१९००

म. ग्रं. सं. ठाणें

विषय — —

सं. क्र.

म. ग्रं. सं. ठाणें

विषय
संगीत

संग्रहालय क्रमांक
१९६

लेखक

पुस्तकाचें नांव पंचे यादी वगैरे

सन
१९००

१९६

संगीत

पत्रें, यादी वगैरे.

ग्रंथ संग्रहालय
क्र. सं. 3e 90

उपोद्घात.

१. राजकारणी पुरुषांनीं मागें ठेविलेल्या ऐतिहासिक गोष्टींच्या संबंधानें जीं पत्रें लिहिलीं व त्यांस जीं पत्रें आलीं तीं आणि ऐतिहासिक व थोर पुरुषांच्या चरित्रांस अनुलक्षून असणारे नानाप्रकारचे जुने किरकोळ लेख आमचेकडे येऊं लागले आहेत. त्या पत्रांचा व किरकोळ लेखांचा इतिहासाच्या कसीं बारीक बारीक गोष्टींचा निर्णय करण्यांत व इतिहासाच्या खांचा खोंचा भरून काढण्यांत मोठा उपयोग होईल. पत्रें लिहिण्याची पद्धति, लिहिणारांचा स्वभाव, तेव्हांची लोकस्थिति इत्यादि प्रकारच्या माहितीचे ही हे लेख द्योतक होतील. यास्तव ते सर्व एका ठिकाणीं निराळे बांधियावे म्हणून "**पत्रें, यादी वगैरे**" असें निराळें सदर घालून त्या खालीं जसजसे ते येतील तसतसे देण्याचें योजिलें आहे.

२. आतां हे पत्रें वगैरे लेख कालानुक्रमानें प्रसिद्ध करणें योग्य होतें. परंतु तसें सध्यांच करणें म्हणजे दुरापास्त आहे. एक तर या लेखांवर शक वगैरे मिती साकल्यें करून दिली नसते. कोठें नुसता वार कोठें नुसती तिथी व महिना इतकेंच घातलेलें असतें. तेव्हां त्यांचा अनुक्रम लाविता येत नाहीं. खेरीज सर्व पत्रें वगैरे लेख आह्मांस मिळाल्यावर त्यांचा अनुक्रम लावण्यास टीक पडणार. परंतु हा पत्रसंग्रह जितका असेल तितका आमचेकडे येणें कठीण दिसतें. आणि तो एकदम सगळाच्या सगळाच आमचेकडे येणें हें तर सुतराम अशक्य आहे. याकरितां सर्व पत्रांदिकांचा संग्रह आमचेकडे येई तों पर्यंत न थांबतां जीं जीं पत्रें, टिपणें मिळतील तीं तीं सर्व जशीं येतील तशीं देऊन त्यांची कालानुक्रमें व्यवस्था करण्याचें काम तूर्त न स्वीकारितां कालांतरावर टाकितों.

३. या किरकोळ लेखांच्या मूळच्या भाषेंत फेरफार वगैरे न करितां बखरीं प्रमाणें जशाचे तसेच छापण्याचें योजिलें आहे. दुर्बोध ठिकाणीं [?] असें प्रश्न चिन्ह करून जशीं अक्षरें दिसलीं तशीं घातलीं आहेत. त्यांचा बोध कोणास झाल्यास इकडे कळविण्यांत यावा, व तसेंच निरनिराळ्या पुरुषांचीं व स्थलांची नांवें येतील त्यांजबद्दलही कांहीं कमी जास्त माहिती मिळाल्यास तीही आह्मांकडे पाठविण्याची एतत्-संग्रह-हित-चिंतकांस आमची विनंती आहे.

४. जुन्या काळच्या पत्रव्यहारांचीं पुडकींच्या पुडकीं पुष्कळ गृहस्थांकडे लोळत पडलेलीं सांपडतील. परंतु तीं मिळण्याचीच मोठी मारामार आहे. या पत्र-व्यवहाराची ऐतिहासिक दृष्टीनेंच काय किंमत असेल ती असेल. बाकी दुसऱ्या दृष्टीनें पाहतां त्यांची कांहीं किंमत ह्या काळीं दिसत नाहीं. तेव्हां हे लेख वाण्यांच्या दुकानांत किंवा कंसरि[illegible] भक्ष्यस्थानीं दवडण्या पेक्षां त्यांचा जीर्णोद्धार करण्याविषयीं त्यांच्या रक्षकांचे मनांत कोणते ही रीतीनें बिंबले तर इति [illegible]चे कामास मोठी अनुकूलता होईल.

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित

स्वामींचे सेवेशीं

विद्यार्थी बाळाजी बाजीराव. नमस्कार विनंति उपरी येथील वर्तमान तागाईत आश्वीन वद्य प्रतिपदा पावेतों स्वामींचे कृपेकरून सुखरूप.

सविस्तर अर्थ मी सेवेशीं विदित केला होता. राजश्री स्वामींचीही मर्जीच राखून एक जशी आज्ञा केली त्याप्रमाणें मान्य करून पुढें स्वामींचे आशीर्वादें परंपार पावूं. विस्तार ल्याहावा ऐसा काय आहे? सारांश स्वामींचीं लेंकरें आहों. आपलेच आशीर्वादें सर्वही उत्तम होईल. वरकड लिहितां विस्तारच आहे. यास्तव उभयतां वेदमूर्तें निवेदन करितां विदित होईल. बहुत काय लिहिणें? हे विनंति.

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री वासुदेव दीक्षित

स्वामींचे सेवेशीं

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष राजश्री

---

१. हे वे० शा० रा० नारायणभट्ट दीक्षित यांचे चिरंजीव. नारायण दीक्षित हे मोठे विद्वान् व तपस्वी ब्राह्मण होते. त्यांस निरनिराळ्या राजपुरुषांनीं इनाम दिलें आहे. काशींतील ब्राम्हणांस सुजाउद्दवळा यानें मोठया संकटांत घातलें असतां तेथील ब्रह्मवृंदाची सुटका करणारे हेच दीक्षित होत. (पेशव्यांची बखर पृ० ७३ पहा) यांशीं व त्यांच्या वंशजांशीं निरनिराळ्या राजपुरुषांचा पत्रव्यवहार राजप्रकरणींही सुरू असे. नारायण दीक्षित हे पुढें काशी येथें कैलासवासी झाले.

यांचे वंशज श्री० रा० यज्ञेश्वर बाळकृष्ण दीक्षित, कायगांवकर, यांजकडून हा पत्रव्यवहार अंशतः आम्हांस मिळाला आहे. याजबद्दल आम्हीं त्यांचे मोठे आभारी आहों.

२. यावरून हें पत्र दोन ब्राम्हणांबरोबर पाठविलें होतें.

शिवराम गोविंद भिडे व सखाराम बापूजी नाईक भिडे व नेमीदास 'अनीपंत [?]. यांजकडे सरकारचा ऐवज येणें तो आणावयासि राजश्री पांडुरंग महादेव व यादाजी दादाजी * दि॥ दादो महादेव यांस फौजतुद्धां व बरोबर उंट नफर २५ पंचवीस देऊन पाठविले आहेत. तर सदरहु ऐवज शहराहून बहुत तजविजीनें रवाना करणें. ऐवज पारखवयासि राजश्री बाबूजीनाईक दि॥ रामाजी नाईक पोतदार यांस पाठविले आहेत. यांचे मारफतीनें ऐवज पारखाऊन शहराहून बहुत तजविजीनें, सुरक्षित-पणें कोंही अटकाव, काजिया न होतां बाहेर काढून देविला पाहिजे ‡ र॥ छ० ६ जमादिलाखर, बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित
स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित असिलें पाहिजे. विशेष, आपण टोंक्याचे मुक्कामीं श्रावण मासचे उत्साहास पुण्यास निश्चयें येतों क्षणोन मान्य केलेंच आहे. त्यास सांप्रत उत्साहाचा प्रसंग आहे. तरि स्वामींनीं स्वार होऊन आलें पाहिजे. अगत्य श्रावणचे उत्साहास यावें. हें विनंति.

पौ ‡ आषाड वद्य ४ रविवार शके १६७७ युवनाम संवत्सरे

वेदमूर्ति राजश्री वासुदेव दीक्षित,
स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान. साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशळ जाणून स्वकीय. लिहिणें विशेष आपण पत्र पाठविले तें पावलें. सविस्तर वर्तमान कळलें. राजश्री जानबा निंबाळकर आले. राजश्री रामदासपंताचे स्नेहाचाच अर्थ सांगितला. तेणें करून संतोष झाला. आम्हींही स्नेहवादें च किती एक विचार मशारनिल्हेशीं बोललों आहों.

---

* दिम्मत=ताबा, पदर.

३. नफर = नग, संख्या.

† रवाना.

४. श्रावण मासचा उत्साह = दक्षिणा वांटण्याचा. पेशव्यांची बखर पृ० ७१-७२ पहा.

‡ पैवस्ती = पत्र दाखल झाल्या मिती अगर तारीख.

५. [?]

६. हा ब्राम्हण गृहस्थ डुप्ले याणें नाझरजंगाचा नाश करण्यास योजिला होता. त्या प्रमाणें त्याणें नाझरजंगाच्या लष्करांत फितूर करून शेवटीं नाझरजंग मारला गेला. नंतर 'राजा रघुनाथ' असा त्यास किताब देऊन डुप्लेनें त्यास सलाबतजंगाचा मुख्य प्रधान केलें. पुढें टीप ७ पहा.

ते सविस्तर लिहितील व बोलतील. याजवरून सविस्तर कळेल. निरंतर सविस्तर अर्थ लिहात असलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंति.

पौ॥ आश्विन शुद्ध ३ बुधवार शके १६७३.

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशी,

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणें. विशेष, गाजुद्दीखान वडील आणि पातशाही सनदे सहवर्तमान येतात. त्यांचे साहियाविषयीं पातशाहानीं सरदारांस बहुत सांगितलें. आह्मांसही लिहिलें आहे. याप्रकारें जाणतां सय्यद लष्करखान यांणीं सलाबत* × × × × विचार तो सांगून ते आलियावर परस्पर बहु होय. कलह-वृद्धि न व्हावी. प्रजा सुखी असावी. याप्रकारें खानास करणें योग्य आहे. मागें खानानीं नागो रामा बरोबर पलीकडील वर्षी सांगून पाठविले होतें त्यांत खानाचा मनोदय गाजुद्दीखानाकडेच स्पष्ट दिसत होता. व रामदासपंताशीं चित्तापासून विमनस्कता, याजमुळें ही तिकडेच अनुकूळ मनोदय होता. सांप्रत मात्र कांहीं संशयांत पडले असतील. आपण त्याचा इतबारी, प्रमाणिक शहरांत असेल त्यापासून लिहून पाठवावें. व आपलें ही पत्र त्याच अन्वयें नाऊन जाव सत्वर आला पाहिजे. प्रसंगीं खानानीं गाजुद्दीखान याजकडे जाहलिया, एक निष्ठेस योग्य। व लाभ ही त्यांत व आमचे स्नेहास ही योग्य, असे तीन अर्थ घडतात. सर्व प्रजांचें बरें होतें व गाजुद्दीखान नबाबाचा वडील पुत्र, आणि पातशाही सनदेसहित येतो, याकडे जाहलियास कोणेविशीं दोष नाहीं. आह्मांस तो जे सरदार करून येतील तें निभावलेंच पाहिजे. व सलाबतजंगासही

---

७. हा निजाम उल्मुल्काचा ज्येष्ठ पुत्र. ह्यानें शिंदे होळकर मार्फत पेशव्यांशीं स्नेहाचें बोलणें लावून दक्षिणचा सुभा सलाबतजंगाकडे होता तो आपणाकडे व्हावा अशी मसलत मांडिली. ह्या मसलतीच्या संबंधानेंच खालीं दिलेलें पत्र पेशव्यानें दीक्षित यांस लिहिलें (इ० सन १७५१।५२

८. सरदारांस=शिंदे होळकर यांस

९. सय्यद लष्करखान हा औरंगाबादचा सुभा गुप्तपणें गाजुद्दीखान याची मदत करीत होता. सन १७५२ च्या एप्रिल महिन्यांत रामदासपंत मारला गेल्यावर ह्यास बुसीनें दिवाण नेमिलें.

* ह्या शब्दापुढील शब्द गेले आहेत किंवा पत्र लिहिणारानें गुप्त कारणासाठीं बळेंच लिहिलें नसावें. अशा ठिकाणीं फुल्या घातल्या आहेत.

१० सन १७५२ मध्यें मोंगलाचा पराजय झाल्यावर ह्याच्या फौजेनें आपसाआपसांत पगाराच्या बाकीवरून जो तंटा झाला त्यांत रामदासपंत मारला गेला. (एप्रिल ता० ७ स० इ० १७५२) याचें व रामदासपंताचें वांकडें होतें.

हेंच योग्य आहे. मागें नासरजंग नबाबाशीं भांडले [ते] काय फळ व काय लौकिक पावले ? बाहेरील कोणी आला तर भांडणें योग्य, घरचे घरीं भांडणें सर्व प्रकारें योग्य नाहीं. याच प्रकारें खानांनीं मसलत × × × कोणी कलहवृद्धीचा उपदेश × × × खास दीर्घ दर्शित्व खमवार [?] करून आपले हातीं घेणें योग्य आहे. आह्मांस तो खानांचा भरंवसा पूर्ण आहे. तथापि नवीन प्रसंग आहे. लिहून उत्तर आणणें योग्य आहे एसीं कांहीं संकलित खानास पत्र पाठविलें आहे. हें जलद पावतें करून सविस्तर उत्तर आणून पाठवावें. तदनुरूप कर्तव्य तें केलें जाईल. छ २९ पावेतों बहुत काय लिहिणें हे विनंति. कदाचित् खान फिरंग्यांचे भरावर जातील तर न जावें. सर्व उमराव तिकडे होतील. फिरंगियाची फुलचरीस संकट, मग नवें सामान कोठें येणार ? व एक फिरंगी सामानानें काय होतें ? ते भर देतील परंतु भरंवसा न मानावयाचा. आचा पूर्व प्रकार कळलाच आहे. हे विनंति.

पै॥ आषाढ शुद्ध ६ सोमवार शके १६७६

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित, स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम तागाईत आषाढ वद्य पंचमी पर्यंत यथास्थित असे. विशेष आषाढ शुद्ध पौर्णिमा मंगळवारचें पत्र पाठविलें तें वद्य चतुर्थीस पावलें, लिहिलें वृत्त सावंत कळलें. दरगूदी कुलीखान यांस पत्र लिहून पाठविण्याचा मजकूर व यांचे विशीं गाजुदीखान याचें पत्र दरगाह कुलीखान यास आणवावयाचा मजकूर लिहिला तो सावंत कळला. त्याजवरून दरगाह कुलीखान यास पत्र लिहून पाठविलें आहे. हें त्यास प्रविष्ट करणें. व याचे विशीं राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे यांस पत्र लिहून पाठविलें आहे. व गाजुदीखान यास पत्र लिहून पाठविलें आहे. तेथूनही पत्र येईल. साद्यांश औरंगाबादेस खुदावतखान व शेख अल्लीखान जुनदी [?] व जमीलबेगखान व अस्सलखान व हशमदुल्लाखान वगैरे आहेत त्यांशीं स-

---

११. नबाबाशें ह्मणे आपला बाप जो निजाम उल्मुल्क त्याशीं.

१२. खान=खानजाद लष्कर खान.

१३. फिरंगी [फ्रांक] हें नांव सर्व युरोपियन लोकांस मुसुलमान लावीत परंतु येथें फ्रेंच उर्फ फ्रांशीस हे होत.

१४. तिकडे ह्मणे गाजुदीखानाकडे.

१५. फुलचरी ह्मणे पांदेशरी. इंग्रजांची व फ्रेंचांची लढाई मद्रासेकडे या वेळीं चालली असून इंग्रजांचा जय झाला (१७५१--५४) त्यास अनुलक्षून हें लिहिणें आहे.

वांशीं राजकारणें करून गाजुदीखान बऱ्हाणपुरास येतांच साऱ्या शहरामध्यें गाजुद्दीखान याची द्वाही फिरवावी; आणि सर्वांनीं गाजुदीखान याजकडे राजकारण लाऊन सामील व्हावें. याप्रमाणें विचारणा होय तें करावें. दरगाह कुलीखान तुह्मांशीं बोलले त्याप्रमाणें त्यांचीं निष्ठेचीं पत्रें आपले नांवें व फेरोजंगाचें नांव घेऊन पाठून देणें. परभारें हीं पत्रें पाठवीत जाणें. वरकड प्रस्तुत बाहेर निघालों. लोक जमा होत आहेत. आठ दहा रोजांत भोंगा पार होऊं. मराठियाशीं जाबसाल आहेच. पहिलें पहिलें लिहून पाठविलें त्याप्रमाणें खानास वरचेवर लिहून तेथून हरएक प्रसंगीं भोजन घेत [?] व तेथेंही सर्व सूत्रें गाजुदीखानाकडे अनुकूल पडत अशीं करावीं. याप्रमाणे लिहून उत्तर आणवावें ता॥ छ २० रमजान. बहुत काय लिहणें लोभ असों दीजे हे विनंति.

पौ आषाढ वद्य ३० बुधवार शके १६७४.

पु॥* वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दिक्षित स्वामीचे सेवेसीं.

विनंति. गाजुदीखान छ ११ रमजानीं नर्मदा उतरून आलीकडे आले, ह्मणून पत्रें आलीं, ह्मणून लिहिलें तें कळलें. पुढें वर्तमान आणखी येत जाईल तें वरचेवर लिहून पाठवीत जावें. भागानगराकडील वर्तमान लिहिलें तें सादंत कळलें. आपले विद्यमानें गाजुदीनखान याजला स्नेहाचा संदर्भ लावून भागानगर प्रांत आपणाकडे करून घ्यावा. मक्ता ह्माला तर करून देतील त्याप्रमाणें वर्षास देतं जाऊं. या प्रमाणें पत्रें आलीं ह्मणून लिहिलें तें कळलें ऐसियास सय्यद लष्करखान आमचे भेटीस सलाबतजंग याजपासून रुसकत होऊन येत आहेत. ते येथें आलियावरि त्यांची आमची भेटि नाहलियावरि जो विचार होणें तो होईल. दरगाहाकुलीखान याजविशीं आपणांस पत्र लिहिलें आहे त्याप्रमाणें पत्रें अगत्य पाठवून द्यावीं ह्मणून लिहिलें तर येविशींचें उत्तर पूर्वीच आपल्यास लिहून पाठविलें आहे. त्याजवरून कळलेंच असेल. आपण लिहिला अर्थ तहकीक करून मागितल्याबद्दल मग सरदारांस लिहून याचा विचार करूं. आलीं तो सर्वत्र ऐकतों कीं फिरंगी[१९] व खान मिळोन फार[१८] डुंझावयाच्या गप्पा मारतात त्यास पुर्ता शोध करून जरूर लिहिंगें.. जरूर गुप्त रितीनें

---

* पुण्यपावन, पुण्यशील, [?]

१६. भागानगर=हैदराबाद.

१७. निरोप घेऊन, निरोपाचीं वस्त्रें मिळून.

१८. तहकीक=पक्का, निश्चयात्मक.

१९. बुशी फरांशीस.

राजकीारण शोध जरूर करून अती त्वरेनें लिहीत असावें. बहुत काय लिहिणें हे विनंति.

---

[1] पे॥ आषाढ वद्य ३० बुधवार शके १६७२.

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दिक्षित स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता॥ छ २४ रमजान पावेतों यथास्थित असे विशेष आपण आषाढ व॥ ५ रविवारचीं पत्रें पाठविलीं तीं दशमीस शुक्रवारीं पावलीं. वृत्त सादर कळलें. सय्यद लष्करखान याचे कबिल्यांचा मजकूर लिहिला तो कळला. ऐसियास सय्यद लष्करखान सलाबतजंग याजपासून निरोप घेऊन आमचे भेटीस येत आहेत. तरि शहराकडे न जातां आमचे भेटीस आले तर उत्तम आहे. कदाचित् त्यांणीं आपले चित्तांमध्यें आणिलें असेल कीं, मराठे सरदार आहेत, त्यांस आपण समागमें घेऊन शहरास जाऊन शहरचा बंदोबस्त करूं. असें म्हणतील तरि आम्ही या प्रमाणें त्यास करूं देणार नाहीं. व शहरास ही जाऊं देणार नाहीं. ते परभारें उपद्रव करून शहरास गेले म्हणजे त्यांचे कबिल्यास काय चिंता आहे ? सुखरूप शहरामध्यें असावें. नाहीं तर त्याचें आमचे सौरस्य व घरोवा आहे त्या रीतीनें म्हटलें तर त्यांचे कबीलें ठेवावयासी एखादें मोतबर स्थल देऊन ठेऊं. चिंता काय आहे ? गुदस्तां सय्यद लष्करखान त्याचे चित्तामध्यें रामदासपंताचे वर्तणुकें करून विपर्यास होताच, परंतु यंदा रामदासपंत वारलियावर सलाबतजंग यांचा पक्ष धरिला आहे; तरि तुम्हीं सय्यद लष्करखान याजला बहुत प्रकारें लिहून पाठवून तो ग्याजुद्दीखान याजकडे संदर्भ लावीत, आमचे विचारा प्रमाणें वर्तत, ते गोष्ट करणें. ये समयीं खानांनी आमचे विचारें न वर्तल्यास तिलमात्र आमचा व खानाचा स्नेह राहत नाहीं, असा भाव तुम्ही दाखविणें खान हजारदां आम्हांशीं ग्याजुद्दीखानाचा प्रकार बोलले असतां रामदासपंत मेले म्हणून आयते वेळेस फिरले तर हें कसें म्हणास येईल ? यांचा स्नेह परलोकीं कामाचा नाहीं. हे विनंति.

श्री.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री दीक्षित[3] बावा स्वामीचे सेवेशीं.

---

२०. कबिला=कुटुंब, माणसें.
२१. [?] उपद्रव?
२२. मातबर=बळकट.
२३. हे दीक्षित नारायण भट्ट पाटणकर हे होत. हे पुढें काशीस जाऊन राहिले.

विद्यार्थी बाजीराव बल्लाळ प्रधान साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ स्वामीचे आशीर्वादें करून यथास्थित असो विशेष. मौजे रांजणगांव पो मजकूर हा गांव खासगत मुकासा आहे तो राजश्री बाबूराव मल्हार यास दिला जाहे. त्यास राजश्री शानाजी जाधव याजपासून चिरंजीव राजश्री चिमणाजी यांणीं बाकीचे ऐवजीं पैका घेतला त्यास दरम्यान तुह्मांच आहां. तुह्मीं आपले हातें कारभार विल्हेस लाविला आहे. हल्लीं मौजे मजकुरासि वगैरे गांवासि कटकट करणार ह्मणून कळलें. स्वामींनीं दरम्यान होऊन त्याजकडील कारभार चिरंजीवापासून फैसल करून घेतला असतां हल्लीं ते कटकट करणार. ही गोष्ट उत्तम आहेशी नाहीं. स्वामींनीं त्यास माकूल [?] करून सांगणें ते रीतीनें सांगावें आणि मौजे मजकुरास कटकट न करितां अमल सुरळीत चालेल तें करावें. अगोदर स्वामीस लिहिलें असावें यास्तव लिहिलें आहे. तरि त्यास फजित करावयाचें तें करून मौजे मजकुराचे वाटेस न जात तें करणें. लोभ असों दिजे हे विनंती.

सदर्हु अस्सल पत्र डुबेरकर बर्वे यांजपाशीं आहे.

श्री

वेद-शास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी चिमणाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। मार्गशीर्ष शुद्ध पंचमी जाणून स्वकीय लिहीत गेले पाहिजे. विशेष. वेदशास्त्र संपन्न राजश्री नारायण दीक्षित यांस रुपये ₹१५०००० पंधरा हजार राजेश्री लक्ष्मण शंकर यांजकडून देवविले आहेत. मशारनिल्हे प्रांत बुंदेलखंड येथें गेलियावर वसुल करून दीक्षितांकडे श्रीस पावते करतील. तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें असे. ,,बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती.

मार्गशीर्ष वद्य २ शके १६६२ रौद्रनामसंवत्सरें.

श्री

तीर्थरूप वेद-शास्त्रसंपन्न राजश्री दीक्षित स्वामी वडिलांचे सेवेशीं.

अपत्य चिमणाजी बल्लाळ व बाळाजी बाजीराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम आश्विन वा। ९ मुक्काम कसबे पुणें. स्वामींच्या कृपेंकरून यथास्थित असे विशेष—स्वामीनीं ज्येष्ट शुद्ध १० चें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर अर्थ कळला. सारांश स्वामींचे आशीर्वादाचा सर्व आमचा विचार आहे स्वामींच्या आशीर्वादा पेक्षां दुसरें दैवत जाणत नाहीं.

संसर्गदोषाचा परिहार करावा. याविशीं आज्ञा लिहिली तर अवश्य स्वामीचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक करूं.

कोणी मंत्रशास्त्री भेटतील आणि कांहीं अनुष्ठान करा म्हणतील तर ते गोष्ट न करणें, कोणाचा मंत्र न घेणें, शिवपूजन व विष्णुपूजन व गायत्रीचा जप व वेदोक्त अनुष्ठानें करीत जाणें, म्हणून लिहिलें; तर आज्ञे प्रमाणेंच करीत जाऊं. स्वधर्म करून आचरण करणें, कोणीं दुराचरण असतील त्यांस शासन करावें म्हणून लिहिलें; त्यास अवश्यमेव लिहिल्या प्रमाणेंच वर्तणूक करूं.

रायांचें[1] वैभवाची वृद्धी व्हावी यास्तव आपण बहुत श्रम आज पावेतों केले, पुढें जोंपर्यंत आपण आहें तोंपर्यंत तुमच्या कल्याणास्तव श्रम करावयास अनुमान न करूं म्हणून लिहिलें; तर राऊ स्वामींस मातापित्रांचेठायीं मानीत होते, त्यांच्या कल्याणास्तव स्वामींनीं श्रम केले तर ते गोष्टीचें अपूर्व काय आहे? बालकाचें कल्याण इच्छावें हें मातापितरांस सांगावें लागतेसें नाहीं. पुढें ही आह्मी लेकरें स्वामींचीं आहों. आमचें कल्याण व आमची वृद्धि उत्तम कर्मांच्या ठायीं दिवसेंदिवस [लागून] यशाची अभिवृद्धि होय, ऐसा आशीर्वाद स्वामी देतीलच, व देवाची प्रार्थना करतीलच यांत संशय नाहीं

राजश्री लक्ष्मण शंकर, बुंदेलखंडांतील, त्यांचे हातून स्वामींकडे खर्चास रवाना करवितों. तो ऐवज स्वामींपाशीं पावता होईल, तो घेऊन उत्तर त्यांजपाशीं द्यावें. ऐवजाचा अंगीकार करावा. माघारां सर्वथा पाठवूं नये.

अकरा कावडी रामेश्वरास पाठवाव्या म्हणून आज्ञा लिहिली; एंशिवास स्वामींनीं[*] तेथें ब्राह्मण योजून तेथूनच कावडी अकरा रामेश्वरास रवाना कराव्या. त्यास पैका पडेल तो लिहून पाठवावा. पाठवून देऊं.

राज्यप्राप्तीकरितां पूर्वी सत्तावीस लक्ष दूर्वा वाहिल्या आहेत. बाकी त्याहींत्तर लक्ष राहिल्या आहेत त्याचा विध राजश्री वासुदेव[3] दीक्षितांस ठावका आहे. तेविशीं त्यांस सांगितलें असे. ते दूर्वा देवास वाहतील.

चिरंजीव नानास[4] आमची आज्ञा मान्य असें असेल तर, त्यांचे पत्र आज

---

१. रायाचें = रावाचे = बाजीरावाचे. बाजीरावास या पत्रांमध्यें पुष्कळ ठिकाणीं राया, राऊ किंवा राव असें म्हटलेलें आढळतें.

* म्ह० काशीहून.

२. पृ० ८ पत्र २ पहा.

३ हे नारायण दीक्षित यांचे चिरंजीव. नारायण दीक्षित काशीस गेल्यानंतर वासुदेव दीक्षित हे दक्षिणेंत संस्थानचे मालक झाले.

४ बाळाजी बाजीराव.

पावेतों आह्मास आलें नाहीं त्यांचें पत्र आलियावर त्यास पत्र पाठवीत जाऊं, ह्मणून लिहिलें ; नर आज पावेतों रायांनीं स्वामीचे आज्ञेचें उल्लंघन न केलें: व आह्मांस स्वामींचे आज्ञेहून दुसरें दैवत नाहीं. तोच विचार चिरंजीव नानाचा आहे. स्वामींची आज्ञा म्हणजे केवळ दैवत असेंच मानून वर्तणूक करितील. सांप्रत त्यांच्या आमच्या नांवाचें एकच विनंति-पत्र लिहिलें आहे. स्वामीनीं त्यांस आम्हांस एकच आशीर्वाद-पत्र पाठविलें तरी कार्यास येईल. चिरंजीव नानाचा आमचा काडी इतका दुसरा विचार आहे असें नाहीं.

आजपावेतों जालें तें नालें, पत्र दिलें होतें तें फिरोन घेतलें, पुढें नवें जें प्राप्त होत जाईल त्याचा दुहोत्रा घेत जावा म्हणोन लिहिलें ; तर दुहोत्राचा करार करावा असें काय आहे ? सारांश मीळ-जोड स्वामींच्या आशीर्वादें होईल. वरकड स्वामींची सेवा जे प्रकारें करणें ते प्रकारें करण्यास अंतर सर्वथा होणार नाहीं.

सारांश स्वामींचे आज्ञेचें उल्लंघन केल्यास कोण उत्तम फल पावेल ? आह्मांस तो स्वामी वेगळें दुसरें दैवतच नाहीं. हेच बुद्धि वडिलांचे आशीर्वादेंकरून स्थिर राहील हा सिद्धांत आहे. तेणेंकरून सर्व उत्तमच होईल. यांत संशय नाहीं. कृपा पाहिजे. हे विज्ञापना.

---

[१२] श्री

वेदशास्त्र-संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं:—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष—काल तुम्हीं गेलेस [त ?] यास तुमची त्यांची बोलीचाली होऊन काय मजकूर जाला, हें तुह्मांकडून कांहींच लिहून न आलें यास्तव आजि येथें मुक्काम करून हें पत्र तुह्मांस लिहिलें असे ; तर त्याचा जाबसाल घेऊन बोली ठीक जाली असली तर तुम्हींच लौकर येणें, अथवा काय मजकूर जाला असेल तो लिहून पाठविणें त्यासारखा विचार केला पाहिजे. आजि राऊ[५] तुमचें कांहीं

५. या मजकुरावरून हें पत्र बाजीराव मरण पावल्या नंतर लौकरच लिहिलें असावें. याजवर चिमाजी आपाही लौकरच कैलासवासी झाले.

६. दीक्षित याजकडून पेशव्यांनीं कांहीं ऐवज कर्जाऊ घेतला असावा असें याजवरून दिसतें.

तरी लिहिले यावें. परंतु न आले यास्तव मुक्काम केला. आतां पत्राचें उत्तर सत्वर पाठवणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पौ माघ शुद्ध ४ रविवार शके १६७२.

---

[१३] श्री

वेदशास्त्र-संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीः—

विद्यार्थी बाळाजी बाजीराऊ प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथिल क्षेम ता॥ आषाड वद्य १३ पावेतों यथास्थित असे विशेष—आपण पत्र पाठविलें तें पावले. दरगाह कुलीखान याजविशीं कित्येक प्रकार लिहिले व गाजुदीखान व राजश्री मल्हारराव होळकर व राजश्री जयाजी शिंदे यांस पत्रें लिहून पाठवावीं ह्मणून लिहिलें; तरि येविशीं पूर्वी आपण पत्र लिहून पाठविलें होतें त्यावरून पूर्वीच पत्रें लेहून पाठविलीं आहेत. तुह्मींही गुप्त प्रकारें सरदारांस पत्र लिहिणें. जे जे ये समयीं चाकरी करून दाखवितील त्यांचें बरेंच होईल यांत संशय नाहीं. आपण याचअन्वये निशा करावी. भागानगराकडील आपण वर्तमान लिहिलें. पुढेंही जरूर तिकडील अंतर्बाह्य ठिकाणीं लावून त्वरेनें पावते करावें. हे दिवस कामाचे फार आहेत, व नर्मदा गाजुदीखान उतरले किंवा नाहीं, हेंही जलद लिहावें. कोण इकडे तिकडे हें मनास आणून लिहीत असावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पौ आषा० श्रावण शुद्ध १ शके १६७४.

---

[१४] श्री

वेदशास्त्र-संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं:—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान—साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत पौष बहुल पंचमी गुरुवारपर्यंत स्वामींचे आशिर्वादें

---

७. हें पत्र कोणत्या कामाच्या संबंधें लिहिलें हें नीट समजत नाहीं.

८. निजाम उल्मुल्काचा ज्येष्ठ पुत्र जो गाजुदीखान यास हैदराबादची गादी मिळवून देण्याच्या मसलतीस अनुलक्षून हें पत्र आहे.

९. निशा = खाली, खातरजमा.

१०. भागानगर = हैदराबाद.

११. हें मनास आणून = याजवर लक्ष ठेवून.

१२. बहुल = कृष्ण, वद्य.

करून यथास्थित जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष—आपणांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरि सविस्तर लिहीत जावें. इकडील वर्तमान तर नवाबांनों[13] फिरंगी[14] याच्या विद्यमानें आह्मांशीं सल्ला केला. हें दुःख सर्वां अमिरांस होऊन बिघाड करावा हे इच्छा करितात. परंतु जीव कोणांत आहे? सर्वही निर्मल्य! पदरचा पैका वेंचावा, जातीनें हिंमत धरून करावेंच करावें, हे गोष्ट काळें करून कोणांतही राहिली नाहीं. खान आदिकरून सर्व[15] * * * * *

बाबुजी[16] नाईक मातारियास जाऊन आईसाहेबांचे[17] विचारांत मिळाले. आमचा अपकर्ष इच्छितात. उपद्व्याप करितात. आमच्या सरदारांकडे येऊन, बुद्धिभेद करून त्यास सातारियास न्यावें, या विचारियास आले होते. परंतु सरदार गेले नाहीं. नाईक माघारे गेले असो. नाईकांचेविशीं आमचे चित्तांत तो कांहीं नवतें. असो. त्यांहीं होऊन गडबड मांडिली आहे. ते आपले कर्मानुरूप फळ पावतील. वरकड आईसाहेबांचा विचार तरि आमचे न्यून पहातात. सरदाराशीं भेदभाद करितात. मोंगलाईंत राजकारणें करितात. कोणें प्रकारें आमचें वाईट व्हावें, या विचारांत आहेत. ईश्वरच आमच्या बऱ्यावर असल्यास त्यांणीं वाईट इच्छून होणें काय? व वरकडांनीं पांचपेंच करून होणें काय? चिरंजीव राा दादास फौजेनिशीं गुजराथेस रवाना केलें ते गंगातीरांनींच गेले असतील. तिकडील मुलकाचा बंदोबस्त करून पुढें जातील. आह्मी ह र प न व ली [?] समीप पावलों. श्रीरंगपट्टण, सौंदे, बिदरूकी [हीं] स्थळें पैकियाचीं आहेत. एकाएकीं भलती गोष्ट आम्ही करीत नाहीं. कां कीं मागील पेंचपांच बहुत आहेत. मागील अर्थ पाहून नसजसा विचार करणें तसा करितों. आपले

---

१३. नवाब = सलाबतजंग.

१२. फिरंगी = फ्रेंच सरदार बसी.

बुसीचें हैदराबादचे दरबारांत फार प्राबल्य असे.

१५. येथें मूळांत सुमारें दीड ओळ मजकुराची जागा कोरी टाकिलेली आहे.

१६. बारामतीकर. हे पेशव्यांचे नातलग असून धनकोही होते. बाजीराव मरणपावल्यावर बाबुजी नाइकास पेशवाई द्यावी अशी रघुजी भोसल्यानें शाहूच्या दरबारीं बरीच खटपट केली, परंतु ती सिद्धीस गेली नाहीं. तेव्हांपासून नाईक व भोंसला हे दोघे ही बाळाजीचा द्वेष विशेष करूं लागले.

१७ आईसाहेब = ताराबाई. शाहू वारल्यानंतर हिचा नातू रामराजा सातारच्या गादीवर बसला. परत बाई मोठी खबरदार बायको असल्यामुळें स्वतां राज्यकारभार पाहवा व पेशव्यांची सत्ता काढून टाकावी झणून तिणें बरींच ढवळाढवळ केली. ह्या गोष्टींस उद्देशून वरील लेख आहे.

१८. गंगा = गोदावरी. ही दादांची सन १७५३।५४ मधील स्वारी असावी.

११. यावरून हें पत्र कर्नाटकीं स्वारीस गेले असतां लिहिलें असें होतें.

आशीरवादें करून सर्व शत्रु शमता पावोन जो लाभ होणें तो होईल. चिंता नाहीं. स्वामींनीं तिकडील वर्तमान निरंतर लिहीत जावें. यथार्थ वर्तमान व अति-विशेष अनाहितकारी जें असेल तें जरूर ल्याहावें, व चिरंजीव दादासही ल्याहावें. सर्व स्वामींचे आशीरवादें नीटच होईल. आपणही तनविजीनें संभाळीत जावें. छ० १९ रबिलावल हे विनंती.

पौ माघ वद्य १३ शुक्रवार शके १६७४ अंगिरानामसंवत्सरे.

---

[१५] श्री

वो. राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराऊ प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आह्मीं करनाटक कचेश्वरींहून ज्येष्ठ शुद्ध १३ पूर्णियास आलों. आपण श्रीहून कधीं आला तें वर्तमान लिहिलें नाहीं. चिरंजीव राजश्री दादाकडील शहरीं व आपली वातमी काय आली असेल तो व सलाबतजंग कोठे आहेत, कोणीकडे जाणार व दिल्ली-कडील वर्तमान, येणेंप्रमाणें सविस्तर लिहून पाठवावीं. कृपा-पत्र न आलें असें नसावें हे विनंती.

पौ ज्येष्ठ वद्य ७ बुधवार शके १६७६.

---

[१६] श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक नमस्कार विनंती उपरि येथील कुशल लिहित गेलें पाहिजे. विशेष आपल्या भेटीस बहुत दिवस जाले. भेटीची इच्छा आहे. आह्मी टोंकयाचे रोहोकें येतों. आपणही तेथें आलें पाहिजे. येतेसमयीं सैद लष्करखान याचे दिवाण राजश्री मल्हारपंत यासही समागमें घेऊन आलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पौ फाल्गुन वद्य १ गुरुवार शके १६७६ भावनाम.

---

[१७] श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक नमस्कार विनंती उपरि

येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष जीवनराव केशव या समागमें खानीनीं सांगून पाठविलें आहे मुस्सा बुस्सी आदिकरून सर्वही येथील अमीर आमची आरजो करितात. कारभार करावा म्हणोन इच्छितात. एक आपली मर्जी असल्या हें कार्य करूं. त्यांस हैदरजंग व मुस्सा बुस्सी यांस पत्रें पाठवावीं कीं, खानास वकील किंवा कारभार सांगावा. ऐशास जीवनराव परशराम महादेव यांचे निसबतीचें शहाजवानखानाशीं केवल ममतेंत. यांशीं खान या गोष्टी कशा बोलतील हा संदेह प्राप्त नाहाला. यास्तव आपणास लिहिलें असे. तरि खानाशीं हा मजकूर तजविजीनें करून या गोष्टीचा शोध बारकाईनें द्यावा. व लेहून पाठवावें. तेणेंप्रमाणें येथें करणें तें केली जाईल. त ह कीं मस ल [?] अर्थ जरूर लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणें हे विनंती—

पौ ज्येष्ट शुद्ध १५ सोमवार शके १६७७.

---

[१८] श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेन नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत गेलें पाहिजे. विशेष सैद लष्कर खान याचे मजकुराचीं पत्रें नवाब सलाबंतजंग मुस्सा बुस्सी व शाहाजवानखान यांस पाठविली होतीं त्यांचीं उत्तरें आलीं. त्याच्या नकला पाठविल्या आहेत. त्या पहाव्या व खानास ही दाखवाव्या. उत्तर कोणें प्रकारें पाठवावें हें पुसून लिहून पाठवावें. व खानास पत्र लिहिलें आहे, तें प्रविष्ट करावें. खानाचे साहित्याविशीं मुस्सा बुस्सीस पत्रें पाठवावीं, तेथें सर्व यास अनकुल आहेत म्हणोन लिहिलें; ऐशियास खानाविशीं मनापासून अंतस्थ सर्व प्रकारें साहित्य पत्रें व बोलणें होत आहे. परंतु सांप्रत पत्रें आलीं तीं पाठविलीं पुढें ज्याप्रकारें तुम्हीं तजवीज योजून ल्याहाल त्या प्रकारें लिहून पाठऊं. चित्त शुद्ध सत्य भाषण तेथें याविशीं नाहींचसें दिसतें. परशरामपंतही नीट नाहींत म्हणोन लिहिलें तेंही यथार्थच आहे. परंतु सांप्रत परशराम महादेव ही हुजूर येत आहेत. सांप्रतचा फिरंगी याचा भाव खराखुरा कसा खानाविशी आहे ?

पौ श्रावण वद्य १० शके १६७७ युवनाम संवत्सरे

---

[१९] श्री

वेदमूर्ती वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती. येथील वर्तमान नारयणभट सांगतील. राजाजी स्वभानें कुटील बोलतात. तो भरंवसा येत नाहीं. भेट इमान सर्व विध जालें. परंतु परिणाम कठीण दिसतो. पांचा लक्षांची जागीर द्यावयाचा करार जाला. देतील तेव्हां खरें. त्यांणीं जागीर दिली, दाभाडियांचा आभिमान सोडिला, तर आम्ही त्रिंबक देऊ. सारांश दैवी मानवी रीतीनें पाहतां काल कठीण आहे. सर्व स्वामीचे आशीर्वादें उत्तम होईल. पत्र पाठवीत जावें. जर जा ल [?] सलूख शेवटास गेला तर येथून कूच होईलं. आपण भेटीस यावें. कृपा केली पाहिजे. हे विनंती.

फेरिस्त नंबर २४८.

---

[२०] श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव नमस्कार विनंती उपरि येथील वर्तमान तागाईत आश्वीन वद्य प्रतिपदा पावेतों स्वामीचे कृपें करून सुखरूप.

सविस्तर अर्थ श्रीं सेवेशीं विदीत केला होता. राजश्री स्वामींचीही मर्जीच राखून आलों. जशी आज्ञा केली त्याप्रमाणें मान्य करून पुढें स्वामींचेच आशीरवादें परंपार पाऊं. विस्तार ल्याहावा ऐसा काय आहे? सारांश स्वामींचीं लेंकरें आहों. आपलेच आशीरवादें सर्वही उत्तम होईल. वरकड लिहितां विस्तारच आहे. यास्तव उभयतां वेदमूर्ती निवेदन करितां विदित होईल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

[२१] श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री गोविंद दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार. विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जावें. विशेष तुह्मापासून सरकारांत कर्ज घेतले मुद्दल रुपये ५०००० पन्नास हजार यांचें व्याज दरमहा दरसदे रुपया १ एकोला बिनसूट प्रमाणें करार केलें असे. जाले मुदतीचें व्याज व मुद्दल हिशेब करून द्येऊं. मिती माघ वद्य १ प्रतिपदा शके १६८२

विक्रम नामसंवत्सरे रा॥ छद्र २६ जमादिलाखर सुा॥ इहिदे सीतैन मया व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

[२२] श्री.

वेदशास्त्र संपन्न राजश्री गोविंद दीक्षित स्वामींचे सेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष तुह्मांपासून कर्ज घेतले मुद्दल रुपये २५००० पंचवीस हजार. यांस व्याज दरमहा दरसदे रुपया १ बिनसूट प्रमाणें करार केला असे. जाहाले मुदतीचे व्याज व मुद्दल हिशेब करून एका महिन्यानें ऐवज पावता करूं. जाणिजे. छ. ६ सवाल वैशाख शुद्ध ८ अष्टमी शके १६८३ वृषानाम संवत्सरे सुा॥ इहिदे सीतैन मया व अल्लफ हे विनंती.

---

[२३] ॥ श्री ॥

वेदमूर्ती राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे शेवेशीं—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार. विनंती. आपलें पत्र बहुत दिवस येत नाहीं. मागें सरदारांस पत्रें गेलीं त्याचा जाब आला असला तर पाठवा. व तिकडील भाय कर्तव्य जरूर ल्याहावें. मागें आपण लिहिलें तें आह्मीं संदिग्ध मानिलें. अखेर आपण लिहिलें तें जाहालें. या उपरही वर्तमान असलेलें तें लिहीत असावें. मंगळवार तिसरा प्रहर हें विनंती.


फेरिस्त नंबर ५५६.

---

[२४] ॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेसी—

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असले पाहिजे. विशेष, आलीकडे आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी ऐसें नसावें. सदैव आपणांकडील वर्तमान लिहीत जावें. आपला व खानचा स्नेह व रावता बराच आहे. व जे ही[?] मुत्सदी यांचा स्नेह व रावता असेलच. नवाब बाहेर निघाले. पुढें म-



नसुत्रा काय करणार, तें अंतर्वाह्य वर्तमान सर्वही आपणास कळतच आसेल.. तर सर्वदा लिहीत जावें. कळावें. आमचें पत्र येईल तेव्हांच उत्तर पाठवावें असा अर्थ चित्तांत आणितां, अंतर वर्तमान लिहितां. [तर] आळस न करावा. बहुत दिवस पत्र येत नाहीं असें नसावें. हे विनंती.

---

[२५]

श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री नारायण दीक्षित पाटणकर स्वामींचे सेवेशीं— विद्यार्थी बाळाजी बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती येथील कुशल ता छ १४ रबिलावल जाणोन स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष स्वामींनें मथुरे सन्निध धर्मकृत्यास दहा गांव मागितले. त्यास तेथें आपला अंमल दैसला झणजे दहा गांव तुम्हीं मागाल ते इनाम करून देऊं. सुरु सितसल्लासेन मया व अलफ्. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

---

[२६]

श्री

सहस्त्रायु चिरंजीव विजयीभव राजमान्य राजश्री बाळाजी बाजीराव प्रधान यांप्रति श्री वाराणशीहून नारायण दीक्षित अनेक आशीर्वाद उपरी येथील क्षेम मार्गशीर्ष वद्य १३ जाणोन समस्त सुखरूप असों विशेष. तुमचें पत्र आलें. यावोन बहुत समाधान जालें. विशेष. तुमची व चिरंजीव वासुदेव दीक्षितांचीं भेट जाली. हें वर्तमान दीक्षितांहीं लिहिलें जे, " बहुत सन्मान केला. धाटावरून पुढें मनुष्य पाठवून बलावून सर्व सविस्तर वर्तमान सांगितलें. बहुत सत्कार केला." तरि [यांत] अपूर्व काय आहे ! हें तुह्मांस योग्यच आहे. न करतां तर अपूर्व !

यानंतर ऐकितो कीं जे सर्वांस क्रोधें आहांत. तर ते सर्व तुमच्या वडिलांपासून सेभतीस आहेत. त्यांचा अन्याय जाला [तर] तुह्मीं क्षमा करावी हें तुह्मां योग्यच आहे. बहुतसा अतिशय न करावा.

यानंतर तुमच्याविषयीं आपण जे ईश्वराची प्रार्थना करायाची ते करीतच आहों. तुह्मीं ह्मणाल जे लोभमुळें करितेत तर ईश्वर जाणे. कैलासवासी बाळांजीपंतांपासून आमचें त्यांचें चालत आलें. आणखी आमच्या वचनाचा विश्वास असे. त्यापेक्षां तुमचे तीर्थरूपांची निष्ठा उभयतांच्या आमच्या स्थळीं

---

२०. बाळाजी विश्वनाथ.

असे, जे तीर्थरूपासारखे मानीत असत. आह्मीं क्रोधें करून नाना प्रकारें रागीजोन् पत्रें लिहीत असों. परंतु त्यांस क्रोध तिलमात्र येत नसे. आणली आपणही त्याजकारितां श्रम केले ते ईश्वर जाणे. त्यापेक्षां 'तुमचें उत्कृष्ट नांव व्हावें ऐसा ईश्वरें आह्मास दृष्टांत जाला आहे. परंतु तुह्मीं कारभाराविषयीं अत्यंत सावध रहाणें. कोणे गोष्टीची चिंता न करणें. तुमच्या पित्याच्या स्थळीं ममता होती त्यापेक्षां तुह्मांवर अधिक आहे. बरें. हेच ईश्वराजवळ प्रार्थना करितों जे यांचें उत्कृष्ठ चालो. आणखी काय लिहावें ?

यानंतर 'आमच्या सोवतीस दहा वर्षें रामाजी केशव आहे. आमचा म्हणवितो. त्यास खानदेशचे महाल पहिले कोणी न करी तेव्हां आह्मी या ब्राह्मणास देवविले. त्यास पांच साहा वर्षे चालत होते. त्यास एका महापुरुषानें आपलें पुण्य खर्चून मामला काढिला. त्यास दोन तीन वर्षें तो ब्राह्मण आमच्याच आशेनें राहिला आहे. यंदा तुह्मीं देणारच होतां हें दीक्षितांहीं आह्मांस लिहिलें होतें. त्यास आतां गतवर्षीं ज्यास महाल होते त्याणें चढविला, परंतु तोटा आला. त्याजवर आपांहीं त्यांस वीस सहस्र सूट दिल्ही असतां यंदा सोळा सहस्र चढकरून मामला त्याणें केला. बरें तुमचें कार्य जाहालें. तें हे आह्मांस समाधानच आहे. परंतु तेच महाल एक वेळ त्या ब्राह्मणास करून द्यावे, हा हेत आमचा आहे याकरितां लिहिलें असे. सुज्ञाप्रति बहुत काय लिहिणें ? येथें वैशाखमासीं पंचपक्वान्नांचें लक्ष भोजन करावयाचा प्रारंभ करून मग कार्तिकमासापर्यंत वाचलों तर एकवेळ त्या प्रांतास सिंहस्थास गोदा स्नानकरून, उत्तम लक्ष भोजन गोदातिरीं करून, सर्वांच्या भेटी घेऊन यावें. दर्शनानंतर सर्व विदित होईल. हे आशीर्वाद.

---

[२७] श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं:—

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित गेलें पाहिजे. विशेष. कलमें येणें प्रो—

कैलासवासी राव यांनीं कैलासवासी तीर्थरूप नाना दीक्षित यांस प्रांत मथुरा सुटल्यावर दाहा गांव देऊं केले.[२१] आहेत ते हल्लीं देवावे म्हणोन तुह्मीं विदित

---

२१. हे शिफारस केलेले रामजी कोण ?

२२. वर पत्र [२५] पहा.

केलें. ऐशास तीर्थरूपांनीं थोरले दीक्षितांस लेहून दिल्हें आहे त्याप्रों प्रां मथुरा हस्तगत जाल्यावर दाहा गांव नेमून देऊं. १

प्रां गुजरस्थ आपणाकडे जाली आहे थोरले दीक्षितांचे दैवत श्रीकृष्ण द्वारका क्षेत्र आपणाकडे जालें आहे. तेथें शंभर ब्राह्मण भोजन नित्य घालावें ऐसें चित्तांत आहे. त्याचे खर्चास या प्रांतीं गांव नेमून द्यावे म्हणोन तुम्हीं विदित केलें. ऐशास आम्हीं पुणेयास आल्यावर पांच हाजाराचें गांव वसुली सरकारांतून नेमून देऊं. १

येणेप्रमाणें दोन कलमें करार केलीं असत. सदरहू प्रों होतील. रा॥ छ० २५ जमादिलावल सुमा अर्बा खमसेन मया व अलुफ. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

---

[२८] ॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामींचे सेवेशीं —

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष स्वामींनीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. लिहिला अर्थ सर्व कळला. तीर्थस्वरूप राजश्री नानासाहेबीं पत्रें आपणाकडे रवाना केलीं तें पण अजुरेदार[२३] कासिदा[२४] हरी आम्हांकडे पाठविलीं तें पावोन लेखन अर्थ कळला. त्याचीं प्रत्योंतर लेहून पाठविलीं आहेत. तीर्थरूपांकडे रवाना करावीं. आपल्याकडील वर्तमान वरचेवरि लिहीत जावें. छ २१ जमादिलावल. बाबुजी नाइकांकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. सर्वदा वर्तमान लिहीत जावें. येथील वर्तमान तर अहमदाबाद[२५] झुजत आहे. आपल्या आशीर्वादें लौकरच येईल. हे विनंती. काशिदास कांहीं दिलें नाहीं हे विनंती.

पो. छ १३ जमादिलाखर सन ११६२ चैत्र शु॥ १५ मंगळवार.

---

[२९] श्री

श्रीमंत वेदशास्त्र राजश्री बाबा दीक्षित स्वामीचे सेवेशीं——

आज्ञा धारिक खंडोजी अरगडे दंडवत विनंती विज्ञापना ऐशीजे येथील कुशळ तागाईत छ. ५ माहे शाबान मुक्काम बुंदी कोट जाणोन

---

२३. अजुरदार = मजूर भाडेकरा.
२४ काशिदा, कासिद = जासूद, हरकारा.

२५. सन इ० १७५२ सालीं वेढा घालून अहमदाबाद शहर रघुनाथरावांनीं सर केलें.

लेखनाज्ञा केली पाहिजे. याजवर इकडील वर्तमान तर खिचीचे[२६] निम्मे मुलुख लुटून व तुंदी कोटियाचे[२७] अद्याप चुकले नाहीं. एका दोन रोजांत चुकणार. दहा बारा लक्ष पर्यंत चुकणार आहे. बुंदीवर मुक्काम आहे. पुढें जाटाचे मुलखांत जाणें आहे. जाट हि त ल पुरावर. याजवर गोपाळराव बर्वे आहेत पुढें त्रिनीत यांचेंच फौज आहे. पुढें जयनगराचे सुमारें आमची फौज जाणार आहे. जयनगर [ब] हे एकत्र होऊन जाणार आहे. 'जाटाचें पारपत्य करूं ऐसें ह्मणतात रा॥ तुकोजी होळकर हे समागमेंच आहेत. यांची त्यांची भेटी कु र ई वर झाली. शिंदे तों उदेपरास होते. इकडे येणार आहेत. आठा पंधरा दिवसां एक होतील. प्रांतर[२८] अली गोवर पथाव्याचीं [?] पत्रें आलीं आहेत. तें व उनवगीर गोंसावी यांचीं पत्रें आलीं आहेत कीं, "तुह्मीं आह्मी मिळून जाटाचें पारपत्य करून घेऊं." त्यास माधोसिंगचा[२९] पुत्र ह्मणतो कीं, "तुह्मीं जाटाचें पारपत्य करावें. तुह्मांस पन्नास लक्ष रुपये देऊं. तुह्मीं व शिंदे होळकर मिळोन वाटून घेणें." उदेपुराची मामलत चुकली आहे. पुढें जाटाचे तोंवर राजश्री शिवाजी विठ्ठल व गंगाधर गोविंद आहेत. बाळाजी गोविंद[३१] यांची मामलत चुकली. राजश्री विश्वासराव झांशीकर पुण्यास आले आहेत यांची मावक[?] फसली आहे. रा० गोविंद शामराव गोरे किल्ले आहेत. कळलें पाहिजे. या प्रांतीचें वर्तमान तर स्वामीस, विदितच असेल. चंबेल उतरून पार झालों आहों. आठा पंधरा रोजांत जाटाची गांठ पडेल. जयनगरास जात आहों. इकडे मागाहून शिंदे येणार आहेत. एकत्र होऊन जाटावर जाणार. स्वामीस कळलें पाहिजे. आमचीं मुलें माणसें स्वामीच्या आज्ञेंत केलीं आहेत. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

[२०] ॥ श्री ॥ पै० पौष व० ८ गुरुवार.

श्रीमंत वेदशास्त्र संपन्न दादा दीक्षित यांजे कायगांव प्रांत गोंडापूर स्वामीचे सेवेशीं—

अपया समान चरणरज आज्ञाधारक खंडोजी अरगडे मुक्काम ह्मसिली प्रांत बुंदीकोट जाणोन स्वामीचे आशीर्वाद करून छ० ७ माहे शाबान ऊर्फ माहे मार्गेश्वर पर्यंत शरीरेंकडून सुखरूप असों विशेष. येथील वर्तमान तर हिंदु-

---

२६. खेचिवाडा.
२७. चुकले नाहीं = निकाल झाला नाहीं.
२८. प्रयामकर. शहाअलम दुसरा प्रयागास स० इ० १७७० पर्यंत होता.
२९. माधवसिंग, जयनगरचा राजा.
३०. 'शिदाजी' असेंही होइल.
३१. बाळाजी विठ्ठल [?]

स्थानचीं फौज येथें स्थित आहे. खेचिवाडा यांत छावणी करून दोन महिने राघोडा वगैरे किल्ले खेचीचे अर्धे घेऊन राजा आपले दस्तांत आणिला. त्याजपासून कांहीं खंडणी गुदस्तांपैकीं घ्यावी. त्यास राजा [कडून] रा॥ तुकोजी होळकर यांचे विद्यमानें कांहीं थोडी खंडणी चुकली. त्यांत हल्लीं घोडे व हत्ती दोन असे भरणा करून दिला. बाकी नक्त द्यावे. त्यास समागमेंच तुकोजी बरोबरच आहेत पुढें झाडून खंडणी आलियासि तो आपले मुलखास जाईल. बाकी अरूप किल्ला मोतीवार दिला. त्याजखालें दो लक्षांचीं जमाबंदी आहे. आणि कांहीं तुकोजीकडे किल्ले ठाणें दोन तीन बसले आहेत. वर्षासण खंडणीपैकीं मुलुख दिला आहे कळावें. दुसरें, भुपाळचीं खंडणी घेतली. पुढें बुंदीकोट येथीलही मामलियत रा॥ तुकोजी होळकर यांचे विद्यमानें चुकली आहे. शिंदाही आठ पंधरा दिवसांत येऊन पोंचतो. उदेपूरची त्याणें खंडणी साठ लक्ष रुपये घेऊन छावणी केली होती. त्यास श्रीमंतांस दहा वीस लक्ष रुपये हुंडी करून परभारें पाठविली. आपणही लोकांस नालबंदी देऊन आह्मांकडेस येणार आहे. पुढें जाटाचे मुलखांत तीन फौजा शिंदे व होळकर व पेशव्यांची फौज पाऊण लाख स्वार मिळोन जाटावर मोहीम करून, त्याजला जेर करून पैसा मिळवावा ऐसें आहे. आणिक अल्ली गोवेर दिल्लीकडील यांचें पत्र आलें कीं, "जाटाचे पारिपत्य करून रुपये पन्नास लक्षपर्यंत मिळवून देईन" असें आहे. पुढें पहावें. जाट हातीं आलियासि फार उत्तम आहे. रा॥ गोपाळराव बर्वे यांजकडे सबनीशी आहे. त्याजला दो चौं लक्षांची जाहागीर देऊन फौजा नेमल्या आहेत. दहा वीस हजार फौज व पायदळ दहा वीस हजार ऐसे आमचे तोंडावर जाटानें पाठविले आहे. सुरजमल्ल जाट तो मेला. परंतु त्याचे कारभारी व मूल आहे. दोघे भाऊ एकत्र होऊन जबर लढाईस उभे राहिले आहेत. कांहीं वकील देखील येत नाहीं. माहे शिमग्यांत फार लढाईचा प्रसंग पडणार आहे. पहावें. ईश्वर कोणास यश अपेश देणार हें न कळे. जयनगरवाला आह्मांस मदत दहा हजार फौजेनिशीं येणार आहे. विठ्ठल शिवदेव त्याचा लेक बापु पहा पांच हजारानिशीं आहे. तिकडे भागीरथीकडून सीख जाटास मदत येणार म्हणोन ऐकण्यांत आलें आहे. पुढें पहावें. इतक्यावर जालियासि अधिक उत्तर वर्तमान लिहून पाठऊं. परंतु तुह्मी तिकडील वरचेवर आलिया मनुष्याबरोबर पत्रद्वारें तोषवीत गेलें पाहिजे. आमचे संसार [illegible]

आमचेविषयीं सूचना मात्र लिहिली आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती[३२].

---

[३१]

श्री

पौ मार्गशिर्ष शुद्ध १० रविवार शके १६७५

तीर्थस्वरूप राजश्री दादा स्वामी वडिलांचे सेवेशीं

अपत्य बाळकृष्ण दीक्षित साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ता॥ कार्तिक वद्य २ गुरुवार जाणून स्वकीय कुशल लेखन करावयासि आज्ञा केली पाहिजे. विशेष. काशींतून स्वार होऊन श्रीमंत राजश्री रघुनाथपंत दादांचे भेटीस गेलों. वडिलांचे आशीर्वादें सर्वांशीं ओळखी भेटी जाहाल्या. चाळीस दिवस दिल्लींत होतों. श्रीमंतांनीं बहुत स्नेह कृपा केली. कांहीं मेळवावें म्हणून गेलों नाहीं. उगेच जावेंसें चित्तांत आलें. दिल्ली शहर पहावें निमित्य गेलों. आपले आशीरवादें सुखरूप घरास आश्वीन शुद्ध १४ सोमवारीं आनंदरूप काशींत पावलों. कळलें पाहिजे. विशेष. वडिलांनीं नि[ं]बक नाईक वगैरे यास कसबें सातारियाच्या पादशाही फर्मानाविशीं लिहिलें होते. यास वजिराचे अर्जीवरी दस्तक करून घेतले. त्यास वडिलांनीं जमीन जुमला किती, तनखा काय, परगणा कोण, तें पत्र लिहून दिल्लीस रवाना करावें. व आम्हांस पालखी रो रघुनाथपंत[३३] दादांनीं व मोत्याचा चौकडा एक दिल्हा व तीन हजार रुपयाचा गांव एक दिल्हा व पादशाहाकडून पंधरा हजार रुपयांचे गांव काशीशिव भु दा न वली [?] चंद्रोतीचे आलीकडे नेमून घेतले. वडिलांचे अर्जीवरी दस्तक जाहाले. परवाने तयार एका मासा आलीकडे करून देतों म्हणून निश्चय रो रघुनाथपंत दादांनीं व होळकर यांणीं व वकिलांनीं सर्वांनीं मान्य केलें आहे. या कामासाठीं सिद्धेश्वर महाशद्वे येथें ठेविला आहे. कळलें पाहिजे. विशेष. हरिदास कृपाराम यांचे दुकान गडबडलें परंतु वडिलांचे आशीर्वादें ठरलें आहे. लोकांचे रुपये देतों. दोन दिवस गडबड झाली आलों नवतों तों जाहाली. आतां आनंदरूप आहे. वडिलांच्या जागेचे हुंड्या हजारिया बदल रुपये साहा हाजार व हरिदास कृपाराम याजबद्दल रुपये चवतीस हजार लादण्या [?] पाठविल्या आहेत. रुपये घेऊन पावलियाचा जाब पाठविला पाहिजे. व

---

३२. हीं अरगडे यांचीं दोन्ही पत्रें इ० सन १७६२—७० सालीं—म्हणजे ज्यावेळीं महादजी शिंदे, विसाजी कृष्ण बिनीवाले व तुकोजी होळकर हिंदुस्थान पुनः काबीज करूं लागले त्यावेळीं लिहिलें असें दिसते.

३३. हें पत्र रघुननाथरावदादा पानाद्वेकी सर केली त्यावेळीं लिहिलें असें दिसतें.

मनसारामानें हुंडी अठरा हजारांची वडिलांकडे पाठविली आहे. ते रुपये घेऊन अमानत ठेविले पाहिजेत. आणि त्यास पावलियाचा जाब पाठविला पाहिजे. वरकड जे वर्तमान होईल तें मागाहून लेहून पाठवूं. परवाना अ ल त म गा करून घेतले आहेत. त्यास तयार व्हावयासि एक वर्ष पाहिजे बहुत त्वरेनें जाहाला तरी या प्रोच सातारियाचा ही लाविला आहे. वडील म्हणतील कीं काशीजवंळ घेतले गांव हें हस्तगत कसे होतील. तरि राजानें आधीं मान्य केलें तेव्हां हें कार्य केले. हरिदास रुपारामास वीस हजार रुपयेपर्यंत लागले तरी देतों. चिंता नाहीं. तो सांभाळून घेईल. तों इतकियांत प्रोचा ही ऐवज चहूंकडून येईल. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हे नमस्कार.

चिरंजीव गोविंद दीक्षित व रामचंद्र दीक्षितां प्रति बाळकृष्ण दीक्षित [यांचे] अनेक आशीर्वाद. लोभ असों दीजे हे. आशीर्वाद. चरण बापुजी महादेव सां नमस्कार.

राजश्री भिकाजीपंत स्वामीस सा नमस्कर विनंती ज्यांचीं पत्रें त्यांस पावतीं करावीं.

---

[३२] श्री

पै० भाद्रपद शु० १३ शुक्रवार शके १६७६.

वेदशास्त्र संपन्न राजश्री दीक्षित बाबा स्वामीचे सेवेशीं

विद्यार्थी गणेश कृष्ण सां नमस्कार. विनंती येथील कुशल ता श्रावण शु॥ त्रयोदशी मुक्काम दिल्ली. स्वामीच्या आशीर्वादें सुखरूप असो विशेष स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावून बहुत संतोष जाहाला. लिहिला मजकूर सविस्तर कळला. याच प्रकारें सदैव पत्र [पाठवून] सांभाळ केला पाहिजे. आपण श्रीमंतास पत्रें पाठविलीं तीं प्रविष्ट करून जाब घेऊन पा आहेत. दिल्लीचा पैका वसुल होत आहे. आठ दिवस तेथें रहाणें होईल. तदनंतर जिकडे जाणें ते जातील. सार्वभौम[३४] नवे जुने जाहले, हें सर्व वर्तमान आपणांस कळलेंच असेल. कसबे सातारियाचे ताकीद पत्रांविशीं लिहिलें तें कळलें. वेदशास्त्र संपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित[३५] येथें आले आहेत. श्रीमंतांची भेट जाहाली. वरकड मंडळीची भेट जाहाली. त्यांणीं आणखी कितीएक मजकुराच्या यादी लिहिल्या आहेत, त्यांत हें कलम लिहा आहे. आपले आज्ञे

---

३४. सार्वभौम=दिल्लीचे पादशहा. | ३५. मागें टीप १३ पाहा.

प्रमाणे श्रीमंतांस विनंती व राजश्री मल्हारबाबा, राजश्री गंगोबा तात्या यांस सांगोन जें होईल तें करून घेऊन सेवेशीं लिहून पाठऊं छ० १० रमजानीं जयाजी शिंदे मारवाडांत गेले. सरकारची फौज चार हजार बराबर दिली. तेही मारवाडचें कार्यसिद्धी करतील. बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

---

[३३] श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री बाळकृष्ण दीक्षित स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पाहून बहुत संतोष झाला. याचप्रकारें निरंतरी पत्रीं सविस्तर लिहित जावें. यवनाची फौज बुडविली. आपणांस कळेलच. हल्लीं शहरास जातों. असो. निजामअल्ली खान बाकी राहिले याचें पारपत्य श्रीकृपे करून होईल. रा॥ छ २४ सफर. आ. ल्ही दया पूर्ण असावी. सर्व देव ब्राह्मणांचे आशीर्वादें करूनच उत्तम फळ प्राप्त जाहाले. बाकी राहिलें तें होईल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पो॥ श्रावण वद्य १४ मंगळवार सवा प्रहर दिवसास.

---

[३४] ॥ श्रीं ॥

पो॥ आश्विन शु॥ ४

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित स्वामीचे सेवेशीं

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहित असलें पाहिजे. विशेष. राजेश्री काशी बल्लाळ व अरबे रमण [?] याज बरोबर खिजमतगार वगैरे माणसें देऊन हिंदुस्थान प्रांतें कामगारीस रवाना केले आहेत. मागाहून याजबरोबर आणिक सरंजाम पाठवावा लागतो. यास आठ दहा दिवस सातारियास[36] राहतील. यास यांचा समाचार नेत जावा. जागा राहण्यास द्यावी. रा॥ छ ४ मोहोरम. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

[३५] श्री

पै० चैत्र शुद्ध १ शके १६७९

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेवबावा दीक्षित स्वामीचे सेवेशीं

सेवक जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विज्ञापना येथील कुशळ

---

३६. भाऊसाहेबांचा बाबा, मारवाडावरील स्वारी पहा. (१७५९ स० ६०)

३७. सातारे हे औरंगाबादेशीं आहे. ६ दीक्षितांचे जोतापितांचे एक गाव होय.

ता। छ ९ माहे रज्जब मु॥ नजीक जाफाराबाद येथें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष–स्वामींनीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जालें. भेटीचा मार लिहिला कीं पैठणावरि मुक्काम होत तरि येणें होतें. लांब यावयासि योग्य घडत नाहीं म्हणोन लिहिलें. त्यास पैठणावरि मुक्काम करावे तरि तो विचार कांहीं विस्तारयुक्त ल्याहावा असें नाहीं. संकलित[38] मजकूर पहिले पत्रीं आपणास लिहिलेलाच॰ आहे. यास्तव उपरीवरि त्वरेनें नावें लागेल म्हणोन गंगातीरीं मुक्काम नेमले. उपरीवरि मुक्काम नेमले आहेत. तेथेंच मागाहून म ह त ह स पंडरी बाबा व बानुराव कोनेर येतील त्यांस स्वामींच्या भेटीची अपेक्षा फार आहांस आहे. कैलासवासी तीर्थरूपांमागें[39] स्वामी वडील आहेत. तीर्थरूपांपेक्षां आमचे ठायीं ममता विशेषात्कारें धरिली पाहिजे. वर्षासनाचा मार लिहिला तरि कैलासवासी यांणीं वर्षासन चालविलें आहेत. यांत तिल तुल्य अंतराई होणार नाहीं. तरि स्वामींनीं कृपाकरून उपरींच्या मुक्कामीं येऊन भेटीचा लाभ दिला पाहिजे. येतेसमयीं राजश्री शामराव विश्वनाथ यांसहि घेऊन यावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[३६] पौ चैत्र शु॥ १० ॥ श्री ॥

मंगळवार शके १६७९.

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव बाबा दीक्षित स्वामीचे सेवेशीं.

सेवक रानोजी भोसले सेनासाहेब सुभा, दंडवत. विज्ञापना येथील कुशल ता॥ छ ७ माहे रज्जब मुक्काम मालडगांव पर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. यानंतर स्वामींचे भेटीची बहुत अपेक्षा आहे. यास्तव आपणाकडे पत्र लेहून जासुद जोडी पाठविली आहे. ऐसियास उदईक मंगळवारीं आमचा मुक्काम दुधनातीरीं करंडीवर आहे. तेथून दर मजल स क्क च वराडप्रांतीं जाणें आहे. येविशींचा अर्थ सेवेशीं लिहिला आहे. तरि स्वामींहीं कृपा करून सत्वर भेटीस आलें पाहिजे. येते समयीं राजश्री शामराव विश्वनाथ यांस समागमें घेऊन यावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[३७] ॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेवबावा दीक्षित स्वामीचे सेवेशीं सेवक रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल तागाईत श्रावण शुद्ध ११ पर्यंत स्वामींचे आशीर्वादें करून यथास्थित असे विशेष. स्वामींनीं राजश्री रामचंद्र बल्लाळ यांजबराबरि

---

३८. संकलित = थोडक्यांत.
३९. म्हणजे रघूजी भोंसले त्यांणीं नागपूरचें राज्य पैदा केलें.

आशीर्वादपत्र व प्रसादवस्त्र पाठविलें तें मस्तकीं वंदून सनाथ जालों. याचप्रकारें निरंतर आशीर्वादपत्रीं संतोषवित जावें. यानंतर स्वामीचे सेवेशीं वस्त्रें पाठविलीं आहेत. वि॥

चांदणी तिर्वेंट[४०] पैठणी. चांदणी पैठणी सक [ला?]

येकूण सनगें दोन व ब्राह्मण संतर्पणाकरितां दुवस्त्या म्हणी उत्तम ४ चार पाठविल्या आहेत. प्रविष्ट होतील. विदित व्हावें याजकरितां विनंती लिहिली असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[३८] ॥ श्री ॥

वेदशास्त्र संपन्न राजश्री गोविंद दीक्षित पाटणकर स्वामींचे सेवेशीं—विद्यार्थी माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष, तुह्मांपासून कर्ज घेतले मुद्दल रुपये ४०००० दिंमत बाबुराव सदाशिव यांस राजमरे [?] यास ५००० हुंडी पुण्याची बाबुराव दीक्षित पटवर्धन यांजवर एकूण पंचेचाळीस हजार रुपये घेतले. यांस व्याज दरमहा दर सदे रुपये १। सवोना त्रिनसूट-प्रो करार केले असे. जाले मुदतीचें व्याज मुद्दल हिशेब करून देऊं. मिती मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा शके १६८३ वृषनाम संवत्सरे जाणिजे. छ ५, जमादिलावल, सु॥ इसन्नेसितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[३९] ॥ श्री ॥

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र दीक्षित व लक्ष्मीनारायण दीक्षित गोसावी यांसि—

सकल—गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ येशवंत राव होळकर दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. खानदेश प्रांतीं खासा स्वारी आल्यावर पुढें राजश्री फत्तेसिंगराव भोंसले वगैरे फौजा या प्रांतीं रवाना जाल्या. जनवार्ता सैन्याचा उपद्रव यामुळे कायगांव टोकें प्रवरासंगम तीर स्थळीं क्षेत्राची जागा, ब्राह्मणांस भय उत्पन्न जालें. साल गु॥ क्षेत्र कायगांव पेंढारी यांणीं लुटलें. त्यामुळें भय अधिक प्राप्त जालें. त्यावरून

---

४०. तिवट = पागोटें.

४१. पहिल्या २ पेशव्यांस नेहमीं कर्ज असे. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत तें सर्व खलास झालें.

४२. स० इ० १८०२ मध्यें येशवंतराव पुण्यावर चालून येत असतां त्यानें फत्तेसिंग माने यास पुढें पाठविलें होतें. फत्तेसिंग हा यशवंतरावाच्या कुंपतला मोठा शूर सरदार होता. त्यानें पेशव्याचे प्रांत लुटून जाळून उद्ध्वस्त केले व विंचूरकर, गोडबोले वगैरे पेशव्यांचे सरदारांस पराभवून मागें लाविलें.

क्षेत्रस्थ ब्राह्मण श्रीफल घेऊन मान्यांच्या भेटीस पुण्यस्थंभीं गेले. त्यांनींही अभय दिलें. जे आह्मांस येविशीं सुभेदार* साहेबांची आज्ञा आहे जें, क्षेत्रास उपसर्ग होऊं नये. त्यावरून सर्वांस संतोष जाला. हल्लीं राजश्री नबाब अमीरुद्दौले फौजेसुद्धां ७कसबे गांडापूर येथें आबंडाकडे स्वारी जाणार. त्याजकडील उपसर्ग क्षेत्रास किमपि लागला नाहीं. याने यांणीं खात्री केली त्याप्रमाणें अनुभवास सर्वांच्यहि आलें. पूर्वापार कैलासवासी थोरले सुभेदारां-पासून या स्थलाचा अभिमान आहेच. त्याप्रमाणें सांभाळ करूनच आह्मांकडील गांडापूर परगण्यांतील तीन गांव नेवास परगण्यांतील एक गांव येकूण चार गांव आहेत. आज पांच सहा वर्षें पायमालीनें खराबा जाली. त्यास त्याचे व तीरस्थळीचें संरक्षण घडावें याकरितां नबाबास पत्र दिल्हें पाहिजे. म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. ऐशियास तुह्मांकडील लक्ष्मण उमाजी याजबराबर राजश्री अमीरुद्दौले याजला पत्र पाठविलें आहे. हें त्याजकडेस पावतें करावें. गांवास उपद्रव देणार नाहींत. सर्वदा पत्र पाठऊन तोषवीत जावें रा॥ छ ११ रबिलाकर. सु॥ सलास मैयातैन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद.

[४०] श्रीसकळ तीर्थरूपराजश्री श्रीमत्परमहंस स्वामींचे सेवेशीं.

अपत्यसमान शाहूजी राजे कृतानेक दंडवत विज्ञाप्ति येथील कुशल. फाल्गुन शुद्ध तृतीया सौम्य वासर स्वामीचे आशीर्वादें यथास्थित असो विशेष. स्वामींनीं आशीर्वादपत्र प्री दि लें [प्रेरिलें?] तेथें आज्ञा जे, श्रीनें जें वदाविलें त्यास संदेह आहे असें नाहीं. पत्र पत्रिकार्थ जाणून जतन करून ठेवणें म्हणून त्यावरून स्वामींनीं आशीर्वादप्रसाद दिला. त्यास संदेह चित्तांत आणिजे-तो असें नाहीं. सूचनार्थ विनंति लिहिली होती. त्यास निर्वाहरूप पत्रिकाच आज्ञा प्रमाण, संग्रहीं ठेविली असे. विदित होय. श्रीपदप्रसाद पाठविला तो पावला. सेवेशीं विनंति.

[४१] श्री.

श्रीसकल तीर्थरूप श्रीमत् परमहंस श्री स्वामींचे सेवेशीं.

अपत्यसमान शाहूजी राजे कृतानेक दंडवत विज्ञाप्ति येथील कुशल भाद्रपद शुद्ध तृतीया, सौम्यवार स्वामींचे आशीर्वादें यथास्थित असो विशेष.

---

* सुभेदार = यशवंतराव.

४३. यशवंतरावाच्या पदरचा एक प्रतिष्ठित सरदार. अमीरखा ?

१२. थोरले सुभेदार = मल्हारराव होळकर.

४५. हे धावडशीचे ब्रह्मेंद्र स्वामी. यांचें चरित्र हल्लीं प्रसिद्ध होत आहे.

सांप्रत स्वामींचें आशीर्वादपत्र येऊन परामृष होत नाहा याकारता चित्त सापेक्षित असे. तरि सर्वदां आशीर्वादपत्र पाठवून चित्त सानंदित केलें पाहिजे हे विनंति.

[४२] श्री.

श्रीमत्महाराज परमहंस परशरामबावा स्वामींचे सेवेशीं.

आज्ञाधारक चरणरज बाजीनें कृतानेक विज्ञापना. स्वामींनीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. की तें क [?] लिहिला त्यास आमची निष्ठा स्वामींचे पायां शिवाय नाहीं, हें आह्मीं काय सांगावें ? जैशी स्वामी बुद्धि चित्तांत धरतील तैशी होईल. असो ते इतका परिहार व्याहावा असें नाहीं. आह्मीं धरतील तैशी होईल. असो ते इतका परिहार व्याहावा असें नाहीं. आह्मीं लेकरें खरीं. आज नव दिवस जाहले. राजश्री × × × स्वामी निरोप देत नाहींत. आतां दोन प्रहरीं राजश्री आबाजीपंताचें पत्र आलें कीं पुणेस लवकर येईन. असें त्यांचें पत्र आलें आहे. तर ठरवितां येईल. सेवेशीं आज्ञा प हो [?] विज्ञापना.

[४३] श्रीमंत महाराज श्रीपरमहंस बाबा स्वामींचे सेवेशीं

अपत्य चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल भाद्र शुद्ध द्वितीया पर्यंत स्वामींचे आशीर्वादें करून यथास्थित असों विशेष. तीर्थरूप राजश्री रायाकडून पत्रें स्वामींस आलीं तींच व जिन्नस पाठविलीं आहेत. त्याजवरून विदित होईल. सारांश स्वामींचा आशीर्वाद तीर्थरूपांचे मस्तकीं आहे तत्प्रभावेंकरून म्लेंछ मोठा गर्वेंकरून आला तो गर्वहत जाहला. समूळीं अंबिलेबेंच बुडालियावें वृत्त येईल तें मागाहून सेवेशीं लिहून पाठवितों. औरंगाबादेची फौज त्यांचे कुमकेस जाणार; शहर सोडून फुलदरीस आली आहे. स्वामींच्या आशीर्वादें ये फौजेचा निःपात इकडेच होईल. असो. आशीर्वाद दिला पाहिजे. होतें तें स्वामींच्या आशीर्वादें होतें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[४४] श्रीमंत परमहंस महाराज श्री स्वामींचे सेवेशीं

चरणरज बाजीराव बल्लाळ प्रधान कृतानेक विज्ञापना. येथील कुशल महाराजांचें आशीर्वादें पौष वद्य चतुर्दशी पावेतों मुक्काम भूपाळ यथास्थित असों विशेष. या प्रांतीं फौजेसहित आलों. नबाबाचा व आमचा

---

४६. 'परशरामबावा' हें नांव स्वामींच्या पूर्वाश्रमींचें असावें किंवा हे परशुराम येथील भार्गवरामाचे भक्त होते म्हणून असें नांव त्यांस पडलें असावें. परमहंस दीक्षा ग्रहण केल्यावर ब्रह्मेंद्रस्वामी असें नांव त्यांच्या गुरुजीनें त्यांस ठेविलें. ब्रह्मेंद्रस्वामींचें चरित्र पृ० २ पहा.

४७ राया = राव = बाजीराव.

४८. अंबिलेनें = लोकर.

मुकाबलेंस व्हावा तों नबाब भूपाल टप्पेंस अशीरी यास गेले. छ० ३ रमजानीं एक युद्ध जाहलें. दुसरें कालही एक युद्ध, नबाबाचें व लोकांचें झालें. बरासा तमाशा नबाबांनीं पाहिला. महाराजांचे प्रतापें मोर्चे नबाबावरील सैलानत बेरीशी चढली. नबाब भोपाळचे आश्रयास तीस चाळीस हजार फौजेनिशीं बसले. आमचे मोर्चे बाद घोडी वरि बसले आहेत. कैराळचा मार दैत आहेत. मोंगलांचा आरगानरगो केला आहे. दाणा, गल्ला, वैरण, काडी कुल बाद जाहली आहे. बा ग सर्ची च [?] गत यास झाली आहे. स्वामींच्या आशीर्वादें निजाम उल्मुलुख ठिकाणीं बुडत आहे. अगर सुटका झाली तरि उत्तमच होईल. नबाब किल्लेबंद झाले यामुळें यांची अब्रू राहिली नाहीं. आपला आशीर्वाद समर्थ आहे. सर्व आशीर्वाद महाराजांचा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[४५] श्रीमंत महाराज परमहंस स्वामींचे सेवेशीं

चरणरज बाळाजी बाजीराव कृतानेक विज्ञापना येथील कुशल तागाईत चैत्र वद्य पंचमी मंगळवार मुकाम म्हसाळ कृष्णातीर येथें स्वामींचे कृपेंकरून सुखरूप असों विशेष. वसईकडील* वर्तमान तर मोर्चे लागले आहेत. दोन तीन सुरुंग जवळही गेले आहेत. व पांच धमधमे तयार झाले आहेत. परंतु सुरंगास पाणी लागल्यावरून मोर्चे चालत नाहींत. लष्कर फार, दोन तीन महिने एक जागां मुक्काम झाला. गवत चहूं गांवाहून आणावें लागतें, असें वर्तमान तेथील आहे; तें स्वामींस तीर्थरूप राजश्री आपा सेवेशीं लिहीतच असतील. मींही वर्तमान विदित व्हावें म्हणून लिहिलें आहे. हैराणी तो वे या स कुलीखान यानें पादशाह व सर्व लोक कैद केले. आणि आपण दिल्लीस येऊन तक्तावर बसणार. पुढें दक्षणेवर चाल करावी हाच त्याचा पुर्ता आशय आहे. असो. पुढें होईल वर्तमान तें शेवटीं लिहून पाठवूं. तीर्थस्वरूप राजश्री रोऊ ब्रह्माणपुराजवळ आहे. येथील वर्तमान तर नूर्त राजश्री छत्रपती

---

४९. मुकाबला = गांठ, लढाई.
५०. टप्पा = प्रांत, परगणा.
५१. ह० आमच्यो फौजेचें.
५२. हे नबाब निजाम उल्मुक होत. हें पत्र स० इ० १७३८ सालीं निजामास कोंडलें असतां लिहिलें हें स्पष्ट आहे.
५३. जय, सिद्धि, चढती.
५४. बंदुकवाले घोडेस्वार.
५५. अरगानरगा (?) दाणा वैरणीची बंदी?
* वसईचा किल्ला घेतल्याची हकीगत साष्टीची बखर पृ० १६-२२ यांत पहावी.
५६. नादरशहा (१७३८।३९)
५७. राऊ = राव = बाजीराव.

स्वामींचा मुक्काम येथेंच आहे. विशेष अर्थ लिहावयास योग्य आहे असें नाहीं. सर्व आश्रा व आशीर्वाद आमचे मस्तकीं असे. तों बसईही येईल. ता वे या स [?]—कुलीखानासही पोंचेल. स्वामींनींहां सदैव लेखकांस आज्ञा करून तीर्थस्वरूप राजश्री आपास लिहिलें पाहिजे. स्वामींची कृपा आहे तों सर्व घडतच आहे. वरकड विशेष अर्थ आहे असें नाहीं. सेवेशीं श्रुत होय हें विज्ञापना.

[४६] श्री

चरणरज बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना ऐशीजे स्वामींनीं चिठ्ठी पाठाविली तेथें कित्येक खेदयुक्त पर्याय लिहिला, तो कळला. ऐशियास आम्हीं स्वामींचीं लेकरें. आह्मांस इतके पर्याय स्वामींनीं लिहावे हे काय आहे? आम्हीं स्वामी खेरीज आहों असें नाहीं. जशी आमची निष्ठा पायाशीं असेल तदनुरूप फल. पत्रीं काय त्याहावे? हे विज्ञापना.

[४७] श्रीमंत महाराज राजश्री परमहंस बाबा स्वामींचे सेवेशीं

चरणरज बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना येथील कुशल स्वामींचे आशीर्वादें यथास्थित असों विशेष. चिरंजीव राजश्री जनार्दनपंत यांचें लग्न वैशाख वहुल पंचमीस योजिलें असे. तर स्वामींनीं कृपा करून कार्य सिद्धीस पावविलें पाहिजे. पहिलें विनंतीपत्र सेवेशीं पाठविलें आहे. परंतु प्रविष्ट झालें असेल नसेल नकळे. यास्तव हल्लीं विज्ञप्ति लिहिली आहे. आम्हीं लेंकरें, स्वामींनीं कृपा सर्व प्रकारें करावी हें उचित असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

[४८] श्री

श्रीमंत महाराज— श्री परमहंस बाबा स्वामींचे सेवेशीं.

चरणरज सदाशिव चिमणाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल माघ शुद्ध पंचमी पर्यंत स्वामींचे आशीर्वादें करून यथास्थित असों विशेष. स्वामींनीं आशीर्वादपत्र पाठविलें तें शिरसा वंदिलें. पैकियाविषयीं स्वामींनीं आज्ञा केली. ऐशियास प्रस्तुत येथें ओढीचा प्रसंग असे तो काय त्याहावा? स्वामींनीं पैकियाविषयीं चार महिने कृपा करावी. तीर्थरूप राजश्री नाना स्वारी करून आलियावरि स्वामी आज्ञा करतील

---

५८. हा नाना साहेबांचा कनिष्ठ बंधु. भिडे यांची कन्या सगुणाबाई हिशीं जनार्दन बाबाचें लग्न झालें.

५९. मुख्यी कारभार सर्व भाऊकडे होता. तेव्हां सर्व राज्याचा खर्चवेंच शिलक जमा याजकडे त्यांचें लक्ष असणें साहजिकच आहे.

याप्रमाणें वर्तणूक करतील. सारांश हा मामलीं स्वामींच्या आशीर्वादाचा आहे. उभयतीं तीर्थरूप असतां यथास्थित चाललें, त्याप्रमाणें किंबहुना याहून विशेषें चालावें हें स्वामीस आवश्यक आहेच. स्वामीहीं कृपा करणें ते करतील न करावी [हें] उचित असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[८९] श्रीमंत परमहंस महाराज श्री स्वामींचे सेवेशीं चरणरज बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत छ ७ जिलकाद पावेतों स्वामींचे कृपावलोकनें करून यथास्थित असे विशेष. बहुत दिवस आशीर्वादपत्र पाठवून परामृष न केला, असें नसावें. चरणरजाचा परामृष सदैव करावा. तीर्थरूप आपांनीं कैलासवासें केला हें वर्तमान स्वामींनीं ऐकिलेंच असेल. मोठा घातच झाला. तीर्थरूप रांऊ यांणीं कैलासवास कोलियास आठ महिने न झाले तों श्रीनें हा प्रसंग घडविला. एका एकींच श्रीनें दुःखार्णवीं पाडलें. होणार बळवंत श्रीइच्छेस उपाय काय ? वडील होते त्यांजवरि स्वामींची कृपा होती. जों जीवित्व तों पर्यंत कीर्तीच जाहली. त्या माघारी चरणरजावरि महाराजांची कृपा आहेच व कृपेमुळें कल्याणच होईल. नवाब **निजाम उल्मुलुख** याचा व **नासरजंगा**चा कलह निर्माण होता. त्यास आम्ही साहिय करितां **निजामउल्मुलुख** यांचें मोडून **नासरजंग** फकीर जाहले. तदोत्तर असे. राजियाची भेट झाली. बहुमान आदर फारच केला. सर्वप्रताप स्वामींचे कृपेचा आहे. स्वामींवांचून आम्हांस दैवत नाहीं. वरकड विस्तार काय लिहिणें ? सेवेशीं श्रुत व्हावें हे विज्ञापना.

[९०] ॥ श्री ॥ पौ। छ २३ मोहरम.

राजाश्रियावीराजित राजमान्य राजश्री **विश्वास** रावजी स्वामींचे सेवेशीं पो। **गोपाळराव गणेश** सां। नमस्कार विनंती. उपरि येथील कुशल ता। छ २० माहे मोहरम मु॥ नजीक बुढा डोंगर जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष पूर्वी आपण पत्र पाठावलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं, पुढें आपले जाणियाचा विचार कोणीकडे हें लिहावें. ऐशास आम्हास श्रीमंत राजश्री दादासाहेब यांनीं आज्ञा देऊन हे प्रांतें रवाना

---

६०. ही पेशवाई.
६१. बाजीराव व आपा.
६२. माऊंच्या आंगीं जी स्वाभाविक ईर्ष्या तिचें हें वाक्य व्यंजक होय.
६३. पौषमास शके १६६२
६४. राऊ = राव = बाजीराव.

केलें. स्तोवरून येथपर्यंत दरमजल येऊन पोंहोचलों. तों सांप्रत श्रीमं. ताचीं पत्रें पातशाहा व सुजातद्दोले यांस आलीं आहेत आणि आह्मांस लिहिलें आहे जे तुह्मी त्यांजकडे व पुढें किलेक तेथून मनसबे करावयाचे आहेत याजमुळें दरमजल त्यांजकडे जाणार यास आपलेकडील वर्तमान अलीकडे कांहींच कळत नाहीं. आपले प्रांताचा बंदोबस्त कोणे प्रकारें आहे. कोणी लबाडी करीत असिल्यास आह्मी तेच मार्गें येत असों तुह्मी सांगाल त्याचें पारपत्य करून पुढें जाऊं. प्रस्तुत नवीन वर्तमान ऐकिल्यांत आलें कीं, जाटांचा फौज भदावर प्रांतांत येऊन अटेर घेतली आणि भिंडेस लागले आहेत. तेथोन पुढें सरकारच्या प्रांतांत येऊन उपसर्ग करणार याचा प्रकार काय आहे हें सविस्तर ल्याहावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब फौज सुद्धां स्वार होऊन चांदवडास आले तेथोन हे प्रांते यावयाचा विचार आहे. ह्मणून पत्रेंच आलीं असत. वरकड सविस्तर अर्थ भेटी अंतीं परस्परें कळों येतील. आपलेकडील व जाटाचे फौजेचें वगैरे ते प्रांतींचें वर्तमान सविस्तर ल्याहावें बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विनंती.

[५१] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री **रामचंद्र** बावा स्वामी गोसावी यांस पो **बाळाजी बाजीराव** प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष राजश्री **अर्जुनसिंग** राजे यांची जागा बुंधेलियांनीं जबरदस्तीनें घेतली. हे पदरीं पडले, यांची स्थापना करावयाचें आमचें वचन गुंतलें आहे, तरि तुम्ही यांचा आगत्य वाद धरून यांची जुनी जागा बुंधेलियांनीं घेतली तेथें यांची स्थापना करून जागा यांचे हवालीं करावयाचा प्रकार राजश्री **अमृतराव** शंकर यांस सांगितला आहे. हे सांगतील तदनुरूप जुने जाग्यावर स्थापना करून सर्व प्रकारें चालवणें सारांश आह्मी बंगालियास गेलों ते सालीं बुंधेलियांनीं यात्रपासून जागा घेतली ते यांची यांचे हवाली करणें जाणिजे छ १९ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती—

[५२] ॥ श्री ॥ पो छ १२ रबिलाखर सन खमस सबैन जेष्टमास.

श्रीमंत राजश्री **नाना** स्वामींचे सेवेशीं पो **नारो शंकर** सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ १ रबिलाखर जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष सांप्रत आपल्याकडील पत्र येऊन परा-

मर्ष होत नाहीं तर ऐसें नसावें. निरंतर पत्रीं सांभाळ करीत गेलें पाहिजे. या नंतर पौा जंबुसर येथें राजश्री दौलत बाबुराव फौजसह जाऊन ठाणें हस्तगत केलें. यास्तव उपराळा करून अंमल वसवावा या अर्थी येथून कारकून व अरब पाठविले त्यांजला वर्तमान कळतांच निघोनें गेले ते समयीं सावकाराचा गल्ला व ठाण्यांतील वस्तभाव व पागेचीं घोडीं वगैरे जिन्नस कं म पे श पन्नास पंचावन हजार रुपयांचा नेला. म्हणोन कारकुनाचीं पत्रें आलीं त्यास यंदा पर्जन्याचे कमतीमुळें माहाल दरोवस्त खरावीखालें आला. दरम्यान आरिष्ट उप्तन्न होऊन बहुत नाश केला. याजमुळें सावकार व इतर लोकांस नाउमेद जालें. पेस्तर आबादी होतां दिसत नाहीं. वस्तभाव ज्याची त्यास प्राप्त जाल्यानें पुढें उमेदवार होऊन माहालची आबादी होईल यास्तव आपल्यास लिहिलें असे. तरि राजश्री दौलत बाबुराव यांजला सरकारचे ताकीदपत्र द्यावें कीं, वस्तभाव व घोडीं, गल्ला वगैरे जिन्नस दरोवस्त माघारा देणें या प्रमाणें पत्रें येऊन सावकाराची वस्तभाव ज्याची त्यास प्रात जाली म्हणजे सर्वत्रांची खातरजमा होऊन माहालची उस्तवारी होईल बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

[५३] ॥ श्रीकृष्णप्रसन्न[1] ॥

श्रीसांबसदाशिवायनमः जो सांबसदाशिव कसा आहे कीं, सत्वरूप म्हणजे असें चित्स्वरूप प्रकाश अवस्था-त्रय साक्षी जागृत कालीं त्यास विश्व स्वप्नकालीं तैजस सुषुप्तीकालीं प्राज्ञ असें ज्यास म्हणनात. जो एकच आत्मा उपाधि-भेदें करून नाना प्रकारें भासतो. पाय नसतां चालतो. डोळे नसतां पाहतो. हात नसतां घेतो. कान नसतां ऐकतो. सर्वांतर्यामीं व्यापक हें कशावरून ? व आत्मा आहे हें कशावरून ? तर, दूर कोणी इंगितज्ञ बसला असतो त्याचा याचे आत्म्यांत [आरशांत?] प्रतिबिंबित होऊन तीच गाष्ट घेतो. व्यापकते व्यतिरिक्त कसें घडेल. असा आत्मा त्यासच आपणांत विसरून आनंद-स्वरूप सोडून दुःखांतील सुख भोगावयाची इच्छा धरितो. हेच त्या आत्म्याची माया. सत्य म्हणतां नये, असत्य म्हणतां नये. जिचें स्वरूप अनिर्वचनीय सत्व, रज, तमोगुणी तिज पासून अहंकार, आकाश, वायु, तेज,

---

१. हें बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडनीस यांचें स्वाक्षरित आत्मवृत्त आहे. हें कसें प्राप्त झालें या विषयीं या लेखाच्या अंतीं हकीकत लिहिली आहे. हें इ सन १७६१ म्हणजे पहिले माधवराव गादीवर बसत तों पर्यंत आहे.

उदक, पृथ्वी पंचमहाभूतें महत्तत्व ह्मणजे अंत:करण तदवच्छिन्न जें चैतन्य जो जीव अपंचीकृत पंच महाभूतें करून तदंशरूपें लिंगशरीरद्वारा जीवास सुख दु:खादि प्राप्ती. 'भोगायतनं शरीरं' भोगाचें स्थान शरीर होय. त्या शरीराची उत्पत्ती तर जें निंद्यस्थान योनी, व पुंस स्थानापासून रेत ज्याचे स्खलनें करून व स्पर्शें करून स्नान करावें लागतें, अशा निंद्य पदार्था पासून शरीर वृद्धीतें पावतें. गर्भींच लयातें पावलें तर गेलें, वांचलें तर आंत अनेक जंतूंचे उपद्रव व जठरस्थ अग्नीनें दाह इत्यादिक क्षुधा-तृषा समयीं परिमार्जन न होणें. असे क्लेश भोगितां प्रसव वायूकडून कष्टें करून जन्म जाहाला ह्मणजे जातांशौच प्राप्त. तदनंतर रोगादिक वेदना आपणच मुक्यानीं सोसाव्या. षड्भाव विकार अस्ति, जायते, वर्धते, विपरीणमते, अपक्षीयते, नश्यति. हे षड्भाववत् विकार असा देही जो मी *त्याला लाहनपणीं अज्ञानें करून आवृत. परंतु पूर्व संस्कारें करून देवाची पूजा करावी हा छंद फार. याजकरितां * * मातोश्रींनीं मारही दिला. परंतु संस्कार दृढ. विद्याभ्यासा करितां मातापितर जे यांची शिक्षा तेणेंकरून लहानपणीं अज्ञानाकरितां चित्तास फार वाईट वाटून त्यांचेंही अनिष्ट चिंतीत असें.. दाहावे वर्षीं विवाह झाला. विघ्न पडलीं असतां निर्विघ्न केलें. पुढें अक्रा वारा वर्षां नंतर कामाविर्भाव शरीरीं होऊं लागला. तेणेंकरून व असत्समागम किंचित् झाला तेणेंकरून पापप्रवृत्ती होऊं लागली. रेतस्खलनही व्यर्थ करूं लागलों. मध्यें घोड्या वरून पडलों. अति व्यवस्था कठीण, दोन दिवस शरीर भान नाहीं. या प्रमाणें जालें असतां गोविंद जो त्याचे कृपेनें बरें केलें. पुढें पंधरावे वर्षीं पित्याचा काळ झाला. त्यांचें और्ध्वदेहिक ईश्वरें करविलें. त्यांत पापदृष्टि एक समयीं जहाली. हा अपराध झाला. व्यर्थ रेतस्खलनें करून पाप व शरीर-नाश समजूं लागलें. तेव्हां सोडून देऊन निश्चय केला. परंतु कामाविर्भाव विशेष, येणें करून पापबुद्धी होत असे. पुढें परंपरा सेवाधर्म चालावा या योगें व श्रीमंतांची कृपा पुत्रवत् असें जाणून कर्नाटक प्रांतीं श्रीरंगपट्टण[4] पर्यंत गेलों. परंतु प्रत्यहीं स्वप्नावस्था होऊं लागली. पुढें घरीं आलियावर रमणीयोग मात्र अज्ञानच तेणेंकरून जाहला. परंतु पापबुद्धी नि:शेष

---

*. जन्म—ज्येष्ठ शके १६६३.

२. पिता—जनार्दन बल्लाळ भानु.

३. परंपरेनें कसा चालत आला तें वंशावळ पाहिली असतां समजेल. पे० ब० पृ० १९ पहा. खेरीज भानूंचा व पेशव्यांचा घरोबा किती होता हेंही पे० ब० पृ० ११–१९ पाहिलीं असतां ध्यानांत येईल.

४. ही स्वारी १७५५।५६ त झाली ती. पे० ब० पृ० ६० टी० ६ पहा.

सुटना. तेव्हां चित्तांत विचार केला कीं, पितामह[५] यांची बुद्धि धर्मशील असतां च सत्यवचनी एकानिष्ठ देव-ब्राह्मणांचे ठायीं परम भक्ती; सात्विक आणि निषिद्ध कर्म करणेंच नाहीं; असें असतां माझें चित्त पापाकडे थोडेसें कां जातें. ? याचा विचार करितां मातामह-पक्ष[६] अति व्यभिचारी तो संस्कार आहे. बुद्धीचा निश्चय करावा तत्रापि स्थिरता राहूं नये. तेव्हां संस्कार बलवत्तर. पुढें टोंक्यास अतिरुद्र करावयास गेलों. तेथें देवतार्चन-नेम धरिला. परंतु शरीरीं पीडा तेणेंकरून वैराग्य असें कीं, पर-स्त्री मनांतही येऊं देऊं नये. मग पाहणें कोठील? मातोश्री व कुटुंब सहवर्तमान माझें बरोबर हिंदुस्थानांत जाऊन स्वर्गंगा त्रिपथ भागीरथीचें स्नान त्रिस्थली यात्रा करावी, अंत:करण शुद्धी होईल, या भावने करून गेलों. त्या कालीं चित्तास अति वैराग्य. याचें कारण शरीरीं किंचित् पीडा. तेणेंकरून चित्त अति वैराग्यशील जहालें. कीं, एक भगवंताची पूजा व ध्यान मात्र करावें. उष्ण शीत यांचीही पीडा. परंतु चित्तास नाहीं. मातेचे ठायीं भक्ती होत्साता चाललों. ते नर्मदा महागंगेमध्यें स्नान करून एका वृत्तीनें ध्यान केलें. त्या दिवसा पासून उत्तरोत्तर वैराग्य अंत:करण-शुद्धीच होत चालली. भाऊंची ममता विशेष न आंवेची व्यथा बहुत जाहाली, उठावयास शक्ति नाहीं, रेचन बहुत, ग्लानी फार तेव्हां कूच जहाले असतां मुक्काम श्रीमंतांनीं करवावा. त्याकालीं ईश्वरें आरोग्य केलें. पुढें दर मजल चरमन्वतीतीरीं गेलों. तेथें ग्रहण पडलें. स्नान-दानादिकें करून आत्मा पवित्र होत्साता ध्यानें करून कालक्षेप चालत असें. पुढें सूर्यतनया यमुना इचेतीरीं गौ-घाटा जवळ गेलों. तेथें स्नान-संध्या करून दोहों दिवसां नंतर मुक्तिपुरीं[६] श्रीमथुराक्षेत्रीं गेलों. तेथें क्षौर प्रायश्चित श्राद्धादिक करून तदनंतर पुढें भगवान् पूर्णब्रह्म राधाकृष्ण याणें सकल लीला केल्या असें जें वृंदावन त्या स्थळास गेलों. तेथें कालिया-डोहीं कदंबवृक्ष ज्याजवर भगवान् बसून वस्त्रहरण करिता जहाला, त्याच्या शाखा अद्यापि यमुनेंत गेल्या आहेत, त्या खालीं जाऊन स्नान तर्पण करून तदनंतर गोपीचंदनाचे टिळे व तुळशीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करीत होत्साता वृंदावनांत अटलाबिहारी व कुंजबिहारी व बालाबिहारी, राधाकिशोर, गोविंदजी या भगवंताच्या मूर्ती यांचीं दर्शनें घेतलीं. त्यांत कुंजबिहारी मध्यानकालीं चौपाळ्यावर निद्रिस्थ, कपाट लागलेलें, परंतु चौपाळ्याचीं दोरी बाहेर ओढीत

---

५. पितामह—बाळाजी महादेव भानु.

६. मातामह पक्ष कोणता? मेहंदळे तर नव्हेत? पुढें टी० ९ व १२ पहा.

६. या सप्त मुक्तिपुऱ्या प्रसिद्ध आहेत. अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका। पुरी द्वारवती चैव सप्तता मोक्षदायका: ॥१॥

असत. ती आंपले हातीं ओढून भगवान् जो यास आंदोलन-लीला केली. तेथोन शृंगारवट जेथें भगवंतें राधेस शृंगार केले, तेथें जाऊन वट-दर्शन घेऊन. पुढें वंशीवटी म्हणजे जेथें भगवंतें मुरलीवादन केलें, तेथें जाऊन वटाचें दर्शन केलें. तेथून सेवावन, कुंजवन हीं स्थळें, कुंज कसें कीं भगवान् लीला करितो असाच भास होत असावा.~ सर्वही वृक्ष छत्राकार ठेंगणे भूमिस्थ पल्लव कंटक वृक्षासही परंतु [?] कंटक नाहीं. हें पाहून आनंदमय होत्साता यमुना-तीरीं रेतींत भगवान् जो याणें बाळरूपीं लीला केली. पादारविंद संबंधी रेणु रजःकण त्याची प्राप्ती मस्तकीं वंदावया करितां ब्रह्मादिक देव इच्छितात. तेथें जाऊन लोळून ती रेती मस्तकावर घेंतली. तेथोन ज्ञानगुदडीस [?] गेलों. तेथें थोर थोर संत, महंत, वैरागी भगवत्पर होत्साते, सायंकाळचे साहा घटिका दिवसास येऊन बसून पुराण-श्रवण करीत आहेत. भगवंताच्या कथा नामें गाताहेत. त्यांचें दर्शन घेऊन चार घटिका पाहून चित्त बहुत शांत जहालें. तदनंतर धीरसमीर जे यां प्रति कालिंदी-तीरीं जाऊन सायंकाल संध्या करून भगवान् सांबसदाशिव जो याचें एकाग्र मनें करून ध्यान करून येता जहालों. गाप्रमाणें तीन चार दिवस क्रमिले. अनेक जन्मांचें पुण्य कीं, असें वृंदावन दृष्टीस पडलें, तेणें करून भगवंताच्या मूर्ती व भगवद्भक्त त्यांचे दर्शनें करून नेत्र पवित्र जाले. पादें करून चालत गेलों तेणें करून पायांचें सार्थक जाहालें. हस्तें करून नमस्कार करिता जहालों तेणेंकरून हस्त पवित्र झाले. मुखेंकरून नामस्मरण केलें तेणेंकरून मुख पवित्र झालें. कर्णें करून भगवत्कथा-श्रवण केलें तेणेंकरून श्रोत्र पवित्रता पावले. स्नानें करून सर्व देह पवित्र झाला. ज्या वृंदावनांत वैरागी एकाग्र वृत्ती करून ध्यानस्त होत्साते कुंजाखालीं जागां जागां वसले आहेत; कोणी पर्णेंच भक्षून, कोणी जल प्राशन मात्र करून कोणी दुग्ध सेवन करून, कोणी सिद्धान्न आणून घालील तेंच खाऊन राहिले आहेत; अशांचें दर्शन घेऊन सत्समागमाचें माहात्म्य किंचित् आनंदातें पावलों. त्यांत एका बैराग्यानें कृपा करून एक मंत्र भगवंताचे नामाचा सांगितला, कीं याचा जप करीत जावा. तो भगवंतेंच सांगितला असा मानून, सर्वांस यथाशक्ति देणें देऊन संतोषातें पावलों. पुढें दिल्लीस गेलों. तेथें पृथ्वीपतीचें दर्शन श्रीमंतांचे आज्ञेवरून घेतलें. त्याणीं बहुत कृपायुक्त भाषण करून आशीर्वाद देऊन आपले जवळील वस्त्रें दिलीं तीं

---

७. पृथ्वीपति=बादशहा. जवानबरून अल्प एक लहान शाहाजादा भाऊनींच गादीवर बसविला होता. भा० सा० बृ० पृ० ९५ पहा.

घेतलीं. किंचित् संतोष जाहला कीं, भगवंताचे कृपेचे अंतर्वर्ती ही कृपा आहे. तदनंतर श्रीमंतांचे लष्करांत श्रीमंतांजवळ आलों. बसलों असतां भूमीकंप जाहला. परंतु भगवंताचें ध्यान चित्तांत आणिता जालों. दिल्लींतील चित्रें कौरे विषय ज्यांत पाप नाहीं असेही घेतले. पाहिले. पुढें उत्तरेकडील यवन शत्रुत्वें करून यमुना पैलतीरीं पराऊण,लक्ष सेनेसहवर्तमान येऊन उतरला. परंतु यमुना भरपूर चालली तेणेंकरून उभयपक्षीं स्तब्धताच जाहली. पुढें कुंजरपुरा श्रीमंतांनीं शौर्यें करून घेतला. मोही युद्धांत होतों. ईश्वरें रक्षिलें. तों शल्कियांत यवन आलीकडे आला. श्रीमंत सैन्यासहवर्तमान त्याचे समोर गेले. गांठ पडली.[८] तेव्हां मी तर लहान श्रीमंताचे बुद्धीस महानबुद्धी [?]. परंतु भावी अर्थ तेणेंकरून विपर्यास पडला. आप्त होते बळवंतराव[९] मातुल व नाना पुरंधरे वगैरे ते अनाप्त झाले. जे अनाप्त शाहनवाजखानो, भवानी शंकर वगैरे ते आप्त जाहले. त्यांचे वाक्याचे ठायीं विश्वास, तेणेंकरून आपली रीत युद्धाची सोडून यवनाची रीत[१०] धरिली. परस्परें युद्ध होत असे. गोळे प्रत्यहीं शत्रूचे राहुटीवरून जात. मातोश्री व स्त्री भयभीत होत. कीं कसें होईल ! ते ते समयीं मातोश्रीस विनंती करीत गेलों. कीं मी विनंती करितों. एक ईश्वरीं लक्ष असावें. त्यांत मातुळ[१२] युद्धांत होते ते पडले. ते दिवशींच सर्व सैन्य नाशास पावावें. परंतु रात्र जाहली यामुळें राहिलें. त्या दोन महिन्यांत मनुष्यें, पशु बहुत मेले. अन्नाची महर्गता. दुर्गंधी एकेच ठिकाणीं. असे श्रम पाहिले. पुढें मातुळाची स्त्री समागमें गेली. मातोश्रीस श्रम फार जाहले. होणार अवश्यक होतें. यदर्थीं संदेह धरूंच नये. हा माझा निश्चय. पुढें थोरलें *युद्ध उदयीक होणार. तों पूर्व दिवशीं संकेत कीं, पराजय आपला जाहला तरी शत्रूचे हातीं श्रीमंताचें कुटुंब व आपलें हातीं लागूं नये. आपणच नाश करावा. आपण तर वांचत नाहीं असा सिद्धांत करून श्रीमंतांनीं याची ही योजना केली. दुसरे दिवशीं तयार होऊन प्रातःकालचे दोन घटिका दिव-

---

८. यवन अहमदशहा अबदाली हा या काळीं २४ दस्ते फौजेसह आला होता. सुमारें १२ शें लोकांचा एक दस्ता.

९. बळवंतराव मातुल–हे बळवंतराव गणेश मेहंदळे असावे असें वाटतें. मागें पृ० ३५ टी० ६ पहा. नाना ह्मणतात मातुळ अनाप्त झाले. परंतु दुसरे लेखांत बळवंतरावांच्या मसलतीनेंच भाऊसाहेब चालत असत असें झटलेलें असतें.

१०. हे दिल्लीतील पादशाही मुत्सद्दी– यांचे मसलतीवर व बळावर पतकरली.

११. एक जागां खंदक करून राहणें ही रीति–ही यवनी रीत इब्राइमखां गाडदी

१२. मातुळ–बळवंतराव मेहंदळे ? पुढें कुटुंब सती गेलें असेंही आहे तेव्हां हे मातुळ मेहंदळेच असावे. भा० सा० ब० पृ० ११४ १५–१६ पहा.

* थोरलें युद्ध–पौष शुद्ध ८ शके १६८२ भा० सा० ब० पृ० ११९ व पुढें.

सास युद्धास गोळागोळीचा प्रारंभ जाहला. श्रीमंत अति बुद्धवान्, धैर्यवान्, शूर, कृतकर्मे गर्व मात्र विशिष्ट, परंतु तर्तुद फारच सैन्याची वगैरे केली. शेवटीं निशाणा जवळील तर्तुद एकीकडे जाऊन शत्रूची मुख्य स्थानींच गांठ पडली. मी श्रीमंता सन्निध ईश्वरस्मरण किंचित् करून असें. तो विश्वासराव यांस गोळी लागली. पडले. ते हत्तीवर श्रीमंतांनीं घालून उभेच राहिले. तों पठाण पाय उतारा आंत येऊन मिसळले. तोडातोडी होऊं लागली. आणि डावे बाजूचे मातबर सरदार, चौघड्याचे धनी देखील, पूर्वीच पळाले. उजवे बाजूचे हीं होळकर शिंदे निघोन निशाण निघालें. दोन तीन शत पायदळ होतें. श्रीमंत दिसेनातसे जहाले. तेव्हां ईश्वरें बुद्धी दिली. माघारे फिरलों. पूर्वी युद्धांत बापूजी[13] पंतीं बोध केला. माघारे फिरावें. त्यांस उत्तर केलें कीं, अशा समयीं श्रीमंतास सोडणें ठीक नाहीं. परतु पुढें या प्रमाणें जहालें. लक्ष सैन्य त्यांत मोठे मोठे सरदार असतां एकही त्या समयीं श्रीमंतास आप्त न जहाला. बहुत दिवस अन्न भक्षिलें कृपा पुत्रवत् केली. तितकें चांगला काळ होता तेव्हां केशास ढका लागल्यास प्राण देऊं अशा प्रतिज्ञा. परंतु ईश्वर घटित विपरीत काळ त्यांत सोबती कोण होतो? सर्व सुखाचे सोबती. भोजन आदरें करून करावें. वस्त्रें, जवाहिर, जागिरा, घ्याव्या. निदानीं इतक असून ज्यांचे देहाचें ठिकाण कोणास ठाऊक नाहीं. सर्व वाताहत जहाले. मी सायंकालचे दोन घटका दिवसास घोड्यावर पाणिपतांत आलों. त्या देशाचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथें परमेश्वरें वाट दाखवावया पुरते रामाजीपंत उभे होते. सांगूं लागले घोडें वस्त्रें टाकून द्यावीं. त्या वरून सर्व टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र जहाल्या वर चाललों. तों एका कोसांत तीनचार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला. दर खेपेस समागमेंचे दाहावीस तोडून टाकीत. त्यांत मी राहिलों. हे सत्ता ईश्वराची. परंतु बापूजीपंत, रामाजीपंत, राहातच गेले. असे जातां दाहा बारा कोश पश्चिमेकडे गेलों. तों तेच शत्रु येऊन रामाजीपंत बापूजीपंत वगैरे यांस जखमी भारी केलें. पडले. मी एकटा राहिलों. तो गवतांत गेलों. ईश्वरें तृणें करून माझें रक्षण केलें. त्यांस मोहनी घातली. सर्वांस मारिलें असतां मी जवळ असतां न मारिलें. व गवत लांब असतां जाऊं दिलें. पुढें ते गेल्यावर जाऊं लागलों. तों पुढें दोन कोशावर दुसरे मागती दृष्टीस पडले. तेव्हां मागती तृणांत जाऊन ब-

---

१३ बापूजीपंत—कोण?

सलों. तों जवळ येऊन काढूं लागले. ते समयीं ईश्वर त्यांतीलच एका वृद्धाचे मनांत संचार करिता जाहला. कीं कशास मारितां ? मग गेले. तदनंतर माझी शक्ति पाणिपतावर बहुत क्षीण, आमविकारादिक विकारयुक्त, अन्न चालेना, असा मी त्याजवर दयासमुद्र सांबसदाशिव जो याणें कृपा करून शरीर अशक्त, ऊन पाहिलेंच नाहीं, व पादचारी अभ्यास नसतां सोळा सत्रा कोश अन्न उदका व्यतिरिक्त आलों. क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां वोरीचा पाला सांपडला तो खाऊन पाहिला. तो तोंडांत जाईना. तसाच सायंकाळीं एका ग्रामाबाहेर आलों. तों एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकर खादली. ती अमृत-प्रमाण लागली. नंतर निद्रा केली. प्रातःकालीं गंगा-सहस्रनाम म्हणत ईश्वर-स्मरण करीत चाललों. तों एका गांवामध्यें गेलों. तेथें एक साहुकार होता, त्यानें घरीं नेलें. भोजन एक ब्राह्मण होता, व यशवंतराव चाबुकस्वाराकडील भेटला, त्याजकडून स्वयंपाक करवून भोजन केलें. तो शत्रूचे स्वार गांवांत आले, हें वर्तमान कळलें. तेव्हां साहुकार म्हणाला कीं आम्ही गाडी करून जयनगराकडे पावते करितों. गाडींत बसून चाललों. तों पाहिलें कीं हा फसवितो. असें बुद्धीस येऊन गाडी टाकून पाय उतराच होउन चाललों. बरोबर दोन तीन ब्राह्मण, दोन मराठी माणसें, याप्रमाणें दाहा बारा कोश गेलों. असे सात दिवस पायीं चाललों. नित्य भोजनाचें साहित्य ईश्वर देववी. तेणें करून समागमचे मंडळी सुद्धां भक्षून रेवडी[१४] पावेतों आलों. तों लष्करचे पळे त्या वाटेनें गेले. त्यांस गांवांत बालोराव म्हणून चौघे भाऊ असत. ते माझें नांव ऐकून पुसत कसे आहेत ? चेहरा कसा ? खुणा खाणा सर्व त्यांणीं पुसून घेतले. मागाहून हे येतात हें जाणून मार्गावर नेहेमीं पाहात बसत. आम्ही आलों तों त्यांणीं रेवडी बाहेर ओळखिलें. पुसूं लागले. नांव न सांगावें हा निश्चय, परंतु तो आंगींच नांव लावूं लागला. त्याचे बोलण्यांत वांकडी गोष्ट नाहीं. आम्हांस साहित्य करून द्यावें, उपकार करावा हें पाहिलें. तेव्हां नांव सांगितल्यावर आपले घरास मंडळी सुद्धां नेऊन उत्तम प्रकारें भोजनाचें साहित्य करून दिलें. भोजन केल्यावर वस्त्रें दिलीं. तदनंतर रामजी दास जोशी मातबर रेवडींत असे त्यास वर्तमान कळल्यावर त्याणें आपले घरीं नेऊन ठाविलें. सात दिवस भोजनास व उत्तम वस्त्रें दिलीं. पुढें आमचे मानस * दाग भरतपुरास

---

१४. मूळांत 'रेवाऊ' असें सर्वत्र आहे परंतु तें मोडींतून बालबोध करणाराच्या नजरचुकीमुळें पडलें असावें हें स्पष्ट आहे. रेवडी हें शहर दिल्लीच्या वाटेवर मुक्कामाची जागा आहे.

* मूळांत 'दकि भरतपुरास' असें आहे.

जावयाचें. परंतु तो म्हणे सोबत चांगली लावून गाडी करून देऊन पावतें करीन. त्यावर एक लग्न निघालें. त्या बराबर गाडी करून देऊन बराबर पेढे साहित्य करून दिलें. आली निघालों तों वाटेंत कृष्णंभट वैद्य आले. त्यांणीं सांगितलें कीं, स्त्री विरोजी बारावकर[15] यांणीं संभालून आणिली. ती जिगनीस नारोपंत गोखले यांचे घरीं आहे. तेथें त्यां गृहस्थानें साहित्य वस्त्र पात्रांचें केलें. आली तेथें गेल्यावर भोजन क्षिरीचें घातलें. तेव्हां आनंद झाला. मग स्त्रीस एक गाडी दुसरी करून तेथून निघालों. तों दिगेस आलों. तेथें पुरुषोत्तम महादेव पाणिपतांहून आले होते. ते वानवले यांचे गुमस्त्याचे बिऱ्हाडास राहिले होते. त्यांस कळतांच त्यांणीं आपले बिऱ्हाडास नेलें. तेथें कुटुंब सुद्धां कमकसर महिनाभर होतों. क्षुधा फार लागत असे. त्यांणीं वस्त्रें वगैरे साहित्य भोजनाचें चांगलें केलें. तेथून मातोश्रीचा शोध फार केला. परंतु घरचा खिजमतगार बराबर होता त्याणें सांगितलें कीं, घोड्यावरून पडून जखम लागून मेली.[16] हेंच ठिकाण लागलें. पुढें पालखी व घोडीं घेऊन ढवळपुरावरून ग्वाल्हेरीस सारें लष्कर पळून पार्वतीबाई, नाना पुरंधरे, मल्हारजी होळकर सारे होते तेथें आलों. अंत:करणापासून होतें कीं, श्रीकाशीस जाऊन नेहमीं वास करावा. प्रपंचांतील विषय-मात्रीं दु:ख हें पुरतें समजलें. परंतु देहप्रारब्ध बळवंत. तेथें आलियावर सर्वांनीं निषेध केला. एकदां देशीं जावें. मातोश्रींचा विधी करावा. वगैरे कित्येक प्रकार काशींत गेल्यावर कसें होईल. पाणिपत जालें तेव्हां काशीही कसी होते. असें चित्तांत येऊन लष्करा बरोबर येऊं लागलों. पाणिपताचें वर्तमान श्रीमंत नाना साहेबांनीं ऐकून माझें स्मरण फार गुरुजीं जवळ केलें कीं, त्यांचें शरीर अशक्त, कसा निभाव होईल ? परंतु ईश्वरकृपेनें व त्यांचे आशिर्वादें महत्संकटातून पार पडलों. पुढें श्रीमंत नानासाहेब यांचे दर्शन बराणपुरावर जालें. पाहतों तों शरीर फार क्षीण जाहलें आहे. मर्जी बेतल्ही[17] जाली आहे. बहुतांच्या अब्रू क्षणक्षणां जातात. परंतु मजबर सदयतेनें लोभेंकरून भाषण करून वर्तमान पुशिलें. सांगितलें. तीन चार दिवस बरोबर राहिलों. श्रीमंत गोपिकाबाई व नारायणराव यांस देवी आल्या. करितां त्या सहवर्तमान नर्मदातीरीं

---

१५. बारावकर—हा पार्वती बाईस आपल्या घोड्यावर घेऊन तिचें प्राणरक्षण करणारा 'बारवेकर' असावा. भा० सा० ब० पृ० १२८ पहा. नानांची आई व कुटुंब या युद्धांत पार्वतीबाई जवळच होतां.

१६ 'गिलचे यांजकडे सांपडली' असें भा० सा० ब० पृ० १२८ येथें लिहिलें आहे.

१७. हे गुरुजी कोण ?

१८. बेतल्ही=बिघडलेली, तऱ्हेवाईक.

राहिलीं. परस्परें उभयतांचें चित्तही ठीक नाहीं हें कळलें. काल वैपरित्यें करून न घडावयाचें तें ही घडलें. तदनंतर या मजलीत कसें होईल जाणून निरोप घेतला कीं दोंक्यास पुढें जातों. जावें म्हणून आज्ञा दिली. दोंक्यास येऊन राहिलों. तों श्रीमंतही मागाहून तेथेंच आले. पुन्हा दर्शन घेतलें. मर्जी विकट असतां एक शालिग्राम मागितला तों बहुत कृपेकरून आज्ञा झाली कीं, क्षेत्रांतून पाहिजे तो घेणें. सीतारामचंद्र मूर्ती घेतली. एक दिवस प्रदोष तेथें पडला. ते दिवशीं श्रीमंत थोरले राऊ[19] यांचें श्राद्ध म्हणून मला भोजनास बोलाविलें. मी विनंती सांगून पाठविली कीं, प्रदोष आहे. तत्रापि यावें म्हणूनच उत्तर जाहलें. यावरून स्वारी देवास जातेसमयीं गुरूजींकडून विचारविलें. तेव्हां आज्ञा जाली कीं, रावसाहेब यांचें श्राद्ध आहे याजकरितां जरूर जरूर यावें. त्या वरून गेलों. श्राद्धाचे ब्राम्हण [यांचीं] भोजनें जाहलियावर खासा भोजनास बसले. एकीकडे श्रीमंत माधवराव [व] एकीकडे मला बसविलें, आणि दुसरे स्त्रीकडून वाढविलें. तिला शिक्षा वाढावयाची दाखविली. अर्थात् मातोश्रीकडून लेंकरास वाढविलें. नंतर श्रीमंतांस विनंती केली कीं, कांहीं दिवस गंगातीरीं राहून मन स्वस्थ करावें असें आहे. त्यावरून आज्ञा जहाली कीं, कांहीं दिवस राहावें. श्रीमंत कूच करून पुण्यास गेले तों शरीर क्षीणच होतें. शेवटील समय, लवकर यावें म्हणून पत्रें आलीं. त्यांचे अन्नाचें शरीर, समयीं जवळ असावें, याकरितां पुण्यास येऊं लागलों तों पारनेरा आलीकडे वर्तमान ऐकिलें कीं, कैलासवास केला. श्रीमंत दादसाहेब यांचीं पत्रें आलीं कीं, जरूर यावें. पुढें पुण्यास आलों. श्रीमंतांस देवदेवेश्वर[21] सन्निध कैलासवास जाहला. हें ऐकून श्रम जहाले. नंतर दादांहीं कृपायुक्त ममता केली. पुढें श्रीमंत राजश्री माधवराव साहेब यांस साद्यास पेशवाईचीं वस्त्रें द्यावयाकरितां घेऊन गेले. समागमें मलाच घेऊन गेले. राजद्वारीं वस्त्रें घ्यावयास समागमें येणें म्हणून बहुत आग्रह केला. विनंती केली कीं, आम्हांस गरज काय ? आमचे खावंद आपण. म्हणोन गेलों नाहीं. त्यावर श्रीमंतीं राजआज्ञा घेऊन [ते] पुण्यास यावयास निघाले. समागमेंच होतों. वाटेंत चालतां एक गाडदी शेतांतील कुणब्याचे बायकोवर बलात्कारें सर्वां देखतां जाऊन पडला. तो एका राऊतानें भाल्यानें मारिला. तेव्हां कामाची दशा पाहिली. नंतर श्रीमंत निरा उतरोन पलीकडे गेले. आम्हीं उद्यां उतरोन

---

१९ थोरले राघि=बाजीराव बल्लाळ.

२० ही नारोबानाईक बाखरे, पैठणकर, यांची कन्या. लग्न १७८२ मध्यें मार्गशीर्षांत झालें. नांव राधाबाई ठेविलें.

२१ देवदेवेश्वर–पर्वतीवरील महादेव.

* नानासाहेबांचे व गोपिकाबाई यांचें? त्याच वर्षी नूतन सपत्नी झाल्यामुळें बाईचें मन रुष्ट झालें असावें.

जाऊं म्हणोन शिरोळ गांवांत राहिलों. नदीस पूर आला याकरितां नावेंत बसलों. मध्य-धारेंत नांव आली ती प्रवाहीं पडली. नावाडयांनीं सांगितलें कीं, आमचा उपाय नाहीं. तेव्हां पुढें खडक जवळ आला, फुटली, म्हणजे शेवटीलच पक्ष. तेव्हां ईश्वर-स्मरण केलें. तों दोन मनुष्यांनीं उडया टाकून नाव ओढून काढिली. हें रक्षण क्षीराब्धिशयन महाविष्णु यानें केलें. पुढें पुण्यास आलों. तों श्रीमंतांनीं कृपा करून यासमयीं कार्यांत मन घालावें हे आज्ञा केली.*

[५४] श्री

यादीं श्रीमंत महाराज राजश्री सवाई माधवराव साहेब यांची स्वारी मोंगलांवर खर्ड्यापर्यंत गेली त्यांचे मुक्कामांचा ‡ तपशील:-

१. प्रथम श्रीमंतांची स्वारी निघोन मुहूर्तानें गारपिरावर डेरे दाखल झाले.

१. तेथोन कूच करून थेउरचे मुक्कामास मुळामुठा नदीचे कडेस मुक्काम झाला. अजमासें कोस ५. तेथें मकरसंक्रमण झालें.

१. तेथोन पुढें कूच होऊन मौजे नांदेड [व] करवांब गांवामधीं, नदी मुळामुठा, तेथें मुक्काम जाहला. कोश सात.

---

* "हें पुण्यश्लोकाचें स्वानुभूत निजहस्तें लिखित प्रकरण चतुर पुरुषांनीं संगृहित परम यत्नेंकरुन संपादिलें. त्याची प्रति श्रीमंत राजश्री मोरोपंत तात्या १००० सहस्रबुद्धे यांचे प्रीतीस्तव केली. मिती आषाढ शुद्ध ५ मित्रवासर शके १७७१ सौम्यनाम संवत्सरे." **शिवकिंकर गोपाळ महादेव भोगले मुक्काम पुणें.**

"हा अस्सल लेख श्रीमंत बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडनवीस यांचे जातीवदल त्यांनीं स्वदस्तुरचा लिहिलेला आपले जन्मापासून तों श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे कैलासवासी होऊन त्यांचे चिरंजीव श्री० माधवराव बल्लाळ यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळून त्यांनीं यांस कारभार करण्यास सांगितला तों पावेतों लिहिला आहे. यांत त्यांनीं आपलीं दोषास्पद कृत्यें ही लिहिलीं आहेत. सबब या लेखास फारच योग्यता आहे. असो, हा लेख अस्सल कोठें असेल तो असो, परंतु नक्कल मोरोपंत तात्या सहस्रबुद्धे यांचे संग्रहीं होती तिची नक्कल श्री कृपासागर राजश्री गोपाळ महादेव भोगले पुणेंकर वास्तव्य हौंकें यांणीं शके १७७१ सालीं केली ती अस्सल प्रत राजमान्य राजश्री माधवराव सखाराम कुळकर्णी सोलेगांवकर यांणीं प्रत घेण्याकरितां आणिली ती त्यांचे वरोवर भागानगरास आली. ती संभाळून ठेवणेविषयीं भोगले यांचें पत्र सोलेगांवकरांस आलेवरुन प्रत पाहिली. वाचिली. संग्राह्य योग्य दिसल्यावरुन संग्रह केला असे. मि० आश्विन शुद्ध १ भृगुवासर शके १८०० वहुधान्यनाम संवत्सरे." **वामन बाळकृष्ण दीक्षित.**

‡ ही यादी आह्मांस देलवडी ता० भिमथडी येथील इनामदार श्री० रावजी पुणेकर यांजकडून रा० शं० तु० शाळिग्राम यांणीं मिळवून दिली. हींत जीं स्थलांचीं नांवें आलीं आहेत तीं जशीं मूलांत दिसलीं तशींच दिलीं आहेत. कोठें फरक असल्यास आमचे मित्र आह्मांस कळवितील.

१. डेरे दाखल झाले=शहराबाहेर लष्करांत दिलेल्या तंबूंत येऊन उतरले. ही गोष्ट पौषमासीं झाली.

१. तेथोन पुढें कूच होऊन मौजे **पा**रगांव **सा**ळूमाळूचें क्षणतात व **वा**ळकी [यां] मधी नदी **मु**ळामुठा व **भी**मेचा संगम झाला आहे. तेथें मुक्काम जाहला. कोश सात. लष्कर आघाडी पिछाडी दोन कोश तळ पडत होता.

१. तेथोन पुढें मौजे **मां**डवगणावरून मौजे **का**ष्टी [व] **तां**दळी [या] दोहीं गांवचे मधी **घो**डनदीवर मुक्काम झाला. अजमासें कोश आठ. **श्री**मंत व **शिं**दे व **हो**ळकर[2] यांचा मुक्काम सरासरी तीन कोश पडला होता.

१. तेथोन पुढें मौजे **आ**डळगांवावर मुक्काम झाला. कोश सात. लष्करचा तळ लांबी रुंदी सदर्हूप्रमाणें कोश तीन असे. पाणी वोढ्याचें. [ओढा] पूर्वेस वाहतो.

१. तेथोन पुढें मौजे **भो**सेगांवापाशीं डोंगराची खिंड आहे, ती खिंड उतरून मौजे **मि**रजगांवावरून पूर्वेस **ना**गलवाडी व **सिं**गवी [यां] मधी नदी **सी**ना [इज] वर **श्री**मंतांचा मुक्काम झाला. **मि**रजगांवावर **हो**ळकर उतरले. **खां**डवी **कों**वळीवर **शिं**दे होते[3]. एकूण अजमासें तळ चार कोश होता. **आपा** साहेब व **भा**ऊ साहेब वगैरे झाडून लोक पाळ[?] यांचें लष्कर उतरलें होतें. मु॥ कोश ९.

१. तेथोन पुढें कूच होऊन **फ**कराबाद **धा**नोरे येथें मु॥ झाला. **श्री**मंतांची खाशी स्वारी **र**त्नापुरांत राहिली. मधी **ख**डकत गांवावर **जि**ऊबा **दा**दा भेटले. त्यांणीं आपली फौज व पलटणें वगैरे दाखविलीं. तो गांव मौजे **ख**डकत, तेथून पुढें दोन कोशावर **फ**कराबाद **धा**नोरे एकूण दोन गांवें. दरम्यान मधी-**विं**चलना नदीवर मु॥ झाला. तेथें मौजे **क**उडगांव येथें **भो**सले येऊन मिळाले. त्यांची भेट होऊन नंतर **फ**कराबाद **धा**नोरेवर मु॥ झाला. कोश ६. लष्करची आघाडी पिछाडी सुमारें ५ कोशांवा तळ पडला होता. तेथें हुताशनी झाली. दुसरे दिवशीं **धु**ळवडी तेथें खेळून प्रहर रात्र पिछलीचे सुमारास सडया फौजा तयार होऊन **आ**पासाहेब व **भा**ऊसाहेब व **बा**बा[7] **फ**डके व **जि**-

---

२. शिंदे व होळकर–दौलतराव व तुकोजीराव.

३. होते–राहिले, उतरले.

४. आपा साहेब=चिंतामणराव पटवर्धन. भाऊ साहेब=परशुराम भाऊ पटवर्धन.

५. जिउबा, जिवबा.–हे व बाळोबा तात्या असे दोन शेणवी गृहस्थ महादजीपासून शिंद्यांचे कारभाऱ्यांत मुख्य होते. दौलतरावाच्या वेळीं तर सर्व कारभार त्यांचे हातीं होता.

६. दुसरा रघूजी.

७. बाबा फडके–हरिपंत फडके यांचा पुत्र.

ऊबादादा व होळकर व भोसले ऐसे सडे तयार होऊन नबाबाचे तोंडावर मौजे बावीवरून मौजे घोडेगांवावर गेले. तेथें पहिले दिवशीं मोंगलावर जाऊन उभे राहिले. मोंगल नबाब मोंहोरीचा घाट खर्ड्याचे उत्तरेस आहे तो बालेघाट उतरून तळगसी[८] घांटावर खरनदीवर मु॥ झाला होता. तिकडील फौज तिसरे प्रहरीं चालून आली. त्यांची यांची गोळागोळी होऊन ते परत माघारे मु॥ स गेले. श्रीमंतांकडील स्वाऱ्या माघाऱ्या फिरोन घोडेगांवचे रानांतच मुक्काम झाला. तेथें मुक्कामावलीं गांव [होते ते.] घोडेगांवचे उत्तरेस ठाणें पिंपळगांव तेथें शिंदे [व] जिऊबादादा राहिले. व बावा फडके व आपासाहेब व भाऊसाहेब व होळकर व भोसले ऐसे घोडेगांवचे रानांत दक्षिणेचे आंगें वाघेगांव आहे तेयपर्यंत राहिले. अजमासें चार कोशांचे आंत.

१. पुढें दुसरे दिवशीं नबाबाचें कूच होऊन वाकीगांव खरनदीच्या कडेस खरड्यापासोन पश्चिमेस अदमासें दोन कोश आहे, तेथें नबाबाचा मुक्काम झाला. ते दिवशीं श्रीमंतांकडील सडया स्वाऱ्या तयार होऊन फकराबाद धानोऱ्याहून खाना नबाबाचे तोंडावर जाऊन, गोळागोळी होऊन, संध्याकाळीं माघारे फिरून घोडेगांवापाशीं दक्षिणेस मौजे नाणजेवर व चौंभेवाडी*वर मु॥ झाला. तिसरे दिवशीं नबाब कूच करून परांड्याचे सुमारें चालले. आघाडीस राजे रावरंभा व दुल्लेखान व आशद अल्लीखान व चंड व ले आणखी वगैरे फौजा ऐसे आघाडीस विनीवर चालले होते. मध्यें बुणगे घालून पिछाडीस खासे नबाबाची स्वारी झाडून फौजांसुद्धां येत होते. तों इतक्यांत श्रीमंतांच्या फौजा आपासाहेब व भाऊसाहेब व भोंसले व होळकर ऐसे उजवे बाजूस दक्षिणेचे आंगें तरडगांवचे रानांत टेंकडीवर सरंजामसुद्धां उभे राहिले होते. खालीं लवणांत उत्तरेकडील बाजूस बावा फडके हुजुरातसुद्धां जरीपटका घेऊन उभे होते. टेंकडीवर तोफा नबाबाचे बुणग्यावर लावावयास आणल्या होत्या.. त्याही पश्चिमेकडून येत होत्या. तों जिउबादादा फौज पलटणें तोफखाना घेऊन उत्तरेकडून नबाबाचें खासे स्वारीचे तोंडावर उभे होते इतकियांत पेंढारी यांनीं बुणग्यावर तोंडें लाविलें. तेव्हां नबाबाकडील आघाडीच्या फौजा उठल्या. तों पेंढारी लुटारी निघोन गेले. नबाबाकडील फौजांची उठावणी झाली ती येऊन आपासाहेब व भाऊसाहेब टेंकडीवर उभे होते त्यांजवर आघाडी आली तों इकडून आपासाहेब व भाऊसाहेब यांनीं उठावणी केली. तेव्हां दोहीं-दळांची चकमक होऊन गर्दी झाली. ते वेळेस भाऊसाहेबांस कपाळावर

---

८. 'तळघांट' म्हणतात तो!
९. तोंड लाविलें=हल्ला केला, युद्धास आरंभ केला.
* चौंभेवाडी कीं. चौंथेवाडी?


जखम लागली. तों उत्तरेकडून जिउबादादा फौज तोफखाना घेऊन येऊन पोहोंचले. त्यांणीं तरडगांवचें रानांत रणटेंकडी म्हणतात त्या टेंकडीवर नवाबाकडील फौजेचा जमाव होता, त्याजवर उत्तरेकडून तोफा लाविल्या व श्रीमंतांकडील बारगीर झाडून जमा होऊन करोळी[10] सुरू झाली, व भोंसले यांणीं दक्षिणेकडून बाणांचा मार केला. ऐशी लढाई प्रहर दीड प्रहर झाली. तों दोन प्रहरचें सुमारास मोंगलाकडील लालखान पठाण यास हौद्यांत गोळी लागून तो ठार झाला, व अवांतर मोंगलांचे फौजेची धूळधाणी होऊन मागील सहा घटका दिवस आदमासें राहतांनां मोंगलाचा मोड झाला. तेव्हां मोंगलाच्या फौजा खरड्याचे दक्षिणेस डोंगराची खिंड आहे. त्या खिंडींत अस्तमानीं शिरल्या. त्यांचे पिछावर श्रीमंतांच्या फौजा जाऊन चहूंकडोन मोंगल वेढून ती रात्र सरून मागील दोन घटका रात्र राहतांनां मोंगल खर्ड्याजवळ आणून घातला. पेंढारी लुटारी यांनीं आघाडीस कांहीं मोंगलाची लुटालूट केली. हें वर्तमान श्रीमंतांस कळतांच मोंगलांस पांण्याच्या पखाली मिठाईचे छकडे असें कांहीं पाठविलें म्हणोन सांगतात. आणि सांडणीस्वार पाठवून श्रीमंतांनीं आपले फौजेंत ताकीद केली कीं, मोंगल बुडवूं नये, राखावयाचा आहे. हें वर्तमान ऐकून श्रीमंतांच्या फौजा माघाऱ्या फकराबाद धानोऱ्यावर आल्या. दक्षणेकडील चिंचपूर व गी[11] यांचें [व] देवकराचें चिंचपूर असे दोन्ही गांवावर भोंसले व होळकर राहिले. बाबा फडके व आपासाहेब व भाऊसाहेब बोरलेगांव[12]चे रानांत राहिले व जिउबादादा घोडेगांवचे रानांत राहिले. दुसरे दिवशीं श्रीमंतांचा मु।। रत्नापुराहून फकराबादेवर नवाब मोडल्याचें वर्तमान ऐकून, कूच करून, मौजे पिंपरखेडें व गीरवलीगांव कांहीं जवळेगांवचें रान एकून तीन गांवावर श्रीमंतांचा मु।। विंचलना नदीवर जाला. तेथून भाऊसाहेबांचे समाचारास श्रीमंत बोरलेगांव[12] वेलवडीचे रानांत आले. तेथें भाऊसाहेब होते. तेथें समाचार घेऊन रत्नापुरावर माघारे गेले. कोश ३. तेथून भाऊसाहेब जखमी म्हणूंन नाणजगांवावर मु।। केला. तेथें नबाबाकडील रावरंभा भाऊसाहेबांचे समाचारास आले. पुढें सल्याचें बोलणें लागून संकेत ठरला. इतक्यांत दोन तीन रोजांत नबाब यांस खर्ड्यांत पाणी व वैरणीचा फार तोटा म्हणून खर्ड्यांतून कूच करून खर्ड्याचे पूर्वेस देवगांव [व] आंबी दोहीं गांवावर मु।। करून राहिले. तेव्हां श्रीमंतांकडील फौजा नबाबाचे पिछावर

---

१०. करोळी=(घोडेस्वारांच्या) बंदुकांचा मारा.

११. 'वाघ यांचें'?

१२. बोरलें हा गांव हरी नारायण बोवा आष्टेकर यांचे संस्थानास जागीर आहे.



आणखी गेल्या. त्या फौजेचा मु॥ शेलगांव कोश २ तेथें झाला. मग नवाबाकडील सल्ल्याचें बोलणें ठरवून तह झाला. सरकारचे कागदपत्र उलगडून दिले. तेव्हां श्रीमंतांचें म्हणणें मोंगलास झालें कीं, तुमचे आमचे कागदोपत्रीं ठराव झाल्याप्रमाणें हस्तगत होई तोंपर्यंत तुम्हांकडील मेसरील[13] मुलूख ओलीस द्यावा. तेव्हां मोंगलानें खर्ड्याचे मुक्कामींहून मेसरील मुलुख यास गोविंदरावं[14] काळे यांचे जिमतीस देऊन गोविंदराव काळे हे मेसरील मुलुख यास रत्नापुरचे मु॥ श्रीमंताजवळ [येऊन] हजर केलें. नंतर नवाब कूच करून विटेचे घाटानें जावयास पुढें नळी वडगांव बालेघाटांखालीं आहे त्या वड़गांवावरून घाट चढून, घाटांत जोतीलाची वाडी आहे, तिजवरून बालेघाट चढून घाटावर विटेगांव आहे त्या गांवावर मु॥ झाला. कोश ४. तेथून कूच करून कल्याणरायाचे वाशींवरून पुढें कळंबास गेले. तेथोन पुढें मातीचीगढी म्हणोन गांव आहे, त्या गांवावरून पुढें भालकी गांव आहे, तेथें मु॥ करून पुढें मैलार गांव आहे तेथें मुक्काम करून पुढें बेदरास गेले. बेदरावर चार रोज मु॥ करून हैदराबादेस गेले.—कलम.

१. पुढें श्रीमंतांकडील फौजा शेलगांवांत होत्या त्या नवाब कूच करून गेल्यावर श्रीमंतांकडील फौजा शेलगांवावरून कूच करून संगमेश्वर गांव तेथें खरनदीचा व सीनेचा संगम झाला आहे. तो गांव संगमेश्वर तेथें मु॥ झाला. अदमासें कोश चार ४.

१. श्रीमंतांचा मु॥ रत्नापुरावर होता. तेथोन कूच करून मौजें आव्हाटी गांव सीनेच्या कडेस आहे तेथें येऊन श्रीमंतांचा मु॥ झाला. तेथें फौजा साऱ्या येऊन मिळाल्या. तेथें सरकारची भेट होऊन हजेरी झाली. मग श्रीमंत व सर्व फौजा मिळोन कूच करून परांड्याचा किल्ला पाहून मु॥ पश्चिमेस झाला. कोश ५ पांच.

१. तेथोन पुढें कूच करून कारली[15] मुगावावरून सोनारीवर मु॥ झाला. कोश ५ पांच.

१. तेथोन कूच करून रुईदुधीवर मु॥ झाला. कोश ६.

१. तेथोन कूच करून अंजनडोहावर मु॥ झाला. कोश ६.

१. तेथोन कूच करून सिद्धटेकानजीक भीमानदीवर मु॥ झाला. कोश अजमासें ७.

---

१३. मशीरउलमुल्ख—निजामाचे मुख्य दिवाण.

१२. काळे हे पेशव्यांचे वकील निजाम अल्लीचे दरबारीं होते ते.

१५. नेरले मुगांव, कीं कारली मुगांव?

१. तेथोन कूच करून मौजे आलेगांवावरून खारेवाडीवर मु॥ झाला. गारदौंडेपर्यंत आघाडी होती. श्रीमंतांचा मु॥ खारेवाडीवर गारदौंडेपासून पूर्वेस खारेवाडी कोशावर आहे, तेथें मु॥ श्रीमंतांचा झाला. खारेवाडी लहान गांव म्हणोन मोठें गांवचें नांव लाविलें. परंतु शोध घेतां[16] खारेवाडीवर मु॥ होता. कोश ७.

१. तेथोन कूच करून गारदौंडचे दक्षिणेस पावकोशीवर रस्ताच आहे. त्या मार्गानें स्वारी दौंडचे पलीकडून मौजे नानगांव इ त व ळ न [?] दोन गांवावरु मु॥ भीमातीरीं झाला. कोश ६.

१० तेथोन पुढें कूच होऊन देलंवडीस आले. तेथें राघूजी टकले यांची मेजवानी आपासाहेब व भाऊसाहेब यांणीं घेऊन पुढें टेंकचे खांबगांवावर मु॥ झाला. नदी मुळामुठा. कोश ८.

१. तेथोन कूच करून थेऊर, कोलवडीवर मु॥ झाला. मधी नदी मुळामुठा. कोश ६.

१. तेथोन स्वारी पुण्यास दाखल झाली. कोश ५.

स्मरणार्चीं कलमें लिहिलीं[17] त्यांचीं उत्तरें.

१. जिऊबादादा निजबत शिंदे हे मिरजगांवचे पूर्वेस गांव खडकत आहे तेथें येऊन भेटले व फौज दाखविली असें म्हणतात.

१. सर्‍या फौजा [यांचा] पाहिले दिवशीं घोडेगांवावर मु॥ झाला. दुसरे दिवशीं मौजे नाणजेवर मु॥ होऊन फालगुन वद्य ५ समारंभ तेथें झाला. ते रात मौजे नाणज व चौंभेवाडीवर रंगपंचमी झाली.

१. भाऊसाहेबांचे समाचारास श्रीमंत आले ते गांवचें नांव बोरलेगांव बेलवडीचें रानांत.

१. मसरील मुलूख यास गोविंदराव काळे घेऊन रत्नापुरचे मुक्कामीं आले.

१. नवाब खर्ड्यास गेल्यानंतर सरकारच्या फौजा कोणकोणत्या गांवावर राहिल्या आहेत तें सदरीं झाडून मुक्कामांचीं गांवें लिहिलींच आहेत.

१. नवाब खर्ड्याहून गेल्यावर मुंगीचे घाटानें गेले नाहींत विटेचे घाटानें गेले तो मजकूर सदरीं लिहिला आहे.

१. या गांवचा मु॥ दुसऱ्या गांवावर गेला तो तळ कितीक लांब पडत होता म्हणोन आज्ञा त्यास शिंदे, होळकर, भोसले, आपासाहेब, व भाऊसाहेब, वगैरे

---

१६. यावरुन यादी तयार करणारानें हें काम मोठ्या काळजीनें केलें असें दिसतें.

१७. यावरुन ही यादी कोणा मोठ्या गृहस्थाचें पत्र आल्यावरून यादी-गार यांणीं लिहिली असें होतें. पुढें टी० १८ पहा.

१८. मागें टीप १७ पहा.

निरनिराळे उतरत होते, तेव्हां पांच चार कोशपर्यंत तळ पडत होता.

१. गारदौंडेस पाच्छाई[19] जादे होते म्हणून श्रीमंतांची स्वारी गेली नाहीं. दौंडेच्या पलीकडून अर्धा कोशाचे छाटयानें स्वारी गेली. नवबदी नगारे वाजले नाहींत म्हणोन परस्परां सांगतात.

१. सरकारच्या फौजा नवाबाच्या पिच्छावर गेल्या त्यांचे मुक्काम व कोश सदरीं कळलेच आहेत. खर्ड्यापासून दक्षणेस चार कोश सुमारें गेल्या होत्या. तेथून मागारें फिरल्या.

१. स्वारी पुण्याहून जातां येतां मुक्कामाचे कोश किती ते सदर मुक्कामाचे लिहिलेच आहेत.

[५५] श्रीमंत महाराज श्री परमहंस बाबा स्वामींचे सेवेशीं.

अपत्यें चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत फाल्गुन शुद्ध षष्टीपर्यंत स्वामींचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे विशेष. आशीर्वादपत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन संतोष जाहला. तुम्हीं वराईवर लगट करून शिमगे पूर्णिमे आलीकडे श्रीनें तुम्हांस वसई दिली, ऐशियास स्वामी साक्षात्कार ईश्वराचा अंश आहेत. स्वामींचे मुखांतून निघेल त्याप्रमाणें होईल येविषयीं संशय नाहीं. स्वामींनीं कृपा करून अभय उत्तरें देऊन वसई दिली म्हणोन आज्ञा केली तेव्हां वसई दिलीच. स्वामींचें अभय [वचन] पूर्ण चित्तांत धरून आज्ञेप्रमाणें शरीरद्वारां साहस करणें तें आम्ही सर्वदा करीत असों. तरि शिमगे पूर्णिमे आलीकडे वसईवर स्वामींचा ध्वजारोहण करण्यास स्वामी समर्थ अहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[५६] श्रीमंत महाराज राजश्री परमहंस बाबा स्वामींचे सेवेशीं.

चरणरज चिमणाजी बालक विज्ञापना येथील वर्तमान तागाईत वैशाख वद्य १ पावेतों महाराजांचे आशीर्वादेंकरून यथास्थित असे विशेष. स्वामींचे आज्ञेप्रमाणें श्रीनिवास केदार याजरामागें पुतळ्या १२५ रुपये १२५. एकूण सवाशें पुतळ्या व सवाशें रुपये पाठविले आहेत. सेवेशीं प्रविष्ट जाहलियाचें उत्तर सादर जाहलें पाहिजे, व सर्व स्वामींच्या आशीर्वादेंकरून फत्ते जाहलें याचें वृत्त सविस्तर काल लेहून सेवेशीं विनंतीपत्र पाठविलें आहे तें पुण्याहून रा अंताजी नारायण यांणीं स्वामींचे सेवेशीं पावतें केलेंच असेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती चंद्र २४ सफर सन तिस्सा सल्लासेन हे ज मा अ से [?]

---

१९. हे पाच्छाईजादे कोण ? | ण्याकरितां.
२०. नौबत न वाजविणें हें अदबी [illegible]

[५७] श्रीमत् महाराज श्री परमहंस बाबा § स्वामींचे सेवेशीं.

स्वपत्यें चिमाजीनें कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना येथील कुशल नागाईत ज्येष्ठ बहुल षष्ठीपर्यंत स्वामींचे आशीर्वादें करून यथास्थित असे विशेष. सोमाजी बराबर स्वामींनीं आशीर्वादपत्र पाठविलें तें प्राविष्ट होऊन संतोषावाप्ती जाहली. वसई फत्ते जाहली यावरून स्वामींनीं मजला कित्येक कृपा-उत्तरें गौरवून दाशरथी आदिकरून साक्ष-उपसाक्ष* देऊन आज्ञा दिली. तर सर्व सामर्थ्य स्वामींचें आशीर्वादाचें. वसई दिल्ही दिल्ही हें उत्तरें त्रिवार स्वामींनीं लेख केलीं व स्वामींनीं पाटसास मज दर्शन दिलें तेथेंहीं वसईविशीं अभय दिलें. तदनरूप स्वामींनीं वसईवर सुदर्शन प्रेरून धर्मद्वेष्टे यांचा निःपात केला. येरवीं वसई सई होती असें [नवतें] व टोपकर अग्निरूप होते त्यांच्या सर्व शक्ती कुंठित करणें हा प्रताप स्वामींचा, आम्हां मानवी लोकांचें हें कृत्य नव्हे. श्री रघुनाथ [यांणीं] वानरां हस्तें समुद्रीं पाषाण तरवून लंकेशादिक त्रिकुटा चळाचें मर्दन केलें तैसेंच श्रीकृष्णें यादवां हस्तें म्लेच्छादे दैत्यांचें निर्दळण केलें, याच प्रकारें पाश्चात्यांचें उपमर्दन स्वामींनीं करून वसईत ध्वजारोहण केलें. स्वामी मूर्तिमंत ईश्वररूप आहेत. स्वामींचा प्रताप कर्तृत्व वर्णावयास आमची बुद्धि नाहीं. प्रपंचिक विचारें स्वामींनीं मज महत्त्व देऊन आज्ञा दिली तर हें सर्व भूषण स्वामींचें आहे. मी स्वामींचा असें.

पुतळ्या पाठविल्या त्या निफासी आहेत त्यांस फांसे करावयास सोनें तोळे ५ पांच पाठवणें म्हणून आज्ञा त्याजवरून सदर्हू पांच तोळे सोनें सोमाजी बराबर पाठविलें आहे.

लक्षुमणराव याजबाबत सातशें रुपये आम्ही पुण्यास येऊन सेवेशीं पाठवून देऊं.

जिन्नस पाठविणें वजन पक्के.

८३ साकर.
८३ गुळ.
८८॥ केशर.
८८१ कृष्णागर.
८८८३ कस्तुरी तोळे.
फिरंगी कागद गडी २.
पंवळी माळ १०८.

येणेंप्रमाणें पाठवणें म्हणून आज्ञा त्यावरून.

साताऱ्याहून देवविलें.
८३ साकर.
८३ गुळ.
पुण्याहून देवविलें वजन पक्के.
८८॥ केशर.
८८१ कृष्णागर.
८८८३ कस्तुरी.
फिरंगी कागद गडी २.
पंवळ्यांची माळ. १०८
मोतें दर रूपयास मोतीं १ एक

* साक्ष–उपसाक्ष=उपमा, प्रतिउपमा.

§ धावडशीचे स्वामी.

प्रमाणें मोतीं सव्वाशें पाठवणें म्हणून आज्ञा त्यास येथें मोतीं नाहींत. स्वामींचे आज्ञेप्रमाणें पुण्यास खरीदी करून पाठवावयाविशीं लिहिलें आहे. मोती मिळालीं तर पाठवितील. मोतीं न मिळत तर सव्वाशें रूपये सेवेसीं पाठवितील.

पांच कारकुनांस पाठवितों त्यांस धंदे सांगणें म्हणोन आज्ञा. ऐशास आम्ही पुण्यास आल्यावर स्वामींनीं दोन अथवा तीन कारकून पाठवून द्यावे हे विनंती आमची आहे. असें असतां स्वामींनीं पांच कारकून पाठविले तर स्वामी-आज्ञा आमचे वस्तु-

येणेंप्रमाणें सेवेशीं पाठविलें आहे. व्हावें हे विज्ञापना.

[५८] श्रीमत्परमहंस बावा स्वामींचे सेवेशीं.

चरणरज दिमणाजी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती यथाल कुशळ तागाईत छ० २ मोहरम चैत्र वद्य दशमी मुक्काम किल्ले कोरींगडे घाटमाथा यथास्थित असों विशेष. औरगाबादेहून पारनेरानजीक आलों. तेथे राजश्री संभाजी आंगरे सरखेल एकाकीं आलीबागेंत उतरोन हिराकोट घेतला. सागरगड घेतला, चौलचा कोट घेतला, थळचा कोट घेतला, आलीबागेंत कुलाब्याचें पाणी बंद केलें. ये समय येऊन आपलें रक्षण करावें. ऐसें मानाजीचें पत्र नानांजवळ आलें. येतां च नानांनीं चार पांचशें राऊत वासुदेव जोशी व विठ्ठल शिवदेव व अंताजी नारायण यां समागमें देऊन रवाना केलें. आम्हांस मानाजीचें पत्र होतें तें आम्हांकडे पाठविलें. पत्र मार्गीं पावलें. तेच दिवशीं लांब मजल करून घोडनदीवर मुक्काम केला. तेथूनच मानाजीस आश्वासनाचें पत्र लिहून रवाना केलें. दुसरे दिवशीं विसां कोसांची मजल

मोडवेल असें नाहीं येविषयीं सोमाजी विनंती करील त्याजवरून विदित केलें आहे, स्वामींची आज्ञा सोमाजीनीं जबानी सांगितली त्याजवरून वस्त्रें पाठविलीं व सोमाजीस सोमाजी बरोबर दोघे होते त्यांस दिलीं.

कारकुनास वस्त्रें.

१५ तिवटे.

३ पासोडिया.

१८

सोमाजीस रुप्याचें कडें दिले सोमाजीबरोबर दोघे होते त्यांस दोन पासोडया दिल्या.

१९०॥ [?] पुण्याहून देवविले विदित झालें पाहिजे. सेवेशीं श्रुत व्हावें हे विज्ञापना.

---

१. हेही धावडशीचेच स्वामी.

२. कोरी कीं कांगोरी. ?

३. संभाजी हा कान्होजी आंग्रे यांच्या औरस पुत्रांपैकीं धाकटा.

४. मानाजी हा कान्होजीच्या राखपुत्रांपैकीं एक. याजकडे कुलाबा किल्ला होता.

५. नाना=बाळाजी बाजीराव.

करून लोहगांवास आलें. मानाजीचे कुमकेविषयीं इंग्रजांसही पत्रें पाठविलीं. तेच दिवशीं पुण्याहून चिरंजीव नानांस रात्रीं बोलावून आणून त्यां समागमे सारी फौज देऊन रवानगी केली. ते येथून पांचवे रोजीं कुलाबियास जाऊन पोंहोचले. आपणही पुण्यास जाऊन तीन दिवस तेथें राहून मातुश्रींचें दर्शन व आज्ञा घेऊन स्वार होऊन काल येथें आलों. नाना तेथें पावले. तेच दिवशीं संभाजिकडील चौकी बाहेर उभी हिराकोटाजवळ आश्रयास होती ते मारिली. पंचवीस तीस माणूस कापून काढिलें. तुळोजी आंग्रया जखमी धरून आणिला आहे. इंग्रजही आगोदर कुलाबियास येऊन पाणी सामान जे पाहिजे तें कुलाबियास पोंचविलें. व सांप्रत तो आरमारानशीं कुलाब्याजवळ आहे, तेथून तोफांचा मार दिला. त्यामुळें आलीबागेतून सरोन हिराकोटचे उत्तरेस आश्रयानें मोर्चे बांधून राहिले आहेत. नाना सागरगडा खालून खाडीचे कडेनें गेले तेथें पंचवीस माणूस संभाजीकडील आलें होतें. त्यांत सरदार होता तो व पांच सात माणूस जीवें मारिलें व वरकड पळाले. सातजण धरून आणिले. जर संभाजी लौंकर निकाल काढून जीव वांचवून निघोन गेला तर उत्तमच जालें. गुराब व थोरलीं गलबतें इंग्रजांचे भयानें सुवर्णदुर्गाकडे लावून दिलीं आहेत. लहान गलबतें व महागिऱ्या मिळोन साठ दागिनें तरतीं सारबरीचे खाडीजवळ ठेविलीं आहेत. जर धीर धरून मोर्चेबंदी करून राहिला तर मोर्चे लावून पारपत्याचा विचार करणें तैसा स्वामींच्या आशिर्वादाचे बळें करीतच आहों. इंग्रजांस मार्ग देऊन जाऊं द्या म्हणून संभाजीनें सांगून पाठविलें होतें. परंतु इंग्रेजाने मान्य केलें नाहीं. आम्ही औरंगाबाद प्रांतीं आहों, ये प्रांतीं ध्यान नाहीं, ऐसा समय पाहून [संभाजी] आले होते. तुमचा आशिर्वाद आमचे मस्तकीं असतां त्यास समय काय फावणार आहे ! कळावें म्हणून लिहिलें असे. मानाजीची स्थापना आम्हीं केली. परंतु त्यास स्मरण न राही ऐसें जहालें. कितेक प्रकारें वावगी वर्तणूक आम्हांशीं केली. त्याचा विस्तार लिहिल्यानें चित्तांत येणार नाहीं. जे समयीं पाय पाहूं तेव्हां विदीत करूं. उरण जागा फिरंग्याची ते आपणच बळावलीं. तैसेच आमच्या उरावर बांधिला (!) ते विशीं व पैक्याविशीं वारंवार लिहिलें, परंतु तें गोष्ट चित्तांत न ये. आज पांचां वर्षांत एक पैसा आमचा देणें तो दिला

---

६. तुळाजी-कान्होजीच्याराख पुत्रापैकीं एक. हा संभाजीच्या पक्षाकडे होता.

७. एक प्रकारचें तारूं.

८ दागिने=नग (सारबांचें)

९. औरंगाबाद प्रांतीं निजामाचा वडील पुत्र नासिरजंग बाजीरावाच्या कुमकेस आपा सैन्य घेऊन गेले होते. १७२०

नाहीं. बहुतच अमर्यादा मांडिली. यास्तव त्याचेही डोळे उघडावे. याकरितां तजविजेनें पाल व मिरगड दोन्ही जागे संभाजीच्या हातास जात होते. तेथील लोकांचा दिलासा करून ते जागे घेऊन आपलीं निशाणें चढविलीं. तैसेंच फिरंगी याचें उरण बळाविलें होतें तेंही घेतलें. आजच फत्ते जाल्याचें पत्र उरणाहून आलें. सारांश त्याचे डोळे उघडले. व सर्व प्रकारें संभाजीचे हातोन जीवही ये समयीं वाचविला असे. सारांश इतकाही प्रताप स्वामींचे आशीर्वादाचा आहे. तेणेंकरून सर्व विचार होतात. दुसरा अर्थ नाहीं. कर्ज फिटेल ऐसें स्वामींचे मुखावाटे निघालें आहे, तेंही शेवटास जाईल. स्वामीच्या आशीर्वादावेगळें दुसरें जाणत नाहीं. उद्यां परवां घाट उतरोनही (?) कुलाब्या पावेतों जाणार आहे. तेथें न पावतां अगोदर संभाजीचा निकाल लाला तर उत्तमच आहे. नाहीं तर तेथवर जाऊन होईल वृत्त तें लिहून पाठवूं. निरंतर आशीर्वाद पत्र पाठवीत जावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

खर्ड्याच्या लढाईचा पवाडा.

[५९] हिंदुस्थान गुजराथ सोडुन शिंदा दखनेंत आला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ ध्रुपद ॥ मजल दरमजल नर्मदा उतरून आले पार ॥ धरला दखनचा सुमार ॥ बेगुबेग येऊनि पाणी घेतलें गंगातीर ॥ फौज होती चाळीस हजार ॥ मनीं मनसुबा करूनी चढले बालेघाटावर ॥ धरला ढंकानी तस्कर ॥ मग कित्येकासी जरब पोंचली मरून झाले चूर ॥ पळाले पुंड पाळेकर ॥ तेथुन नलदिनें कूच करूनी दाखल तुळजापुर ॥ आले दखनांत झालें जाहिर ॥ दखनदेशीं अंबा भवानी दैवत अनिवार ॥ देवीसी केला नमस्कार ॥ चाल घुमाळी ॥ दिले तुळजापुर सोडुनी ॥ गेले चंद्रभागा उतरूनी ॥ खबर ऐकिली श्रीमंतांनीं ॥ दोन कोस आले चालूनी ॥ भेटले हाडपसराच्या रानीं ॥ नेमिली पुण्याची छावणी ॥ जवळ पेठ आहे भवानी ॥ मुक्काम वानवडीवर केला ॥ हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ १ ॥

---

१०. उरणबेटांत द्रोणागिरी पर्वतावर फिरंग्यांचें देऊळ असून त्याभोंवतीं तट व दरवाजा आहे. दरवाज्याच्या वरील उंबरठ्यावरील खुरूस काढून गणपतीची मूर्ति खोदिली आहे ती याच वेळीं खोदिली असावी.

११. मोठमोठ्या स्वाऱ्या पेशवे करीत असत त्यामुळें त्यांस खर्च फार येऊन नेहेमी कर्ज असे. हें कर्ज पुढें नाना फडणीस यांणीं निःशेष फेडीपर्यंत चाललेंच होतें. त्यास उद्देशून वरील वाक्य आहे.

१२. हें पत्र व मागें अंक (५५, ५६, ५७) हीं रा० कृ० वि० कालगांवकर यांणीं नकला करून पाठविल्या होत्या त्यांवरून घेतलीं आहेत. यां० ड० यांणीं या (५८) पत्रावरूनच या स्वारीची सर्व हकीगत लिहिली असावी असें वाटतें.

१. शिंदे दक्षणेंत सन १७९२ मध्यें आले. २. गंगा=गोदा.

सहा चार महिने तिथें गुजरले पुण्यास येऊनी ॥ मनसुवा बहु सवळं करूनी ॥ न बाबासी पत्र लिहिलें फार फार अर्जीनी ॥ खर्चि द्या आम्हांस पाठवूनी ॥ जासुदजोड्या केल्या रवाना पोंचल्या जाऊनी ॥ पत्रं टाकिलें मुजरे करूनी ॥ नबाब बहादर मशरनमुलुख एक मसलत करूनी ॥ पत्र पाहिलें त्यांनीं ॥ वाचुन परगण्यावर चिठ्या नेमिल्या समय समपाहुनी ॥ नगदी ऐवज दिला लावूनी ॥ पांसष्ट लाख रूपये पोंचले नाहीं भरले मनीं ॥ दखनचा हिशोब घेऊं भरूनी ॥ चाल धुमाळी ॥ ऐसें करणें भगवंताला ॥ हिंदुस्थान ज्यानें काबिज केला ॥ परतुन दखनमधी आला ॥ तुणें शहरीं काळ झाला ॥ खबर कळली नबाबाला ॥ नबाब बेदरावरी आला ॥ खरे खोटे भासे लोकांला ॥ तर्क्ती दवलतराव स्थापिला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान सोडुन० ॥ २ ॥

नबाबानें पत्र लिहिलें श्रीमंत नानांसी ॥ शिवाय दवलतराव बापूसी ॥ पांसष्ट लाख रूपये आम्हीं कर्ज दिले शिंद्यासी ॥ लवकर द्या आमचे आम्हांसी ॥ आटोकाट सरदार मिळोनी बसले मनसुब्यासी ॥ क्रोध आला दवलतरावासी ॥ तुम्हीं बसून रहा पुर्ण शहरीं हुकूम करा आम्हांसी ॥ पाहुनि घेतों नबाबासी ॥ तमाम फौजा मिळोनि दिले रोनमुरे त्यासी ॥ बोलाविलें जिऊबा दादासी ॥ तिथें जेवत असला तर इथें या तुम्हीं पाणी पियासी ॥ घेऊनि देवजी गवळ्यासी*॥ चाल धुमाळी ॥ येऊनि लवकर पोंचलें ॥ श्रीमंत पुण्याबाहेर निघाले ॥ मुळा-मुठावर डेरे दिले ॥ बावन उमराव मिळाले ॥ एकंदर बसुनि मनसुबे केले ॥ भोंसले ते हि लवकर आले ॥ शिंदे आघाडीस घातले ॥ येऊन सिनेवर शह दिला ॥ हुकुम० हिंदुस्थान० ॥ ३ ॥

बेदर सोडुन नबाब लौकर बाहेर निघाले ॥ अमिरउमराव संगें घेतले ॥ चला चला म्हणून लवकर घारूरावर आले ॥ पुण्याकडे झेंडे फिरविले ॥ तेथुन जलदिनें कूच करूनि वांजरानदीवर आले ॥ फिरंगी आघाडीस घातले ॥ शेकसलाची[४] करूं कंदुरी मशीरन बोलले ॥ पेशवे थरथरां कांपुं लागले ॥ पासष्ट लाखांचा मुलूख मागतां तेही विसरून गेले ॥ स्वमीं नबाब दिसूं लागले ॥ सांडीवरती सांडी फिरती डाकवाले बसविले ॥ वरचेवर बातमी आणऊं लागले ॥ चाल धुं० ॥ घाट उतरले मोहोरीचा ॥ मार्ग धरिला पुण्याचा ॥ एकच गट करून फौजेचा ॥ माळ चढले नायगांवाचा ॥ तक[ला?]वा आला तिकडुन पेशव्याचा ॥

---

१. ता० १२ फेब्रुवारी १७९४ रोजीं वानवडी येथें.

* कोण ?

४. सेकसलास–पुण्यांतील.

५. महंमदाची मुलगी फतिमा इच्या नांवानें मुसलमान उत्सव करतात तो.

निश्चय केला यांनीं झुंजाचा ॥ धडाधड वार सुटे तोफेचा ॥ मुसा रहिमुंनच मोरचा तुडवीला ॥ हुकूम० हिंदु० ॥ ४ ॥

नबाबानें मोरचा तुडविला कळलें श्रीमंताला ॥ अजुरंदे जाले बहु मनाला ॥ अमीर सारे बोलावूनी आणिले देऱ्याला ॥ वक्त हा बुडायाचा आला ॥ नाना फडणीस एक मसूदी तर्क त्यानें काढिला ॥ बोलाविलें जिउबा दादाला ॥ तुम्हीं आघाडीस असतां मनसुबा कसा नाहीं कळाला ॥ नबाब गफलतीनें आला ॥ तीच विरेशरी धरून सऱ्या फौजा आघाडिला ॥ चुरस लागली तेव्हां शिंद्याला ॥ भिवराव पानसे तोफखाना त्यांचे हवाली केला ॥ फिरंगि लोक तैनातीला ॥ चाल घु० ॥ पेशव्यांनीं विंचरणा रोखून ॥ सऱ्या फौजा पुढें देऊन ॥ रास्त्यांनीं एक अलंगधरून ॥ फडक्यांनीं तवाफरा बांधुन ॥ राजे बाहदर नाम निशाण ॥ फौजा नानाच्या आध्यान ॥ तेथें मिळाले अष्टप्रधान ॥ हौद्याशीं हौदा भिडुनि गेला ॥ हुकूम केला० ॥ ५ ॥

करून स्वारी तयार नबाब जरदा अंबारींत ॥ बेगम्यापुढें हुजुरांत ॥ त्यांची उमेदवारी पेशवे सर करूं सहजांत ॥ बांधली रांडांनीं हिंमत ॥ मशारल मुलुख त्याचे मसुंदी राजा नेमिवंत ॥ झाडुन फौजा त्याच्या अंकित ॥ रोशनाखा पर बिनीचाले नबाबाच्या हुकुमांत ॥ भरअमल दोन्ही दळांत माहित ॥ इस्मालखा दनी पठाण गारदी त्यांचे संगत ॥ नामी करंवळ आहे हुजुरांत ॥ फाजलखा रोहिले खांसि बारा हजार जमात ॥ नंबुरे नोडुन उंटावर [त] ॥ चा० धु० ॥ नबाबानें हल्ला केली ॥ फौज लोणिचा माळ चढली ॥ दोन्ही दळें उभीं ठाकलीं ॥ नामी सरदार आसदअल्ली ॥ तोफखान्याला शिलेंक दिली ॥ देवडी

---

६. मुसा रहिमान हा पेशव्यांचा अरब सरदार होता.

७. अजुरदे=खट्टु, खिन्न.

८. मसुदी=मुत्सद्दी. एक मुत्सद्दी=अद्वितीय राजकारणी पुरुष.

९. वीरश्री (चालीवर वसण्यासाठीं)

१०. भिवराव पानसे—पुणें येथील शुक्रवारांतील पानसे यांचे पूर्वज.

११. अलंग=लांब ओळ, बाजू.

१२. तराफरा=तवातोबरा ? पूर्वी प्रत्येक घोडेस्वारानें मुलुखगिरीवर जाते वेळीं एक तवा व एक तोबरा इतकी सामुग्री तरी जवळ बाळगावी असा प्रघात असे. त्या वरून तवातोबरा म्हणजे मुलुखगिरीस लागणाऱ्या वस्तु यांचा समाहार झाला. फरा म्हणजे शिपायांची रांग असा अर्थ आहे पण मग 'तरा' शब्दाचा उलगडा चांगला होत नाहीं.

१३. आध्यान = आध्यानें = ध्यानानें, सभोंतीं ?

१४. नबाबाचा जनानखाना बरोबर हत्तीवर बागत असे त्यास उद्देशून हें व पुढील वाक्य अशीं लिहिलीं आहेत. मुळांत 'बेगम्या, बेगमा' असें असतें तर बरें.

१५. मुत्सद्दी.

१६. करवळ—करोळ=बंदुखीस्वार.

१७. शिलेंक=सरबत्ती.

मार जेव्हां बसविली ॥ पेशव्याची फौज मागें हटविली ॥ फिरून खरनदीवर मुक्काम केला ॥ हुकूम के० हिंदुस्थान गु० ॥ ६ ॥

रातोरात आणून तोफखाना जोडिला जिउबा दादानीं ॥ लोणीगारमाळ पसरूनि ॥ एकापरीस एक शिपाई रांगडा हिंदुस्थानी ॥ दोन कंपु फिरंगाणी ॥ मन्याबापु भोंसले परशरामभाऊ आज्ञा घेऊनी ॥ एक मोरचा त्यांनीं रोंखुनी ॥ भवानराव प्रतिनिधी आले अर्नूपान[18] भोगुनी ॥ एक मोरचा त्यांनीं रोंखुनी ॥ चौकोसाची लांबण पडली कोणांत नाहीं कोणी ॥ बहिऱ्यामधीं[19] फौज गेली मिसळुनि ॥ चाल धुमा० ॥ तोफेचा एकच वर्षला कहर ॥ गगनीं लागुनि गेला धूर मायसी[20] पारख [लें] लेंकुरं ॥ नबाबासी कळुनि आला फितूर ॥ मजल कांय [?] सुटेल तोफेचा वार ॥ पांचजण निवडले रणशूर ॥ मुसा रहिमुचें बुडविले लष्कर ॥ रमेणा[21] बहुत तिथें मातला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदु० ॥ ७ ॥

लालखान वजिरखान ह्यांनीं रणांत घोडीं घातलीं ॥ परशरामभाऊसीं जखम चढविली ॥ दाजीसाहेब येथ शामजंगास स्वारी केली ॥ पठाणी लोक संग हाटेली ॥ कटाव करीत चालले जेव्हां तिराचे मार बसविली ॥ भोंसल्यानें गर्दबाण उडविली ॥ वजिरखानासी बाण लागतां हौद्यांत जीव[22] सोडिली ॥ लालखांची सुद नाहीं लागली ॥ बाळासाहेब ठार जहाले वस्त शान पेडली[23] ॥ खनाखना लव्हा गर्द उडाली ॥ भलेभले सरदार ह्यांनीं बहिरींत तोंडें घातली ॥ आंबारी नबाबानें फिरविली ॥ चाल धु० ॥ लोक लोक झाले चंथत ॥ नबाबमशारलमुलुक हौद्यांत ॥ आनंदराव किल्ला ठेवा नजरेंत ॥ हावाई लाविली किल्यांत ॥ नवाबदाखल सुलतान दुर्गांत ॥ बुणगे आले शिवपट्टणा भोंवत ॥ वेढा काय शिंद्याचा पडला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदु० ॥ ८ ॥

खरनदींवर दिले मोरचे किल्यासीं रोंखून ॥ फौज नबाबाची घेरून ॥ जिउबादादा श्रीमंतांशीं बोले अर्ज करून ॥ नबाबास क्षणांत घेइन लुटून ॥ लुटुल्यावांचून कारण नाहीं बसा शह देऊन ॥ नाना करील तेंच प्रमाण ॥ बे-

---

१८. अनुपान भोगून=याचा अर्थ स्पष्ट कळत नाहीं.

१९. बहिऱ्यामधी–तोफांच्या आवाजामुळें बधिरपणा आला त्यांत. किंवा खोंडा, दरी, नळी ?

२०. मूळांत 'मायशी पारख लेंकर' असें आहे. त्याचा 'आई म्हणून तिलाच लेंकराची पारख, ओळख राहिली–बाकी सर्व चुंदी झाली', असा निर्वाह करतां येईल. परंतु वर दिलेलाच पाठ असावा असें वृत्तावरून होतें व त्याचा अर्थही बरा होतो. पारखलें=परकें झालें, त्याची ओळख बुजाली.

२१. रमणा=तुमुल युद्ध, हातघाईंची लढाई, गर्दी.

२२. जान=जीव.

२३. 'वस्तशैन्य' असें मुळांत आहे. कदाचित् 'मस्त सैना' असेंही होईल.

देंड्यांसी हुकूम टाका रस्ते बंद करून ॥ रुपयाशेर तेव्हां मिळेना अन्न ॥ पाण्या पांचुनि फौज तेरसली नबाबानें ऐकून ॥ सल्यास धाडिले गोविंद किसन ॥ चाल धुं० ॥ गोविंद किसन आले परतून ॥ नबाबासि वर्तमान सुचवून ॥ मशीरल मुलूख दिले पाठऊन ॥ पेशव्यांनीं टाकिलें कैद करून ॥ जसा सांपल्यांत व्याघ्र कोंडून ॥ नबाबासि नानाचें वचन ॥ खातरजमा झाली येथून ॥ अवघा चिंतिंचा विकल्प उडाला ॥ हुकुम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान गुजराथ सोडुन शिंदा दखनांत आला ॥ ९ ॥

शके १७१६ आनंदनाम संवत्सर ॥ फाल्गुन वद्य ६ षष्ठी बुधवार ॥ किल्यामधिं येऊनि नबाबासी आठवला विचार ॥ द्यावी निंबाळ्करासि जहागीर ॥ नबाब बोलतां हजर विश्वासराव बापु सुपेकर ॥ आणविले आपासाहेब निंबाळकर ॥ भेट घेऊनिया [करा] कुचाचा विचार ॥ किल्यामधीं सदर ज्याहा बाहादर ॥ शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे ॥ चैत्र पौर्णिमा शुक्रवार ॥ दळभार घेऊन नबाब वांजरानदीच्यावर ॥ संगे होते निंबाळकर ॥ चाल धुमाळी ॥ कनिया अखेर त्या वेळेस ॥ नबाब गेले भागानगरास ॥ श्रीमंत पोंचलें थेट पुण्यास ॥ गैबिचे देणें भुजंग आयास ॥ कादरभाई चाकरू दिले बिनीस ॥ त्यांनीं जाऊनि गांठिलें हारदास ॥ रामछंद गातो मजलसीला ॥ हुकूम केला बादशाहानें त्याला ॥ हिंदुस्थान गुजराथ सोडुन शिंदा दखनांत आला ॥ हुकुम केला बादशाहानें त्यालें[२६] ॥ १० ॥

---

[६०] ॥ श्री ॥

छ १२ जमादिलोवल प्रहर दिवस प्रातःकाळ.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापुजी भीवराव स्वामी गोसावी यांसि-पो। बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष–तुम्ही रा। राघो गोविंद यांचा व अंतुरकर मोंगलाचा काजिया जाहालियाचा मजकूर दोन चार बंद विस्तारें लिहिला, परंतु कोणे गोष्टी वरून काजिया जाहाला, काजिया व्हावयास कारण काय, तो मजकूर किमपि लिहिला नाहीं. याजवरून तुमच्या लिहिण्याची तारीफ काय त्याहावी! जरी शिंपी, रंगारी यांचे मजकुरावरून अंतुरकर मोगलांनीं काजिया फैलाविला असेल

---

२४. पेंढा-यांसी ? बेरड यांसि ?

२५. तरसली=त्रासली.

२६. या पोवाड्यांत शेवटीं शेवटीं बरेच ठिकाणीं अर्थ स्पष्ट लागत नाहीं. स्थळांचीं व पुरुषांचीं नांवें आलीं आहेत तींही परिचित नाहींत. ज्या कोणांस अधिक जी माहिती मिळेल त्यांनीं आम्हांकडे मेहरबानी करून पाठवावी.

हा पोंवाडा रा० रा० कृष्णाजी रघुनाथ केळकर यांजकडून आम्हांस मिळाला.

तर तो जुंज[1]मुकादिमा आहे. जैसा जेथें जीव देखावा तैसा तेथें पैका वसुल करावा. जातीचा मुकादिमा त्यास पैका सुटेल असें नाहीं. व पैका दिल्या खेरीज तेही जातीं-त येथेंपूर्व[2] वर्तणारनाहीं. या करितां दरनादार पाहून घेणें तें ध्यावें व त्यांनींही बोलावें. असें असोन जुंज कारभारावरून इतकें दररोज लावावेंसें नाहीं. थोडें बहुतांनीं कजिया चुकल तर चुकवणें. माणसें इकडील मेलीं व जखमी झालीं याजप्रमाणें तिकडीलही मेलीं व जाया झालीं असतील त्याचा मजकूर[3] नाहीं. परंतु घोडीं गेलीं मेलीं असतील तीं द्यावीं. येणेंप्रमाणें होऊन अंमल करार वांकें[4] चालवीत असिलियास कजिया वारून टाकणें. वर्तमान वरच्यावरी लिहीत जाणें जाणीजे. छ० ८ जमादिलोवल मु।। सीत आर्बे मया व अलफ बहुत काय लिहिणें. अगर मामलती वरून कजिया जाहाला असेल. आणि सालबसाल मालियत चालत आल्या प्रमाणें सुरळीत करून देतील तरी उत्तम आहे. कजिया वाढवूं नये. याप्रमाणें करावें. तरि तुम्ही काय त्याशीं बोलतां व ते काय कोठपर्यंत बोलतात, व कोणत्या गोष्टी [वर] अट येऊन पडते तें वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[६१] ॥ श्री ॥

राजश्री नाना पंडित प्रधान गोसावी यांसि—

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ मानाजी आंगरे वजारतमाब रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणुन स्वकीय लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष—राजश्री महादाजी रघुनाथ यांस मजमुचा धंदा सांगोन रेवदंडियास पाठविल्यापासून कारभाराचा बंदोबस्त व लोकांची समजावीस यथास्थित करून अमीनपणें येकनिष्ठेनें वर्ततात ऐसें समीप-वर्ती कुलाबियास श्रवणांत येतच होतें. एकनिष्ठतेविशीं आपलाही निश्चा जाहालाच आहे. सांप्रत जंजिरे याचे मोहीमचे प्रसंगांत जमाव व साहित्य सहवर्तमान मशारनिले येथें आलियावर तरतुद[5] व तसबीर[6] पाहून बहुत संतोष जाहाला. सेवक लोक निष्ठेनें वर्ततात त्यांची सर्फराजी बहुमान खावंदांहीं करावा उचित जाणोन राजश्री रामाजीपंतांकडून तपशीलें विनंती लेह-विली आहे. आम्ही लिहिल्याचें जरूर जाणोन या समयांत मशा-

शिक्का. *

१. मुकदिमा=प्रकरण, खटला.
जुंज-झुंज=युद्ध, भांडण.
२. येथपूर्व=यथापूर्व (?) पूर्वीप्रमाणें.
३. मजकूर=मातबरी, हिशेब या अर्थी. कारण मेलेलीं माणसें परत देतां येत नाहींत.
४. वांका=प्रकरण, खटला, हकीगत.
करारबांके=कराराप्रमाणें ?
५. तरतूद=उपाय.
६. तसबीर=प्रयत्न.
* शिक्यावरील अक्षरें लागत नाहीत. हा दीर्घवर्तुलाकृति आहे.

रनिल्हेचे वहुमानास पालखीची आज्ञा करणार आपण समर्थ आहांत. मोर्चेवंदीचे प्रसंगास हरएक साहित्यास रेवदंडासमीप अनुकूल आहे. साहित्याचे तरतुदीस मशारनिल्हेस रवाना करविले असत. सारांश वहुमाना योग्य जाणून लिहिलें आहे. येविशीं उपेक्षा नसावी. रा। छ० २४ माहे रमजान. बहुत काय लिहिणें कृपा निरंतर वर्धमान असावी हे विनंती.

मोतंव सूद.

[६२] ॥ श्री ॥

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यासिं—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्यँ स्ने॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद सु॥ सबां आर्बेन मया व अलफ तुम्ही फौज सुद्धां बुंदेलियावरि कालिंजराकडे गेलिया आलीकडे कांहीं वर्तमान अवगत होत नाहीं. पत्रही येत नाहीं. तरि प्रस्तुत तुम्ही कोण्हे जागां आहां, काय मनसुबा योजिला आहे, बुंधेलियानें सुप्रवृत्त होऊन तुमच्या मनोदयानुरूप मामलियत विल्हेस लाऊन टाकली कीं नाहीं ? यॉं तह करूं नये, झुंजावेंच, हाच त्यांनीं विचार चित्तांत आलिला आहे ? पुढें तुम्हीं काय कैसें करावयाचें केलें आहे. तें सर्व वरचेवरि लिहिणें. इकडील कांहीं नवीन लिहिनेसें नाहीं. अद्यापि सातारियासच आहों. पुढें होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. जाणिजे छ० ९ रजब बहुत काय लिहिणें— पै॥ छ॥ ३ रमजान.

श्री राजा शाहु नरपति हर्षनिधान बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान

लेखन सीमा

॥ श्री म्हाळसाकांत ॥

[६३]

राजश्री रावजी गोविंद गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत रानमान्य—स्ने॥* मल्हारराव होळकर दंडवत विनंति उपरी तुम्ही ज्येष्ठ वद्य ६ व एकादशीचीं पत्रें पाठविलीं तीं पावून लेखनार्थ अवगत जाहला. येथें पावल्यावर सरकार पत्रें उभयतां बाबांस दाखऊन आज्ञेचे भाव सर्व दर्शविले. त्यांनींही बोलण्याचा क्रम चालू केला आहे. धन्याचा लोभ कारभारी यांचे मनःपूर्वक जपणें हें बारीकपणें ध्यानीं आल्यावरून लेखन केलें आहे. राजश्री बाळाजी लक्ष्मण नि॥ चिंचूरकर यांची भेट करविली. त्यांचेही बोलण्यांत उचित तेंच निदर्शनास आलें. पुढें घडल्याचें लेखन

७. या=किंवा, अथवा.

* स्ने॥ =स्नेहांकित.

होईल म्हणोन लिहि। ऐशियासि तुम्ही सरकार पत्रें व आज्ञेअन्वयें बोलून क्रम चालू करविला हें नीटच. यावर दिनावधीवर न पडतां आरंभिला विचार सत्वर बनून ये तें करवणें. खावंदाचा लोभ दिवसेंदिवस दिसण्यांत येईल तसें सेवाही करण्याची उमेद इकडे हे भाव कारभारी व बाळाजी

श्री
म्हाळसाकांत चरणीं
तत्पर येशवंतराव सुत
मल्हारराव होळकर.

लक्ष्मण यांस दर्शवून त्यांचे जपणें मन ज्या दौलतीविशीं आहे त्याची वृद्धी घडे तें करणें. करीम पेंढारी सरकार कैदेत त्याचें बोलणें लाऊन सुटका होती ह्या आवया राजश्री खंडो माहादेव व सखाराम जगजीवन यांनीं ऐकून तेथील मनीचे भाव विस्तारें लेहून पाठविले. त्यास येथें होणें तें दूरां देशींने तेथील सल्लेनच होणें तें होईल. तुम्ही बोलण्याचा क्रम चालता जाला ते पक्षीं दररोज होईल तसें लेहून वरचेवर कळवीत जाणें. आळस न करणें. रा। छ।। ५ रजब सु।। सल्लास अशर मया तैन व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[६४] ॥ श्री म्हाळसाकांत ॥

मोतंब
सुद.

रानश्री रावजी गोविंद गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत रानमान्य स्नेहि। मल्हारराव होळकर दंडवत विनंती उपरी तुम्हीं भाद्रपद व।। ५ चें पत्र पाठविलें तें पाऊन लेखनार्थ अवगत जाहला. फणशा मंदाणकर निंबोण्यास पावून उत्तर आलें. चांदवडचें पत्र आलें नाहीं. आल्यावर लेखन करीन. श्रीमंतांची स्वारी भीमातीरीं कपिला षष्ठी करून येणार. अजम अलफिस्टन साहेबांस व खुशरुदीन मोदी व त्र्यंबकजी डेंगळे यास पत्रें सरकारचीं येतात तीं योग्यते प्रमाणें येत असावीं म्हणोन राजश्री खंडोपंत बाबांनीं साहेबांस लिहिलें आहे. त्या अन्वयें पत्रें येण्यास आज्ञा व्हावी म्हणोन लिहिलें ऐशियाशी फणशा व मूल आन पावेतों चांदवडीं पोंहोचऊन तुम्हाकडे पत्रें आलींच असतील. त्यांनला तेथें ठेवणें सांप्रतचे प्रसंगास अप्रशस्त जाणोन नेमाड प्रांतीं आणावावयाचें ठरून राजश्री परशराम होळकर यांजपाशीं पावते करण्याविशीं पत्रीं राजश्री रामदास आगरवाल व भिकाजी गोमाजी यांस पाठविलीं त्याप्रमाणें ते करतील. याचा तपशील राजश्री खंडो महादेव यांचे पत्रीं लिहिला आहे. तेथें प्रसंगानुरूप बोलावयाचें तें बोलून इकडेही कळविणें.

श्री
म्हाळसाकांत चरणीं तत्पर
येशवंतराव सुत मल्हारराव
होळकर.

आज पावेतों श्रीमंतांची स्वारी पर्वाचें स्नान करून पुण्यास आलीच असेल, पुढें श्री स्वामीस जाण्याचें उरेल तैसें कळविणें. साहेब व मोदी व डेंगळे यांस पत्रें यावर मशारनिलेचे लिहिल्या अन्वर्येच लिहिण्यांत येत जातील रा। छ ५ जिल-काद सु।। खमस अशर मयातैन य अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

मोतंय सूद

[६५] ॥ श्री ॥

राजाश्रियाविराजीत राजमान्य राजश्री बाळाजी गोविंद स्वामी गोसावी यांसि-पो। रघुनाथ बाजीराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष-राजश्री पुरुषोत्तम महादेव हिंगणे यांस जातीस सरंजाम रुपये १५,००० पंधरा हजार रुपये द्यावयाचा करार करून हे सनद तुम्हांस सादर केली असे. तरि सदहू पंधरा हजार रुपयांचे तनख्याचे गांव पा। कोंच पै। अव्वलसाल सन समान सितेना पासून नेमून देणें आणि आकार होईल तो साल दरसाल जा।। मु।। खर्च लिहीत जाणें जाणिजे छ ५ मोहरम सु।। सबासीतेन मया व अलफ, बहुत काय लिहिणें हे विनंती.

[६६] ॥ श्री ॥

* पु।। राजश्री बळवंतराव गणपत स्वामी गोसावी यांसि—

विनंती उपरी. श्रीरंगपट्टणकरांचा प्रकार कसा आहे, बुद्धि स्थीर राहून सरकारचा पैका टक्का हप्तेबंदीचा देऊन दोन पट्ट्यांतील कोणती पट्टी सोडवितात, किंवा पैका द्यावयास अभाव करून लबाडीवर आहेत, वकील पाठविले याजशीं कसे वर्ततात, यांचे त्यांचें अंतर बाह्य कसें, व सरकारी निष्ठेनें वर्तावयाचा या न वर्तावयाचा डौल कसा घातला आहे, ते बातमी तुम्हांस येतच असेल तरि विस्तारयुक्त त्यांजकडील वर्तमान लिहीत जावें. आदवानीकरांनीं हा काल-वरि ऐवजाचा निकाल केला नाहीं. मौलवी तेथें यरुत्यारी जाले आहेत तरि तुम्हीं त्यांस वरचेवरि ताकीद करून ऐवज राजश्री मल्हार नाईक यांस देविला आहे, त्यांचे पदरीं पडे ते करावें. छ० १४ सवाल हे विनंती.

[६७] ॥ श्री ॥

पु।। राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांसि—

विनंती उपरि दरबारचें वर्तमान व राजश्री श्रीपतराव निवर्तलियाचा अर्थ पहिला तुम्हांस लिहिलाच आहे. आलीकडील वर्तमान तर श्रीपतराव यांचे

---

८. पर्व-कपिलाषष्ठीचें.
९. स्वामी=कार्तिक स्वामी.
१०. मेहेदळे यांस बाळाजी बाजीरावानें हें पत्र लिहिलेंसें दिसतें.
११. या=किंवा, अथवा.
१२. हे प्रसिद्ध रामचंद्र बाबा शेणवी.
१३. श्रीपतराव प्रतिनिधी (मृ० १७२८.)
* पु।।=पुरवणी.

बंधु राजश्री जगजीवनराव परशराम यांजवरि राजश्री——स्वामींनीं कृपा करून छ १४ जिल्हेजीं पौष शुद्ध प्रतिपदेस प्रतीनिधीपद दिल्हें. वस्त्रें व हत्ती, बहुमान दिला. वरकडही त्यांचे समागमीं मुतालीक व राजश्री कृष्णानी परशराम यांचे पुत्र दोघे यांसही वस्त्रें [दिलीं.] राजश्री उदाजी चव्हाण येथेंच आहेत. अद्याप कांहीं बोलीचाली नाहीं. पुढें होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. सारांश उभयतां महालेचें अती प्राबल्य नहालें आहे. याचा विस्तार. कोठवरि व्याहावा ? आम्ही युक्ति करून रेटणें तें रेटितों. कांहीं आइकावें लागतें. कांहीं करून देतों म्हणतों. या रीतीनें येथील विचार आहे. राजश्री रघोनी भोंसले बेराडांतून माहूर प्रांतें आले. त्यांच्या चित्तांत आमच्या मुलकांत घांसदाणे घ्यावे ऐसा विचार आहे. नागांजागांहून महालकरी यांचीं पत्रें येतात. मशारनिले तो स्नेहयुक्ति भावभक्तिचीं पत्रें पाठवितात. तथापि त्यांचा प्रकार कपटी आहे. तो तुम्ही जाणतच आहां. आम्हीही कागदीपत्रीं स्नेहयुक्तच लिहीत असतों. पुढें होईल वर्तमान तें लिहिलें जाईल. येथें येणार ऐसेंही वर्तमान आहे. हे विनंती[१५]

[६८] ॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्रबावा स्वामी गोसांवी यांसि—

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष—तुम्ही पत्रें अधिक शुद्ध त्रयोदशीचीं पाठविलीं तीं छ २९ रबिलाखरीं पंढरपुरीं पावलीं. सर्व वर्तमान कळलें. त्यांचीं उत्तरें आलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिलीं आहेत. त्यावरून कळेल. येथील वर्तमान तरि आम्ही क्षेत्र मजकुरीं आहों. या उपरि पुण्यास जाऊं. चिरंजीव राजश्री भाऊ याजकडील वर्तमान तरि ते सावनूर प्रांतीं आहेत. सावनूरकरांची त्यांची भेट होणार. उपरांतिक तिकडील तालामाला पाहून यावें. फार तर पंधरा दिवस तिकडे मोडतील. नाईक सिरे प्रांतीं आहेत. नासरजंग आरकाटकडे जाणार तिकडे छावणी करणार. पाहावें. नबाब बाजरानदीचे तीरें जात आहेत. औरंगाबादेस छावणीस जाणार हेंही वर्तमान असे. तुम्हांस कळवावें म्हणोन लिहिलें असे. *सावनूरकरांची भाऊंची भेट जाहाली. या उपरि पंधरा विसा दिवसां आलीकडे चिरंजीव येतील. नाईक नासरजंगाचे आश्रियानें

---

१४. महाल—राजस्त्रियेस महाल अशी संज्ञा असे. थोरला किं० वडील महाल= मोठी स्त्री. धाकटा महाल=धाकटी स्त्री.

१५. शाहू महाराज यांची तब्बियत १७२८ सालीं नादुरुस्त होती तेव्हां हें पत्र लिहिलें असावें.

* येथपासून पुढील मजकूर खुद्द रामशाच्या हस्ताक्षरीं लिहिलेला आहे

ते प्रांतीं छावणी करून विदनूर प्रांतीं उत्पात करणार व करतील. सांप्रत बरसात जवळ आला. काय काय हातें तें पहावें. छ ६ जमादिलावल हे विनंती.

[६९] ॥ श्री ॥

राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा॥ बाळाजीराव प्रधान आशिर्वाद सुरुसन सबा आर्बेन मया व अलफ तुम्ही पत्र छ २४ रबिलाखरचे पाठविलें तें छ २४ जमादिलोवलीं प्रविष्ट झालें. जैतपुरास राजश्री जयाप्पा अगोदर येऊन मोर्चे दिले. मागून आम्हीं आलों. शुंभेल्लियांनीं जैतपुरास सामान बरें विपुल ठेविलें होतें. तोफा, नेजाला व वरकंदाज, दारूगोळा व वाजे सामान बहुत होतें. †रेवणींतून हमेशा झुंजत. आपलेकडील हजार माणोस मेले. चार हजार नखमी जाले. तथापि सुरंग चालवून दोन सुरंग उडविले कांहीं भिंताड पडलें तेणेंकरून गांजरी कोसांस येऊन अजीच किल्ला फते केला. म्हणोन विस्तारें लिहिलें तें श्रवण होऊन संतोष जहाला. जैतपूर बांकी* जागा व लडाऊ सामान बहुत दारूगोळा विपुल असतां तुम्हीं व वाजे§ सरदारांनीं व लोकांनीं श्रम साहस करून जागा फते केली. शाबास तुमची व शाबास लोकांची. मोठी गोष्ट जाहाली. जैतपूर लहान सामान्य जागा नव्हती. जर हस्तगत न होतें तरि ‡बदनक्षास कारण होतें. तुम्हांसारखे उमदे सरदार इरेस†† पडल्यावर जैतपूर काय आहे? किंबहुना याहूनही बांकी बिकट जागा असल्यास हस्तगत कराल. या उपरि ही तिकडील नवलें विशेष व कर्तव्य मनसुबा उल्लेख पुरःसर लिहीत जाणें. जाणिजे छ २८ जमादिलोवल बहुत काय लिहिणें. शिक्का. लेखन सीमा

पै॥ व जा-पासुन स्वामीन (?) पै॥ छ शाबान मु॥ गहवरा पे॥ सेवडा.

[७०] ॥ श्री ॥

राजश्री सदाशिवपंत भाऊ गोसांवी यांसि—

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेहा॥ मल्हारराव होळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत असावें. विशेष—इकडील सरदारींत खर्चाची वाढ. महलांत पेशजी प्रों॰ उत्पन्नास जागा नाहीं. फौज बाहेर मोहमीस रहात गेली. सध्यां तो प्रकार

---

† रेवणी-रेवण=मातीचा ढीग किंवा बुरुज.
* बांकी=मजबुदीची.
§ वाजे=दुसरे, हातासालचे, अपांतर. वर 'वाजे सामान' पहा.
‡ बदनक्षा=कमीपणा; दुलौकिक.
†† हर=ईर्षा.

सर्व आपले ध्यानांत. तीर्थरूप कैलासवासी बाबाँसाहेबांनीं पदरचे माणशा सर्व लोभांत ठेऊन फौजेची हुशारी ठेविली तो ओघ यथास्थित चालून सरकार चाकरी घडावी याहून दुसरें लक्ष नाहीं. राजश्री गणपतराव नारायण येथें कामाकाजांत व राजश्री बाळाजी लक्ष्मण देशीहून आले, त्यांचें म्हणणें श्रीमंत स्वामींचे अभयोत्तरें व भाऊंचे लोभानें सर्व विचारू घडतील. येविषयींच मार राजश्री खंडो महादेव व सखाराम जगज्जीवन यांजला लिहिण्यांत आला आहे. उभयतां कळवितील त्याप्रों श्रीमंतांस विनंती होऊन क्रमें यथापूर्व प्रवाहास येऊन बाहिलांचा लौकिक राहणें आपल्याकडे आहे.

[७१] ॥ श्री शंकर ॥

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसि---

छ सकळगुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नो हणमंतराऊ निंबाळकर दंडवत विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लेखन करीत गेलें पाहिजे--विशेष आपणांकडून राजश्री काशीराऊ दिवाण व राजश्री राजजी जुंझारराऊ घाटगे व रा। तुकोजी चव्हाण आले यांनीं आपणांकडील कितेक स्नेहाचें व उत्तर प्रत्योत्तर जाल्याचें वर्तमान सांगितलें त्यावरून कळोन आलें. ऐशियासि आपणांशीं जो निश्चय हे करून आले त्याप्रमाणें राजश्री किरंगोजी निंबाळकर याजबा। दोन हजार फौज देऊन रवानगी केली येविषयीं राजश्री दतबांनींही गोसांवी यांसि पत्र लिहिलें आहे. त्यावरून विदित होईल. उभयपक्षीं दुसरा विचार आहे ऐसें नाहीं. रा. छ. २६ रोवल बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती.

श्री शिवचरणीं तत्पर बापुजी सुत हणमंतराव निंबाळकर

मोर्तब सूद

[७२] ॥ श्री ॥

राजश्री यादवराव बल्लाळ दिंमत बजाजीराव घाटगे स्वामींचे सेवेशीं पो शामराज बल्लाळ फडणीस कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष राजश्री पांडुरंगराव यादव यांजकडे मजमदारीचें काम देविलें त्यास त्यांचे हातून काम घेऊन वेतन देववीत जाणें. राजश्री परशराम पंडित व जयवंत बाबा मंत्री व रघुनायराव पंडित सचिव व रघोजी भोसले सेनासाहेब सुभा व राजमंडलचे कारभारी व बाळाजी जनार्दन व परशरीम रामचंद्र व परशराम सदाशिव व त्र्यंबकराव सदाशिव व जयवंतराव बाबा व फत्तेसिंग बाबा गायकवाड याप्रमाणें हुजूरची मंडळी

*बाबासाहेब=बाजीराव बल्लाळ.

यावयाची. त्यास रानानीराव घाटगे व बाहेरनाराव व निराजी शामराज व शामराज सिळकंठ पेशवे व निजाम अलीखान व हैदरखान व मुरादखान वगैरे व राघोजी आंगरे वजारतमाव सरखेल व गोविंदराव गायकवाड हिंमत बहादूर याप्रमाणें राजमंडल यावयाची त्यास त्यांची बरदस्त बराबर मंडळी सुभानराव व घोरपडे व पिरानीराव घोरपडे व शामराव गोविंद व जानराव घानीराव शाळकर [?] याप्रों यावयाची. त्यास त्यांची बरदस्त ठेवणे. रा छ ३ जमादिलावर बहुत काय लिहिणें हे विनंती.

[७२] ॥ श्री ॥

राजश्रिया विराजित रानमान्य राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांसि—

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष—दरबारचा मजकूर विस्तारें § सरदारांस लिहिला त्याजवरून कळेल. आमचा गुत्ता आजपर्यंत दरबारीं व्हावयास कारण काय म्हणाल तर राजश्री स्वामींचें सरकार कर्जदार झालें व महालचे खर्च अनिवार. नित्य ला [क ?] यळें यास्तव राजश्री-स्वामींनीं आपले कारभारी यांस ताकीद करून बंदोबस्त करितात. घरच्याच कारभारांत राजश्री-स्वामी दंग अहेत. त्यांहीं होऊन आम्हांस निरोप द्यावा तर आपले कारभारांत गिरीफदार. आम्हीं विनंती करावी तर त्यांची मर्जी दीक १७ पाहून आज पावेतों चर्चा न केली. राहात राहात गोष्ट राहिली. आम्ही निरोपाच्या विचारांत आहों. राजश्री-स्वामींची मर्जी पाहून निरोप घेऊन, परंतु (!) यश येणें आमचे तिकडे होतें असा विचार नाहीं. निरोपासच किती दिवस लागतील तें नकळे. निरोप होऊन पुणियास आलियावर कोंकणचा वगैरे कारभार करणें लागेल. तुम्हांस कळावें याजकारितां लिहिलें असे. छ १६ सव्वाल बहुत काय लिहिणें हे विनंती.‡

[७४] ॥ श्री ॥

रानश्री मल्हारनी होळकर व जयाजी शिंदे गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत रानमान्य—स्नो बाळानी बानीराव प्रधान अशीर्वाद सु॥ सबा आर्बैन मया व अलफ. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. बुंधेलियांनीं बंदमामली केली तहरहावर गोष्ट पडून बेरीज ठहरली. वोला कांहीं दिल्या. कुंवर वोलेस द्यावे. इतकी बाकी असतां उभयतां राजे पळून गेले. कालिंनर व अनेगडास गेले. बुंधेलि यांचा मोठा गुबेर होता तो

---

§ सरदार=शिंदे व होळकर.
१६. गिरीफदार=गुंतलेले
१७. दिक=खिन्न

‡ मागें पृ० ६१ टी० १५ पहा.
१८. बदमामली=उद्दाम वर्तन.
१९. गुबर, घोबार=भ्रम.

त्यांचा त्यांणीं गमाविला. अतःपर न करणें तें नट धरूनच करावे लागेल. स्वामींच्या पुण्यप्रतापेंकरून उत्तम होईल. म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास तुम्ही श्रमसाहस कर्तव्य तें केलें. व बुंधेली यांचा बचाव करून दारमदार केला असतां त्याचे दुरादृष्टें, दुर्बुद्धें तदनुरूप यांचे मनांत येऊन पळून गेले. येणेंकरून सर्व गोष्टीनें खराब तेंच जाहाले. तुम्हीं कर्तव्य तें करालच व केलेंच पाहिजे. असो. येविशींचे कितेक पर्याय राजश्री रामचंद्र बावांच्या पत्रीं लिहिले आहेत. त्यानवरून कळेल. आपल्याकडील सदैव वर्तमान लिहीत जाणें. नाणिजे. छ २९ नमादिलावल बहुत काय लिहिणें. पै॥ छ ७ सावान मु॥ गहबरां पो॥ चे [से!] वदा.

शिक्कॉ.

लेखन सीमा.

[७५] ॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत तात्या स ता॥ राजश्री बिसाजीपंत दादा स्वामींचे सेवेशीं—

पो॥ विष्णु महादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ ता॥ छ १० सावान मु॥ नजीक महेश्वर, वर्तमान यथास्थित जाणोन स्वकीय कुशळ लिहीत असलें पाहिजे. विशेष—आम्ही करंवादचे मुकामीं होळकराजवळ दाखल झालों. आपलीं पत्रें त्याच मुक्कामीं आलीं. त्यांत लिहिलें आम्ही शिवणी हुसंगाबादेवरून भूपाळावरून खेचिनाड्यांत येतों. ऐशास आपला पहिला करार जे चढव्याचे घाटें यावें, आणि शिंदे, होळकर सर्व इकडेच आहेत. हे, आपण येकत्र होऊन मनसबा पुढें करणें तो करावा. हा उत्तम विचार. आणि तुम्हीं त्या मार्गे जावयाचा मनसबा केला झणजे हे उभयतां इकडे मनसबे करतील. शिंदे यांनीं तो उदेपूरचे मुलांचा पक्ष धरून त्याजकडा घेऊन संस्थानाकडे[२३] चालले. ते मुलांची स्थापना करून संस्थानचा पैका घेणार. हा त्यांचा मनसबा. होळकर महेश्वराहून निघाल्यावर मनसबा काय करतील तो करोल. आम्हांस श्रीमंतांनीं इकडे पाठविलें व आपला आग्रह जाणोन आलों. श्रीमंतांची आज्ञा आपणांस व हे उभयतां सरदार एकत्र करून सरकारी काम करावें. आपण त्या मार्गे गेलेतेव्हां तिघांचे तीन मनसबे जाले म्हणजे आम्ही मग राहून उपयोग नाहीं त्यास सविस्तर वर्तमान रा दादोपंत दादांनीं लिहिलें आहे, त्यावरून कळों

---

२०. दारमदार=मानसन्मान.
२१. दुरादृष्ट दुरदृष्ट=कमनशीब, दुर्दैव.
२२ मूळात 'खु' असें दिसतें.
२३. मूळांत 'सांनाकडे' 'सांचा' असें आहे.

येईल. तदनुसार आपण याच मार्गें यावयाचा मनसबा *क्षेपनिक्षेप करावा त्या मार्गें नाऊन सांचुकतील. त्याहून या मार्गें मोठ्या मनसब्याचा बंदोबस्त करून उदेपुरचाही बंदोबस्त केल्यानें सरकार काम आहे. आपल्यासही तूर्त उपयोग पडेल. यास्तव याच मार्गें यावें हें उत्तम आहे. याउपर आपली मर्जी त्याचमार्गें जावयाची असल्यास मग आम्ही यां समागमें कशास रहावें? रा॥ दादा व आम्ही देशास जाऊं. आम्हांस सर्व प्रकारें लक्ष आपलें यास्तव आम्हीं येथपर्यंत आलों. पुढें आपलें पत्र जसें येईल त्याप्रमाणें तजवीज करूं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

[७६] ॥ श्री ॥

७ १ रमजान वैशाख तिसा खमसैन.

राजश्री नाना पंडित प्रधान गोसावी यांसि—

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेहा॥ राघो॰ नी आंगरे वजारतमान राम राम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष—छ ५ शाबनचें पत्र पाठविलें तें छ २२ मिनहूस उंदेरीचे मोर्चेबंदीस थळचे मुक्कामीं येऊन पावलें. मुख्यार्थ कीं, उंदेरींत पाण्याची अनुपत्ति[२४] जाहाली आहे. वैशाखांत तरि भारीच होईल. सुरतेकडील बळ तुटलें. यामुळें शामलें[२५] अवसान खाता जाला असतां चोरपाइ॰[२६] की अवसान धरून करितो. राजपुरींचीं गलबतें नेलीं. उंदेरीस साज सामान घेऊन येतो. उलटी सलावत[२७] त्याचीच पडोन आली आहे. त्यांचें पारिपत्य होत नाहीं हें अपूर्व असे. किरकोळ उपद्रव मुलकांत होतात ते केवळ जंजिरे याहूनच होतात ऐसें नाहीं. उंदेरीहून होतात ऐसें निदर्शनास येतें. याउपरि सारीं आरमारें येकत्र होऊन या समर्थांत सर्वांनीं एकदिलीनें लगट कोलियास स्थळ हस्तगत होऊन यावयास अगाध नाहीं. येविशीं विस्तारें राजश्री रामाजीपंतास लिहिलें आहे. म्हणोन नशीहतपूर्वक आज्ञा केली. ऐ॰ शास उंदेरकरांचे व. जंजीरकरांचे पारिपत्याची योजना होऊन राजश्री शंकराजीपंतास व राजश्री नारोपंतास व राजश्री रामाजीपंतास पत्रें सादर जालियाची आज्ञा छ १४ मिनहूचें पत्र खास दस्तुराचे मुजरद[२८] जासुदा समागमें आलें तें छ १८ तेरखेस माहे मजकुरीं पावलें. आज्ञेचे निकडीप्रमाणें वसेपैकीं व राजश्री नारोपंतीं आरमार सुद्धां येऊन पावावें. सारें येकत्र होतांच

---

* क्षेपनिक्षेप=ढाकोढाक.

२४. अनुपत्य=अनुपपत्ति=दौर्लभ्य. अभाव.

२५. शामल=दवडी.

२६. चोरपाइकी (चोर + पायिक) चोरून हल्ला करणें.

२७. सलावत=सुदैव, यश, जरब.

२८. मुजरद=ताबडतोब, मुदाम.

जीवाभ्य[२१] श्रमेंकडून श्रम साहसास अंतर न करावें. हाच कस्त[२२] धरून आरमारची अपेक्षा आज पावेतों करीत आहों. तथापि अद्याप येऊन पावले नाहीं. पत्राची विनंती लेहून पाठविली आहे. त्यावरून सेवेशीं निवेदन जाहालेंच असेल. अखेरीचे दिवस, अवकाश बहुतसा राहिला नाहीं. आजेचा अर्थ निकडीचा जाणोन येथून मुजरद महाँगिरी[२३] मशारनिल्हे शंकराजीपंताकडेस व नारोपंताकडे पाठविली आहे. त्वरेनें पावें म्हणोन लिहिलें असे. वरकड किरकोळ उपद्रव चोरी छपीनें उंदेरीहूनच होतात. जंजिराहून होत नाहीं म्हणोन तहि उंदेरीचे मोर्चेबंदीस चौकी कुलाबापासून पळ नवगांवचे खाडी पावेतों आम्हांकडील नवगांवापासून केहीम, आव्हास, सासवने, मांडवें, रेवस पावेतों राजश्री महादाजी रघुनाथ यांहीं रेवदंडकर, रायगड भोरपकर लोक जागा येऊन बंदोबस्त केला आहे. उरण खाडीची खबरदारी उरणाहून होत असतां उंदेरकराची महागिरी तडीस लागावी ऐसें नाहीं. एक दुसरा होडीवर काळोखे रात्रीस येत जात असेल. तरीच कोठें आग लावावी, घोंडे मारावे हे उपद्रव होतात. याजवरून नित्य चौकीदारांचें पारिपत्य करणें तें करीत असों. व राउतांचा छबीनाही होतो. खबरदारीस आम्हांकडून व महादाजीपंताकडून अंतर पडत नाहीं. विरनाडी माडलतपा(?) अष्टमीकडून चोर येऊन तुमचे टापियांत रयतेस भारभार उपद्रव केला. जंजीरकर प द म (पद्म ?) दुर्गकरी ऐसे रयतीजवळ सांगत गेले. त्यांचे शोधास आम्हांकडील व महादाजीपंताकडील लोक मुलखांत घालून रात्रंदिवस शोधास लागलोंच आहों. जंजीरकरास व प द म दुर्गकरी यांस बंदरें अनकुल व राना जंगलाचा आश्रय बहुत. रानांत दबा देऊन काळोखे रात्रीचे संध्यांतून चोरी कर्म आचरतात. तिकडील मामलेदार खबरदारी करीतच आहेत. सारांश योजिले मनसबे याप्रमाणें येत्यादे जागा निकडीचा प्रकार या समयास व्हावा हेंच कार्याचें आहे. श्री कृपेनें व आपले तपोबलें कार्यसिद्धि होऊन आलियास सरेच उपद्रव दूर होतील. जळमार्गे उंदेरीस सामान चोरी छपीनें नेतो त्याचे बंदोबस्तास आम्हांकडील गुराबा[३२] गलबतें महागिरिया दक्षिणभागीं मार्ग अवरोधोन ठेविल्या आहेत. याचप्रमाणें उत्तरभागीं महागेरिया व गलबतें मानिल्हे महादजीपंताकडील येऊन रात्रंदिवस छबिना होत असतां उंदेरीस मुंबैसमीप काळोखे रात्रीस चोरी छपीनें महागिरी येते नाते त्यांचे पैरवीस आरमारकरी लाविलेच

शिक्का.

---

२१. जिवाभ्य=जीवापलीकडे.
२२ कस्त=कष्ट, निर्भय.
३१. महागिरी=एक प्रकारचें तारू.
३२ गुराबा=एक प्रकारचें तारू.

आहेत. गांठ पडतां जीवाभ्यश्रम करून दस्तै[33] करावयास चुकणार नाहीं, फालगुनमासीं रात्रौ महागेरी येतां आम्हांकडील आरमारकरी यांनीं पिच्छा केला. तडीस येतां रेवदंड करांहीं मर्दुमी करून कोंडून दस्त केली. या प्रकारचें वर्तमान आहे. दर्या अफाट, चौगीर्दे[34] आरमारचा परीघ असावा. सारें आरमार येकत्र जडाव जालियावर चित्तानरूप सेवा घडोन येईल व यावी हाच कस्त व उमेद असे. स्वामी सेवेचे ठायीं आम्हांपासून कसूर कोताई हा काल पर्यंत जाली नाहीं व पुढेंही होणार नाहीं. हेच निष्ठा मनोमानसीं असेच. अंतरसाक्ष आपण समर्थ आहांत. राजश्री रामानीपंतही लौकरीच येणार येतील. त्यांचे अनुमतें श्रम साहसास दुसरा विचार घडणार नाहीं. रा॥ छ २४ माहे शाबान बहुत काय लिहिणें कृपा वर्धमान असावी हे विनंती.

मोतंब-
रूद

॥ श्री ॥

[७७]

पु॥ राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसांवी यांसि विनंती उपरि सौजी नाईक यांणीं कर्नाटक प्रांतीं न जावें. गेले तरि धुडाऊन काढावे याजकरितां चिरंजीवांची[35] रवानगी कर्नाटक प्रांतीं केली. त्याचा मजकूर विस्तारें लिहिलाच आहे. प्रस्तुत नाईक यांणीं राजश्री—स्वामींस दोन लाख रूपये रोख द्यावे ऐसें केलें होतें ते रोख निशा केली. बाकी राहिले ऐवजाचे हप्ते करून याद राजश्री येसाजी भोंसले यांजपाशीं दिल्ही. व बेदनुरचा साडेतीन लक्षांचा कतबा होता तो मा॥रनिल्हे नवळ देऊन निरोप घेऊन गेले. पुढें नबाबास भेटून नबाब म्हणतील तें द्यावें आणि तेवढियावरि ठाकुरकी[38] वाढवून कर्नाटक प्रांतीं जावें ऐसें आहे. नवाबाचा विचार पाहतां दोहीं दगडीवर हात आहेत. नाईकांची प्रतीक्षा करीत आहेत. व आमची फौज सोधें बिदनुर प्रांतें गेली आहे. यांसही पैका न मिळावा याही उद्योगांत आहेत. श्री इच्छेनें इतकियाही गोष्टीचें निराकरण होऊन उत्तमच होईल. कांहीं फिकीर आहे ऐसें नाहीं. तुम्हांस वर्तमान कळावें म्हणोन लिहिलें असे. पुढें ही होईल तें लिहिलें जाईल. रा॥ या मनसब्याचे मजकूर किरकोळ किरकोळ फार आहेत. पत्रीं काय त्याहावें श्री कृपेनें दर्शनोत्तर कळतील. छ २२ सफर हे विनंती.

---

३३. दस्त=तावेंत, हस्तगत.

३४. चौगीर्द=चहूंबाजूंनीं.

३५. बाबूजीनाईक बारामतीकर—यांनीं आपल्यास पेशवाई मिळावी या अर्थे सन १७२० सालीं बाजीराव बल्लाळ निवर्तल्यावर रघूजी भोसले यांचे मार्फत उद्योग चालविला होता. पण तो सिद्धीस गेला नाहीं. त्यामुळें नाईक यांशीं बाळाजी बाजीरावाचें वरें नवतें.

३६. चिरंजीव-सदाशिव चिमणाजी असावे.

३७. हे नवाब सावनूरचे असावे.

३८. ठाकुरकी=लौकिक, अबरू.

[७८] ॥ श्री ॥

पु॥ राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांसि—विनंती उपरि चिरंजीव राजश्री माऊ निरोप घेऊन गेलियावरि कितूर म्हणोन ठाणें गिराशियांनें राजश्री नारायणराव घोरपडे यांचें होतें तें बळाविलें म्हणोन घेऊन दिल्हें. पुढें मजल दरमजल सोंधियाचे लतियांत गेले आहेत. सावनूरकरांचा तह रह होणें तें होत आहे. अद्यापि चुकला नाहीं. सोंधेकरी यांचीं रदबदल लागली असे. बिदनुरास वकील गेले आहेत. फिरंगियांवरि दबाव असे. जयसम सांवत येऊन भेटले आहेत. तेही आपलें साहित्येच्या गोष्टी बोलतात कीं रेडी वगैरे. फिरंगियानें घेतले आहेत त्यास तंवी पोंहाचाऊन द्यावीं. आपली स्थापना करावी. फिरंगी आपली बोली बोलतात कीं सांवत आम्ही समजोन घेऊं. तुम्हीं त्याचा पक्ष न करावा. या प्रकारचें वर्तमान आहे. पहातां अर्थी फिरंगी बेइमान त्याचें पारपत्य करावें तरि येसमयीं बनत नाहीं. दोन्ही ही अलग अलग राखिले आहेत. कां कीं, सावनूरचा दार मदार करणें तें करून घेऊन, सोंधेकरांचीही मामलियत चुकऊन बिदनूरकरांकडे जावें, तेथील मामलियत विल्हेस लाऊन खबरदार होऊन राखा [हा ?] वें. सारे पठाण एकवट करावे. नाईक आले तरि त्यांस धुडाऊन द्यावें. ऐसा विचार असे. पुढें विचारें होतां होईल तें करीतच असों. रा॥ छ २३ सफर हे विनंती.

[७९] ॥ श्री ॥

तीर्थरूप रानश्री नाना स्वामीचे सेवेशीं—

आपत्यें सदोबानें साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ ता॥ छ १२ जमादिलोवल मुक्काम पुणें. स्वामींच्या आशिर्वादें करून यथास्थित असें विशेष—स्वामी कोठें आहेत, माघारे फिरले न फिरले, कोणें जागां आले, हें कांहींच वर्तमान कळत नाहीं. तरि स्वामींनीं सविस्तर वर्तमान वरच्यावरि ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर आम्ही राजश्री* स्वामींचा निरोप छ ३ जमादिलोवलीं घेऊन पुण्यास आलों. स्वामींस वर्तमान कळावें यास्तव लिहिलें असे. रानश्री बाबूजी नाईक यांस राजश्री स्वामींनीं कर्नाटकचा मामला मुकासा सांगून गौरव केला. तो अर्थ विस्तारें स्वामींस लिहिलाच आहे, त्याजवरून विदित होईल. राजश्री आबाजी नाईक राजश्री—स्वामींच्या दर्शनास

---

३९. गिराशी=डोंगरी लुटारू.
४०. लतियांत=हद्दींत, शिवेंत.
४५. फिरंगी–हे गोंवेकर पोर्तुगीज.
४२. साहित्याच्या=मदतीच्या.
४३ नाईक बारामतीकर बापूजी.

वरील २२ सफरचें पत्र पहा.

* राजाचें नांव अदबे खातर न घालतां 'राजश्री' शब्दापुढें कोरी जागा टाकून पुढें 'स्वामी' वगैरे बहुमानदर्शक शब्द लिहिण्याची वहिवाट असे.

गेले होते. · त्यांस छ ५ नमादिलोवर्ली राजश्री—स्वामींनीं निरोप दिल्हा. वस्त्रें:—१ मंदील, १ मुंडासें जरीचा झगा, १ चादर मोराची. १ पदक हत्तीचा मजुरा दिल्हा.

येणें बहुमान करून आबुराव किताब देऊन निरोप दिल्हा. स्वामींस कळावें यास्तव लिहिलें असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

[८०] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री—भाऊ साहेब स्वामींचे सेवेशीं.—

विनंती सेवक जयाजी शिंदे कृतानेक विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ १ सवाल पावेतों मुक्काम नजीक सिपाबरड स्वामींचे कृपावलोकनें करून यथास्थित असे विशेष. मजल दरमजल रेवापार आलियाचें वृत्त पूर्वी विनंती पत्रीं सेवेशीं लिहिलें आहे, त्यावरून विदित जालेंच असेल. स्वामींचे आज्ञे प्रें॥ नलदीनें येऊन पोहोंचावें, परंतु पर्जन्याचे अतिवृष्टिमुळें जागां जागां गुंता होत गेला. हल्लीं कांहींशीं उघाडी जाल्यावर तिन्हीं लष्करेंस वार उतरलें. प्रस्तुत पर्जन्यही थोडका आहे. याउपर जलदीनें चार पांच रोजीं बऱ्हाणपुरास दाखल होतों. बऱ्हाणपुरचा बंदोबस्त होऊन येईल तदनुसार मागाहून सविस्तरें सेवेशीं लिहून पाठऊं. वरकड निराळें पुरवणी पत्रीं सेवेशीं लिहिलें आहे, त्याजवरून निवेदन होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[८१] ॥ श्री ॥

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बापूजी बाजीराव स्वामी गोसावी यांसि पोष्य सदाशिव चिमणाजी नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणें—विशेष तुम्हीं निरोप घेऊन गेलां तेव्हां राजश्री व्यंकटराव यांजकडील स्वार पथक तुह्मांबरोबर पाठवितों म्हणोन सांगितलें व त्याजवरून मशारनिल्हेकडील कारकुनासही आज्ञा केली. ते तुम्हांकडे ले त्यांणीं तुम्हांस खर्चावेचाचा मजकूर पुसला त्यास तुम्हीं त्याजपाशीं साफ लिलां कीं " श्रीमंत राजश्री नाना स्वामी यांणीं कांहीं आपल्यास द्यावयाची बेगमी केली नाहीं. आपण कोठून द्यावें ? तरि श्रीमंत राजश्री भाऊ यांजपाशीं जाऊन आपली रोजमरीयाची बेगमी करून घेणें." त्याजवरून मारनिल्हेचे कारकून येथें आले कीं, " आपल्यास खर्चावेचास देत नाहीं याप्रमाणें बोलतात. तरि त्याजबरोबर जाऊन पोटास काय करावें ! आणि जावयासही

§ ग्याजुद्दीनखां, निजाम उल्मुकाचा वडील मुलगा, यास हैदराबादचा सुभा बनविण्याकरितां शिंदे होळकर वेऊन दक्षिणेंत येत होते त्या वेळचें हें पत्र आहे. तीन लष्करें शिंदे होळकर व खुद ग्याजुद्दीन यांचीं. वार—' पार ' तर नव्हे.?

मागें पुढें घेतात." त्यास तुम्ही सरकारचें निशाण व हत्ती बरोबर घेऊन नातां. फौज अलबता हजार बाराशें असली पाहिजे. केवळ हत्ती आणि चार तट्टें आपण जाईन म्हटल्यास कैसें बनलें ! ह्यामध्यें राजश्री राणोजी शिंदे लांबले तेथपर्यंत तुम्ही जा [ल] तोंपर्यंत बरोबर फौजही पाहिजे. व जे फौज येईल त्यांस कांहीं पोटासही दिल्हें पाहिजे. विना दिल्याघेतल्याबगर सरदारी कैशी चालते ! व बोझ कैसा राहतो ! हा अर्थ तो सर्वही तुम्हांस ठावकाच आहे. हें जाणून राजश्री त्रिंबकराव विंधनाय याजपाशीं तुम्ही बोललां होतां कीं, " श्रीमंत राजश्री नाना स्वामींनीं तो कांहीं खर्चावेचाची बेगमी केली नाहीं. भाऊजवळ मागावें तरि त्यांस कांहीं लिहिलें नाहीं ऐसें असतां हे कांहीं देतात ऐसें नाहीं. सरदारी तो चालली पाहिजे. याजकरितां श्रीमंतांचे नांवावर व सरदारीवरि पांच हनार रूपयेपर्यंत घेऊन रोखा लिहून दिल्हा. घेऊन जातों. पुढें देणार खावंद आहेत." ऐसे बोलले असतां मा।रनिल्लेकडील कारकुनास साफ जाव दिल्हा हें कैसें कार्यास येतें ! या उपरि मा।रनिल्लेस पाठवावें तरि ते जात नाहींत तरि मशारनिल्लेचे राऊत तुम्हांबराबर पाहिजेत व यांस राजश्री रामचंद्र बावापर्यंत जा[ल] तों. थोडे बहुत खर्चा[स] देऊन घेऊन जावें लागतें. तरि या पत्राचें उत्तर जलदीनें पाठवावें कीं, मशारनिल्लेकडील राऊत पाठऊन द्यावे. त्यांस थोडें बहुत खर्चास देऊन घेऊन जातों, या प्रकारचें उत्तर जलदीनें पाठऊन द्यावें म्हणजे तेंच पत्र बजिन्नस[३४] त्यास दाखऊन त्यांजला तुम्हांकडे रवाना करितों. सारांश बा[२५] की सरदारीचा बोझ उचललिया खेरीज भारीपणा कैसा पडतो ! केवळ आंगावेगळेंच टाकलें तरि सरदारीचा आबही राहिला पाहिजे. हा अर्थ सर्व तुम्ही जाणतां. लिहिणें काय आहे ! तरि या पत्राचें उत्तर जलदीनें पाठऊन द्यावें. दिरंग न लावावा. रा॥ छ १० जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती.

[८२] ॥ श्री ॥ छ २२ साबान.

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं.

विनंती उपरि राजश्री फत्तेसिंग बावा यांणीं सांगितलें याप्रमाणें स्वामींस लेहून पाठविलें, त्याचें उत्तर स्वामींनीं लिहिलें त्यांत मजकूर कीं, रघोजी बावांस कर्नाटक होतें कीं काय ! हा अर्थ स्पष्ट उघडक पाहिजे. दुसरें, बावानीं तमाम सरदार सरंजामी फौज जमा करावी. कर्नाटकांत पाय पडला तरि घालावा. न पडे तरि वराड देवगडाकडे जावें. गेले तरी चालेल. परंतु हिम्मत

---

३४. बजिन्नस=खुद्द तेंच, अस्सल.

२५. 'बा' आणि 'की' यांचे दरम्यान एक अक्षर असून तें फाटलें गेलें आहे.

नाली पाहिजे. व निरोपही व्हावा. आपण खामखा* घ्यावा. बाहेर निघावें. आम्हीही फौजेचें साहित्य करूं. कर्ज मात्र आम्हांस द्यावयास अनुकूल पडणार नाहीं. बाबानीं उत्पात केला तरि कर्नाटक यास होईल कीं काय हा शोध बाबानीं थोरले वाडियांतर्फे चालून पहावा म्हणून लिहिलें. ऐशियास फत्तेसिंग बाबाचा कारभार आहे, तो स्वामी† नाणतात. त्यांचे सर्व साहित्य मनसुब्याचे आपण केलें पाहिजे. पैका कर्ज द्यावयास मात्र मिळणार नाहीं तरि तेवढी गोष्ट नसो, परंतु वरकड तरी सर्व जालें पाहिजे. सरंजामी फौज ते मेळवितील. आपली ही मातबर फौज समागमें व मनसबा आपणास करावा लागतो याचा स्पष्ट भाव त्याशीं बोलला पाहिजे तेव्हां ते उद्योगास लागतील. ऐशियास त्यांस सरदारी करणें आणि आम्ही होऊन उत्पात कां करावा ? त्यांची त्यांस दरकार आहे कीं नाहीं ? असें स्वामी† म्हणतील. तरि त्यांची त्यांस अवश्यकता असावी [हें] उचितच; परंतु त्यांस घरीं राहिल्यानें काय सुख नाहीं ते बाहेर निघोन हैराण व्हावें ? मशारनिल्हेनीं स्वामींचा† अविलंब धरिल्यास तीन वर्षें जालीं. परंतु फलादेश कांहीं उत्कर्षें करून जाला नाहीं हें त्याचें टेपर स्वामींवर † आहेच. दुसरें, हे लगामी असल्यास कित्येक गोष्टी उपयोगास पडतात. बाहेर काढिल्यानें त्याचें टेपर दूर होऊन त्यांत आपलाही कार्यभाग असे. डौल चित्तांत आणून यांस बाहेर निघण्याविशीं उत्तेजन देऊन करावें. त्यास येविशीं स्पष्ट स्वामींचा भाव कळला पाहिजे. तेव्हां त्याशीं बोलावें अथवा त्याणें विचारिल्यास अव्वल जाब करावा. कर्नाटक रघोजीबाबास होतें न होतें याचा अर्थ पेशजी चोपदारास मोघम लिहिलाच आहे. अद्यापि कांहीं चर्चा नाहीं. परंतु राजश्रींचा‡ भाव आबाजी नाईक यास पुढें करून रघोजीस भांत घालावा असा आहे. हाच घडिल्यास फतेसिंगबाबासही त्यामध्यें मिळावयास उत्पात केलाच पाहिजे. न करीत तरि आम्हीं करावा. काय निमित्य कीं, बाबूजी नाईक व आबाजी नाईक यांच्याशीं खरीं का व्या [?] लागावयाची बाकी राहिलीच नाहीं. आबाजी नाईक जाले तरी काय ? वाडियांतील वगैरे पेच पडतील. व आपण वाढविला त्याचें बरें कसें चालावें या अर्थे मात्र आबाजी नाईक यांस पुढें करणें. नाहीं तर रघोजी बाबाचेच स्वाधीन असे जालियास कर्नाटक त्यांचे घरास जाऊं देणें उचित नाहीं. यास्तव जरूर पाय धरून वोढावें. येविशीं स्वामींची आज्ञा काय ? तिसरें, फतेसिंग बाबानीं थोरले वाड्यांतील

---

* खामखा, खामखाय=खचित, कांहीं झालें तरी.

§ थोरले वाडियांत=थोरल्या राणीकडे

† स्वामी=नाना व भाऊ.

‡ राजश्री=शाहू महाराज

* * हे नाना सांचे मेहुणें

मनीं कर्नाटक होतें न होतें हे पहावी ऐशी आज्ञा स्वामींची. तरि थोरले बाईंचे कर्ज नाइकांकडे आहे. त्याचा निकाल तीं आधीं पुसतील. दुसरे रानश्रीचे देणें याचा विचार जाला पाहिजे. जे कर्नाटकाचा कारभार नाहि-यास दिवाणांत ऐवज देणें पडेल तो फतेसिंगबावा स्वामींस द्यावा म्हणतील. हा एक पक्ष. दुसरे कदाचित बाईनीं म्हटलें कीं, आबाजी नाइकास पुढें करून राजश्री दुसरे साहित्यास देणार तरि नाईक माझे अगत्यवादाचा, मी कर्ज दिल्हें आहे तें मामल्यावरीच दिल्हें आहे, तेव्हां मामलाही माझाच आहे. आबाजी नाईकास समागमें घेऊन तुम्हींच करावें. म्हणजे दोन्हीही पक्ष मजकडेच लागले. रघोजी धाकटे बाईचें पक्षींचा, त्यासही तोंडघशी दिल्हें. असें बोलली तरि याचा विचार काय करावा. आणि जरी बाईसी लाघावळ लाऊन कांहीं आशा दर्शविली व रानश्री धाकटे बाईचे अगत्यवादामुळें रघोजीस कर्नाटक सांगणार असें बोलल्यास आबाजी नाईक यांस राखून तुम्हीं करा असें बाई बोलतीलसें वाटतें. यास्तव सुचला विचार स्वामींस लिहिला आहे. तरी तीहीं पर्यायाचे स्फूर्दरूप समर्पक सालजाब [जाबसाल ?] पाठवावयास आज्ञा करावी. त्रिचनापल्ली वाहत [?] सनसीतचे ऐवजाचा हिशेब वगैरे याची पुरवणी आलाहिदा लिहिली आहे त्याचेंही उत्तर सादर करावें. विदित जाहालें पा।. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.[४६]

[८३] ॥ श्री ॥ पै॥ छ २२ साबान.

राजश्री भाऊ गोसावी यासि—

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नेा॥ राघोजी आंगरे बजारत माब रामराम विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लेखून आज्ञा करीत असले पाहिजे-विशेष छ १४ शाबानचे स्वहस्ताक्षर पत्र आलें तें छ १८ मिनहूस मौा थळ उंदेरीचे मोर्चेबंदीस प्रविष्ट जाहालें. गौरवाभिवृद्धीस पावलों. श्रवणेंकडून संतोष जाला. सुरतेकडील आरमार राजश्री नारोपंत सहवर्तमान आठा दहा रोजांत येईल. सर्व एकत्र होऊन उंदेरींत पाणी नाहींसें जालें आहे या समयांत भारागिरी करून लगट करावा म्हणोन आज्ञा केली. आज्ञेचे अन्वयांत सविस्तर विनंती श्रीमंत पंतप्रधान यांचे सेवेशीं लिहिली आहे. त्यावरून निवेदन होईल. आम्हांस आपली आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करावी, श्रम साहासास अंतर न करावें, हेच निष्ठा.

---

४६. शाहूमहाराजांच्या मनांत एकदां वारामतीकर यांस कर्नाटकचा सुभा सांगावयाचा होता त्या खटपटीबद्दल हें पेशव्यांच्या तर्फदारांचें पत्र आहे. धाकटी राणी, थोरली राणी व पेशवे ह्या तिघांचे तीन पक्ष होते.

दुसरा विचार नाहीं. मा। निळे नारोपंतास व वसैस आज्ञापत्रें जाऊन पावलींच असतील. त्याप्रमाणें भारमार व महागेरिया आविलंबें येऊन पावलियास शत्रूवरि निर्कर्षे होऊन येईल. मुख्य गोष्ट सारा भारमाराचा जडाव व महागेरिया मारगिरीचे पोंचतें सामान अल्प अवकाशें कडून आलें पाहिजे. विलंबावरि गोलिया अखेर मुसुब आली आहे. वारा, तुफान जालें म्हणजे भारमाराचा टिकाव होणार नाहीं. यंविशीं राजश्री महादाजी रघुनाथ यांहीं लिहिलें आहे त्यावरून सविस्तर श्रुत होईल. राजश्री साबाजी प्रभु जाऊन पावलियावरि हलाखीचें सांगत वर्तमान निवेदन केलें असेल व करितील. अनकूलतेविशीं सर्व प्रकारें भरंवसा आपले कृपेचा आहे. विस्तारें विनंती स्याहावी तर सर्वजाण आपण समर्थ आहेत. रा॥ छ २१ माहे शाबान. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असो द्यावा हे विनंती. (शिक्का.) (मोर्तब सूद)

[८४] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबांचे सेवेशीं–

आज्ञाधारक दमाजी गायकवाड समशेरबहादर कृतानेक दंडवत विज्ञापना येथील क्षेम तागाईत आश्वीन कृष्ण पंचमी पावेतों साहेबांचे कृपाकटाक्षें करून यथास्थित असें. विशेष, साहेबांकडून आज्ञापत्र सादर जाहालें तें उत्तम समयीं प्रविष्ट होऊन अक्षरशहा विलोकनें परम प्रमोद जाहला. पत्रीं आज्ञा कीं, "चांचवे व जाफराबादकर एकत्र होऊन, लोक जमा करून, जाहजावर चढवून रोंजपुरीस कुमक पोंहचवावी, मनमाने तैसा उपद्रव करावा, ऐशी तरतूद करितात. त्यांजला उत्तम प्रकारें ताकिदीचीं पत्रें लिहावीं आणि बंदोबस्त करावा." ऐशी आज्ञा सादर होतांच जाफराबादवाले व चांचवे यांशि ताकीदपत्रें लिहून पाठविलीं आहेत कीं, "तुम्हीं कुमक जंजिरीयाशि परिच्छिन्न न पाठविणें. यद्यपि न ऐकिलें तर पारपत्य यथास्थितपणें होईल." त्या प्रांतीं कमाविसदार नाहींत. जोरतलबी मुलुख. तेथील भुमे आहेत त्यांस पत्रें लिहिलीं आहेत. व घोगे वगैरे बंदराचे कमाविसदारांस एतद्विषयीं लिहिलें आहे. व फौजही त्यांचे बंदोबस्तानिमित्य रवाना जाहाली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ती.

---

४७. निकर्ष=निकराचा हल्ला किंवा वेढा.

४८. मुसुब-मुसम=अगोठ, प्रज्यन्यकाळ.

४९. मागें पत्र (७६ वगैरे) पहा.

५०. चांचवे=चांचे, समुद्रावरील लुटारू.

५१. रोनपुरी—जंजिऱ्याजवळच. हें हबशी यांचें ठिकाण.

५२. परिच्छिन्न=बिलकुल, कोणत्याही प्रकारें.

५३. जोरतलबी—शक्तीच्याच योगें अंमल चालवावा लागतो जेथें असा.

५४. भुमे=तदेशीय (पाळेगार)

५५. हें पत्र जंजिऱ्याच्या हबश्याबरोबर जें युद्ध चाललें होतें त्यास अनुलक्षून आहे मागें पत्रें ७६ व ८३ पहा.

[८५] ॥ श्री मोरपा ॥ ७ २६ सवाल.

श्रीमंतं राजश्री **भाऊ**साहेब स्वामींचे शेवेसि—

विनंती सेवक **मल्हारजी** होळकर व **जयाजी शिंदे** कृतानेक विज्ञापना स्वामींचे कृपावलोकनें कडून ता॥ छ १० शवाल रेवातीरी यथास्थित असे विशेष. स्वामींकडून आज्ञा पत्रें सादर जाहलीं त्याजवरून लेखनार्थ सविस्तर कळला. उत्तरें निराळे पुरवणी पत्रीं सेवेशीं लिहिलीं आहेत त्याजवरून सविस्तर निवेदन होईल. आम्ही व नबाब **निजाम**मुलक सहवर्तमान **नर्मदा**तीरास येऊन पोंहोचलों. यां उपर सारें लष्कर लौकरच पार उतरोन येत असों. स्वामींनीं तिकडून फौज जमा करवून पुण्याहून कूच करून आलीकडे अविलंबें आलें पाहिजे. आम्ही बऱ्हाणपूरचा बंदोबस्त करून येतों. मग पुढील बंदोबस्त होणें तो उत्तमच होऊन येईल. स्वामींच्या विचारानुरूप साऱ्या गोष्टी होतील. वरचेवर आज्ञापत्रें सादर केलीं पाहिजेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ती.

[८६] ॥ श्री ॥

पु॥ रानश्री **राम**चंद्रबावा स्वामी गोसावी यांसि—

विनंती उपरि **सफ**दरजंग यास निमरेंजाबंद करून आपले लगामीं लावावा याचा विचार केला असे, म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशियास हा विचार उत्तम केला. आम्हांसही **दिल्ली**हून लिहिलें आलें होतें. आम्हींही त्यास येविशीं विचारानुरूप लिहिणें तें लिहून त्यास लगामी लाऊं ध्यावें, त्यानीं रेंकार पूर्वकाचे साह्य न करावें असें करावें, म्हणोन लिहिलें असे. तुम्हींही त्यास वरचेवर उचित जाणून लिहीतच असाल व लिहिणें. ज्यांत आपल्या मनसुबियास व कर्तव्यतेस उचित, आणि उपयोगी, परिणाम उत्तम, लोकोत्तर, योग्यतर, लौकिक कीर्तीस्पद तेंच करणें व कराल हा निशा आहे. **सफ**दरजंग उमदा मनुष्य, त्याचा स्नेह हरप्रकारें रक्षण करणें उचित. दुसरें, **काशी** त्यांचे हातीं त्याशीं निखालसता असलिया कालगतीनें **काशी**चें स्पष्ट दर्शन होणार तों महा लाभ आहे. यासाठींही स्नेह रक्षावा. दुसरें अत्यंत अर्थाअर्थीं संबंध नाहीं जाहला. अप्रिय

---

५६. हा निजामनमुलुख याचा वडील पुत्र ग्याजूद्दीन होय. मागें पत्र ८० पहा.

५७. सफदरजग—हा अयोध्येचा नबाब हा दिल्लीच्या बादशाहांचा वजीर होता. याचे व ग्याजुद्दीन यांचें वांकडें होतें.

५८. (निम=अर्धा. रजावंद=खुषी, अनुमत) कांही त्यासारखें करून, कांहीं त्याचे ऐकून.

५९. रकारपूर्वक—हे कोण ? रोहिले असावे असें वाटतें.

६०. निशा=विश्वास.

६१. येथपासून खुद्द बाशांच्या (बाळाजी बाजीरावाच्या) हस्ताक्षरीं मजकूर लिहिला आहे.

भाषण करून विग्रह वाढविणें उचित नव्हे. थोडासा तोटा जाहला तरी सोसून स्नेह रक्षणें उचित असे. हे विनंती[६२].

[८७] ॥ श्री ॥

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलांचे सेवेशीं—

अपत्य माधवराव साष्टांगनमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ १२ सफर पावेतों वडिलांचे आशिर्वादें यथास्थित असें विशेष. वडिलीं आशीर्वादपत्रें त्रिंबकजी गुंढा खिजमतगार याजबराबर पाठविलीं तीं पावोन त्यांचीं उत्तरें विस्तारें लिहून हरजी चव्हाण खिजमतगार याजबरोबर पाठविलीं आहेत. येऊन पावतील त्याजवरून सविस्तर सेवेशीं निवेदन होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[८८] ॥ श्री ॥

श्री.
राजा शाहू नरपति हर्षनिधान, माधवराव नारायण मुख्य प्रधान. *

छ मा॥ अनाम देशमुख व देशपांडये पो॥ जालनापूर यांसि माधवराव नारायण प्रधान सु॥ सलास समानीन मया व अलफ. नरहरी रनाळेकर यवनमय होऊन भ्रष्ट जाला त्याजला प्रायश्चित्ताचा अधिकार नसतां शामाचार्य व कांहीं प्रभृती ब्राम्हण पैठणकर यांणीं शुद्ध केला. सबब पैठणीं परस्परें ब्राम्हणांचा तट जाला. उपरांतिक जावीजंग यांजकडील का॥ दार[६३] पेशजी आला होता. त्यानें बलात्कारें शुद्ध ब्रम्हणांची व बहिष्कृत ब्राम्हणांची पंक्ति करून एकाकार केला. सबब पैठणकर झाडून ब्राम्हण सर्व बहिष्कृत जाले. त्यांस प्रायाश्चित द्यावयास सरकारचे कारकून शंकराजी राम व जयराम रायदेव पाठविले त्यांणीं झाडून पैठणकर सर्व ब्राम्हणांचीं प्रायश्चितें परगण्यासुद्धां केलीं. पैठणचा संसर्ग तुम्हांस घडला आहे. तरि तुम्हीं सर्व ब्राम्हणांस ताकीद करून झाडून प्रायश्चित्तें परगण्यासुद्धां उभयतां कारकून यांचे विद्यमानें संसर्गानुरूप फडशा करणें. जाणिजे. (लेखन सीमा)

छ १८ जिलकाद आज्ञा प्रमाण.

---

६२. हिंदुस्थानांत पेशवे, शिंदे व होळकर मिळून मराठ्यांच्या तीन फौजा असत. पैकीं पेशव्यांच्या फौजेचा अधिकार किंवा दिवाणगिरी रामचंद्र बाबाकडे या वेळीं असावी. हेंही पत्र नाना साहेबांच्या मुत्सद्दीपणाचें द्योतक होय.

६३. कमाविसदार.

* 'न' लिहून दुसऱ्या कागदावर उठविला असतां जसा उलटा उठतो तसा मूळ शिक्यांत सर्वत्र आहे. तसा वर काढतां आला नाहीं. हा उलटा 'न' असण्याचें कारण असें. पिंगळे यांचे घराण्यांत पेशवाई होती ती त्यांजकडून काढून भट यांस दिली हा बदल केला तो दर्शविण्याकरितां शाहूनें हें शेवटचें अक्षर 'न' उलटें वळवें असें ठरविलें.

[८९] ॥ श्री राम ॥

राजश्री बाळाजी पंडित प्रधान गोसावी यांसि—

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नी॥ येशवंतराऊ दाभाडे सेनापति दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत असलें पाहिजे. विशेष खासगत कोठीचे बैल सेर[६४] २०० दोनशें येसाजी गव्हाणा याचे स्वाधीन करून सातारा मिरज प्रांतें पाठविले आहेत. ये विशीं गोसावी यांनीं आपल्याकडील कमावीसदारास पत्रें देऊन सरसाल कोठीस हाशिलाचा उपसर्ग न होतां आमदरफ्त[६५] सुरळीत चाले ते गोष्टी केली पाहिजे. जाणेजे. रा॥ छ ८ निल्हेज. बहुत काय लिहिणें लोभ' असों दीजे हे विनंती.

श्री.
श्री राजाशाहू स्वामी
छत्रपति येशवंतराव
दाभाडे सेनापति.
*

[९०] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री कृष्णराव वळवंतराव स्वामी गोसावी यांसि—

पो॥ माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष—भुजापा शिराळकर वाणी वा॥ मौजे कुरडु पें॥———यांणीं मौजे मा॥रची कमावीस रा॥ जगपतराव निंबाळकर यांजकडून केली होती त्यास वाणी मा॥रानें कांहीं अन्याय केला स॥ त्याजला. न्याययाबद्दल भागानगराहून[६६] नबाबाकडून सजावल आले. त्यास वाणी मा॥र मौजे मजकुराहून पळोन जाऊन का॥ कैम येथें राहिला आहे, म्हणोन हुजूर विदित जाहलें. त्याजवरून हें पत्र सादर केलें असे. तरि तुम्ही आपले कडील का॥ दारांस ताकीद करून का॥ मा॥रीं सजावल येतील त्यांचे स्वाधीन वाणी मा॥स करून कबज घेणें. जाणिजे. छ २२ रजब सु॥ समानीन मया व अल्फ. बहुत काय लिहिणें हें विनंती.

[९१]. ॥ श्री ॥

राजश्री त्रिंबकराव दाभाडे सेनापती गोसांवी यांसिः—

छ अखंडित लक्षुमी अळंकृत राजमान्य स्नेा॥ गोविंदराव नारायण आशीरवाद छ २४ रा॥खर पावेतों आपले कृपावलोकनें करून क्षेम असें. विशेष. इकडील मजकूर ता॥ वैशाख वा॥ ३ पावेतों यथास्थित असों विशेष. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर यांणीं सरकारची ताकीद

---

६४. सर=संख्या, (नग, डाग याप्रमाणें)
६५. आमदोरफ्त=जाणें येणें.
* हा शिक्का अष्टकोनी आहे.
६६. सजावल=जासूद.

पत्रें गकाराँविशीं व शहरचे दखलीविशीं आणलीं त्याचा मा।र पेशजीं लि।। आहे. हल्लीं पत्राच्या नकला करून पा।। आहेत. यासि उत्तर केलें कीं, गकारास बहादर येथील अधिकारी यांणीं प्रयम देऊन शहरांत घेतलें होतें. येविशींचीं पत्रें पूर्वी सरकारांत गेलीं होतीं तें तुम्ही जाणतच आहां. त्या अन्वयावरून कार्तिक माशीं तुमचा आमचा तह ठरला. तेसमयीं यादींत कलम लिहिलें आहे कीं, शहरांत राहतील तों पावेतों बाहेर उपसर्ग होऊं न द्यावा. बाहेर गेले तर शहरांत न घ्यावें. त्याप्रमाणें घडलें असतां शब्द लावावा ऐसें नाहीं. शहरचे आमलाचे दखल मा।र काठेवाड व बरमगांवचे मामलतीचे हजारी यांचे बाकीचा ऐवज सवा लक्ष राहिला आहे तो घ्यावा आणि येथें कारकून, राहील त्याणें सीबंदीचा दरमहाचा ऐवज सहा हजार देत जावा. शहरांत बखेडा हरएकविशीं न करावा. सुदामतप्रमाणें चालावें. येविशींची खातरी करावी. म्हणजे सरकार आज्ञेप्रों दखल देऊं. गुंता नाहीं. परंतु त्यास काठेवाडचा ऐवज देणें नाहीं. आणि दखल घेणें त्याजवरून, राजश्री गोविंदराव फौजसुद्धां वाडे-कमाडेस मुक्कामास आले आहेत. दस्तूरचीं गावें सहजांत फौजेचे मुक्कामानें खराब होत आहेत. उपाय काय येविशींची विनंती सरकारांत करून उत्तर लौकर पाठवावें. त्याप्रों वर्तणूक करूं. सरकारांतून निक्षून ताकीद यांचे वकील तेथें आहेत त्यांस करवावी कीं, काठेवाड झालेवाडचा ऐवज याची व शहरीं राहील त्याणें दरमाहा द्यावा, सुरळीत चालावें, याची निशा करून दखल घ्यावा झणजे वकीलांचीं पत्रें परभारें येतील. व येथें सरकारचीं पाठ-वावीं झणजे देऊन जाबसाल करूं. त्यांसही समजलें आहे कीं, ऐवजाची निशा जाल्याखेरीज दखल होणार नाहीं. परंतु पत्रें पाठवून खुलासा पहातात. आज पत्रें आलीं कीं, रा।। चिंतो रणसोड बोधनी यांजकडे शहरची मामलत सांगितली. शहर व दस्तुरचा दखल द्यावा. कारकून मा।र निल्हे कडील पत्र घेऊन आला त्याशीं बोलणें याच अन्वयें जालें. आज उत्तरें घेऊन लष्करांत जाईल. लष्कर कासींद्रें पालदीजवळ आहे. याउपरि घडे तें लिहून पाठवूं. येथें कोणी मामलेदार असतात. सर्वांशीं वाईट बरें कशास बोलावें लागतें मामलेदार येणार तो ज्येष्ट मास पावेतों यावा. आश्वीन मासीं आल्यास पांच महिने शिवंदीचे चालणार नाहीं, गवगवा पडेल. पुढील सालीं रसद कोणी देणार नाहीं. यास्तव लौकर आल्यानें ठीक आहे. माहल विल्हेस लावून चालविले. हे आशीरवाद. †

---

* 'गकार' कोण? गायकवाड तर नव्हत?

† हें पत्र लिहिणारा कोण तें माहित नाहीं. पत्रांतील मजकुराचा संबंधही तूर्त कांहींच कळत नाहीं.

[९२] ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री **धोंडोवा**[६७] यांसि—**सदाशिव चिमणाजी** आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. **धारे**चा प्रकार उपस्थित जाला होता. तो तीर्थरूपांनीं सोडून तेथें **धारे**जवळ रा॥ **गोविंद हरी**[६८] यांस ठेवून आपण **कोटया**च्या रोखें **राणा**[६९]**नी**चे **सरहद्दे**स गेले. तेथून **दिल्ली**चा मार्ग समीपच. **पठाणां**नींच येऊन **लाहोर** घेतलें. वजीर व **मनसूर अल्ली**खान चाळीस कोसांवर गेले. **पठाणां**चीच सलावत यांजवरि होती. यास्तव वजिरांनीं पाद्शहांस बाहेर निघावयाविशीं लिहिलें होतें. पादशहा भगेंद्रांनीं वेथिर्स्त. यास्तव पातशाहांनीं शाहाजादियाचा मरातीब **अलमगीर**[७०] पादशाहानीं **बहादूर**शाहा व **अजम**शास दिल्हा होता त्याप्रमाणें देऊन शाहाजादा वजीरासमीप पाठविला. लढाई होणें होती. पुढें कसकसें जाहालें असेल वर्तमान येईल तें लेहून पाठवूं. **येशवंतराव पवार औरंगाबा**दहून कूच करून गेले. त्यांचे मागें मागें **राघो गोविंद** गेले होते. गांठ पडों न देतां ते झाडून गेले. **धारे**स गेलेंसें वर्तमान आलें आहे. नबाब **बऱ्हाण**पुरास गेला. पुढें जाईलसें दिसत नाहीं. **सुरते**कडेही जात नाहीं. रा॥ **गोविंदराव** तीर्थरूपांजवळ बोलत होते कीं, **नवाब सुरते**स जातो, **दा**भाडियांचे आपण साहित्य करावें. तेव्हां निमे **गुजराय** द्यावी [म्हणजे] साहित्य करूं म्हणाले. त्यास **गोविंदराव** आह्मांजवळ बोलिले, लक्ष रूपये रोख चहूं पांच पावेतों परगणे जहाले तरि स्वामींनीं मान्य करून साहित्य करावें. त्यास आम्ही म्हणालों कीं, पांच लक्ष रोख, पांचा लक्षांची जागा द्यावी. म्हणोन त्यास म॥रनिल्हे **उमाबाई** नवळ बोलले. तीं मुलकाची गोष्ट मान्य न करीत. पैका देऊं म्हणालीं व तीर्थरूपांचें उत्तर तो निमे **गुजराथ** घेऊं तरीच साहित्य करूं ह्मणोन आलें. जरि नवाब **सुरते**कडे जाता तर **दा**भाडेही बोलते. तें होत नाहीं. याजकरितां तो प्रसंग शिथिल पडला.

[९३]. ॥ श्री ॥

राजश्री **राव**जी **गोविंद** गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्ने॥ **मल्हार होळकर** दंडवत विनंती उपरि तुम्ही राजश्री **खंडो माहादेव** व **सखाराम जगजीवन** सह श्रीपंढर-

---

६७. **धोंडोवा** हे कोण ?
६८. **गोविंद हरी** हे **पटवर्धन**.
६९. **राणाजी** उदेपूरचे.
७०. **अलमगीर**=औरंगजेब.
७१. हें पत्र अपुरें आहे. तथापि हें सन १७१८ १९ सालीं लिहिलें असावेंसें आंतील मजकुरावरून वाटतें.

पुराकडे छ ५ रोजीं गेल्याचें वर्तमान राजश्री माधवराव येशवंत यांचे लिहिल्यावरून समजपर्यंत आलें. तेथें गेल्यावर श्रीचे दर्शनाचा गुंता उर्कोन. सरकार प्रकर्णी बोलण्याचा प्रसंग पडून घाटावर आणिलेंच असेल. कारभारी यांजकडून प्रतिकूलता कोणतीही नाहीं. येक दोस्ताचे रुकाराची गुंता तेही बोलून चालून पल्यावर आणिलेंच* असेल. सारांश प्रसंगीं कोणेही विशींची न्यूनता न पडतां आरंभिला कार [?] अविलंबें शेवटास जाय तें करणें. दुसरें, इंग्रजांनीं काम काजें उगऊन घेण्याची बहुत निकड लाविली होती, त्यांत पन्हाळेकरांची कुमक करून मसलत वाढवावी हा इरादा दिसण्यांत येतो. याचें वारीकपणें वास्तविक अंसेल तसें लेहून सविस्तरें कळविणें र॥ छ १७ रजब सु॥ सल्लास अशर मयातैन व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

[९४] ॥ श्री ॥

पु॥ राजश्री त्रिंबकराव विश्वेनाथ स्वामी गोसावी यांसि–

विनंती उपरि राजश्री हिंदुराव सेनापति थोर मनुष्य, बोलण्यांत, मर्यादेंत, तिलमात्र अंतर दाखवीत नाहींत. आम्ही त्यांचे बहुमानास त्यांचे विचारें मातबर प्रकार करणें प्राप्त झाल्यास त्यांचे मसलतीखेरीज करणार नाहीं. तेही आमच्या डेरियास आले होते. कोणें रोखें जावें, कसें करावें, इत्यादि त्यांच्या विचारें करीत असों. तेही राहिल्या सारखें होईल तित [कें] करून दाखवावें याच प्रकारें चित्तापासून बोलतात. फौजेचा प्रकार पाहतां स्वामींनीं नेमणूक केली त्यापैकीं हजार बाराशें तर आलेच नाहीं. आली फौज तिची गणती घेतल्यास चौथाई तर कमी होईलच. तेव्हां फौजही कमी मातवर भरण्यांत समजत नाहीं. निवडक प्रकार तेव्हांच उघडा दिसतो. सरदार छावणीस राहिले. त्यांसही छावणीचें संकट. त्यापक्षीं जितके फौजेस ठेवावें तितका खर्च भारी. यामुळें भागले थकले, सबर निबर, कोणाचे देण्या घेण्यामुळें बनतें, न बनतें यामुळें येकण माणस कमी होतें. तेव्हां भरणा कमी. गाडदी तरि चहूंकडे गुंतले. महमद इसफ तरि जरूरीस सिऱ्यास पाठविले. आणखी लोक भरणा स्वामीकडून आल्यास त्यास बोलवून घेऊं. येकांड्या असाम्या, घोडे चांगले माणोस आढळाचे थोडे थोडे ज्यास आढळतें तो घेऊन येतो. तूर्त त्याच्या स्वरूपाप्रमाणें रोजमरा करार करून पुढें सर्वांप्रमाणें नालबंदी वगैरे पावेल ऐसें लेहून घेऊन चाळीस पन्नास तरि ठेविले. शें दोनशें पर्यंत उपयोगी आढळल्या सारिखे वरचेवरि पाहून ठेऊं. चार पथकें निवडून येखादे 'कामास हुजराचीं

---

* येथें बाजूवर शिक्का आहे.
७२. हे त्रिंबकराव मामा.
७३. हे घोरपडे मुरारराव गुतीकर.
७४. सिरा प्रांत कर्नाटकांत आहे.

पाठवीन म्हटल्यास नेमणुके प्रमाणें हजारांचे पांचशें जातांना जीतात. ह्या प्रकारें अवस्था दाणा चाऱ्यामुळें जाली आहे. राजश्री गोपाळराव गोविंद आमच्या डेरियास येत असतात. राजश्री आनंदराव रास्ते बोलाविल्यास येत असतात. ह्मणोन लिहिलें तें कळलें. ऐशास विचार आचार कर्तव्याकर्तव्य राजश्री मुरारराव घोरपडे यांचे विचारें करितां बहुत उत्तम आहे. ते सांगतील ते नेकसल्ला[७६]च सांगतील. फौजेच्या कमतीचा व भरण्याचा अर्थ लिहिला तर तो खराच. छावणीचा प्रकार वास्तव कमती असेल. येकांडें माणोस,घोडें पाहून चाळीस पन्नास ठेविले, आणखी येतील तसे पाहून शें दोनशें ठेऊं म्हणोन [लिहिलें] तर चाळीस पन्नास ठेविले ते ठेविले या उपरि नवे लोक येकांडे येकंदर न ठेवणें. वर गोपाळराव व आनंदराव बोलाविल्यास येत असतात म्हणोन तर विचारआचारास उभयतांस बोलावितात. व तेही येतील. गुंता नाहीं. विचार करण्यास सर्वांच्या विचारें केल्यास गुंता काय? जाणिजे छ १० रविलोवल बहुत काय लिहिणें हे विनंती.

पौ॥ छ ५ रा।खर श्रावण

॥ श्री ॥

[९५]

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसावी यांसि–

पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष–राजश्री राजे अर्जुनसिंग धंधेरे यांचे वडील लेक बुंधेलियांस मिळोन यांचे कनिष्ट पुत्राशीं झुंज केलें. दोन तीन महिने लढाई जाहाली. नाइलाज देखोन यांचे कनिष्ट पुत्रांनीं जोहर[७८] करून आपण लो [थ]? टून मेला. मग बुंधेलियाचे आसरियानें यांचे वडील पुत्रांनीं घेतलें. भेलशाचे स्वारीस अर्जुनसिंग याचे ज्येष्ट पुत्रांनीं भेटीस यावयाचें व नजर कबूल करावयाचें राजकारण लाविलें. त्यास आम्ही उत्तर केलें कीं, "अर्जुनसिंग आमचे पदरचे जागे [?] यांचे तुम्हीं भेटीस येणें व नजर कबूल करणें तें आधीं अर्जुनसिंग यांस भेटणें, ते आम्हांस आणून भेटवितील, उपरांतिक नजर करार करूं" म्हणोन उत्तर केलें. त्यास ते सालीं भेटीस नू आले. हल्लीं तुम्हाशीं भेटीचा पैगाम करतील. व नजर निर्याज[७९] कबूल करतील. अगर कबूल केली असली तरी तुम्हीं कबूल न करणें. अर्जुन-

---

७५. येथपर्यंत भिवकरावांनीं लिहिलेल्या पत्रांतील गोषवारा झाला.

७६ नेकसल्ला=चांगला उपदेश, सदुपदेश.

७७. बाळाजी बाजीरावाचें हें पत्र.

७८ जोहर करून=जाळून घेऊन (लाक्षा) जोहर=(लाक्षा) गृह.

७९. नजरनियाज=(नवस.) नजराणा.

सिंगाचे हातून येऊन भेटतील, जागे खालीं करून यांचे हवालीं करतील, तरि भेट घेणें. अर्जुनसिंग पदरचे यांची स्थापना करूं ऐसें आमचें वचन गुंतलें आहे. याजवरि दृष्टि देऊन यांची स्थापना करणें. याचा लेक ज्येष्ठ फंद फिरिंदाची गोष्ट सांगेल त्यानवरि सर्वथा न जाणें. नाणिजे. छ २३ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंती.*

॥ श्री ॥

[९६]

चिरंजीव राजश्री नाना यांसि–बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष. मियाँ आछनचे मजकुराविशीं मुजफरखान यास पत्र लेहून तुम्हांकडे पाठविलें आहे. तें पावलें असेल. त्यास मिया आछनचा व हबशाचा नोरा होऊन अल्ली नवाजखान याचा तह जाला. आपण लोक सुद्धां बाहेर निघालों म्हणून रा॥ महादाजी केशव यांचें पत्र छ १४ रबिलावर शनवारीं आलें. त्यास याप्रमाणें मजकुर जाला तेव्हां महादाजी केशव व कृष्णाजी अनंत मागें फिरलेच असतील. कृष्णाजी अनंत येऊन कोंळ्यांचें पारपत्य करावयाचें तरतुदीस लागतील. मुजफरखान यास पत्र पाठविलें आहे, तें त्यास द्यावें ऐसें नाहीं. याजकरितां पत्र न देणें. व जासुदाबरोबर पत्रें महादाजी केशव व अल्लीनवाजखान यास वगैरे पाठविलीं आहेत. तीं पत्रें पाठवावयाचें प्रयोजन नाहीं. जासूद तुम्हांजवळ जाऊन पावलेच असतील. त्यास माघारें फिरवावयास जासूद पाठविले असत, तरि तीं पत्रें पावलीं असतील तर [परत] पाठवणें. जाणिजे छ १३ रबिलोवर. बहुत काय लिहिणें–मुजफरखानांनीं जाऊन जवार घेतली. गंभीर गड घेतला. याची सलावत त्यांजवर पडली. कोळी मैदानचे जुंझणार नव्हत. दोन हजार मुजफरखान, सठवोनी जाधव, कृष्णाजीपंत तुम्हीं बलर्दीनें जावें. उशीर न करावा सत्वर काम उरकेल. उत्तम प्रकारें पारपत्य करावें. घरांतील चोर मळमळित जाहालिया परतेल. लवाडी करतील. हे आशिरवाद. पो॥ छ १६ रबिलावर.

[९७]

॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्र बावा स्वामी गोसांवी यांसि:– पोष्य बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल

---

८०. यावरून प्रामाणिकपणा आमच्या राजकार्य धुरंधरांत होता ! ज्याचो बाजू ते स्वीकारीत त्यांस कांहीं ते अंतर देत नसत.

*मागें पृ० ७६ टी० ६२ पहा.

८१. नाना पुरंदरे असावे.

८२. सुरतकर?

८३. कोळी जव्हारचे वगैरे.

नाणोन स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. किल्ले कन्हारा हा दतीयेकरानीं पैगाम करून घेतला; आणि झांशी प्रांतीं उपसर्ग करीत आहेत; सरकारची बाकी येणें ते देत नाहींत; मर्वाशी मनमाने तैसी करितात, म्हणोन राजश्री नारो शंकर यांणीं लिहिलें त्यास येविशीं त्यांणीं तुम्हांसही लिहिणें तें लिहिलेंच असेल. तुम्हीही या गोष्टीची पैरवी चित्तांत उचित कर्तव्य तें आणलींच असाल. त्यास यंदा दतीयेकरांनीं दो चौं प्रकारें लबाडीच केली. विना त्यास बोडसेकरासारखाच नतिजा दिल्या खेरीज हलखुद राहोन सरकारचा अंमल सुरळीत होतार्त ऐसें नाहीं. ऐशियास मा।र निल्लेची मदत फौज पाठवून केली पाहिजे, कीं दहशतीनेंच कन्हाऱ्हा सोडीत आणि आपले जागां जाऊन सरकारी अंमल सुरळीत चालतात. याजकरितां येथूनही मीरखान वगैरे मा।रनिल्लेचे तावि र्जातील पथकें आहेत. त्यास ताकीदपत्रें लिहिलीं आहेत व त्या प्रांतीं इजतखान वगैरे आहेत त्यांस ताकीद करून फौजसुद्धां मा।र निल्लेकडे पाठवणें म्हणजे फौजेच्या दवाबानें जें काम होणें तें होईल. मुलकांत फितुर होणार नाहीं. यद्यपि दतीयेकर कन्हाऱ्हा धरून बसलेच तरी काय मुजार्की आहे ? फौज त्या प्रांतीं फिरूं लागलियावरि त्याचा आटा बंद करील ऐसा प्रकार आहे. तरि जें करणें तें विचारें यांची पैरवी करून सुरळीत होय तें करणें. रा॥ छ १७ सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[९८] ॥ श्री ॥

अखंडित लक्षुमी अळंकृत राजमान्य राजश्री विसाजी कृष्ण व हरी गोपाळ गोसांवी यांसि:—

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार सु॥ सितेन मया व अलफ. तुम्ही शिरहट्टी घेतली यार्ची पत्रें पाठविलीं तीं पावोन संतोष जाहाला. उत्तरें आलाहिदा पुरवण्यांत लिहिलीं असत. त्याजवरून शिरहट्टीचा बंदोबस्त करून तुम्ही पुढें गेलांच असाल. कोठें गेलां काय वर्तमान तें आठा रोजाच्या अंतरानें लिहीत जाणें. वरकडही त्या प्रांतींचें वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे. छ २६ रमजान. बहुत काय लिहिणें.

[९९] ॥ श्री ॥

राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जयाजी शिंदे गोसांवी यांसि:—

अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेहा॥ बाळाजी बाजीराव प्रधान

---

८४. मवाशी.=रानटी लुटारूचें कर्म, धंदा.
८६. नतिजा=फळ, शिक्षा.
८७. हालखुद=जसें पाहिजे तसें, यथावकाय.
८८. ताबिजा=ताबियांतील ?
८९. मुजाका=किंमत, महत्व.

आशिर्वाद सु॥ सीत आर्बेन मया व अल्फ. राजश्री अर्जुनसिंग राजे हे बंगाल्याचे खालीं हुजूर आले त्या तागायत हुजूरच आहेत. त्यास हे हुजूर आल्याअगोदर यांजकडे जागा होती ते जागा राजश्री सभासिंग यार्णी हे हुजूर आले यास्तव झुंजून घेतली. यांचा कुंवर तेथें कामास आला. याप्रमाणें नाश जाहला. त्यास हे हुजूर आले होते कीं, पुढें कांहीं राज्य आपल्या जिमे करून घ्यावें, श्रम करावे, सहास करावें, कृपा संपादून घ्यावी. ऐसें असतां हे उमेद एकीकडेच राहोन यांची जागा होती ती जाऊन रहावयास स्थल नाहीं ऐसें जालें. आणि त्यांणीं तो एकनिष्ठा धरून बसले आहेत. ऐशास आमच्या विचारें ऐसें आहे जे, यांणीं आपल्या बयाकारणें कंश्यप* धरला, चार वर्षें बाहालीं आणि यांची दाद न लागे. तेव्हां ही गोष्ट योग्य नाहीं. हें जाणून निकाल या प्रकारचा काढला आहे जे, हे हुजूर फिर्याद आले होते त्या अगोदर यांजकडे गांव गल्या ज्याप्रमाणें चालत आले आहेत त्याप्रमाणें चालवावें. अधिकही कांहीं देऊं नये. त्यांत उणें करूं नये. ये विशीं यंदा सभासिंग याजकडील तह सरकारचा होणें तो जाहालियावरि सदर्हू प्रमाणें याची जागा यास द्यावयाचा करार करून याचे जिमे करावी. जाजती उपसर्ग लागों न द्यावा. याप्रमाणें खांमखा करावें. कदाचित बुंधेले म्हणतील कीं, याची पुरातन जागा कांहीं नाहीं, ऐसे असतां काय म्हणून ते जागा द्यावी? तरि हे पुरातन आहेत म्हणोन द्यावी ऐसें नाहीं. हे सरकारांत आले त्या अगोदर याजकडे जागा होती त्यापासून याजकडे चालत नाहीं. कजिये करितात. यास्तव हुजूर फिर्याद आल्या अगोदर यांजकडे होती त्याजप्रमाणें यांजकडे चालों देत तें करणें. या उपरि यांचें काम लांबणीवर न घालणें. हे बहुत येथें हैराण जाहाले आहेत व यांची हैराण गत दूर होणें तें करणें. जाणिजे छ २९ रविलोवल बहुत काय लिहिणें[१२].

लेखन सीमा

॥ श्री ॥

[१००]

राजश्री बाळाजी पंडित प्रधान दाजी गोसावी यांसि–

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्षुमी अलंकृत राजमान्य स्नेहो॥ मानाजी आंगरे बजारत माब रामराम विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लेखन करीत असलें पाहिजे. विशेष–सांप्रत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं

---

९. नारो शंकर यांची.
—मखा=खचित, निश्चित.

१२. मागें पत्र (१५) व टीप ८० पहा.
* कश्यप=कांस, आश्रय.

मेंगल आगळीक करून पुढें येत आहे म्हणून आपण मंजल दर॰ मजल मोंगलाचा उपमर्द करावयाकरितां जात आहेत ऐसें वर्तमान परस्परें कळोन येत असे. हा काल पावेतों मोंगल आपले दर्पें कडून स्नेहांत असतां या समयीं दुर्बुद्धि धरिल्यावरून आपण पारिपत्याचा विचार योजिलाच असेल व योजावा हाच प्रसंग प्राप्त असेल. दुसरा विचार आचार पारिपत्याविना योग्यांत पडोन येत नसतील ऐसेंच दिसतें. असो, आपला पुण्योत्कर्ष समर्थ आहे. तत्राप आपण खांसा आहांत. मान मार्ग पाहून कर्तव्यांत येणें तेंच येईल. व आणतीलच. मोंगलाचें सामान जयलें असेल, आपलें जयोन फौजेचा गोंहा होत असेलच. व पुरता होय तोंवत्काल सलावती खालें राखणें धरणें त्या रीतीनें आपण धरतीलच. न कळे एखादे समयीं सरदार मामलेदाराकडून आगळीक होऊन थोडकेच सामानानशीं मोंगलाचे फौजेस तोंड करावयाचा विचार करतील. तरि एक वेळ शेर जाहला म्हणजे गोष्ट कार्याची नाहीं. हे विशीं लिहावेसें काय ? कैलासवासी राऊ व आपा तांब्राचे *उपमर्द करीत आले. त्या युक्ति प्रयुक्ति सर्व आपण पाहिल्या असत. मसलतीच्या प्रसंगाचा गरगशा तो आहेच, त्याजमध्यें स्मरणपूर्वक संतोषाचें वृत्त लिहून पाठवीत असावें. रा॥ छ १८ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें॰ कृपा असों दीजे हे § विनंती.

(मोर्तबसूद)

[१०१] ॥ श्री ॥

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री विश्वासराव यांसि प्रती नारो शंकर आशिर्वाद उपरि येथील कुशल ता॥ छ १७ रज्जब मुक्काम नजीक नासिक यथास्थित असे विशेष. तुम्ही छ २ माहे मिनहूचें पत्र पाठविलें व आणखीं दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री सुभेदार देशास आले व रा॥ बाळाजी गोविंद फौजेसुद्धां झांशी प्रांतें न राहतां शिरोंजेस येऊन सागराकडे गेले. येणेंकडून चहूंकडचा बंदोबस्त नीट राहिला आहे. झांशीचे किल्ल्यास मोर्चे लागले आहेत इत्यादिक तिकडील मजकूर विस्तारें लिहिले ते अवगत जाहाले. ऐशास आम्ही दरबारचा उलगडा करून श्रीमंत स्वामींची आज्ञा घेऊन फौजसुद्धां पुणतांब्यानजीक आलों. तेथून फौज कासारबारीनें नसरतपुरास पाठविली. आम्ही सडे जनस्थानांस येऊन श्री त्र्यंबकेश्वराची यात्रा करून जनस्थानाहून काल प्रस्थानें डेरा दाखल जालों. राजश्री मल्हारराव सुभे-

---

१३. गाहा=जमाव.
*येथें बाजूवर शिक्का आहे.
§ हे पत्र बाजीराव मरण पावल्यावर लौकरच लिहिलें असावें.
१४ सुभेदार=मल्हारराव होळकर.
१५. बाळाजी गोविंद बुंदेले.

दर्र चांदवडा [स] आले आहेत. भेटीस यावयाविशीं त्यांचें पत्र आलियास त्यांजकडून चालते मजलीनें फौजेस मिळोन रा॥ त्रिंबक शिवदेव व अंताजी माणकेश्वर व येशवंतराव पवार ही तिन्ही पथकासहवर्तमान मजल दर-मजल त्या प्रांतास येतों. पुढें पांच सात हजार फौज तुम्हांकडे लांब लांब मजलांनीं पाठविली असे. या फौजेबरोबरि रा॥ चिमाजी वामन व माधवराव यांजला देऊन पुढें शिरोंजेकडून झांशीकडे रवाना करणें. फौजेचे आवाईनेंच वेढा उठोन जाईल. अथवा मातबर फौजेचेंच काम असलिया आम्ही तो मजल दर मजल येतच आहों. तिकडेस आलियास तिकडील कामें सहजांत घडोन येतील. तुम्हीं उज्जनीस राहोन तिकडील बंदोबस्त राखावा. आम्हीहा येऊन पोंहोचतों. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. हे आशीर्वाद.

राजश्री खंडोपंत व राजश्री चिमणाजीपंत स्वामींचे सेवेशीं—नमस्कार विनंती उपरि तुम्हीं हिम्मत धरून चिरांजिवांस उज्जनीस ठेवून पुढें फौज घेऊन जावें. तिकडील रंग पाहावा तैसें करावें. तों इकडील फौजांचा उपराळा सत्वरच होईल. चिंता न करणें. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती. पै॥ छ १ साबान मु॥ बेगदा पे॥ उज्जन शुक्रवार सायंकाळ.

[१०२] ॥ श्री ॥

राजश्री बाळाजी पंडित प्रधान दाजी गोसावी यांसि—

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य-स्री॥ मानाजी आंगरे बजारतमाब रामराम विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपणाकडून राजश्री अंताजी बावाजी पत्रें घेऊन आले. आपले सांगितल्याचा अर्थ निवेदन केला. स्वहस्ताक्षरें लेखनान्वय श्रवण करून घेतला. नंतर विश्वासपूर्वक स्वस्थ असतां रेवदंडे यांत येऊन कर्म आचरलें तो वृत्तांत व चिरंजीव राघोजी आंगरे आपलें आश्वासनें[16] व मागाहून राजश्री सांबाजी प्रभु तदुत्तर अंताजी बावाजी संपादोन[17] आलियाचें संतोष वृत्त लेहून पत्रें पाठविलीं तीं हुसेनखान मिरधे[18] घेऊन आपणाजवळ जाऊन, पावलींच असतील. आपले विश्वासवचनावरि सर्व खेद परिमार्जनांत आणोन, समजोन आपले कृपेची अभिवृद्धि निशापूर्वक करून घेत जावी याच कृतसंकल्पावरि आपणाकडील सौख्याचे विभागाची

---

१६. हें पत्र विश्वासराव नांवाच्या बुंदेलखंडांत असलेल्या सरदारास लिहिलेलें असावें. पुढें पत्र १०६ व १०७ पहा.

१७. याचा संबंध पुढें 'संपादोन' याजकडे.

१८ मिरधा=जासुदांचा नाईक.

मध्या प्रतिक्षा न करितां आजि समयीं मोंगलाचे शहाकरितां आंपली स्वारी ह्या-हींलियायुळें इकडील मामले याविशीं आम्हांस कितेक प्रकारें सुचविलें तें स्वहितांत उचितांत म्हणोन अस्मतभामीं शत्रुवर्ग प्रसिद्धपणांत आहेत त्यांत फिरंगी याची आवाई दिवसें दिवस येत चालली. निमित्य अगोधर सावध असावें म्हणोन आरमारच्या तयारीनिशीं बातमींत राहिले. याचें वृत्त साकल्य लेहून गेलेंच असे. आमं [चें] कडेस फिरंगी याचें वृत्त आलें. प्रमाण अप्रमाण असो म्हणून खांसाच आरमारावरि चढोन बाहेर स्वारी केली. अगोदर कळतां रेवदंडे यांत राजश्री नारायण खंडो कारकून इतबारी जाणून सूचनेस पाठविले. खांसा आह्मीच आरमारावरि गेलों. फिरंगी कदाचित् आंमचे [?] तरि सर्व मामलेदारी आमचे युक्तीस मिळोन एकत्र विचारांत येऊन शत्रूस पराभवांत आणावें याच्याही युक्ति योजोन ठेविल्याच होत्या कीं, जलमार्गें आरमाराच्या जोऱ्यानें आगमन होतां त्यास प्रति मप्यता [?] न जाहालियानें सर्व साहित्यानशीं खुषकीस जातां त्यास गुंता पडणार नाहीं. यौजकरितां वसै, साष्टी, रेवदंडे देखील आरमार एकत्र करून फिरंगी आल्यानंतर कावे, दावे खेळोन मुकाबले यास प्रतिमॅळ राहून आंगावरि ओढोन संपूर्ण दर्यांतच वेध ओढोन घ्यावा. समयीं फिरंगी तडीस लागों जातो, आम्ही पाठीवरि जातांच क्षणीं तडीस उतरावयाचें अवसान सहजांतच खता पाऊन आमचे मुकाबले यास येईल. आलियावरि आम्ही बाहेर पडत आलियावरि तोही येतच जाईल ऐसें ही अक्षोन रेटाई करून तडीस सामान सुद्धां उतरावयासि लागलांच तरि त्याचे आरमारांत मुख्य जोरा थोरले तरांडियांचा ती तरांडीं तडीस जाणेंच नाहींत. लहान तरांडियांवरून तडीस जावयाचा संबंध पडोन जाईल तेव्हां जुंजारू लोक सामान देखील तडीस उतरावायावरि तरांडीं सहजांतच खालीं पडों पहातील. त्यांजवरि आपले आरमाराचीं नेहटबाजी, व खुषकीस उतरूं लागतील त्याजवरि खुषकीचे लोकांची नेहटबाजी, ऐसा एकावच्छेदें करून येलगार करावाच करावा. ऐसा व आणखीही विचार समयीं सुचेल त्या प्रों। सर्व एकरूपतेनें व आरमार एकत्र होऊन कर्तव्यांत आणावें. याचे विचारें करून बाहेर स्वारी केली. लहान थोर मिळोन साठ शिलेंशिला आरमाराचा फिरता ठेविला. ऐसें केलें असतां राजश्री रामाजी महादेव पराक्रमी विश्वासघातकी निर्माण आहेत. दुसरे नारो त्रिंबक तळेकर, रामाजी महादेव यांचे साग्यतेस होऊन किल्ले सागरगडीं कार्तीक वद्य द्वितीया गुरुवारीं पहाटेस बारा पंधराशें लोकांनिशीं शिल्या घेऊन

---

९९. मागें पत्र १०० पहा.
१०० प्रतिमल ? प्रतिफल=उलट मारा?

१. तरांडें=एक प्रकारचें तारू.
२ शिलेंशिला=तांडा, रांग, जमाव.

वजरटोंक म्हणोन दक्षणभागीं असे तेथें जाऊन शिडया लाविल्या. किल्लांची चौकशी आहे तैशीच होती. त्यांणीं शिडया लोटिल्या. दगडी घालितां अवसान खतौं होऊन श्याम वदन केलें. मोड जाहला. परकियाकडील *असते तरि मोडाचे पाइकांवरि स्वारी गेलियास जाऊं पावते ऐसें नाहीं. तत्राप आचरणाप्रमाणें पारिपत्य करावें तरि ते करणार, आचरणार लघुकर्म आचरोन गेले. परंतु मोड पाहून मारिले, धरिले तरि तोही लौकोक या समयांत परकियांत उत्तम नाहीं. हेचविशीं कळंक. अगोदर सर्वांस ताकीद आहेच कीं, सावध राहून रक्षावें बुद्धिपुरःसर क्षितीस पाठीवरि न जावें. तदनुरूपच वर्तणूक होऊन सात शिडेया सोडविल्या. शिडिया लावितां बकरे मारिले तेही सापडल. तळेकर लोक फिरून जातां रेवदंडे समीप पल्ला पाहून रेवदंडां गेले. तेथून तळेंयास गेले. या प्रों॥ मामलेदाराचें आचरण आणि आपले तो विश्वासपूर्वक आश्वासन आणि परिणाम या प्रकारें. तेव्हां काय करावें ? आपले विश्वास वचनावरून आम्ही स्वस्थ, यामुळें कपटियास भास होतो कीं, विश्वासास प्रवर्तले आहेत, यांतच संध असे. ऐसें समजोनं माणिकगडास दगा दिल्हा. हल्लीं आपले कृपेची निखालसता सर्वत्रांस कळल्याप्रमाणेंच किल्याचेही लोक विश्वास मानोन वर्तत असत तरि सध्या दगाबाजी जहालीच होती कीं नाहीं. अनभवास येत गेल्याप्रमाणें साकल्य ल्याहावें लागतें. लिहितां तपशील सुद्धांच लांबतो परंतु लंब्यमान मजकूर पाहून समयीं श्रवण करून घ्यावयाचा अनादर केला तरि तोही खेदच म्हणावा. असो, आमचा एक निश्चय कीं, आपले ऐसे म्हणवून आहों. त्यास अंतर नाहीं. अतःपर आपले विचारास येईल तदनुरूप उपद्रव कर्त्यांस जांजीतं केले तरी उत्तम, न केलें तरी उत्तम. आपला अवलंब समजोन मानानें आहोंच. घडलें वर्तमान साकल्य कळावें म्हणून लिहिलें असे. फिरंगी याचे आगमनानंतर युक्ति प्रयुक्तीची योजणूक आमची आम्हां जवळ राहिली असे. लिहिला पाल्हाळ एव्हां वृथा असे. समयीं घडेल तेव्हां खरें. आवाईप्रमाणें आगमन जाहलें. आपले सामर्थ्यावरून निरंतर शोधांत आहोंच. वरकड दाजी आपले आम्ही म्हणवीत असतां आमचे पाठीं ऐसा विचार उपद्रव असावा, परकियांत लौकिक आणिलासारिखा रुढीस यावा, हाच मात्र खेद वाटतो. बरें, यांचे निराकरण करणार आपण आहेत. विस्तारें किती म्हणून ल्याहावें ? न ल्याहावें तर कोणास ल्याहावें ? यास्तव सविस्तर जाहलें वृत्त लिहिलें असे. बहुत

---

३ खस्ता=(नुकसान, नाश) नष्ट.
* येथें शिक्का बाजूवर आहे.

२. पाइक-पायिक=पायदळचे शिपाई.
५. जाजीत ? 'फजीत' तर नव्हे ?

काय लिहिणें लोभ असों दीजे रा॥ छ ३ माहे सफर हे विनंती.[९] (मोर्तबसूद:)

[१०३] पै॥ छ १० जमादिलावर. श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बापूजी बाजीराव स्वामी गोसावी यांसि. पे॥ बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष–तुम्ही पत्र छ २५ जमादिलोवलचें पाठविलें तें छ ३ जमादिलाखरीं प्रविष्ट जहालें. आम्ही पलाशीहून कूच करून घाटावर आलों तों, सैद लष्करखानही रोजिर्याहून कूच करून पुढे आले. वातमी रास्त घेऊन आले. आम्ही तेचक्षणीं कूच करून, सामानें बांधून खानासंनिध आलों. त्यांस आम्हांस अंतर दो कोसांचें राहिलें. तेव्हां खानांनीं सांगून पाठविलें कीं, "आज तुम्हीं मुक्काम करणें आम्हीही मुक्काम करितों. तदोत्तर तह झाला तर उत्तम. नाहीं तरि दुतर्फा ही तयारीच आहे" म्हणोन त्याजवरून मुक्काम केला. रा॥ बजाजी माधवराव व त्रिंबक सुंदर सादतखानाचे दिवाण आम्हांकडे आले. आम्ही आपले मुद्दे त्यांस सांगितले. ते त्यांणीं खानास जाऊन सांगितले. खान म्हणाले हे मुद्दे आम्हांस मान्य होत नाहींत. तेव्हां आम्ही तुटती गोष्ट सांगितली. तुटतेंसें देखोन त्यांनीं मुद्दे मान्य केले. त्यांच्या आमच्या भेटी जाहल्या. परस्परें वस्त्रें घोडे दिल्हे. म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास तुम्ही हिंमत धरून फार शिकस्त केली. शाबास! तुम्हीं केलें तें बहुत बहुत उत्तम केलें. रंगाच्यां मोटा बहुत बांधाव्या ऐसें नाहीं. अतःपर तुम्हीं न वोढणें. केलें तें सुरळीत करून तुम्हीं येणें. खान स्नेहावर, अंतीं मुस्तकीम[१०] म्हणोनच हे गोष्ट रफे दफे[११] जाहली. अन्यथा अन्यत्रा पासून होणें दूर. नाहक कलहास कारण जाहलें होतें. जुंज मुकदामियांवरून दीर्घ कलह प्राप्त होता. वारा पाणीं[१२] जहालें व तुम्ही दम धरून केलें बहुत बरें केलें. अतःपर तुम्ही सुरळीत करून येणें. मजकुराचे रजबदलीमध्यें खानाची मर्जी तोडून थोडक्या मुद्यासाठीं नाखूष न करणें. त्यांची मर्यादा व स्नेहाची रीत बहुत संरक्षण करणें. जाणिजे. छ ४ जमादिलावर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

६. पेशव्यांचे सुभेदार रामाजी महादेव वगैरे यांजवर ही फिर्याद आहे.

७. सैदलष्करखान हैदराबादकर.

८. रोजें–औरंगाबादेनजीक.

९. रंगाच्या मोटा बांधणें=आब राखणें, प्रतिष्ठा राखणें, (सर्वकाळ) कलावर गोष्ट घेणें? हें पत्र वाचून बापूजी बाजीराव डोंगरा एवढा झाला असेल! "अमृतं स्वामिगौरव:"

१०. मुस्तकीम=कायम, अढळ.

११. रफेदफे, रफातफा=सुरळीत, जमवून, सलूख्यानें.

१२. वारापाणी=निकाल.

[१०४] ॥ श्री ॥ छ १६ रविलोवर.

राजश्रियाविराजित "राजमान्य राजश्री **बापू**जी **भी**मराव स्वामी गोसावी यांसि– पो। **बाळा**जी **बाजी**राव प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जाणें. विशेष–**येस्ळकर मों**गल व खोजजी वगैरे यांचें व राजश्री **रा**घो **गो**विंद यांचें युद्ध जहालें. परस्पर माणसें घोडीं पडलीं. **रा**घो **गो**विंद खानदेशांत गेले. त्यांचे मागें **मों**गलाची फौज लागली आहे. मशारनिल्हेची कुम्क करणें जरूर तरि तुम्ही व ही र बु ल गे देपूर बेलापूराकडे येऊन, सडे जाऊन, **रा**घो **गो**विंद यांस सामील होणें. तुम्ही जातां क्षणीं कांहीं न करणें. **मों**गल बळें येऊन कलहास प्रवर्तेल तर मग जैसें बनेल तैसें तुम्हांस करणेंच लागेल. कराल. करणें. **रा**घोपंताचा पिच्छा सुटे ऐशी तजवीज करणें. वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. बहुत काय लिहिणें हे विनंती[13].

[१०५] ॥ श्री ॥ पौ। छ २९ रमजान.

सेवेशीं विज्ञापना ता। छ २२ सावान पर्यंत वडिलांचे आशिर्वादें करून यथास्थित असे विशेष–वडिलीं आशिर्वाद पत्र पाठविलें तें प्रविष्ट जहालें. **न**बाब **नि**जाम **अ**ल्लीखान यांची तुमची भेट जाहलीच असेल; बोलणें चालणें काय जहालें, तुम्ही कोणीकडे जाणार, काय मनसुबा केला, नबाब कोणीकडे जाणार; तुम्ही व **न**बाब **ब**राडांतून जाल तों आमचे दोन चार मुक्काम **आ**शेरी **ब**रानपुरासमीप होतील; नबाब कोणीकडे जाणार तें लिहिणें; म्हणोन आज्ञा. ऐशास वडिलीं आज्ञा केली ते उचित. वडील दीर्घ दर्शीवें चारी मनसुबियांचे प्रकार ध्यानांत आणून कर्तव्य तें करितात. त्यास **न**बाबाची आमची भेट **कु**रुमखेडानजीक छ २५ सावानीं जाहाली. बोलणें चालणें एक दोन रोजांत होईल. **न**बाबाचा आग्रह आपले डेरियास आम्हीं यावें. त्यांनीं आमच्या डेरियास यावें असा आमचा आग्रह आहे. तोही प्रकार दोन तीन रोजांत उरकून **न**बाब, आम्ही घाट चढोन जातों. लष्करांत ताकीद निक्षून करणें ते केली आहे. लूट फाट कांहीं होत नाहीं. हा मुलुक **न**बाबाचा व **भो**सल्याचा. **न**बाबानीं कित्येक महालच्या कबुलातीचे कतब सरकारांत होते ते मागून घेतले. भरवस्ती गांवाम इकडील तार्कादार व **न**बाबाचे ठाणेदार बैसले आहेत. कोठें उपद्रव नाहीं. व आमचा व नबाबाचा मुक्काम [असे] ओ साड रानांतच पडले. खलासा उद्यांचे परवांचे दिवसांत कामकाज उरकून घांट चढून जाऊं. वडीलही योजिल्या मनसुबियांस कूच करून *जातीलच

---

१३. मागें पृष्ठ ५६।५७ पत्र ६० पहा. | * हें पत्र थोरले **मा**धवरावचें असावें.

घाट चढून वरते गोलियावर कोणीकडे जावयाचा ठहराव होईल तो सवेशीं लिहून पाठवूं. सवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१०६] ॥ श्री ॥ छ २५ मोहरम.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री *विश्वास रावजी स्वामींचे सेवेशीं–

पो। गोपाळराव गणेश सा। नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ ता। छ २२ माहे मोहरम मु।। नजीक पचावल जाणून स्वकीय कुशळ लिहीत असलें पाहिजे. विशेष–आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. जाटाची फौज येऊने भदावर प्रांतांत गडबड केली आहे. पुढें सरकारच्या प्रांतांत येणार त्यामुळें इकडे कितेक हारामखोरांनीं दुंडी[14] आरंभिली आहे म्हणोन कितेक विस्तार लिहिलें तें कळलें. ऐशास ये विशीं आपली खातरजमा होऊन स्वस्थता असों द्यावी. आम्ही आपले पाशीं येऊन पोहोंचलों ऐसेंच जाणावें. येथोन पेशजी आपणाकडे मुंजरद[15] जोडी रा। केली आहे. तीं पत्रें पावलींच असतील. त्यास आम्ही दरमजल येत असों. आम्ही आपण एकत्र जाहल्यास ईश्वर इच्छा आहे तरि खावंदाचे पुण्य प्रतापें करून सर्व शत्रु हरामखोर असतील त्यांचें पारपत्य होईल. चिंता नाहीं. देशींचें वर्तमान तर श्रीमंत राजश्री दादा साहेब फौज सुद्धां स्वार होऊन बऱ्हाणपुरीं आल्याचीं पत्रें आह्मांस आलीं आहेत. पुढें दरमजल हे प्रांतें येणार. आपणांस कळावें. बहुत काय लिहिणें. कृपा कीजे हे विनंती.

[१०७] ॥ श्री ॥ पै।। छ २४ जिलकाद इसने

सेवेशीं रघुनाथ हरी सां। नमस्कार विनंती येथील कुशळ छ २२ सवाल मु।। मौजे जेरोण पे।। जतारा प्रांत बोडसें स्वामींचे कृपें करून यथास्थित असों विशेष. छ १३ साबानचें पत्र सादर जाहलें तें छ १२ रमजानीं झांशीच्या मुक्कामीं पावोन बहुत संतोष जाहला. पत्रीं आज्ञा कीं, राजे हटेसिंग यांची स्थापना बोडशांत करावी. दतीयेकरांचें संमत नसावें. राणी व कारभारी एक विचारें करून बंदोबस्त करावा. त्यास राणीचें वैमनस्य राजांशीं जाहलें तेव्हां राणीनेंच कुचोद्य[16] करून राजास काढून दिल्हा. त्याचें साहित्य दतीयेकरांनीं केलें. ते एकच आहेत. परंतु येथील प्रसंग पाहून होईल तितका स्वामींच्या आज्ञेनुरूप बंदोबस्त करून सेवेशीं लिहून पाठवितों. सालगुदस्ताची पक्की वहिवाट व सालमजकुरचा आजमास पाठवणें म्हणून आज्ञा. त्यावरून

---

१४. दुडी=धुंदी.
१५. मुजरद=जरूर, मुद्दाम.
१६. कुचोद्य=कुविचार, लुच्चेगिरी.
* मागें पत्र १०१ व पुढें १०७ पहा.

सालमजकूरचा आजमास सेवेशीं पाठविला* आहे. स्वदेशाप्रमाणें येयील प्रकार नाहीं. रयत मवाशी. बैशाख आखेर पावेतों वसूल येईल तितकाच. अम्मल सुरळीत रीतीनें चालावे हा अर्थ रयतीस ठाऊकच नाहीं. अखेर साल पावेतों पक्की वहिवाट होईल ती घेऊन सेवेशीं येतों. गु॥ वहिवाट पाठवावी त्यास माहितगार कारकून आहेत ते प्रस्तुत जमाबंदी वगैरे कामेंकाजें हंगामाचे दिवस आहेत याजकरितां येथें जरूर पाहिजेत. सालासही चार पांच महिने यांची अवध राहिली. सालगु॥ व सालमजकुरची वहिवाट घेऊन आम्हीच स्वामीपाशीं येतों. हिशेब पाठवावयासि विलंब लागला म्हणून रुपें न भरावें. एक दोन कारकून माहितगार आहेत. त्यांस येयील काम मोठें आहे. येथील माहितगीरी त्यांचीच याजमुळें पाठविले नाहींत. त्यांत वोडशामुळें, वोडसेकर बुंधेले यांणीं या प्रांतांत दुंडी केली याजमुळें, स्वारीस निघालों. याजकरितां कारकून समागमें आणिले आहेत. वोडशाच्या बंदोबस्तास आणीक मासपक्ष पाहिजे. राजश्री § विश्वासराव लक्ष्मण यांजकडे सालगु॥ वसूल पडिला. व मशारनिल्हे यांच्या विद्यमानाची शिवंदीची हिसेरसीद बेहड्याच्या आजमासें निवडून पाठविली आहे. एक दोन घेळ स्वामींची आज्ञा आली त्यावरून पाठविली. मर्जी असेल त्याप्रमाणें फडशा करावा. त्यांचा खर्च सरदारीचा आहे. आम्ही नेमणुकेच्या आधारें लिहून पाठविलें आहे. कमजास्त जें करावयाचें असेल तें करावें. सालगुदस्तां मवासापासून गढ्या घेतल्या, त्यांतून पाडून टाकल्या. व ठाणीं ठेविलीं व मवासांच्या दंग्यापासून गांव निर्वेध केले. त्याची तनखा निराळी यादीवर लिहून पाठविली आहे. त्यावरून श्रुत होईल. मवासांपासून मुलुख सोडविला आहे. परंतु जागा उजाड. लावणी केली आहे. चवसालां तनखा भरेल. मवासाचा उपद्रव जाहालियासि किल्ले करेरा व झांशीं येथें जंकीरा पाहिजे सबब आजमाशीं रुपये खर्ची लिहिले आहेत. मर्जी असल्यास जकीरा घेऊं. पागेस खर्च लागतो. पागेवांचून जुंजाचें काम जमत नाहीं. पागेमुळें सामान चांगलें रहातें. परंतु खर्च भारी. याची विनंती पूर्वी सेवेशीं लि॥ च आहे. आज्ञा कर्तव्य ते करावी. येथें घोडीं ठेवण्याचीं असिल्यास खर्च दहा हजार रुपये नेमणुकेहून जाजती लागतील. श्रुत असावें. जाटांच्या दंग्यामुळें सुलाकरी [सुकलारी ?] येथील ठाण्याचा बंदोबस्त करावा लागला. याजमुळें जाजती खर्च रुपये सुलाकरीस जहाले आहेत. खर्च न करावे तर मुलकास

---

* यावरून हल्लींप्रमाणें जमेचा व खर्चाचा अजमास (बजेट) पूर्वीही दरसाल करीत असत असें स्पष्ट होते.

§ मागें पत्र १०१ व १०६ पहा.

१७. मवास=लुटारू लोक.

१८. जकीरा=सामान समान.

उपद्रव लागतो. काय करावें ? खर्च थोडका करून जमा जास्ती साधावी यांत धन्याची मर्जी प्रसन्न राहते. परंतु येथील प्रकार सारा शिवंदीचाच आहे. यास काय करावें ? श्रम सायास करून फळ नाहीं. न करितां अम्मल राहत नाहीं. या रीतीचें वर्तमान आहे. निर्वाह करणार स्वामी समर्थ आहेतं. घोडसेकर बुंधेले यांणीं दुंडी केली हें वर्तमान दिल्लीस राजश्री विसाजीपंतांस लिहून पाठविलें. त्यावरून राजश्री आनंदराव गणेश दिपे, राजश्री नारो शंकर राजेबहादर यांस पथक सुद्धां पाठविले आहेत. येथें येऊन पंधरा दिवस जाहले... सेवेशीं श्रुत व्हावें म्हणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजें हे विनंती.

[१०८] ॥ श्री ॥

तीर्थरूप राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेशीं–अपत्यें माधवराव साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ ता॥ छ २७ सावान मुक्काम कुरुमखेड पर्यंत वडिलांचे आशिर्वादें करून यथास्थित असे विशेष–करांडे यास सोडावयाचा करार राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांजकडून जाला असतां अद्याप त्याची सुटका जाली नाहीं. तरि वडिलीं मा॥रानिल्हेचे कारभारी यांस आज्ञा करून करांडियाची सुटका होय तें केलें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१०९] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री तात्या* स्वामींचे सेवेशीं–पोष्य भवानी शिवराम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. तागाईत चैत्र वद्य ११ पर्यंत मुक्काम शहर स्वामींचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष–राजश्री सेना-खासखेल यांजकडील उपसर्ग सरकार अमलांत होऊं नये या अर्थीं सरकारांतून पूर्वी त्यांस पत्रें आलीं होतीं. तीं त्यांनकडे प्रविष्ट करून त्यांचीं उत्तरें आलीं तीं सेवेशीं पाठविलीं आहेत. अवलोकनें भावार्थ ध्यानास येईल. यजमान स्वामींची मला आज्ञा आली त्याप्रमाणें मींही सरदारांस पत्र लिहिलें होतें. त्यास तो मजकूर गाळून उत्तर आलें. बजिन्नस कारकुनाची चिठ्ठी आली त्याची प्रती पाठविली आहे. सारांश कोणी [कोणती?] गोष्ट शाश्वत नाहीं. काठेवाडांत सरकार महालीं फौजेचा उपद्रव लागतोच आहे. सरदारांनीं फौजेंत वरचेवर पत्रें दिल्हीं, परंतु प्रमाण राहिलें नाहीं. विस्तारें कोठवर लिहूं ? स्वामींचीं खासदस्तुर पत्रें बोधपर येत गेलीं त्यांचा स्मर रहावा, पोटीं विवेक करावा, तें कांहीं मनांत न आणितां दिवसा दिवसाचें करणें नवीन पडतें. असो. साल-

---

* हरिपंत तात्या फडके ?

मजकुरीं कांठेवाड झालेवाडचा पैसा ठराऊन आले प्रमाणें साहुकाराकडे भरणा पावेल ऐसें दिसत नाहीं. करारांत गायकवाडाकडील उपसर्ग न लागावा ऐसें आलें आहे. कौलपत्र मवासांस§ या अन्यायें आहेत. इच्छा सर्वोत्तमाची. स्वामींची कृपा तारक आहे. विस्तारें विनंती वारंवार कोठवर लिहावी? स्वामींचे ध्यानांत आहे. तेथें रा॥ गमाजी [गयाजी?] पाटील यासि निक्षून तार्कीद होत नाही. वरकड मजकूर सर्व ती॥ राजश्री खंडोपंत दादा व राघोपंत विनंती कर्‍तां अवगत होईल. हे विज्ञापना.

[११०] ॥ श्री ॥

॰ सेवेशीं विज्ञापना. हिंदुपत बुंधेले याणीं अमानसिंगास मारिलें. ढिर्कां जाहाला नाहीं. त्यांणीं महदन्याय केला आहे त्याचें पारपत्य करणें जरूर आहे. तुम्हीं त्याचे जाग्याचे सन्निध असोन कांहींच वर्तमान लिहिलें नाहीं. तरि तुम्हांकडे राजकारण आलें असेल त्यास सविस्तर वर्तमान लिहून पाठवणें म्हणोन आज्ञा. त्यास येविशींचें एक वेळ विनंतीपत्र लिहिलें होतें. परंतु जोडी[२०] मारिली गेली. दुसरें तो जिम्मा राजश्री गोविंद बल्लाळ यांचा. सेवकास स्वामींची आज्ञा नाहीं व त्यांचे पुत्रास लिहून पाठविलें त्याणीं पत्रांतील मजकूरच समजला नाहीं म्हणोन दस्तऐवज न गोवितां उत्तर लिहिलें. दुसरें गैरहंगाम दिवस आणि सेवकाजवळ फौज थोडी. हिंदुपत माजोरा आहे. त्याचा लहान भाऊ खेदसिंग त्यास काढून दिल्हें. त्याचे वकील आले. बोली चालीही लागली आहे. त्याजकडील सूत्र ठीक करून ठेविलें आहे. त्याचा हिस्सा निमेचा देविल्यानें कांहीं नामजादा* चार, पाच लक्ष रूपये मिळतील ऐसें आहे. परंतु फौज पाहिजे. याजकरितां आलाहिदा पत्रीं सविस्तर विनंती लिहिली आहे. त्याप्रमाणें दोन हजार फौज आल्यानें चार महिने पोट बाहेर भरून सरकार किफायत होईल. इतके दिवस इकडे जाहले या उपरि कालपीस जाऊं. दसरा जाहला म्हणजे इकडे येतों. स्वामींनीं कृपा करून दोन हजार फौज दसरा आलीकडे येऊन पोंहचे तें करणार स्वामी समर्थ आहेत. स्वामीचे प्रतापें करून पारपत्य उत्तम प्रकारें करून होईल. हल्लीं एक पत्र हिंदुपतीस जे तुम्ही नाहाक अमानसिंगास मारून सरकारचा टिका न होतां राजे जाहलां, व खेदसिंगास काढून दिल्हा हे गोष्ट कार्याची नाहीं. हल्लीं गोपाळराव बापूजी यांस आज्ञा केली तरि

---

§ मवास=कोळी भिल्ल वगैरे लुटारू.

१९. टिका=टिळा—गादीवर बसण्याचे वेळीं वडील नातलगानें टिळा लावला म्हणजे सर्व विधी पूर्ण झाला असा रजपुतांचा समज आहे. येथें पेशव्यांच्या मार्फत व्हावयास पाहिजे होता.

२०. जोडी=जासुदाची.

* नामजादा चालून जाण्याबद्दल दिलेला ऐवज या अर्थी.

मशारनिले सांगतील त्याप्रमाणें खेदसिंगास हिस्सा देणें व यांचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक करणें, म्हणोन उत्तम प्रकारें लिहून ताकीद व एक पत्र राजे जगतरान यांस जे गोपाळराव यांस आज्ञा केली आहे तरि व हे एक होऊन पारपत्य करणें [व] सवाई दिवाण गुमानसिंगास याचे समागमें देणें याप्रमाणें, व एक पत्र राजश्री गोविंदपंत यांस जे फितुर करून पा व ते स दिलयानें उत्तम प्रकारें पारपत्य स्वामींचे प्रतापें होऊन येईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१११] ॥ श्री ॥

विनंती उपरि-पुरतेस वकील गेला त्याजकडील बोलीचालीचा काय मजकूर तो ल्याहावा म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास नारो तुकदेहु तेथें पावलियाचीं पत्रें आलीं परंतु यांची त्यांची बोली चाली जाहालियाचा मजकूर कांहीं लिहिला आला नाहीं. त्याही मध्यें राजश्री स्वामींच्या दुखणियाचीं वर्तमानें तेथें हजर जाले असतील. याजमुळें मोंगल ही बोली सुधा बोलणार नाहीं. तालामाला पहातील. ऐसें आहे. त्यास आलीकडे वर्तमान आलें नाहीं. काय वर्तमान लिहिलें येईल तें सेवेशीं लिहून पाठऊं. व्यंकटराव मोरेश्वर याचीं पत्रें आलीं तीं सेवेशीं पाठविलीं असत. त्याजवरून वर्तमान कळेल. त्याकडील जाजती जासूद मागे पाठविलेच आहेत. वरकड रघोजी भोसले यास व सैद शरीफखान यास पत्र पाठवल्याचें लिहिलें आहे तीं द्या व या स[?] नाहींत. गुप्तरूपें बातमी घेणें तेव्हां पत्रें नेलियास ठीक पडणार नाहीं व राहूं ही देणार नाहीं. स्वामींचे विचारें पत्रें द्यावींशीं जालियास लेहून पाठवावीं. दारको रंगनाथ याजपासून तिजाई ग्वालेरची रसद घेऊन हुजूर मामला ठेऊन सनद द्यावी असें लिहिलें होतें, परंतु तूर्त रसद न घेणें, पुढें लेहून त्या प्रकारें करणें, म्हणून लिहिलें. ऐशियास स्वामींस सनद कशी द्यावी हें लेहून पाठविलें त्याचे आधींच पैका रसदेचा घेतला होता. स्वामींनीं सनद द्यावयाचें लिहिलें त्यावरोन देणार होतों. परंतु घालमेलीचें वर्तमानामुळें दिल्ही नाहीं. हल्लीं आज्ञेप्रमाणें सनद देत नाहीं. रसद तो घेतलीच आहे. पुढें आज्ञा होईल त्याप्रमाणें रसदेचें विल्हे होईल. रा॥ छ १५ जिल्हेज बहुत काय लिहिणें हे विनंती.

[११२] ॥ श्री ॥

पौ॥ छ २४ मोहरम सनखंमस

श्रीमंत गुणसागर लोकपालक विश्वभूषण औदार्यवंत श्रीक्षीराब्धिशायीवरप्रताप रमासानकुल गौब्राह्मणप्रतिपालक महा [?] राजेश्री दादा साहेबांचे सेवेशीं-आज्ञाधारक देवजी बयाजी किले सेंधवे दिम्मत मल्हारजी होळकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञाप्ति येथील क्षेम ता॥ छ १५ मोहरम पर्यंत महाराजांचे कृपेदृष्टी क-

रून आनंदरूप जाणोन विशेष साहेबीं आज्ञापत्र पाठविलें तें छ ९ रोजीं प्राविष्ट नाहेलें. _ शिरीं वंदून परम संतोषावाप्ति जाली. पत्रीं आज्ञा सादर केली कीं, रा॥ महादजी शिंदे यांची सरदारी दूर करून राजश्री मानाजी शिंदे यांस सांगितली याजकरितां महादजी शिंदे आज्ञेशिवाय उठोन ते प्रांतें गेले असत. सेंधवे प्रांतांत आले म्हणजे आटकाव करून पुढें जाऊं न देणें. त्यास साहेबांचें पत्र प्रविष्ट जालें ते दिवशीं घाटाखालीं मौजे सांगवी प्रे॥ आंबे येथें मशारनिल्हेचा मुक्काम होता. आज्ञाप्रमाणें किले मजकूरचा घाट पांच सातशें भिल्ल वगैरे जमा करून बंद केला. त्यास मशारनिलेस वातमी जाली. तदनंतर किल्ले मजकूरचा घाट सोडून चांचरे पटी धा मार्गें घाट चढून पंचविसा कोसांची मजल करून निघोन गेले. साहेबांचे सेवेशीं हे विज्ञापना.

[११३] ॥ श्री ॥

पौ॥ छ २४ जिल्हेज चैत्र सु॥ तिसा

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत स्वामीचे सेवेशीं—

पो॥ बाळाजी* गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल ता॥ छ २७ जिलकाद मु॥ सागर जाणून स्वकीय कुशळ लिहीत असलें पाहिजे. विशेष आपण पत्र पाठविलें तें पावलें. संक्रमणाची तिलशर्करा पाठविली ती पावली कितेक श्रीमंतांचे व भोंसल्यांचें बिघाडाचें वर्तमान लिहिलें तें सविस्तर कळलें या प्रांतीचें वर्तमानाविशीं लिहिलें त्यास दोन तीन पत्रीं पेशजी आपणास लिहिलें आहे त्यावरून कळलेंच असेल सांप्रत वर्तमान तरि अबदाली लाहुरा पलीकडे दोन मजलीवर आला आहे. त्याची इतराजी नजीबखान रोहिल्यावर आहे. त्याजमुळें नजीबखानानीं आपले जाग्याचा बंदोबस्त करून रतनसिंग जाटाशीं सूत्र करून आणशफत होऊन करार मदार जाला आहे. पुढें उभयतांनीं फौज सुद्धां जाऊन शाहास मैदानांत गाठोन जुंज द्यावें याप्रमाणें मनसबा करीत आहेत. मग पहावें. सुजादौला आपले जाग्यांत आहेत. अल्ली गौर बादशा व फिरंगी[22] प्रयागास आहेत. पुढें काय मनसबा करतील पहावें. वरकड प्रांताचें वर्तमान तरि चिरंजीव राजश्री गंगाधरपंत बाबा कोचकनार प्रांतीं आहेत तिकडे गंडीबंद[23] जमीदार यांणीं सरकारी जागा दाबिली आहे. त्यांचें पारपत्य करीत आहेत. फौजा हा कालवर न आल्या

---

२१. मानाजी फांकडे याजवर दादांचें फार प्रेम असे म्हणून महादजी राखपुत्र जाणून शिंद्यांची सरदारी मानाजीकडे त्यांणीं दिली. परंतु महादाजीनें आपले आंगीं पाणी आहे असें दाखविल्यावरून माधवराव बल्लाळ यांणीं त्याजकडेसच सरदारी कायम केली.

* बाळाजी गोविंद हे गोविंदराव बुंदेले यांचे चिरंजीव असावे.

२२. फिरंगी=इंग्रज-कलकत्तेकर.

२३. गडीबंद=गढी, किल्ला यांचा आश्रय आहे ज्यांस.

याजमुळें राजे रजवाडे वगैरे * * * याची नजर ठिकाणीं राहिली नाहीं. विना मातबर फौज आल्या खेरीज बंदोबस्त यथास्थित होत नाहीं. इकडे धामोणी प्रांतें तेजगडवाले लोधी [?] वगैरे यांणीं सरकारी नागा दाबिलीं त्याचेही पारपत्य फौजा आल्या शिवाय होत नाहीं असें आहे. जर आपलें येणें लौकर होईल तरि सहजाखालीं बंदोबस्त होऊन येतो. सविस्तर आपणास कळावें. तिकडील वर्तमान सर्वदां पत्रीं लिहीत असलें पाहिजे. राजश्री जानोजी बावा भोंसले यांनकडून आनंदरूप वकील बादशाकडे प्रयागीं आला आहे. त्याचीं उत्तरें गेलीं. भग काय मजकुरावर आला आहे हें कळत नाहीं. आपणास कळावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती.

[११४] ॥ श्री ॥

राजश्री माधवराव रामचंद्र गोसावी—

सु॥ सीत सीतेन मया [व] अलफ तुम्हीं विनंती पत्र छ २७ रमजानचें पाठविलें छ मा॥रीं अस्तमानीं पावलें. रा॥ बाबूराव[२३] सदाशिव न पुसत गेले त्यांचे मागें राजश्री रामचंद्र गणेश फौज घेऊन गेले. धारूरच्या वाटेनें नाईक गेले. त्या मागें रामचंद्रपंत पाठलाग करीत गेले. नाइकाचे पागेचीं घोडीं व जामदारखाना वगैरेची मोनदाद करून गोठांत आणून ठेविले, म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास बाबूजी नाईक यांचीं घोडीं पागा हत्ती दोन जामदारखाना वगैरे मोजदाद केले ते आणावयास हुजूरून राऊत पाठविले असेत याजबराबर पाठऊन देणें. उदईक कूच करून जावें तर तोफखाना व जामदारखाना व दारकोजी निंबाळकर व सठवोजी गावडे वगैरे लोक अद्यापि आले नाहींत त्यांस ताकीद करून पाठवावे म्हणोन तर तोफखाना, जामदारखाना व दारकोजी निंबाळकर व सठवोजी गावडे वगैरेस ताकीद केली असे. येऊन पावतील. तुम्हीं उद्याचा दिवस मुक्काम करणें. तुम्हांजवळ पथकें कोण कोण आलीं व कोण न आलीं तें सविस्तर लेहून पाठविणे. जे राहिले असतील ते ताकीद करून पाठविले जातील.

नाइकाकडील सिलेदाराची सोय काय करावी तें ल्याहावें म्हणोन तर मा॥रनिलेकडील शिलेदार हुजूर पाठऊन देणें.

सांढणीस्वार २ दोन येथें नेहमी पाठवावे म्हणून तर दोन सांडणी स्वार पाठविले असत.

नाना जोशी यांचे घरीं बाबूरायांची वस्तभाव आली आहे. त्यावरून त्यांचे घरीं गाडदी यांची चौकी बसविली असे. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक क-

---

२३. हे बारामतीकर नाईक—यांचें व | पेशव्यांचें नातें असून वांकडें होतें.

रूब कारकून हुजुरून पाठविला असे. तहकीक करतील. जे त्याजकडे वस्त भाव असेल ते हुजूर घेऊन येतील.

रामचंद्र गणेश यांजबराबर लोक गेले ते सडे गेले. यास्तव त्यांचे मागें जावयाची आज्ञा जालियास जाऊं, म्हणोन तर त्याजबराबर कांहीं गेले नाहीं. याजकरितां तुम्हीं हळु हळु जाणें. जाणिजे छ २७ रमजान लेखनसीमा.

[११५] ॥ श्री ॥

राजश्री बाजीराव यादव दिम्मत पंत सचीव स्वामींचे सेवेशीं—

पो। गंगाधरराव यादव दिम्मत बजाजीराव घाटगे नमस्कार विनंती विशेष—राजश्री मांधवराव बल्लाळ फडणीस यांचे चिरंजीव बळवंतराव यानकडे मजमेदारीचें काम देविलें आहे. त्यास यांचे हातून काम ध्यावें व दुसरे राजश्री तुकोजीराव आटोळे सफेजंग बहादूर व यशोदाबाई जाधव व गंगाधरराव गोविंद व बाजीराव रघुनाथ व परशराम पंडित व जयवंत बावा मंत्री व अहिल्याबाई न रघोजी आंगरे व रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा व लक्ष्मणराव वगैरे राजमंडळ यांची स्वारी यावयाची त्यास त्याची बरदास्त ठेविणें रा।। छ सावान बहुत काय लिहिणें हे विनंती.

[११६] ॥ श्री ॥ पो। छ ४ रजब.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक महादजी शिंदे साष्टांग दंडवत विज्ञापना ता।। छ २९ सावान पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. आम्हांबराबर पांच तोफां पाहिजेत. स्वारींत कोठें गांवगढी लागते. त्यास तोफा विना जेर होत नाहीं. यास्तव स्वामी कृपाळू होऊन नगरास तोफखाना आला आहे यापैकीं स्वारीच्या तोफा पांच द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[११७] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसि—पो। माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें विशेष—बदलेदेणें तसलमात दादो उध्धव वर घाटचे किल्याचे बेगमीस ऐवज मालमजकुरीं द्यावयाचा त्यापैकीं तूर्त—

३५००० माघ शुद्ध पौर्णिमा रूपये.
३५००० फाल्गुन शुद्ध पौर्णिमा रूपये.
३०००० चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १६८९ चित्रभानु संवत्सर.

१००००

एकूण एक लक्ष रुपये सदर्हू मुदतीप्रमाणें देविले असत. मारनिलेकडील कारकून पुण्यास येईल त्यास ऐवज पावता करणें. पुण्याचे एकंदर ऐवजांत लाख रुपयांचा नेमणूक करून दिल्ही आहे. त्यास तुम्हीं ऐवजाचा नेमणुक करते समयीं येथून मुदती लिहिल्या आहेत याप्रमाणें ऐवज नेमिला असला तर उत्तमच जाहालें. या मुदतीहून जाजती मुदत असली तर त्या ऐवजीं सावकारापासून कर्ज घेऊन यास मुदतीचा मुदतीस पावतां करणें. मुबदला ऐवज राहील तो सावकारास रदकर्जास[२४] देणें. सारांश गोष्ट, याचें देणें फार निघालें पैकीं तूर्त सदर्हू लाख रुपये देविले यास हिसका पडल्यानें मग याची स्थित रहाणार नाहीं याजकरितां तुम्हास लि॥ असे. तरि मुदती प्रमाणें ऐवज क्षेपनिक्षेपें[२५] पावता करणें र॥ छ २१ साबान सु॥ सबासितैन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती. पौ॥ छ ६ सव्वाल.

[११८] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक सदाशिव मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत छ १२ जिलकाद मु॥ अनेकल नजीक होसूर येथें यथास्थित असे विशेष. स्वामींनीं कृपा करून सेवकास पत्र पाठविलें तें पावोन परम हर्ष जाला. तो पत्रीं लेखन करावयास सेवक समर्थ नाहीं. इकडील वर्तमान तरि सविस्तर राजश्री मामांनीं[२६] सेवेशीं विनंती पत्रें लिहिलीं आहेत त्यावरून सर्व विदीत जालेंच असेल. महमद अल्लीखान याजकडील दिवाण व राजश्री माधवराव सदाशिव इंग्रजांचे मजकुराविशीं आलें. कुमकेस न जावें इतर नाइकाकडे व आपल्याकडे ही न यावें हा तह जाला. इंग्रजांनीं विलायतेस लिहून पाठविलें आहे. स्वामींचे फौजेसि कुमक करावी म्हणून तेथून आज्ञा आल्यानंतर यावें हाही अर्थ आहे. सेवेशीं सर्व विदित जालेंच आहेत. परंतु सेवकानें ऐकिलें वर्तमान सेवेशीं ल्याहावें. या उपरि मसलतीचा डौल बिदनूर प्रांतीं जावें हा आहे. दिवस तो गेले. परंतु तिकडे गेल्यास हैदर नाईक सल्याची पैरवी[२७] करील. आग्रहच नंदीगड बालापूरचा आहे त्यांत कदाचित् हे नेट जाल्यास सल्ला केला तर न कळे. असे मजकुराचें वर्तमान ऐकिलें त्यावरून सेवेशीं विनंती लिहिली आहे. हे विज्ञाप्ति.

---

२४. "रदकर्ज नाम बुधा ऋणनिर्यातनं विदुः" रा० व्य० को०.

२५. क्षेपनिक्षेप=तावडतोब, ठाकोठाक.

२६. मामा=त्र्यंबकराव विश्वनाथ.

२७. पैरवी=वाटाघाट, आव, प्रयत्न या अर्थी.

[११९] ॥ श्री ॥

विज्ञापनें-चिरंजीव राजश्री संभाजी आंगरे कुलाबियाहून विजयदुर्ग प्रांतें जावयास स्वार होते समयीं मजला व चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे यांस जंजीरे कुलाबास ठेऊन कारभार संपूर्ण निरोपिला. त्याप्रमाणें त्यांची आज्ञा वरिष्ट स्थानीं मानोन एकनिष्ठपणें वर्तणूक करून यथाज्ञानें देशदुर्गांचा परामर्श रक्षणयुक्त करावयाचें तें केलें. शिपाई लोक आदिकरून मातबर सरदार नामांकितांस खावया खर्चावयाची अनुपत्य जाली त्यांची समाधानें शब्द गौरवानें व किंचित् देऊन घेऊन रक्षिलीं. चिरंजीव संभाजी आंगरे इकडे आले म्हणजे तुमची उर्जितें करून म्हणोन कित्येक शफतपूर्वक लोकांशीं भाषण करून राजांचे जागे जुने व नवे शामला पासून घेतले ते हा कालपर्यंत जतन केले. कारभार प्रसंग काही पावेतों केले ते चिरंजिवाचे आज्ञे खेरीज केला नाहीं. तदनंतर चिरंजीव विजयदुर्गाहून कुलाबां आले. आह्मांस व सर्व लोकांस आल्हाद जाला कीं, अतःपर आपले उर्जित होईल व आम्ही कामकाज केलें हें धनी दृष्टीनें पाहून [२९]गौरशीं करील म्हणोन आस्था होती. ते गोष्टी त्यांहीं एकीकडे ठेवून आह्मांशीं व चिरंजीव मानाजी आंगरे यांजशीं दुरोक्तीचें भाषण करूं लागले. नित्य नवेच कारभारसंबंधें आरोप ठेऊन प्रथमता मजला बाहेर घातलें. तदोत्तरीं मानाजीस जीवनमुक्त करावयाचें आरंभिलें. हें त्यास कळतांच हिम्मत धरून प्रातःकाळीं तो निघोन रेवदंडियास गेला. संभाजी आंगरे यांनीं देशदुर्गाचा परामर्श बंदोबस्त करावा, लोकांचीं समाधानें करावीं, ते किमपि न केली. जे दिवशीं चिरंजीव मानाजी आंगरे निघोन आले त्याचे दुसरे दिवशीं उंदेरकर शामलांनीं थळच्या चौबुर्जीं संनिध मोर्चा होता त्यानवरि घातले. जुंझ बरें दाट जाहालें. मुर्चीयांतील तोफ शामलांनीं नेली. तथापि तेथील लोकांचें समाधान व मोर्चाची बंदोबस्ती न करितां दुसरे दिवशीं चिरंजीव संभाजी आंगरे निघोन सुवर्णदुर्गास गेले. आणि तमाम लोकांनीं अवसानें तोडलीं. महाराजांचे जंजिरे व कोट, ठाणीं नाजुक वरघाटे ताम्राने उदंड उत्पात केले. राने स्वारीस आले होते. परंतु महाराजांचे एक निष्ट सेवक होते त्यांणीं देशदुर्ग जतन करून फिरंगी, इंग्रज, शामल, वगैरे शत्रुवरि स्वामींचा प्रताप कोदंड फिरवून शत्रु पादाक्रांत केले. हल्लीं तरि सुगम प्रसंग महाराजासारखा धनी सर्व प्रकारें अभिमानी चित्तावरि धरितील तरी हुमशाम शासनाक्रांत करितील. या समयीं फिरंगी, इंग्रेज, हबशी यांणीं महाराजाच्या स्थळाची चालना करावी ऐसें नव्हतें.

---

२८. शामल=हबशी.
२९. गौरशीं=नांवाजणें, वाहवा करणें आ | अर्थी.

परंतु कालवशें करून जालें त्यास उपाय काय? आपण महाराजांचे सेवेशीं यावें याच उद्देशें लवलीया [?] पर्यंत आलों. त्यास राजमाचीकराकडील कांहीं वृत्त आढळलें. यास्तव तिकडे गेलों. राजमाचीचा बंदोबस्त केला. व या उपरि कुलाबां जाऊन बंदोबस्त करितों. लोकांस विना दिल्या घेतल्यां खेरीज समाधान होतें ऐसें नाहीं. तमाम लोक बेदिल, निराश्रित, धनी नाहीं, ऐसें त्यांचे चित्तांत जालें. साहित्य तों जालें पाहिजे. या जिल्ही या मु त शी [10] जिल्हा राजश्री प्रधान पंताचा आहे. सर्व प्रकारें हशमांनीं व फौजनें व क्रियेयुक गोष्टीनें संजुदे आहेत. महाराजांनीं कृपाळु होऊन राजश्री प्रधानपंतांस आमच्या साहित्याविशीं आज्ञा करावी. महाराजांचे आज्ञेप्रमाणें ते साहित्य करतील. व लोकांस समाधान पूर्वक डौळें तीस पसतीस पाठवावीं. तें त्यांस देऊन मनोधारण करून या जिल्हियाचा बंदोबस्त करून महाराजांचे पायांसंनिध येतों. आम्हांस महाराजांचे पायांखेरीज दुसरा भवलंब आश्रा आहे ऐसें नाहीं. जरी डौळें येत नाहीं तरी लोक तजा वजा [32] नाहाले. संभानी आंगरियानीं तो या जिल्हियाची उपेक्षा केली आहे. महाराजांस एक एक स्थळ निर्माण करितां काय श्रम लागले आहेत! ते स्थळें अनियासें शत्रूचे हातांत जाऊं सकते. लोकांचा इतबार पुरत नाहीं. लोक कष्टी आहेत. कोणे समयीं त्यांस काय बुद्ध सुचेल व कोणाकडे डौळें [33] देतील तें नकळे. शत्रु तरी उशापायेतरास [34] सकळ सामुग्रीनें सिद्धच आहेत. तरी महाराजांनीं कृपाळू होऊन डौळें अगत्य पाठवावीं. सारांश महाराजांनीं सध्या दोन गोष्टी कराव्या. एक प्रधान पंतास साहित्याची आज्ञा करावी, दुसरे डौळें पाठवावीं. म्हणजें बंदोबस्त महाराजांचे प्रतापें करून होतो. आम्हांस महाराजांचे पायां खेरीज दुसरा आश्रा आहे ऐसें नाहीं. देवधर्म मायबाप सर्व महाराजांचे पाय आहेत. सदर्हू प्रमाणें साहित्याची आज्ञा करणार महाराज धनी आहेत.

चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे यांणीं राजकोट, चऊल आपले हातीं घेतलें. हजार पांचशें माणूसही जमा केले आहेत व फिरंगी व इंग्रज ही अनुकूळ करून घेतले.

[१२०] ॥ श्री ॥

राजश्री पंतप्रधान साहेबांचे सेवेशीं—

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा गोवि-

---

१०. 'या ज ला ही तु या मु त शी ल' असेंही होईल.

११. संजुदे—संजुदा=पूर्ण, तयार. "परिपूर्णस्तु संजुदा" राजन्यव्यवहारकोश.

१२. तजावजा=पांगलेले.

१३. डौळ=नमुना, सही किंवा शिक्का केलेला कोरा कागद.

१४. उशापायेतरास=उशागतीं पायगतीं.

दराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर दंडवत विनंती ऐशीजे. येथील कुशळ जाणून स्वकुशलेखनाज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष साहेबांची आज्ञा घेंऊन निघालों. तुळजापुरच्या मुक्कामास पोंहोचलों. तेथून फौज नगरच्या मार्गानें रवाना करून आम्ही श्री जेजोरीनाथाचें दर्शन घेऊन दावर्डास* एक दिवस राहून दुसरे दिवशीं कूच करून दरमजल गंगातीरास पोंचलों. मार्गीं शिवराम अनंत व हैबतराव वाणराव व कृष्णाजी चव्हाण पांगादार पागांसुद्धां गुजराथेहून आले ते भेटले. बरोबर आहेत. फौज गंगेच्या मुक्कामीं येऊन मिळाली. नंतर दरकूच चांदवडच्या मार्गें जात असतां दंताजी नागेश कुटुंब सुद्धां पळत फिरत होते. त्यांस भेटीस बोलाविलें होतें. ते येईनात, धटाई करूं लागले. नंतर दहा वीस स्वार पाठवून आणून ठेविले. तेथून पुढें § साल्हेरच्या नजीक आलों. किल्लेयाचा बंदोबस्त करून दोन मुक्काम राजश्री दौलतराव यांजकरितां करून त्यास मिळवून घेतलें. नंतर कूच करून सोनगडच्या मुक्कामास आलों. किल्ले मजकूरची बंदोबस्ती होतीच. परंतु साहेबाचे पुण्यप्रतापें करून किल्ला खालीं जाला. निशाण चढऊन आपले लोक ठेऊन बंदोबस्त करून व्यारच्या [?] मुक्कामास आलों. व्यारवर त्यांजकडील पागेदार अण्णाजी अनंत वगैरे पांचशें होते त्यास आमचे पांच सातशें पुढें आगाऊ गेले होते त्यांनीं चार घोडी पाडून व चार भले माणूस पाडून घेतलीं. व्यारांत ठाणें घालून पुढें दरमजल सुरत अठ्ठाविशींत आलों. मांडवीकर दोनशें स्वार व चारशें माणूस सुद्धां भेटीस आले तिकडून राजश्री त्रिंबकराव गायकवाड आणखी एक दोघे येऊन भेटले. साहेबांचे पुण्यप्रतापेंकरून दरमजल जात आहों. राजश्री फत्तेसिंग गायकवाड याचा रेवा तीरीं मुक्काम आहे. तीन हजार स्वार पायदळ मिळोन आहे. अशी बातमी वरचेवर येती. साहेब कृपें सर्व यथास्थित होईल. साहेबीं कृपाळू होऊन राजश्री दौलतराव यांसमवेत फौज घोडीं माणूस सामान यथास्थित पाठविलें. परम समाधान जालें. आम्हांजवळही फौज पेशजी व हल्लीं देशीं आणखी जमा जाली आहे. माणूस उत्तम आहे. काम काज पडल्यास

---

* दावडी ता० खेड हा गांव गायकवाडांस इनाम होता तो आलीकडे त्यांणीं आपले पदरचे 'हवळे' नांवाच्या सरदारास देऊन टाकिला. येथें खंदक, गांवकूस, गढी व वाडा आहे. सदरेच्या पुढें कारजें आहे. जवळच एका डोंगरीवर खंडोबाचें स्थान आहे तें प्रसिद्ध आहे. गोविंदराव गायकवाड येथे देवाचे सेवे करितां बरेच दिवस राहिले होते. देवाकडे गायकवाडाकडून चौघडा, पोषाख व खेरीज सुमारें ३०० दरमहा नेमणूक चालू आहे. येथें टांकी नेहमी सुरू असते.

§ साल्हेर व मुल्हेर हे दोन किल्ले बागलाण जिल्हा नासिक येथें आहेत.

उपयोगी पडतील. दिनचर्या बातमी येत असते त्यांत अंतर नाहीं. एका दों दिवसां त्यांची आमची गांठ पडेल. त्यांच्या मनांत मेटावें असें आल्यास आम्हांकडून अंतर होणार नाहीं. विरुद्धास प्रवर्तल्यास तसेंच प्राप्त. कोण-ताही प्रकार मांडल्यास साहेबांचे कृपें यथास्थित होईल. कोणत्याही गोष्टीस प्रारंभ करते समयीं साहेबांचे चरणाचें चिंतन अंतःकरणीं करून पुढें उद्योग करितों. तेव्हां त्या चरणास आमच्या करण्याचा साभिमान आहे. आमची निष्ठा चरणापाशीं. ते सर्व पार पाडून यथास्थित होऊं. ऐवन माल व ज्युचा [?] मा॥ व अवांतर नित्येक अर्थ राजश्री सखाराम *हरि व रावजी अप्पाजी यांसि लिहिलें आहेत. ते विनंती करितां ध्यानांस येईल. सर्व प्रकारें आधार आश्रय एक साहेबांचे चरणाचा. साहेबीं साभिमानें कृपा केली त्या मार्गें येथपर्यंत निभावीत आलों. एक दोन स्थळें मजबुदीचीं होतीं. तीं हस्तगत जालीं. पुढें त्यांची भेट होऊन त्यांचा बंदोबस्त करणें तोही अर्थ साहेबांचे कृपें घडेल त्यांची आमची गांठ लौकर पडेल. होईल मजकूर तो वरचेवर सवेशीं लिहून पाठऊं. परंतु साहेबांचे पुण्यें करून सर्वही उलगडा पडेल. साहेबीं चिंता सेवकाची न करावी. आणि माझा अभिमान साहेबांच्या चरणीं आहे तर साहेब माझे मायबाप आहे, तर हे ब्रीदाची लज्जा मातापित्यास आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. रा॥ छ २४ माहे जिलकाद कृपा कीजे हे विज्ञापना.

[१२१] ॥ श्री ॥

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसि

छ सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहा॥ आनंद राव गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर दंडवत विनंती येथील कुशळ जाणून स्वकीये कुशळ लिहीत असलें पाहिजे. विशेष—कानोजीराव गायकवाड यांणीं बदमामली करून बखेडा बहुत केला. यास्तव समस्त सरदार यांचा एकदील करून कानोजीराव यांस कैदेंत ठेऊन दौलतीचा बंदोबस्त यथास्थित केला. हें वर्तमान आपणांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. स्वामींचे प्रतापें बखेडखोरांचे पारपत्य करून बंदोबस्त केला. आज छ मा।रींच बंदोबस्त झाला. मागाहून सविस्तर विनंती लिहितों. रा॥ छ १९ रमजान यौंजे उपरि मी चाकरानें व्हावें आ. [?] इष्ट नाहीं. वडिलानीं चाकरी करितां हा काल काढिलें याच अन्वयें माझी हीच न वे रा आहे.

---

* हे दोन परभु गृहस्थ होत. सखाराम हरी हे रघुनाथराव दादा यांचे परम स्नेही होते. रावजी आपाजी हे पुढें गायकवाडीन दिवाण झाले.

३५ येथपासून पुढें खुदखाशांचें अक्षर आहे तें दुर्बोध आहे.

एकदां खावंदाचे पाये व रि न पाहावे तो सुदीन वरकड आणिक नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती

शिक्का.

[१२२] ॥ श्री ॥

पो। छ १ जमादिलोवल सन इहिदे समानीन वैशाख शुद्ध ३ गुरुवासर

श्रीमंत महाराज राजश्री रावसाहेब स्वामींचे सेवेशीं--विनंती सेवक हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान--ता। छ २९ रविलावर पावेतों स्वामींचे कृपावलोकनें यथास्थित असे विशेष--स्वामींनी छ २५ रा।लावरचे आज्ञापत्र स्वहस्ताक्षरें कृपा करून सादर केलें तें छ २७ मिनहूस पावोन परम संतोष जाला. इंग्रज घाट उतरोन गेला. तुम्हीही त्यांचे पिछावर गेलां. उभयतां सरदार आहेत. चहूंकडून येकदांच एलगार करून इंग्रज बुडवून टाकणें म्हणून आज्ञा. ऐशास इंग्रज घाटमाथा खंडाळ्यावर होता. त्यास राजश्री परशरामपंत व तुकोजी होळकर यांस फौज सुद्धां घाटाखालीं अगोदर रवाना केलें होतें. यांणीं त्याची रस्त मना केली होती. यामुळें त्याचे लष्करांत महागाई जाली. व आम्ही खडकाळ्याचे मुक्कामींहून एका दो रोजांत ला [क?] व पास येऊन तोफा सुरू करून मारगिरी करीत होतों. महागाईमुळें त्यानीं घाटमायाहून कूच करून खालीं उतरून खालापुरास इंग्रज आला. आम्ही छ २५ रा।लावरीं घाटाखालीं उतरून रात्रीचे त्याचे लष्कराचे पाऊण कोसाचे तफावतीनें उभे होतों. त्यास त्यांणीं ते दिवशीं प्रहररात्र रहातां कूच करून चालिला. तेव्हां आम्हीं फौज सुद्धां निकड करून झुंजाचें तोंड लाविलें. सरकारचे सरदार व लोक व गाडदी व हशमी लोकांनीं स्वामिसेवा एक निष्ठता महाराजांचे चरणाचें चिंतन करून इंग्रेजांचा जंगी मार होत असतां खातरेस न आणितां लढाई सुरू करून मोठ्या तारफेनें बेन्याहत [बेनियाँहत !] मर्दुमी करून युद्ध देलें. इंग्रेजास नरब चांगली दिल्ही. त्याजवर छ २८ रा।लावरी खालापुरापुढें चौक आहे त्या मुक्कामींहून त्यांणीं कूच केलें. त्यास आम्ही प्रहर रात्रीस पहाटेचे तयार होऊन त्यांचे पिछावर आलों. व उभयतां सैरदारही आले. तोफांची मारगिरी त्याजवर केली. व लोकांनीं व सरदारांनीं काल निकड करून जुंझाचें तोंड लाविलें. सर्वांनीं स्वामिसेवा नीवाम्य श्रमें करितात. इंग्रजांचें माणूस फार नायां जाहलें. गाडर इंग्रेज यांणीं हिंदु

---

१६. हरिपंत फडके पेशव्यांचे बक्षी.
१७. जीवापलीकडे !
१८. होळकर व पटवर्धन.

स्थानांत जागां जागां लढाया केल्या त्याच [३१]तौरानें इकडे मर्दुमी दाखवावयास आला. त्यास स्वामी प्रतापवान्, सरकारांत सरदार व लोक वीर भारथी आहेत, यांणीं मोठे मोठे मनसुबे करून शत्रु पादाक्रांत केले असतां या [३०]टोपकराचा मजकुर काय? स्वामींच्या तेजप्रतापें याचा गर्व परिहार जाहला. यांचे पुरतें पारपत्य स्वामींच्या आज्ञेप्रमाणें करावें हाच आमचा सर्वांचा सेवाधर्म, तदनुरूपच [३१]घावदाव पाहून लगट करीतच आहों. दारूचें बळ फार, लढवई चांगला, म्हणूनच मर्दुमी करून मुक्कामास जातो. इंग्रज पनवेलास नाकून पोहोंचला. आम्ही दो तिही कोसांचे अंतऱ्यानें आहों. कालचे लढाईंत एक तोफ इंग्रेजांची पाडाव जाली व बंदुका आल्या. दारू मार्गानें लोकांस फार सांपडली. पेंढाऱ्यांनीं बैल आणिले. त्यांचें माणूस फार जायां नालें. सर्व गोष्टी स्वामींचे पुण्यप्रतापाच्या आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१२३] ॥ श्री ॥

राजाश्रियाविराजित राजमान्य राजश्री रामचंद्रपंत तात्या स्वामींचे सेवेशीं—

पोष्य बाळानी कृष्ण व हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उप. री येथील कुशळ ता॥ छ १४ जिलकाद मु॥ पुणतांबें जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष—फार दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. लिहून पाठवावें. आपली लढाई फत्ते जाली म्हणोन ऐकिलें. सविस्तर ल्याहावें. श्रीमंत राजश्री [३३]राऊसाहेब होक्याचे मुक्कामास आले. तेथून सडे होऊन पुढें गंगापुरास गेले. आम्हां उभयतांस मागें ठेविलें. बुनगे सांभाळून घेऊन येणें म्हणोन आज्ञा केली. त्यावरून एक मुक्काम केला. छ १२ रोजीं राजश्री [३४]भवानराव चहूं राउतानिशीं लष्करांत आले. आम्हांस वर्तमान कळतांच गेलों. भेट जाली. त्यांचे मानस श्रीमंतांकडे जावयाचे असेंच ओता [?] म्हणोन बोलिले. आम्ही सांगितलें कीं, "तुम्ही येथें आलां. आम्हांस वर्तमान कळलें. आतां तुम्हांस एकटें जाऊं देणार नाहीं. पालखींत बसवून आम्ही जातों [तेव्हां] तुम्हास समागमेंच नेऊं." त्यावरून आढे वेढे घेतले. शेवटीं पालखींत घालून घेऊन जात असों. कांहीं खात नाहीं. श्रीमंताचें दर्शन जाल्या खेरीज अन्न उदक देखील घेत नाहीं. आम्ही चौकी पहाऱ्याचा बंदोबस्त केला असे. भवानराऊ आतां निखालसतेच्या गोष्टी फार सांगतात

---

३१. तौरानें=तोऱ्यानें, डौलानें.
३०. टोपकर=टोपीवाला, जाम्र.
३१. घावदाव=संधि.
३२. पेशव्यांची नजर पृष्ठ १२५–१३०. पहा.
३३. थोरले माधवराव असावे.
३४. हे प्रतिनिधी.

कीं, "श्रीमंतांजवळ जाईन, ने करतील ते करूत." सारांश गोष्ट, भगवंतें आपल्यास यश दिल्हें. , भवानराव अनायासें करून सांपडले. मोठी गोष्ट जाली. तिकडील वर्तमान लिहीत जावें. सांप्रत आपला मुक्काम कोठें आहे! पुढें कोणीकडे जावयाचा विचार आहे? तें सविस्तर ल्याहावें. युद्धाचें वृत्त तपशिलें लिहावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती–

राजश्री बगाजीपंत स्वामींस सा॥ नमस्कार. तिकडील वृत्त तपशिलें लिहून पाठवणें हे विनंती.

[१२४] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना स्वामींचे सेवेशीं–

पोष्य हरी बल्लाळ सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ ता॥ छ २२ नमादिलोवर जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष–आपणाकडून बहुत [दिवस] पत्र येऊन कांहींच वर्तमान कळत नाहीं. तरि ऐसें नसावें. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. इकडील वर्तमान तरि श्रीमंत राजश्री दादासाहेब धुळकोटापलीकडे सहा कोसांवर मुक्काम करून राहिले आहेत. श्रावण मासचे खर्चास दोन लाख रुपये द्यावे लागतात तेव्हां कूच होऊन पुढें येतील. त्यास ऐवजाविशीं राजश्री विष्णुपंत बाबा यांस लिहिलें आहे, तें तरतूद करतील. परंतु त्यांस ऐवज लौकर द्यावा लागेल. राजश्री नारो गणेश होळकराकडील व राजश्री बाळाराव शिंदे यांजकडील व विष्णुपंत बाबा सरदारापासून रोख घेऊन बराणपुरास आले. पुरंदरास जाव * * त्यास, महंमद इसफ वगैरे गाडदी यांस तेथून निरोप दिल्हा. ते येऊन बराणपुराजवळ राहिले आहेत. त्यास पुढें घालून तापी उतरोन आलीकडे आणावे, नाहीं तरि मागती श्रीमंत बराणपूरच्या मार्गें येतात. तेव्हां त्यांस [?] मिळतील याजकरितां कारभारी यांस चार दिवस अधिक लागले. परंतु आतां लवकर निघोन येतील. आमची भेट घेऊन पुढें जावें असें त्यांचे मानस आहे. मग पहावें. स्वारी बरोबर समया नाहींत. येथें द्याव्या तरि लष्करांत मिळत नाहींत * * * तां आतां समया वगैरेची यादी आलाहिदा लेहून पाठविली आहे त्याप्रमाणें सांडणी स्वारा बरोबर पाठऊन द्याव्या. श्रीमंतांस वर्तमान दीनचर्येचें लिहितों आपणास कळतच असेल. अधिकोत्तर लिहिणेस नाहीं. श्रीमंताचे येण्याचाच मजकूर पडलां आहे. पैका पुष्कळ पावला. सेवट काय करितात कळत नाहीं. श्रावण-मासचे खर्चाचा पैका द्यावा, पुढें चांदवड पर्यंत देऊं नये, असें बोलण्यांत आहे. परिणाम लागेल तो खरा. खर्चास नाहीं पावलें तर तापीवर आल्यावर पोटास नाहीं, म्हणोन मुलुकास तसदी देतील. एकूण दोन्हीकडून नुकसानी जाण्न

राजश्री त्रिंपुपंत यांस बहुत प्रकारें लेहून तर्बुद करविली आहे. त्याचे पहिले तीन लक्ष गुरुजीजवळ भरणा जाला. आम्ही दोन लक्ष श्रावणमासाचे श्रीमंताचे खर्चास मागतों. हा ऐवज त्यास प्रविष्ट होयसें करावें. पैक्याचें मोठें संकट पडलें. सरदारांनीं मसलत लांबवली असो. एक वेळ चांदवड दाखलें जाले म्हणजे सारे गोष्टींची भ्रांति फिटेल. होईल तें लिहून पाठऊं. दोन चार पत्रें आपणांस पाठविलीं परंतु उत्तर येत नाहीं तस्मात् आम्ही मसलत लांबविली, मेहनत करीत नाहीं, असें ध्यानांत आलें असेल तर येथें काय करितों तें काय ल्याहावें ? दर्शनांतीं विदित करूं. आपले ममतेंत अंतर नसावें. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

[१२५] ॥ श्री ॥ पौ। छ २७ रमजान.

राजाश्रियाविराजित राजमान्य राजश्री गोविंदराव स्वामीचे सेवेशीं—

पो। परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष—तुम्ही दु कि त्ता[?] पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर आपले व राजश्री गोविंदराव बापु यांचे पत्रावरून सविस्तर कळला. याचप्रमाणें वरचेवर तिकडील व इंग्रजाकडील व टिपूकडील वर्तमान लिहून कळवीत जावें. इकडील मजकूर तरि आम्ही धारवाडचा धंदोबस्त करून तुंगभद्रा पार होऊन दक्षणतीरास आल्यानंतर मायेकाडा व होदेगिरें व संतीबेनुर व चेनगीरी हीं ठाणीं घेऊन नजीक रामगीरी येथील मुक्कामास गेल्याचें वगैरे वर्तमान तपशीलवरि राजश्री गोविंदराव बापू यांचे पत्रीं लिहिलें आहे. त्याजवरून सर्व मजकूर कळेल. छ १० रमजान बहुत काय लिहिणें लोभ असो द्यावा हे विनंती.[४५]

[१२६] ॥ श्री ॥

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री गणेश विश्वनाथ गोसावी यांसि—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ सबांसूबैन मयावअलफ—तुम्ही विनंतीपत्र पाठविलें तें पावलें. राजश्री फत्तेसिंगराव गाईकवाड आमदाबादेस मोर्चे लाऊन शहरावर गोळे टाकितात. व सरकारचे महालांत उपद्रव करितात. त्यास सेविशीं त्यांस सांगोन पाठविलें असतां ऐकत नाहीं. तेव्हां आम्ही आमदाबादेस येऊन मग तुमचे आमचे विचारें करणें तें करूं, म्हणून त्यास लेहून पाठऊन फौज सुद्धां बडोद्यानजीक गेलों. तों त्याणीं उत्तर पाठविलें कीं, मही उतरून आलीकडे आल्यास तुमची आमची कटकट होईल. म्हणून लिहिलें व आमदा-

४५ गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे हे वरील गृहस्थ असावे.

बादेस जाण्याविशीं आज्ञा आली यावरून त्याणीं दोन तीन घाटाची बंदोबस्ती केली. परंतु मार्ग फुटेल तिकडून आज्ञेप्रमाणें जातच आहों. तेथें गेल्यावर आपानी गणेश व आम्ही मिळोन त्यास दोन गोष्टी विचाराच्या सांगूं. आयकिलियास उत्तम, न आयकत तरि बनेल तसें करूं. परंतु त्यांची नजर आमदाबाद घ्यावी अशी आहे. त्याजकरितां धारेकडील फौज पंवार वगैरे यासि आमदाबादेस जाण्याविशीं आज्ञा व्हावी. व सुरत अठ्ठाविशीचे महाल जप्त करावे लागतील. तिकडे सोनगडास दीड हजार फौज आहे. आणखी राजश्री भिवंराव येशवंत याणीं फौज सुद्धां येऊन त्याणीं व याणीं एकत्र होऊन काम करावें म्हणजे फत्तेसिंग ताब्यावर येतील. फार भरीं भरले आहेत. याजकरितां तरतूद लौकर जाल्यानें बंदोबस्त होईल. म्हणून तुम्हीं लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशियासि तुम्हांस आमदाबादेस जाण्याविशीं आज्ञा जाली आहे. त्याप्रमाणें जाऊन दाखल होणें. त्याणीं दोन तीन घाट बंद केले तरी जाण्यास वाट बहुत आहेत. चिंता नाहीं. तुम्ही अमदाबादेस पोंहोचल्यानंतर फत्तेसिंग आयकतील. न च आयकत तरि तुम्ही व अप्पाजी गणेश व राजश्री गोविंदराव खंडेराव सर्व एकत्र जाल्यावर दुसरी फौज नलगे. इतके येकत्र असतां आमदाबादेचें त्यांच्यानें काय व्हावयाचें कळतच आहे. दुसरा मजकूर सुरत अठ्ठाविशींत फौज या दिवशीं पाठवावयाची सोय नाहीं. लावणीचे दिवस. पुढें श्रावणमासापासून पाठवावयाची तजवीज केल्यानें पोटास मिळेल व शहही बसेल. या करितां तूर्त तिकडे फौज जाण्याचा उपयोग नाहीं. राजश्री अंताजी नागेश येथें आले आहेत. जाबसालांत येईल तसें तुम्हांस लिहिलें जाईल. तुम्ही लिहिल्याप्रमाणें आमदाबादेस जाऊन दाखल होणें. राजश्री रघुपतराव नारायण यांजकडील फौज तुम्हाकडे आहे. त्यांच खर्चाची बेगमी त्याजकडून होत नाहीं म्हणून तुम्हीं लिहिलें त्याजवरून येविशीं त्यांस आलाहिदा पत्र सादर केलें आहे. ते आपले फौजेचे खर्चाची बेगमी वरचेवर करीत जातील. तुम्हीं आमदाबादेहून खर्चास द्यावयाविशीं रा। आपाजी गणेश यास ल्याहावें म्हणोन लि।। त्याजवरून खर्चास फौजेस द्यावयाविशीं मा।रनिलेस लिहिलें आहे, त्या प्रा।। खर्चास देतील व संस्थान मांडवी येथील भगवंतसिंग दिवंगत[४७] जाहाले याजकरितां राणीनें संस्थानावर गुमानसिंग दत्त पुत्र घेऊन बसविलें. त्याप्रमाणें त्यांची स्थापना सरकारांतून करार करून त्यांजकडे नजरेचा ऐवज करार केला. त्याप्र-

---

४६. हे सोनोरीचे पानशे–यांजकडे तोफखान्याचें काम होतें.

४७. दिवंगत=स्वर्गवासी, मृत.

मार्णे तूर्त पंधरा हजार रूपये तुम्हांकडे देवविले असत. घ्यावे. नाणिजे. छ १३ रा।वर बहुत काय लिहिणें.
पौ। छ २४ रबीलावर मु।। डभही.

मा।र्तंबसू ट.

[१२७] ॥ श्री ॥ छ २३ जमादलावल.

विनंती विज्ञापना मीर ऐलाद अली सिकंदर जाहा नबाबाचे पुत्र यांनीं मजला सांगून पाठविलें कीं, नबाब व श्रीमंत उभयतांत निर्फाला येणें ठीक नाहीं. जर तुम्ही म्हणाल तर मी या कामांत येतों. मुषरुलमुल्क यांस सांगून नबाबाची मर्जी घेतों. म्हणोन निरोप. यांचें उत्तर त्यांस दिल्हें कीं, आपण या कामांत यावें असा आम्हांकडून पैगाम आपल्याकडे नाहीं. ही गोष्ट जाहिरींत येईल, ते वेळेस आम्हांकडून स्पष्ट उत्तर होईल कीं, याजकरितां आमचें नांव तुम्हीं घेऊं नये. याचा जबाब त्यांनीं दिल्हा कीं, तुमचें बोलणें आहे असें मी कसें म्हणेन? जर तुम्हांकडून कांहीं असतें तर बोलतों. कांहींच नाहीं याजकरितां तुमचें नांव घेणार नाहीं. जर मर्जी हुजुरची असली तर मी शोध करून पाहतों. याप्रमाणें पुसतों. परंतु माझे विद्यमानें जाबसाल करावा असें तुम्हीं करार करून सांगावें. तेव्हां त्यांस म्हटलें कीं, मुषरुलमुल्क या गोष्टीवर राजी होणार नाहीं. याजकरितां तुम्ही हें करूं नये. मुषीराची मर्जी ही घेतली. होत असल्यास करावें. मला मान्य. नबाबाची परवानगी ही देवविती. ऐसें त्याचें म्हणणें आहे. तुम्हीं हो म्हटलें म्हणजे उदईक जाहीर दारीनें तुम्हांकडे कोणी गृहस्थ बोलावयासि पाठवितों. तेव्हां त्यांस उत्तर दिलें जे दौलाचें संमतें हें आपलें बोलणें त्यांस श्रीमंतांस या गोष्टीची विनंती लिहितों. तेथून उत्तर आलियावर काय आज्ञा येईल तसें सांगेन म्हणोन यास जबाब देऊन खुंटविलें. विनंतीही लिहिली आहे. आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. रा। छ १९ जमादिलोवल. हे विज्ञापना.

[१२८] ॥ श्री ॥

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके १०१ जय नाम संवत्सरे कार्तिक बहुल प्रतिपदा मंदवासरे क्षत्रियकुलावंतस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यांणीं राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन यांस आज्ञा केली जे, राजश्री येसाजी राम व रामचंद्र नारायण व दादाजी त्रिंबक यांजकडील गांवें हुजुर सरकारांत यावयाचा करार पेशजी नारायणराव पंडित यांचे वेळेस जाहला असतां अद्यापि

---

४८. निफाला=किलाफ, मांडण ?
४९ जाहिरदारी=उघडपणें,
५०. हें पत्र सरदयाच्या लढाईच्या पूर्वीचें असून गोविंदराव काळे यांणीं लिहिलेलें असावें.
५१ बहुल=वद्य.

सरकारांत येत नाहीं. येविशीं वेदशास्त्र संपन्न राजश्री महादेव शास्त्री फोंडेकर व अप्पाजी शामजी यांसि आज्ञा जाहली आहे. यांसि त्रिवर्ग रेटाईचा जाबसाल करितात. हुजूर जाऊन अर्ज करूं ऐसें बोलतात. म्हणोन हुजूर विदित जाहालें. तुमचे विद्यमानें करार असतां अद्यापि सरकारचे करारापैकीं त्रिवर्गांकडील व पुण्यशील आवुबाई कडील गांवें येत नाहींत याचा अर्थ काय? राजश्री नागो शामजी हुजूर विनंती करितात जे, राजश्री रामचंद्र महादेव यांच्या कर्जाचा फडशा जाहला पाहिजे. त्यास रामचंद्र महादेव यांचा फडशाचा मात्र गुंता सरकारांतून राहिला आहे. रामचंद्र महादेव यांणीं सरकारचे तालुके अडथळून ठेऊन तालुकेंतील त्याजकडील व आऊबाईच्या वगैरे यांचे मतलबांत शिरोन बखेडा करावयाचें कारण काय? सावकारी जो जाबसाल वाजवी असेल तो तुमचे विद्यमानें होत असतां बखेडा करणें हें उत्तम नसे. याचे बंदोबस्ताविशीं ताकीद करून आऊबाईकडे अथवा हर कोणाकडे सरकार तालुकेंतील कुमक न जावीशी करावी. मिरजकर याणीं बावडेकर व सेनापति व शेषो नारायण व रामचंद्र भगवंत सर्वत्र कुमक पाठवणार, त्यास सर्वत्रांस ताकीद करावी जे, आऊबाईकडे कुमकी लोक परिच्छिन्न पाटऊं नये व शेषो नारायण व रामचंद्र भगवंत यांजकडून कुमक गेल्यास यांचें पारपत्य होईल. व येसाजी राम व रामचंद्र नारायण यांजकडील ही कुमक जाऊं नये. ये विशींची ताकीद तुम्हीं केलीच आहे. इतके उपरि पाठवितील तरि जिकडून उपराळा[52] होईल तिकडे त्यांची खराबी होईल. येविशीं तुम्हांस अनेक प्रकारें समजाविलें लिहिलें तुमचीं विनंतीं पत्रें येतील यास्तव स्वामींनीं अगोदर आज्ञा केली असे. सर्वत्रांस ताकीद करावी. त्रिवर्गांकडील वगैरा करारांपैकीं गांवांविशीं उभयतां मशारनिले यांसि आज्ञापत्रें सादर जाहलीं आहेत त्याप्रमाणें निकड करितील. ते सरकारांत हुजूर अर्ज करूं ऐसें बोलतील. तरि त्याची रदबदली चालणार नाहीं. आज्ञेप्रमाणें गांवें व वसूल करारा तागाईत देवावी येविशीं तुम्हीं ताकीद निक्षून केली पाहिजे. करारांत लढा राहूं नये. - निभावणी जाहाली न जाहाली हें तुम्हांस न समजेसें काय आहे? वारंवार ये विशीं सरकारचीं आज्ञापत्रें सादर असतां करारापैकीं गांवें व हारामखोर येत नाहींत हें उत्तम नसे. जाणिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

मर्यादेयंविराजते.

पै॥ छ २८ सवाल मार्गशीर्ष मास.

५२. उपराळा=मदत.

[१२९] ॥ श्री ॥ छ ४ साबान.

विनंती उपरि छ १ माहे षाबान सिदी इमामखान यांस दौलांनीं पाठविल्या वरून प्रातःकालचे प्रहर दिवसास आले. पत्राचा जबाब आला कीं नाहीं म्हणोन पुशिलें. आला नाहीं, येईल ऐसें उत्तर केलें. नंतर कितेक अंदेशाचें बोलणें बोलत होते. तृतीय प्रहर जाला अद्याप पत्रें आलीं नाहींत म्हणाले. आलियावर सांगून पाठऊं. तेव्हां बोलिले कीं, पत्रें आलीं म्हणजे आपणच चलावें. उत्तम म्हणोन सांगितलें. नंतर बोलिले कीं, कदाचित् सायंकाळ पर्यंत जबाब न आल्यास आपण दौलाकडे चलावें. चार गोष्टी बोलण्यांत याव्या म्हणजे ते नवाबास मुक्काम करण्याविषयीं अर्ज करितील. तेव्हां त्यांस म्हटलें नें, पत्राचा जबाब आलिया वेगळ काय बोलावें ? जबाब येईल तेव्हां येऊं. कूच करणें अथवा मुक्काम याविशीं आम्ही कांहींच म्हणत नाहीं. आणि म्हणणारही नाहीं. जशी तुम्हांस सल्लाह वाटेल तसें करावें. आमचा प्रतिबंध किमपि तुम्हांस नाहीं. पत्राचा जबाब तुम्हांस पाहे तों पर्यंत नवाबाचा मुक्काम तेथेंच असावा अशी खावंदांची आज्ञाही आम्हांस आली नाहीं. मग कूच अथवा मुक्काम याविशीं काय म्हणून तुम्हांस सांगावें? तुम्हांस सल्लाह दिसेल तसें करावें. आमचे बोलण्याची प्रतीक्षा करूं नये. तेव्हां ते म्हणाले कीं, कूच करा अथवा मुक्काम हें आपण म्हणों नये. परंतु दौलाचे आपलें बोलणें होईल. कूच मुक्कामाचे बोलण्या वेगळे आणखी बोलणें नाहीं कीं काय ? फैसल्याचा ठराव वगैरे अंदेशाचीं बोलणीं होतील. त्यांतच कूच मुक्कामाचा प्रकार हें ते समजतील. यानकरितां पत्र आलें अथवा न आलें तरी चलावें म्हणोन बोलले. तृतीय प्रहर आतां जाला. सायंकाळीं सांगूं म्हणून बोलिलों. तेव्हां म्हणाले उत्तम आहे. आतां येथून जा ये कशास करूं ! मी सायंकाळ पर्यंत येथेंच असतों. बरोबरच येईन. ऐसें म्हणोन येथेंच राहिले. सायंकाळ जाला तों पर्यंत पत्राची प्रतीक्षा केली. पत्राचें उत्तर नाहीं. तेव्हां संध्या भोजन केलें. इतकियांत दौलाची येक चिठ्ठी चोपदार घेऊन सिदीकडे आला. चिठ्ठी त्यांनीं पाहून चोपदारास बसावयास सांगितलें. मग काय चिठ्ठींत होतें हें समजलें नाहीं. रावजी येतात किंवा कसें ऐसें लिहिलें असेलसें वाटतें. आम्ही भोजन करून सहा घटका रात्रीं दौलाकडे गेलों. सिदी इमामखानही बरोबर होते. तेथें बोलणें जालें. त्याचा सा॥ आलाहिदा लिहिला असे. रा॥ छ ३ षाबान हे विनंतीरें[3].

[१३०] ॥ श्री ॥ पौ॥ छ १४ जमादिलावल.

विनंती विज्ञापना दौलानीं कम [काल ?] ठाण्यास आम्हांस बोलाविल्यावरून

---

५३. हें पत्र खडर्याच्या माहिमेच्या संचयाचें दिसतें.

छ ७ जमादिलावंल सोमवारीं गेलों. येकांतीं बैठक होऊन दौलाचे बोलण्यांत आलें कीं, मीर आलम याजकडून पत्रें आलीं आहेत. छ २९ माहे रा॥ खरीं श्रीमंतानीं मीर आलम व राजाजी यांसि बोलाविल्यावरून गेले. दरबार नाला. मदारुल महाम व परशराम पंडत व अप्पा बळवंत व चिंतामणराव फडके व गोविंदराव भगवंत सदर्हू इसमें होतीं. श्रीमंतांनीं मदारुल महाम यांस आज्ञा केली कीं, यांशीं बोलावें. त्यावरून मदारुल महाम यांणीं बोलण्यास आरंभ केला. याप्रमाणें इबरत सदरीं आणून बोलण्यांतील मजकूर लिहिला. तें पत्रच मीरआलम यांचें दौलांनीं आम्हांस वाचून दाखविलें. याचा तपशील औलाहिदा पुरवणी पत्रीं विनंती लिहिली आहे. त्यावरून ध्यानांत येईल. रा॥ छ १० माहे जमादिलावल. हे विज्ञापना.

[१३१] ॥ श्री ॥ छ ३ सफर आर्बासबैन.

राजश्री पंतप्रधान साहेब साहेबांचे सेवेशीं

छ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेा॥ गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादर दंडवत विनंती ऐसीजे येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लेखन आज्ञा करीत असलें पाहिजे. विशेष— आपलें पत्र छ १४ जिल्हेजचें आलें तें छ १२ मोहरमीं मुक्काम बडोदें अदकोशीं पावलें. लेखनार्थ ध्यानास आला. आम्हांकडील पत्रें येत नाहींत याकरितां विस्मय करून लेखन केलें. ऐशियासि सोनगड ज्या रे हस्तगत करून आपणाकडे पत्रें पाठविलीं नंतर तेथून कूच करून पुढें आलों. रेवा तीरीं माघ वद्य १४ त्यांची आमची लढाई जाली. त्यांचा मोड जाला. निशाणें, नरीपटका, नौबती, सुत्रनाळा, जेजाला, तोफा, उंटें, डेरे, ढाला, वगैरे लुटण्यांत आलें. ते खांसे पंचवीस स्वारांनिशीं पळोन बडोद्यास आले. दुसरे दिवशीं आपणाकडे पत्रें रवाना केलीं. नंतर कूंच करून रेवा उतरलों. दरमजल चौथे दिवशीं बडोदियाच्या पश्चमेकडे अदकोशीं उदकांची नदीवर मुक्काम केला. येथून मुंजरद[५५] कासीद जोडी पत्र लिहून आपणाकडे पाठविली. याप्रमाणें पत्र पाठविण्यास अनमान अथवा उपेक्षा किमपि नाहीं. परंतु मागच्या आडंचणीमुळें कासीद जोड्या कोठें अडकून ठेविल्या किंवा कैसें जालें हें न कळे. साहेबांस पत्र न ज्याहावें ऐसें नाहीं. सर्वकाल आपल्याकडील निजध्यास. असतु. बडोदियासि जाऊन बसले आहेत. आम्हीं भोंवतीं बंदी केली आहे. पेटलाद डबलकें वगैरे पारयळीं त्यांजकडील लोक व सरंजाम थोडा बहुत होता. तेथें अमल बसवावयाकरितां कारकून व फौज पाठविली. त्या खटपटीस मास पक्ष

५.२. वर टी० ५.२ पहा. | ५.५. मुजरद=जलद, जरुरीची.

लागला. बेकार ग्रामांची जप्ती चहूं दरवाजियांची केली आहे. किल्ला बाहेर त्यांच सिबंदी व स्वार होते त्यांस आपल्याकडील लोक नेऊन मारामार करून गांवांत नेऊन घातले. तीर्थस्वरूप राजश्री खंडेराव गायकवाड हिम्मत बहादर फौज सुद्धां येथें आम्हांपाशींच आहेत. रानश्री दौलतराव फौजसुद्धां आहेत. या उभयतांकडे बडोदियांतून सलूखाचें बोलणें एक दोन दिवस आलें. या उभयतांची भेटीही त्यांणीं येऊन घेतली. सर्व सोडून नेमणुके प्रमाणें घेऊन स्वस्थ असावें त्याप्रमाणें बोलणें निश्चयांत आलें होतें. परंतु पुण्याहून पत्रें खिजमतगारासमवेत व कासीदा समवेत वगैरे गुप्त प्रघट दरफेज येऊन त्यास पोंचलीं. त्यावरूनें पुन्हा उमेद बेकार ग्राम न द्यावे, आपल्या दैवयोगें हा उपाय निर्माण नाला, इतःपर होईल तेथवर बळ धरावें, ऐसा निश्चय होऊन पुण्याकडे पत्रें जातात येतात. या उभयतांकडे सलूखाचें बोलणें लाविलें होतें. त्यांस सांगून पाठविलें जे, आपल्या दैवें हा उपाय निर्माण जाला. इतःपर माध्यस्थ काय म्हणोन सांगून पाठविले. तिकडील पत्रें बजिन्नस आलीं तीं यांसि दाखविलीं. यांणीं ही प्रत्योत्तर करणें तें केलें. तें त्यांच्या प्रत्ययास न आलें. आंतील बळ म्हणावें तर, मोठा आश्रय मिळोन किल्ला, हिंमत म्हणावी तर पुण्याकडील पत्रावर, हें आपणांस कळावें. चहूंकडून किल्याची बंदी केली आहे. या घटकेपर्यंत कुमक त्यांजकडे कोठून आली नाहीं. अहमदाबादची सिबंदी आम्हांकडेस आली. चाकरीस ठेविले. पहिले देशची फौज व इकडील सिबंदी व स्वार मिळोन पंचवीस तीस हजार फौज आहे. चहूंकडून त्यास अडचण केली आहे. साहेबांचे पुण्यें करून कार्यभाग सत्वरीच होईल. या मार्गेच हल्ला करून घेतों. परंतु गायकवाडांचीं कुटुंबें झाडून आंत, प्रजा बहुतां दिवसांची वस्तीची वस्ती, याजकरितां सबूरीनें आजि पर्यंत करणें तें केलें. तोफांही किल्यावरील आम्हांकडील चालू आहेत. किल्या भोंवते आपले लोक जबरजस्तीनें जाण्यांत गुंता नाहीं. ते आंतून तोफा व गोळ्या मारितात. प्रयत्नास चुकत नाहीं. मनसब्याची उमेद पुरी करून कागदपत्रावरून विशेष. तिकडे त्यांचें येणें होईल हा बहुतांस संदेह. परंतु येथीलच उलगडा होणें कठीण. त्यापक्षीं तिकडे येण्याचा अर्थ कोठील! साहेबीं येविशीं स्वस्थ चित्त असों द्यावें. येथील गुंता स्वल्प दिवसांतच उरकेल. दिनावधी लागणार नाहीं. सदैव कृपावंत होऊन आज्ञा पत्रीं सांभाळ करणार साहेब समर्थ. र॥ छ १९ माहे मोहरम बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे. हे विनंती."

---

५६. कासीद=जासूद, हरकारा.
५७. येथें बाजूवर शिका आहे.
५८. दमाजीच्या मागें त्याच्या मुलांपैकीं सयाजी याणें बखेडा मांडला तेव्हां गोविंदराव यांस बंदोबस्ताकरितां पेशव्यांनीं पाठविले होतें. तेव्हांचें हें त्यांचें पत्र आहे.

[१३२] ॥ श्री ॥

आशीर्वाद उपरि. राजश्री गोविंदराव आम्हांजवळ बोलले कीं, लक्ष रूपये व दो चहूं लक्षांचे परगणे दिल्हे म्हणजे साहित्य करावें म्हणोन. त्यास आम्ही उत्तर केलें कीं, चार पांच लक्ष रूपये रोख व चार पांच लक्षांची जागा याप्रमाणें द्यावी. तुम्ही ठीक करणें म्हणालों. तीर्थरूपांसही लिहिलें. तेथून उत्तर आलें कीं, ह्या गोष्टी तोडच्या नाहींत. मुलुखगिरी बुडवून नबाबाचा तह मोडा, तेव्हां हें कर्म करावें. या गोष्टीस आपलें स्वहितही पाहिलें पाहिजे. निमित्य [निमें ?] गुजरात देतील तर करूं म्हणून लिहिलें आहे. प्रस्तुत तरी नबाब बरानपुरास आहे. सुरतेकडे जात नाहीं. याजमुळें दाभाडेही बोलत नाहीं व तीर्थ [रूप] ही कोट्याचे रोखें गेले. यास्तव सर्व प्रकारें मनसुबा शिथिल पेडला. * * *

[१३३] ॥ श्री ॥

राजश्री सोमशेखर नाईक संस्थान हरपनवली गोसावी यांशीं—

⊕ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेा॥ महादाजी अंबाजी आशीर्वाद उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष—तुमच्या संस्थानचा मामला चुकला पाहिजे. तुह्मांकडून मातबर येऊन तह रह करावा. ऐसा निमित्य रा॥ त्रिंबकराव गिरमाजी तुह्मांकडे पाठविले असतां हा कालपर्यंत मातबर पाठविले नाहीं. अपूर्व असे! अतःपर आह्मी मजल दरमजल ते प्रांतें येत असों. तुमच्या चित्तांत तह रह करावा, मुलकाचा बचाव करून घ्यावा, ऐसें असेल तर अविलंबें मा॥रनिले बरोबर मातबर पाठवून देणें.

[१३४] ॥ श्री ॥

राजश्री मुरारराव घोरपंडे बजारत माब गोसावी यांशीं—

⊕ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेा॥ महादाजी अंबाजी आशीर्वाद विनंति उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष. पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन संतोष जाहला. स्नेहाचा अर्थ लिहिला व राजश्री पंतप्रधान यांनीं आम्हांस बंधु म्हणविलें आहे ते गोष्ट लोकोत्तरांत उत्तम दिसे तें करावयास आपण साभिमानी आहोंत. म्हणोन कितेक लिहिलें. व राजश्री नागोपंत यांनीं निवेदन केलें. त्याजवरून कळलें. ऐशास, आपला व राजश्री पंतप्रधान यांचा स्नेह आजि कालचा नाहीं. पूर्वापार

---

५९. हें पत्र असें मुद्दामच सांपडलें. | संस्थान.
६०. हा संताजीचा वंशज. गुती हें त्याचें | ६१. लोकोत्तर=लौकिक.

चालत आला तो अभिवृद्धीस पावावा. सर्व प्रकारें श्रीमंतांचा तुह्मीं लोभ संपादून उमदे महत्कार्यांस उपयोगी व्हावें हेंच आह्मी इच्छितों. राजश्री श्रीनिवासराव यांस बोलाविलें असे. तेही एका दों रोजांत येतील. त्याजशीं बोलोन आपणाकडे पाठऊन देऊन वरकड अर्थ राजश्री नागोपंत यांजशीं बोललों आहों. हे लिहितील त्याजवरून कळेल. राजश्री नरसिंगराव एक प्रकारचे मनुष्य यांस निरोप देऊन पाठविलें झणोन तर आपणं श्रीमंतांचे बंधु झणवितात. श्रीमंत उमदे अमीराची तोर[६२] व रीत भात राखतात. अनेक देशांतरींचे वकील सहवाशीं राहून घेतात. तोच प्रकार आपणानवळ असावा व आपण इच्छा धरतांत त्यास मुख्यत्वें हींच कारणें आहेत. प्रस्तुत राजश्री गोविंदराव शामराव यांस पाठविले असत. हे सर्वही सांगतील त्याजवरून कळेल. यांस आपणाजवळ राहूं द्यावे. रा॥ छ १ रजब बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती,[६३]

[१३५] [श्री]

राजश्री बाबुराव राम स्वामी गोसावी यांशीं–

विनंती उपरि तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. सुमेरसिंग यांजकडील माडदी यांची वाटणी केली याची याद पाठविली ती पावली. पुण्यांत लोक हजर नव्हते व मयत जाले व रजेस गेले त्यांचे वाटणीचा ऐवज रुपये ११३२ अकराशें बत्तीस चिमणाजी पंडवळ[६४] खासबारदार दि॥ रुमाजी विंचरेकर याजबराबर पाठविले ते पावले. त्याची वाटणी लष्करांत नाली असे. रा॥ छ १० रजब सु॥ इहीदे सितेन मया व अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[१३६] ॥ श्री ॥

राजश्री यादव राव बल्लाळ कडणीस व मजमदार व दफ्तरदार स्वामीचे सेवेसीं पो। बाजी राव यादव कृतानेक सां। नमस्कार विनंती विशेष–राजश्री पांडुरंगराव रामचंद्र व दिनकर शामराव यांनकडे मजमदारीचें काम सरकारांतून देविलें यास्तव त्यांचें हातून काम घेऊन वेतन देवीत जाणें. राजश्री परशुराम पंडित व जयवंतबाबा मंत्री याप्रमाणें स्वारी यावयाची यास्तव त्यांची बरदास्त ठेवीत जाणें. दुसरे राजश्री येशवंतराव पारसनीस व बजाजीराव घाटगे व जनार्दन बल्लाळ व त्र्यंबक राव यादव व जाफरखान व शादरखान व महमदखान व निजाम अल्लीखान व शामखान व हुसेनखान व पिराजीराव व हंबीरराव तुकोजीराव

---

६२. तोर–तोरा=डौल, दरजा.

६३. या पत्रावरून पेशवे चांगल्या उमद्या मनुष्यास कसे चहात होते हें ध्यानांत येईल.

६४. पडवळ हे महाळुंगे पडवळाचें, ता॰ खेड, येथील पाटिलकीचे तक्षीमदार आहेत.

आटोले समशेर बहादर व सेनाकर्ते व सेना धुरंधर व राजआज्ञा ममलकतमदार, डबीर पारसनीस याप्रमाणें रानमंडल यावयाचें त्यासि त्यांची वरदास्त ठेविण्यांत यावी हे विनंती.

[१३७] ॥ श्री ॥ छ १७ रविलावल

राजाश्रियाविराजीत राजमान्य राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसीं—पो। गोविंद-राव कृष्ण सा। नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय लिहीत असावें. विशेष इकडील वर्तमान सांप्रत श्रीमंताचे पत्रीं विस्तारें लिहिलें आहे. त्यावरून कळेल सांडणी स्वाराची रवानगी येथून छ ९ सफरीं केली. सरकारचे व आपल्या कडील पत्राचे जाब नवाबा कडील पारशी पत्रें व आपले पत्राचीं उत्तरें रवाना केलीं आहेत. सांडणी स्वार पोहोंचून पत्रें प्रविष्ट होतील, पावल्याचें उत्तर यावें. सांडणी स्वाराबरोबर पत्रें पाठविलीं त्याचें उत्तर लवकर यावें म्हणजे पुढले चालीचा मार्ग समजेल. राजश्री गोविंदराव बोलतील त्याजवरून ध्यानांत येईल. रा॥ छ १२ माहे सफर. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

[१३८] ॥ श्री ॥ छ ७ निल्हेम

राजश्री गोविंद रावजी गोसावी यांसि—

शिक्का. फारशी

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—स्नो॥ राव रं. भाजी जयवंत निंबाळकर दंडवत विनंती उपरी येथील कुशळ ता। छ १७ माहे सव्वाल मुक्काम भागानगर जाणून वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री नरसिंगराव घाटगे टेंभुर्णीकर हे येथें आले. यांणीं आपलें वर्तमान सांगितलें जे, राजश्री आनंदराव घाटगे यांचे हातें चाकरी व परगणे मजकूरचें कामकाज घेऊन नोकरी आपण करार केली म्हणून. त्यास आनंदराव सरकार चाकरीस दुरुस्त नाहीं. यास्तव राजश्री नरसिंगराव घाटगे हे चांगले मनुष्य जवामर्द, सरकार चाकरीस दुरुस्त, असें जाणून नवाब मुख्तरूलमुल्क बहादूर यांचे अनुमतें ठरलें जे सरकार उपयोगी आहेत यांचाच बंदोबस्त करावा. त्याजवरून प्रगणें टेंभुर्णी पैकीं देहे एकूणीस तनखा रुपये १७५०० साडे सतरा हजार सदरहूची सनद राव मशारनिले यांचे नावें करून दिल्ही आहे तर प्रा। मजकूरचा जागीरीचा अमल यांचे सुपुर्द करून द्यावा. तुम्हांकडील कारकून प्रगणें मजकुरीं ठेविला तो घेऊन जावा. सन ११९३ सालीं चाकरीस न आले सबब नजर पांच हजार ठरविली. ते रुपये खरीप रब्बी झाडा करून घ्यावे. याप्रमाणें ठरलें आहे. त्यास मुदतीप्रमाणें सदरहू ऐवज घ्यावा. येविशीं दौला बहादूर व राजश्री सोयराजीपंत यांणीं आपणांस पत्रें

लिहिलीं आहेत तर नरसिंगराव घाटगे यांचा अमल दखल करून ध्यावा. फिरून बोभाट येऊं न द्यावा. यांचे भाऊबंद यांशीं कटकट करतील तर त्यांस ताकीद निक्षून करावी. हें काम सरकार किफायतीचें व मनुष्य बहुत चांगला ऐसें समजून केलें आहे. तर दरम्यान तुम्हांकडून घालमेल न व्हावी. तालुकियास स्वराज्याचा उपसर्ग बहुत लागून प्रगणा खराब जाहला. याजकरितां स्वराज्याकडील बंदोबस्त चांगला करून द्यावा. तैसेंच करमळियाकडील ही कांहीं उपद्रव न द्यावा. म्हणून राजश्री शामराव व चंडीदासपंत यांस ताकीद करावी. मशारनिलेपासून करारनामा लेहून घेतला त्याची नक्कल पहावयास पाठविली आहे. हें काम जवा म नु द [मर्द ?] बाळा बहादर [?] सेवेराजीपंत यांच्या आमच्या विचारें जाहालें असे. यांत घालमेल न व्हावी. लिहिल्याप्रमाणें कामाचा बंदोबस्त करून द्यावा. रा। छ १७ सव्वाल हे विनंती. सन ११९४.

[१३९] ॥ श्री ॥

राजश्री सखारामपंत गोसावी यांसि—

छ अखंडित लक्ष्मी अळंकृत राजमान्य स्नेा। जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे विशेष—आम्हांकडील प्रांत कडेवळीत येथील देशमुखीचे कामावरि पागा पाठविली. त्यास आम्हांकडील ठाणेदार व पागा निंबगांवीं वोस गांवांत जागा विच्छिन्न केली. तेथें बसोन आहेत. ऐसें असतां भगवंतराव राम याचे लोक नित्य उठोन हर्षामर्शानिमित्य भोंवते उभे राहोन काजिया करितात. आम्हांकडील पागेचें कुरण कापून नेतात. गांवकुसाचा गढीचा आसरा नाहीं. ऐसें जाणोन उपद्रव करितात. याजकरितां भगवंतराव राम यासि उपसर्ग न करीत ऐसे ताकीदपत्र देववावें. दुसरें, नगरकर किल्लेदार देशमुखीचे रुसुमास खलेल करितात. वतनदारीच्या शेर्‍यां व आंब्याचीं झाडें, मौजे मेहकरीस पागेचें कुरण आहे तें चालू देत नाहीं. यास्तव किल्लेदारास ताकीदपत्र आपले सरकारचें दिलें असतां दुसरे पत्राचा उर्जूर करितात. त्यास ताकीद देववून वतनबाब मुरळीत चाले तें करावें. राजश्री महारराव निंबाळकर व रामराव निंबाळकर व शिंद्यांकडील मामलेदारही रुसुमास खलेल करितात त्यास ही ताकीदपत्रें देववावें कीं, त्यांचेही तालुकियांतील रुसुम अविच्छिन्न पावते करावे. निंबगां-

---

६५. रुसुम=जमिनीच्या उत्पन्नांतील देशमुख देशपांडे यांचा विभाग.

६६. शेरी=१. मणीं दोन शेर याप्रमाणें एकंदर उत्पन्नावर कमावीसदाराचा हक्क २. शेरी जमीन म्हणजे गांवसिवेच्या बाहेर असणारी बागाईत जमीन.

६७. उजूर=सबब, बयाद.

वचें गांवकुसूं व गढी विच्छिन्न केली आहे त्याचे मरामतीची परवानगी नगरच्या किल्लेदारास द्यावी , कीं, भगवंत गोपाळ गुमस्ते देशमुख गढी घालतील ते घालूं देणें. ऐसें पत्र द्यावें. रा॥ छ २४ माहे जमादिलावल बहुत काय लिहिणें हे विनंती. मोर्तबसुद

[१४०] ॥ श्री ॥

पै॥ छ ३ रविलोवल सब्बा श्रावण गोहदचा मुक्काम--

तीर्थरूप राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं. अपत्ये माधवराव साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ ता॥ छ १७ मोहरम पर्यंत वडिलांचे आशिर्वादें करून यथास्थित असे विशेष. वडिलांचें पत्र आलें त्यांत आज्ञा कीं, बरुणापूरची मामलत रा॥ नारो कृष्ण याजकडेच करार राखणें. इजारियानीं दुसरियास न देणें. दुसऱ्यास दिल्यानीं शहर खराब करतील. नारो कृष्ण बरा आहे. याचें चालवणें. ह्मणोन आज्ञा. त्यास नारो कृष्णाचें वर्तमान राजश्री चिंतो विठ्ठल व आबाजी महादेव यांस ठावकें आहें. नारो कृष्णाची मामलत दूर न करितां त्याचाच कारकून त्रिंबक नारायण यास कमावीस सांगितली. सरसुभेदारी त्याची त्याजकडेसच करार राखिली. त्यांस हुजूर यावयाविशीं पत्र पाठविलें असतां न आले. मनस्वी भाषण केलें. जासूद उठोन आले. तदोत्तर खिजमतगार पाठविले. पत्र सादर केलें त्याजशीं मनमाने तें बोलले. खिजमतगारांनीं पांघरूणें जाळिलीं तथापि हुजूर न आले. त्यावर गाडदी दाहा पांच पाठविले. येणें ह्मणोन लिहिलें असतां त्यांस शहरांत न घेतलें. बदलोन गोष्ट सांगितली. यास्तव रा॥ मलबा पानसी याजबराबर स्वार हशम देऊन आणावयास पाठविले. कैद वडिलांची. अमर्यादा नसावी. सेवकलोकीं मर्यादेनें वर्तावें हे शिक्षा. पण आज्ञा वडिलांचीच आहे. व प्रस्तुत काळीं राजश्री गोपाळराव गणेश यांणीं बदलोन गोष्ट सांगितली. तोच अन्वय नारो कृष्ण यांणीं चित्तांत आणून बेबदल गोष्ट सांगितली आणि आटीनें आट सदर्हूप्रमाणें पडत पडत आली. येरवीं नारो कृष्ण याजवर आणिक सारखा प्रकार व्हावा ऐसा अर्थ नाहीं. जालें वर्तमान दोन तीन पत्रीं सेवेशीं लिहून पाठविलेंच आहे. व हल्लींही जाल्या प्रकार विनंती पत्रीं लिहिला असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१४१] ॥ श्री ॥

राजश्री त्रिंबकराव मामा स्वामीचे सेवेशीं--

विनंति उपरि आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट जहालें. आह्मीं येथें येऊन

---

६८. पांघरुणें जाळणें–पत्राचा जबाब मिळण्या करितां धरणें वेण्याचा हा एक प्रकार होता असें दिसतें.

विरेपट्टणास चौफेर मोर्चे बसविले. तेव्हां दुसरे दिवशीं किल्लेकरी कौलास येऊन कौल मागूं लागले. त्याजवरून त्यांस कौल देऊन बाहेर काढिलें. आणि छ. २५ जिल्हेजीं किल्यावर सरकारचें निशाण चढलें. ठाण्यांतील पांच हत्ती व पंधरा घोडीं पाडाव आलीं व कोडग [?] वाल्याकडे रा। आप्पाजी गोविंद रवाना केले आहेत. त्याचाही मजकूर कसा तो एका दो रोजांत कळेल म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास आपण जाऊन किल्यास मोर्चे देऊन किल्ला जोरबजोर घेतला. व ठाण्यांतील पांच हत्ती व पंधरा घोडीं पाडाव आलीं. हे मोठी गोष्ट जाहाली. या दर्दें करून दुसरीं ठाणीं अवसान धरणार नाहींत. राजश्री आप्पाजी राम छ २५ जिल्हेजीं मंगळवारीं येथें येऊन दाखल जाहाले. त्यांचे बोलण्याचा अर्थ सविस्तर दुसरे दिवशीं हैदरखानाकडील सांणडीस्वार व राजश्री राव § सेनापती याजकडील दोघे स्वार यांबरावर लेहून पाठविलें आहे. त्याजवरून सविस्तर कळेल. रा। तुळाजी पवार व कुडचीकर व बांडे पा। गी र पा डी र येथें होते त्यास शत्रूचा जोरा तिकडे फार जाहाला. यांची पाळय राखोन दगा करावा असें त्याचे चितांत होतें. परंतु तुळाजी पवार व व कुडचीकर व बांडे मोठे निकर्डानें शत्रूवर आपला दाब राखून सांभाळून आले. बांडे तो होसकोटयास राहिले. तुळाजी पवार व कुडचीकर लष्करांत येऊन दाखल जहाले. रात्रंदिवस मेहनत फार. याजकारितां त्यांचे घोडयांत कांहीं ताकत राहिली नाहीं. रवाना छ. २७ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

[१४२] ॥ श्री ॥

पै॥ छ. १७ मोहरम ज्येष्ठ सन सबा मु॥ ग्वालेर.

तीर्थरूप राजश्री दादासाहेब वडिलांचे सेवेशीं--

अपत्यें माधवराव साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशळ ता॥ छ. २५ जिल्हेज पर्यंत वडिलांचे आशीर्वादें करून यथास्थित असें विशेष--शहर बरानपूर येथील अमलांत मामलेदारांनीं कमपेश केली याचा अर्थ अग्रगत जाला तें वृत्त वडिलांचे सेवेशीं विनंती केली. स्वामीनीं आज्ञा केली कीं, शहरास कमावीसदार पाठऊन तहकिकात करावी. म्हणोन रा। त्रिंबक नारायण यांस कमावीस सांगितली. सरसुभेदारी राजश्री नारो कृष्ण यांजकडे आहे तैशी त्यांजकडे करार ठेविली. ऐसें असतां नारो कृष्ण यांस पत्र सादर केलें कीं, त्रिंबक नारायण याजकडे अम्मल सुरळीत देणें. तें त्यांनीं न मानितां जाबसाल केले. त्याजवरि खिजमतगाराबराबर पत्र सादर केलें. त्याशींही मनस्वी भाषण केलें. तदोत्तर-

§ सेनापति--मुरारराव घोरपडे असावे.

ही पत्रें माणसें पाठविलीं त्यांस शहरांत घेतलें नाहीं. बेबदल गोष्टी अमर्यादेच्या सांगितल्या. माणसें फिरोज आलीं. रा। गोपाळराव गणेश यानीं बदमामलीची गोष्ट सांगितली, त्याचप्रमाणें नारो कृष्णासही उमेद जाली. एवंच हाच मार्ग पडतो. यांत खावंदगिरीचा बोज काय ? यास्तव अशा गोष्टीस पारपत्य असावेंच. काम थोडें. दरगुदर* करावी तर शहर बेबदल जहालें हें लौकिकांत. तेव्हां खावंदगिरीस उचीत तें जालेंच पाहिजे. हें संविस्तर वर्तमान वडिलांस कळावें यास्तव लिहिलें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

[१४३] ॥ श्री] पै॥ छ ३० जिलकाद.

सेवेशीं। महादाजी बल्लाळ व हरी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २६ जिलकाद मु॥ नजीक कपिला संगम कृष्णा उत्तर तीर स्वामींचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनीं सांडणीस्वाराबरोबर व जासुदा बो। पत्रें पाठविलीं तीं पावलीं. सरकारचे कागदपत्र प्रविष्ट केले. उत्तरें घेऊन पाठवितों. इकडील वर्तमान तर राजश्री मुरारराव सावनूरकर यांस निरोप जाला. छावणीस राजश्री गोपाळराव रहाणार त्यास निश्चय नाहीं. श्रीमंत कृष्णा उतरोन उत्तर तीरास आले. फौजेचे नालबंदीचें काम चालीस लागलें. दोनी स्वाऱ्या मिळोन नालबंदीचा ऐवज ठरेल त्यापैकीं निमे तूर्त द्यावा. त्याचे भरतीस सात आठ लक्ष पाहिजेत. याजकरितां ऐवजाचे तरतुदीविशीं श्रीमंतांनीं आपणास पत्र लिहिलें आहे. आतां इकडे कांहीं गुंता नाहीं. दरमजल येणार. आज आठ कोसांचें कूच आहे. राम तीर्थावरून, म्हसवडावरून येणार. पाऊस पडों लागला. एक मुहूर्त ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, दुसरा वद्य चतुर्दशी पर्यंत इतकियांत येऊन पोंचणार. वरकड नवल विशेष वर्तमान तर वंकापुरचा किल्ला खालीं करून द्यावयास राजश्री राजेबहादर गेले होते. छ १९ जिलकादीं किल्ला हस्तगत जाला. आंत कांहीं जकीरा दारूगोळी तोफ नाहीं. दाणा मात्र होता तो विकत घेतला. किल्यांत शंकराजी राम ठेविले आहेत. याउपरी गोपाळराव यांस देतील अथवा सरकारांतून बंदोबस्त करितील. दोनी प्रकार घाटतात. कळलें पाहिजे. स्वामींचे चरण दृष्टीस पडत तो सुदिन असे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

[१४४] ॥ श्री ॥


राजेश्री पंत प्रधान गोसावी यांसि—

ॐ सकळ गुणाळंकरण अखंडित लक्ष्मी आळंकृत राजमान्य—स्ने॥ उदा-

---

* दरगुदर=कानाडोळा, क्षमा. ह्या अर्थी वर पत्र १२६ पहा. हें पत्र स० इ० १७६८ सालीं लिहिलें.

जी चव्हाण हिम्मत बहादर ममलकत मदार दंडवत विनंती येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळलेखन करीत असलें पाहिजे. विशेष—आपण पत्र पाठविलें पावलें. लेखनाभिप्राय कळोन समाधान जालें. सातारियाकडील वर्तमान लिहिलें त्याजवरून साकल्य कळलें. सांप्रत आपण कोठें आहां? विचार मनसुबा काय? आपण चित्तांत काय आणिलें आहे तें ल्याहावें. पुढेंही कितेक विचार करणें आहेत. तर राजश्री लिंगो आमाजी यांस पाठऊन द्यावें. विचार सुचेल तो मशारनिले समागमें सांगोन पाठवावा. जाणोन लिहिलें. ऐशास आपण आह्मांस निरोप दिल्हा ते वेळेस सांगितलें कीं, श्रावणमासीं मनसुब्याची रीत व फौज ठेवावयाचा विचार तुम्हांस सांगों तों पावेतों दोन दिवस मनसुबा राखून राहणें. असें बोलोन निरोप देऊन लावून दिल्हें. त्याजवरून आम्ही आथणीस आलों. ज्येष्ठ मासीं चिरंजीवांचें लग्न केलें. वरकड या मुलकांतील जागां जागां कागदीं पत्रीं व नानाप्रकारचे फितूर पत्रीं काय ल्याहावे. सर्व अर्थ आपणास विदीत. मसलतीचा विचार, आपणा शिवाय आमची मसलत नाहीं.



या फितुरांत आजपावेतों आह्मी मनसुब्याचा जीव मात्र रक्षून आहों. इकडील कितेक अर्थ सांगणें तो सांगोन राजश्री लिंगोपंत रवाना केले आहेत, ते आपणां संन्निध येऊन सविस्तर विनंती करतील. तो अर्थ चित्तारूढ करून प्रत्युत्तर समर्पक पाठविलें पाहिजे. प्रस्तुत या श्रावणमासीं आम्ही कूच करून झेंडे डेरे बाहेर देऊन निघालों आहों. सर्वभार आपणावर आहे. आपणाखेरीज दुसरा विचार जाणत नाहीं. हें मनोमन साक्ष असे. पुनरुक्त पत्रीं विशदें ल्याहावें हा अर्थ नाहीं. तपशील अर्थ मशारनिले निवेदन करतील त्याजवरून श्रुत होईल. आपलें उत्तर येईल तदनुरूप वर्तणूक होईल. विशेष काय लिहिणें, कृपा वर्धमानकरावी हे विनंती.

मोतंब सुद.

[१४५] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेशीं—

पो। भवानी शंकर हैबतराव कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लेखन करीत असलें पाहिजे. विशेष—आपण पत्र पा। तें पावलें. प्रांत बांई येथें ब्राम्हण ज्ञातींत कोणी कन्येचे रू। घेऊन विवाह करूं नये, जो कन्येचा ऐवज घेईल त्याजपासून दुप्पट व जो देईल त्यानें कन्येचे

बाणास रु॥ दिल्हे असतील तितके, व मध्यस्ती करून पैका घेईल तो ऐवज त्याजपासून सरकारांत घेतला जाईल. या प्रमाणें ब्राह्मण ज्ञातीस व जमीदार व धर्माधिकारी व उपाध्ये व जोशी व पा। कुळकर्णी यांस निक्षून ताकीद करावी. ताकीद केली असतां आज्ञे प्रमाणें वर्तणूक न करीत त्यांजपासोन सदर्हू प्रमाणें ऐवज घेऊन कांहीं खर्चाची बाब न लावितां हिशेबीं जमा करावी, म्हणोन लिहिलें. ऐशास प्रांत वांई येथील गांव बहुत करून दुमाले आहेत. तेथें आमचा रोखा पत्र चालत नाहीं. वसुली गांव व वांई क्षेत्र व देशमुख व देशपांडये वगैरे सरकारचे पत्राअन्वयें आणवून ताकीद करवितों. कळलें पाहिजे. बहुतकाय लिहिणें लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

[१४६] ॥ श्री ॥ पै॥ छ ५ मोहरम.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना ऐसिजे गोंवेकर फिरंगी याकडे राजपुरींतून पेगाम लागल्याचा मजकूर निराळे विनंतीपत्रीं लिहिला आहे याजवरून सेवशीं निवेदन होईल. फिरंगी यंदा पूर्तकालेहून जाहाजें आल्यानंतर वळवळ करितां राहात नाहीं. या गोष्टीस स्वामींच्या प्रतापाचा दबाव असिल्यानें उत्तम आहे. दबाव हाच कीं, वरकड टोपीकर वगैरे यांस राजपुरीचे मसलतीमुळें पत्रें सादर जालीं असतील त्या प्रमाणें गोंवेकरांसही पत्र सादर व्हावें कीं, जंजिरे दंडा राजपुरी याजवर सरकारची मसलत आहे, तरि तुम्हीं आपलीं जाहाजें संजुता करून सामान सरंजाम सुद्धां तयार होऊन जलमार्गें येऊन सामील होणें. कदाचित राजपुरीवाले तुम्हांस लाभ लोभ दाखवून आपले कुमकेस बोलावतील व तुम्ही ममतेस गुंतोन त्यांचें साहित्य कराल तरि आधीं तुमचें पारपत्य होईल. राजपुरीवाल्यांस तंबी करून जंजीरा सरकारांत घेणें हें तों जरूर आहे. त्या प्रों थोडक्याच दिवसांत सिद्धीस जाईल. परंतु तुम्ही तु र द रा ज पाहोन वर्तणूक करणें. म्हणोन पत्र व त्यांतच मजकूर ल्याहावयाचा सेवकास सुचला लिहिला जातो जे. तुळाजी आंगरे याजवर सरकारची मसलत पेशजी जाहाली होती तेसमयीं तुम्हीं त्याची कुमक उपराळा करावयाची कबुलात करून आडीच लक्ष रूपये आंगऱ्याकडून तुम्हीं मेले आहेत. त्यास आंगऱ्याचा मुलुख व कोट किल्ले दरोबस्त सरकारांत घेतले. मालीयत व खजाना जेथें जेथें त्यांचा सांपडला तो सरकारांत आणिला. तुम्हीं

हिलें असतां अद्यापवर पाठवीत नाहीं. हे गोष्ट कार्यास येणार नाहीं. हल्लीं देखत पत्र, सदरहू रुपये सेवकाचे पदरीं घालून हुजूर पाठावेणें. तैसेंच सोंधेकरांचा मुलुख आहे तो सरकारचें स्वराज्य आहे ऐसें असतां कूर्मगड व सदाशिवगड हे दोन्ही किल्ले तुम्हीं घेऊन ठाणीं ठेविलीं आहेत म्हणोन कळलें. तरि हरदू किल्यांवरील तुम्हीं आपलीं ठाणीं उठऊन, किले खालीं करून, सेवकांचे स्वाधीन करणें व यांची पावती घेऊन हुजूर पाठवणें. आणि तुम्ही भाद्रपद शुद्ध चतुर्थी होतां आपलें सामान सुद्धां येऊन राजपुरी जवळ सरकारच्या फौजांस, सामील होणें. येणें प्रों तुम्हीं केल्यास तुमचे संस्थानचें व तुमचें कल्याण आहे न केल्यास तुम्हास नतीजा पोंचेल. स्पष्ट समजोन वर्तणूक करणें म्हणोन पत्र व गोवेंरनदोर राजा व सकटतार दिवाण यांस वस्त्रें सावांक [ला ?] दस्तुर येऊन सेवकास आज्ञा जालिया गोमांतकास जाईन. हे गोष्ट जालियानें फिरंगी दबाव खाऊन आपले ठिकाणीं रहातील. वळवळ करूं शकणार नाहीं. महाराजांचे ध्यानास आलिया येणें प्रों पत्रें वस्त्रें पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत व येथून सेवकाची खानगी उत्तम प्रकारें करून द्यावयाविशीं जिवुबा सबनीस यांस आज्ञा असावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१४७] ॥ श्री ॥ पै॥ छ ५ मोहरम.

सेवेशीं नारायण भास्कर साष्टांग दंडवत विज्ञापना. गोंवेकर फिरंगी यांकडील बातमीचा मजकुर तरि राजपुरीहून ज्येष्ठ अखेर माशीं गलबतावरून वकील येऊन नेहमी गोंव्यास येऊन राहिला आहे. त्याजकडून गलबत राजपुरीस जाऊन मागती सांप्रत आलें. जंजिऱ्यावर मसलत श्रीमंतांची जाली आहे, जंजीरा घेणार, त्यास या समयास तुम्हीं आपली कुमक उपराळा जळमार्गें करावा, सामान सरंजाम आपणास पोहोंचवावा, आपली शरम या वरतीं तुम्हीं राखावी. तैसेंच मर्दनगडास तुमचा मुख्य राजा मारला गेला असतां तुम्ही आजि पावेतों कांहीं प्रतिकार करून दाखविलें नाहीं, तरि मर्दनगडचा सूड घ्यावा, येविषयीं दू मु त व जे कारितात. परंतु आजवर फिरंगी याजवळ जमात किंवा लढाईचा पोख्ता सरंजाम नाहीं. दरसाल जहाज एक येतें. व तीन वर्षांनीं चार-पांच गलबतें व मोठी जाहाजें तीरकती सु ब रां चीं यावीं त्यास हें तिसरें साल आहे. यंदा भाद्रपदमासीं गणेश चतुर्थी माजी पांच जहाजें घेऊन नवा राजा येणार. ती जाहाजें पर्तकालाहून आल्या उपरांतीक आधीं मर्दनगड-

चे गळीं पडावें, हा त्यांचा मनसवा आहे. बादनें शामलांचा यांचा करार मदार होऊन वर्तमान आंढळेल तें सेवेशीं लेहून पाठवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. *

पै॥ छ ५ मोहरम.

॥ श्री ॥

[१४८]

सेवेशीं **नारायण भास्कर** साष्टांग दंडवत विज्ञापना. **सांवतां**चा व **गोंवेकर** **फिरंगी** यांचा हर्षामर्ष गतवर्षी पासून लागला आहे. त्यास **गो**मांतकचे खाडी आलीकडील मुलुक यांणीं घेऊन सारे मुलकाची जप्ती केली. रहातां तीन ठाणीं राहिलीं. येक **हलर्ण**, दुसरी **डिचोली**, तिसरें **ते**रेखोल या तीन ठाण्यांत **फिरंगीं** यांचे लोक आहेत. ठाण्या बाहेर नाक्या नाक्यावर चौत्था यांच्या बसल्या आहेत. सामान बाहेरून जाऊं पावत नाहीं. दोन तीन जुंजें यांचीं त्यांची जालीं. त्यांत **फिरंगी** यांचें सामान बहुत, बरोंच दारू गोळीची मोठी मार. तथापी एक दोन वेळां यांचा जोर होऊन **फिरंगी** मोडून माघारे घातले. वीस बावीस **फिरंगी** यांजकडे सांपडला. त्यांस आणून कैदेंत ठेविले आहेत. सांप्रत **फिरंगी** याजकडून बोली चाली लागली आहे. त्याजकरितां **वा**डीस **फिरंगी** होते त्यांपैकीं एक दोघे **गो**व्यास गेले आहेत. परस्पर यांचा त्यांचा तहरह व्हावा, ठाणीं यांचे स्वाधीन करावीं, पुढें यांणीं **वा**रदेशांत न उतरावें, **फिरंगी** याणीं खाडी आलीकडे उपसर्ग न द्यावा, असा कारभार त्यांचा घाटत आहे. होतां होईल तें सेवेशीं लेहून पाठवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१४९]

॥ श्री ॥

साहेबांचे सेवेशीं आज्ञांकित **ब**याजी नाईक, विज्ञापना, मेस्तर **ए**लफिनइष्टेन वकील दिम्मत **इं**ग्रज **क**लकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी.

१. छ १० मोहरमचें वर्तमान. मशारनिले प्रातःकाळीं **दा**पोडी पावेतों जाऊन सहल करून आले. अनुमिया **है**दराबादकर **ना**रायणजी डांकवाले यांशीं बोलून गेले. **मुं**बई व **है**दराबाद व **श्री**रंगपट्टण व **ब्रा**ह्मणपुरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जाब रा जाले. रिकाड कोशलदार व कर्णेल ग्रांट **मुं**बईहून बंगल्यास आले. सात मुक्काम केले होते. **वे**हेरीस येऊन, देऊळ

---

७३. 'बादन' हे कोण ?

* हा लिहिणारा नारायण भास्कर कोण?

७४. 'बराच'=म्हणजे काय ? मोडींत 'वेशेच' असेंही होईल.

७५. वेहेरगांव=येथें एक कोरींव लेणें आहे. हें बौद्धांच्या वेळचें आहे. मध्यें टोलेजग दिवाणखाना आहे. त्याचे शिरोभागीं मोठा स्तूप असून त्यावर एक मोठें छत्र आहे. यास धर्म राजाचा डेरा असें "ह्मणतात. दिवाणखान्याचे खांब मोठे उंच असून समोरासमोरील प्रत्येक दोन खांबांवर एक अशा अर्धलंब वर्तुलाकार मोठ्या लांकडी कमानी शोभे करितां दिल्या आहेत.

(पु० चा०)

वगैरे जागा पाहून, कारल्यास मुक्काम करून, मागती मुंबईस गेले. सरकारचा जासूद व मारनिले कडील खिजमतगार तरतुदी करितां मारनिलेनीं पाठविले होते ते माघारे आले.

१. छ ११ मोहरमचें वर्तमान. बापूजी गणेश गोखले यांस मारनिलेनीं पत्र लिहून, थैली तयार करून रवाना करावयास, त्यांजकडील सखोपंत टेंभे यांस बोलावून आणोन त्यांचे हवालीं केली. सखोपंतांनीं एक घटका बोलणें करून गेले. बापूजी गोपाळ साने येऊन कप्तान कलोस यांशीं बोलून गेले. करवीरकरां कडील कारकून मेस्त्र रसल यांशीं बोलून गेले. प्रभाकरपंत जोशी मोधीशीं[७६] बोलून गेले. आंगरे यांजकडील बापूभट सोमण मेस्त्र रसल[७७] यांशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री यांणीं जासुदा बराबर लखोटा पाठविला तो मुंबईचे डांकेवर रवाना करावयास मारानिले जवळ पावता करून गेला. मुंबईचे डांकेवर व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें आलीं. जाब रा॥ जाले.

(मागील पृष्ठावरून.)

खांबावरील पुतळे–व इतर ठिकाणचेही-जोडपीं जोडपीं आहेत. दिवाणखान्याच्या बाहेरील आंगास दोहींकडे दोन जोडपीं नृत्य करीत आहेत असें दिसतें. हीं इंग्रजी बाल मध्यें जोडपीं नाचतात त्या प्रमाणें दिसतात. एकंदर सर्व पुतळ्यांचा पैराव बैरागी बैरागिणी यां सारिखा दिसतो–पुतळे नग्न नाहींत. या दिवाणखान्याच्या दोन्ही बाजूस दोन मजली कोरलेल्या गुहा आहेत त्यांत विद्यार्थी राहात असत असें अनुमान होतें. प्रत्येक खोलींत एक माणूस निजण्या पुरता ओटा व तितकीच रिकामी जागा अशी सोय आहे. या स्थलांस हल्लीं आखाडे म्हणतात. कारण या खोल्यांच्या तोंडीं सर्व साधारण अशी जागा आहे तींत आलीकडील लोक नालिम करतात. दिवाणखान्याच्या तोंडीं एकवीरा भवानीचें स्थान आहे व पाण्याचीं टांकीं आहेत.

७६. मोधी–हा जातीचा पारशी असून इंग्रजाच्या पदरीं असे. कर्नल क्लोज् पुण्यास रेसिडेंट असतां राजे रघुवाडयाच्या भेटी तो खुसरूजी मोदी याच्या मार्फत घेत असे. तेव्हांच सदाशिवराव भाऊ माणकेश्वर हे बाजीरावाकडून रेसिडेंटाकडे वकील होते व बयाजी नाईक हुजऱ्या हा बाजीरावाचा हेर होता. या तिघांचा एक विचार होऊन, त्यांनीं मोठमोठालीं कामें करून, पुष्कळ पैसा मिळविला. मोदीच्या हातीं इंग्रजी सूत्र आहे अशी बाजीरावाची समजूत पडल्यावरून तो त्याशीं फार स्नेहानें वागूं लागला व रेसिडेंटाच्या अनुमतानें त्याजकडे धारवाडची सरसुभेदारी सांगितली. हा सर्व कारभार एल्फिन्स्टन साहेब रेसिडेंटाचे कामावर येईपर्यंत नीट चालला होता. परंतु तो रेसिडेंट झाल्यावर त्याची ओळख मराठे सरदारांशीं असल्यामुळें मोदी फिका पडू लागला व वरील त्रिकुटांत भांडाभांडी सुरू झाली. पुढें एल्फिन्स्टन साहेबास संशय येऊन त्यानें मोदीस इंग्रज व पेशवे यांतून एकाची नौकरी सोडण्यास सांगितलें. त्यावरून त्यानें सरसुभेदारी सोडिली. नंतर विशेष वहिम आल्यावरून त्यास पेनशन देऊन घरीं बसविण्याचा प्रसंग आला, तेव्हां मोदी अकस्मात् विषप्रयोगानें मरण पावला. (१८१४) मोदीची बाग पुण्यास प्रसिद्ध आहे. मराठ्यांच्या सर्व इतिहासांत पारशी एवढाच आढळतो.

७७. मिस्तर रसेल–हा कर्नल क्लोज् गेल्यापासून तों एल्फिन्स्टन येई पर्यंत रेसिडेंटाचें काम पाहात होता.

दोन रोजां वर्तमान निवेदन जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१५०] ॥ श्री ॥

साहेब साहेबांचे सेवेशीं आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना, मेस्त्र इलफिनइस्टोन वकील दिम्मत इंग्रज कलकत्तेकर यांनकडील दिनचर्येची बातमी--

१. छ ७ मोहरमचें वर्तमान. मशारनिले प्रातःकाळीं दापोडी पावेतों जाऊन सहल करून आले. गोपाळराव खंडेराव रास्तें यांजकडील कारकून व बापूजी गोपाल सानें मा।र निलेशीं वेगळाले बोलून गेले. करवीरकर यांजकडील कारकून मेस्त्र रसल यांशीं बोलून गेले. प्रभाकर पंत जोशी मोघेशीं बोलून गेले. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं एंत्रे डांके बरोबर आलीं. जाब रा। जाले.

१. छ ८ मोहरमचें वर्तमान. करवीरकरांकडील वासुदेवभट गुरुजी व तीन असामी कारकून ऐसे येऊन मा।निलेशीं बोलणें करून गेले. गंगाधर शास्त्री व बापू मैराळ मा। निलेशीं दोन घटका बोलणें करून सायंकाळीं गेले. चिंतामणराव पटवर्धन व मिरजकर व तासगांवकर व कुरुंदवाडकर यांस मा।निलेनीं पत्र लिहून चार थैल्या तयार करून त्यांजकडील कारकून बोलावून आणोन चौघांचे हवालीं चार थैल्या रवाना करावयास केल्या. त्या घेऊन चौघांनीं कपतान कलोस यांशीं बोलणें करून गेले. बापूजी गोपाळ साने मशार निलेशीं व मोधी यांशीं बोलून गेले. मुंबई, हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें डांकें बरोबर आलीं. जाब रवाना केले. गारपीरचे लष्करांतील शिपाई व गंगाधर शास्त्री यांजकडील माणसें मोहरमची फकीरी मागावयास आले. सबब मशारनिलेनीं लष्करवाले यांस रुपये दहा व शास्त्री यांजकडील माणसांस पांच एकूण पंधरा रुपये दिल्हे.

१. छ ९ मोहरमचें वर्तमान. निपाणीकर यांस माारनिलेनीं पत्र लिहून थैली करून रवाना करावयास बापूजी गोपाळ साने यांचे हवालीं केलीं. ती घेऊन साने गेले. मशारनिले व कप्तान कलोस व मेस्त्र रसल व कप्तान पावला.

---

७८. बयाजी नाईक–हा एक हुजऱ्या असून हेरांचें काम त्याजकडे होतें.

७९. बापू साने–मोदीच्या वतीनें धारवाड सरसुभ्याचें काम पहात असे. मोदी मरण पावल्यानंतर त्यानें केलेल्या दुर्वर्तना बद्दल बापूस जाब विचारूं लागले व कैदही त्यास केलें. पुढें त्रिंबकजीच्या विलक्षण शिक्षेच्या धाकानें तो कैदेंतच मरण

८०. गंगाधरशास्त्री पटवर्धन व बापू मैराळ हे बडोद्याहून पेशवे व गायकवाड यांचा मागील बाकीचा लढा पडला होता तो तोडण्याकरितां इंग्रजांच्या बाहेदारीवर पुण्यास आले होते. पैकीं गंगाधरशास्त्री हे पूर्वी फडके यांच्या पदरीं होते. मैराळ हे हुल्लींच्या बडोदकर मैराळांचे पूर्वज असावे.

पोटेंजर व दु स रे व जी [खुसरूजी ?] मोधी ऐसे चार घटका दिवस राहतां राजश्री सदाशिवपंत भाऊ यांजकडे नाना फडणीसांचे वाड्यांत येऊन भाऊंशीं बोलणें केलें. श्रीमंत महाराज साहेबाचे सेवेशीं मशारनिलेनीं पत्र बापू साने यांचे हातें लिहून थैली करून बराबर आणली ती भाऊंचे हवालीं करून दोन घटका रात्रीं गेले. मोधी मागें राहून एक घटका बोलून गेले. आनंदराव मल्हार व धोंडो मल्हार बोलण्यांत होते. कप्तान फोर्ट[3] दोन वेळां येऊन मशारनिलेशीं बोलणें करून, खाना खाऊन, दोन प्रहर रात्रीं गेले. आंगरे यांजकडील कारकून प्रातःकाळीं मशारनिलेशीं बोलून गेले. मुंबई, हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें डांके बरोबर आलीं. जाब रा॥ जाले. भिकाऱ्यांस चार रुपयांचा खुर्दा मशारनिलेनीं खैरात केला—

३

तीन रोजां वर्तमान निवेदन जालें पाहिजे सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१५१] ॥ श्री ॥

सेवेशीं धोंडो गोविंद गोडबोले कृतानेक साष्टांगनमस्कार विज्ञापना ता माघ वद्य ५ तृतीयप्रहर पावेतों सुखरूप असों विशेष—राजश्री पंतप्रतिनिधी व चंदन-वंदनकर व सातारकर यांस निक्षून ताकीद झाली पा॥. वारंवार तेंच लिहितोस हें काय? अेसें कदाचित् म [नां] त येईल. त्यास स्वामींची स्वारी त्या प्रांतीं जाऊन माझा अम्मल सुरळीत चालण्याविशीं ताकीद होणें यांत मला भूषण बहुत आहे. स्वामींचे साहाजिक भाषण परंतु सेवकास महाभूषण याजकरितां वारंवार विनंती लिहितों. हेंही स्वामींचे ध्यानांत आहेच. रास्ते यांस आरब दूर करण्याविशीं ताकीद जाहली म्हणोन कळलें. फार संतोष जाहला. क्षेत्राचा उपद्रव गेला, राघोपंत सफरे म्हणून कोणी कऱ्हाडे गृहस्थ पूर्वी बाबूराव केशव यांचे पदरचे त्यांनीं सालगुदस्त बंडांत पुण्यास येऊन सातहजार रूपये भरून कऱ्हाडची मामलेदारी केली. तेव्हां ते दोषी याजकरितां मशारनिलेस धरून वैराटगडास आटकेंत ठेविले आहेत याविशीं रा॥ चिंतोपंत देशमुखांस माहीत

---

८१. सदाशिवपंत भाऊ—माणकेश्वर—टेंभुर्णीचे कुळकर्णी. पूर्वी हरदासाचा धंदा करीत. पुढें गोविंदराव पिंगळे यांचे मार्फत हैदराबादेस होते. पे० ब० पृ० २१९ टी० २५ व पृष्ठ २२९ टी० ५० पहा.

८२. कॉप्तन् फोर्ड—हा मराठी फौज मोडून इंग्रजी पलटण बाजीरावं साहेबानीं तयार केलीं होतीं त्यांजवरील मुख्य. यालाच पेशव्यांचे बखरींत 'पोट' साहेब म्हटलें आहे. पे० ब० पृष्ठ २३१ पहा.

८३. वरील दोन पत्रांवरून इंग्रजांची व्यापकता व महत्त्व हीं या वेळीं किती होतीं हें समजेल.

८४. बाजीरावींत मामलती मक्त्यानें देत असत.

पुर्नपणें आहे व सेवेशीं विनंतीही केली आहे. त्यास त्यांचा चार रूपये खंड ठरावयाचा तो दरम्यान वे।। रा। वैजनाथ भैट मामांचें बोलणें पडेल व पडतें त्यांत भाव यांस उगेंच कैद केलें, दोष नाहीं, याजकरितां त्यांस सोडून द्यावें याप्रमाणें झालें. त्यास मी आक्षेप घेतला. सरकारचे अपराधी अटकाविले आहेत. त्यास परवानगी सरकारची. ते पक्षीं परवानगी शिवाय सोडतां येत नाहींत. तेव्हां इकडे निरूपाय जाणोन वेदमूर्ती रा। मामा सरकारांत विनंती करून भशारनिलेस सोडवावयाचा उद्योग करतील व चालला आहे. सरकारांतून तें गृहस्थ सुटल्यास सरकारचे चार रूपये मात्र येणार नाहींत. परंतु बोलणें बोलतील ते मात्र मध्येंच रूपये खातील. आणि अपराध पक्का यास्तकरितां त्यास मुक्तेची परमाणगी नच व्हावी. कदाचित् सरकारचा खंड देऊन सुटत असिल्यास मग नीटच आहे. माझा ज्वर परिहारला. पंधरा दिवशीं पूर्ववत शक्ति येईल सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१५२] ॥ श्री ॥

पुरा॥ राजश्री बाबा स्वामींचे सेवेशीं. विनंती ऐसीजे. इकडील राजक्रांतीचें वर्तमान तरि जलचरांचीं[86] पळटणें बंगाल्यांतील व चिनापट्टन लगायेत गुजराथ वगैरे या प्रांतीचे दरोबस्त जमाव पलटनें सुमारी पाऊणशें केला. क स र याचा कौसल ठहरून बादबरसाद आश्वीन अखेर तयारी करून हिंदुस्थान प्रांतीं आपल्या मुकाबिल्यास येतात यांत संदेह नाहीं. जंगी सरंजाम तयार करण्याकरितां या प्रांतींचे महालानिहाय मिळोन येथें साहुकारापासून पन्नास लक्ष रूपये घेतले. वराता सावकार मारांस कलकत्याकडे लाऊन दिल्या. पोख्त सरंजाम लेश करविला आहे. याप्रमाणें तांब्रींचे[87] अधिकारी यांनीं मसलतीचे घाट बांधून स्वार सरंजाम सुद्धां येत आहेत. तरि आपण श्रीमंत महाराजांस राज्यक्रांतीचे भाव सुचवून तयारींत असावें. दुसरें येथून हो डि या नें मा व र घाट येथील मुक्कामा पावेतों माणसांची डाक रवाना जाहली आहे. हालकरे चारशें व कारकून इंग्रेजांनीं नेमून पाठविला आहे. आज पंधरा रोज जाहाले. बेटांत आपल्याकडील गृहस्थ आहे त्यांनीं तथ्य वृत्त सांगितलें त्यावरून सुचना लिहिण्यांत आली आहे. कारण कीं, सर्वांस आधार तेथील. येथील० उमेद तिळमात्र नाहीं. आतां छद्म [छनद?] करितां परंतु सिद्धीस जाणार नाहीं.

[१५३] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री आबासाहेब साहेबांचे सेवेशीं—विनंती सेवक मल्हार चिंता-

८५. वे० ब० पृष्ठ २११ पहा.
८६. जलचर=इंग्रज.
८७. तांब्र=इंग्रज.
८८. हे आबासाहेब कोण ?

मण बोधनी अकबरनीस कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना छ २५ माहे रमजान पावेतों आपले कृपें करून सरकार कामावर हजर असों विशेष. ता। वांफगांव येथील आकबार येणेंप्रमाणें श्रुत व्हावी. कलमें.

१ हुजुरींहून नारायणराव हालकारे सरकार आज्ञेवरून श्रीनेजुरीलिंगाचे * नवस फेडावयाकारितां भाद्रपद शुद्ध ७ पुणें मुक्कामीं येऊन राजश्री बाबाजी बाजीराव मामलेदार तालुके मा। हे नारायण राव बरोबर जेजोरीस जाऊन तेथें श्रीचा गोंधळ व कुळधर्म व ब्राह्मण भोजन उत्तम प्रकारचें करून देवाची पूजा अर्चा वस्त्रप्रावर्णासह उत्तम प्रकारें केली. व सर्व आश्रित, व पाध्ये वाघे मुरळी यांचा सन्मान करून बहुत चांगला समारंभ केला. आसमंतात जेजुरीचे मोठा लौकीक जाहला. या कृत्यास बारा चौदा दिवस कमावीसदार तेथें होते. नंतर नारायणराव श्रीपंढरपुरास गेले व बाबाजी पुण्यास सरकार कामावर हजर आहेत.

५. ता। वांफगांव देहे नव येथील इकडील रिवाजाप्रमाणें गांवकरी यानीं कमावीसदार यांजकडे पीक पाणीचे आर्ज्या केल्या आहेत कीं आमची पहाणी पिकाची करून नजरेस आणावें, त्यावरून का।दार यानीं कोठें कोठें कारकून पाठविले आहेत व आणखी पाठविण्याची योजना आहे. कलम.

१. नवगांवीं शेंकून पोत्याच्या चिठ्ठ्या केल्या आहेत. नवगांव मिळोन शें सवाशें रूपयांचा आकार होईलसा दिसतो. कलम.

१. १३का।। आले. येथील पाटील कुळकर्णी यांचा व रयतेचा तंटा त्रिंबकराव रामचंद्र यांचे अमलापासून वाढला दिसतो. रयतीस फूस देणार का।। मा।रच्या दोन तीन असाम्या येक गोपाळराव बारेकर व एक आनंदराव शेटे

---

८१. वांफगांव ता० खेड-हा गांव पूर्वी होळकर यांचा. परंतु त्याचा मोबदला होऊन हल्लीं खालसा आहे. येथें होळकरांचा तटबंदी वाडा गांवकुसू वगैरे आहे. गांव नदी व ओढा यांच्या चिमटयांत आहे. होळकरांचा वाडा मोडला आहे तथापी एक दिवाणखाना दुमजली शाबूत आहे. व त्यांत खालीं विष्णूची गरुडारूढ मूर्ती स्थापिली आहे. दुसरी एक गंडकी शिळेची लक्ष्मीनारायणाची मूर्ती आहे ती सवालाख रुपये खंडणी बदल होळकरांनीं राजस्थानांतुन आणिली असें सांगतात.

* मल्हारी व म्हाळसा यांचीं दोन लिंगें असून खेरीज मूर्तीही असतात. मल्हारी हा महादेवाचा अवतार.

९०. जेजूरीस पेशव्यांचें जुनें तळें व तेथील पाणी बागेस नेण्याकरितां केलेला खजिना व मळ, होळकरांचें तळें, जेजुरीनाथाचें तटबंदी देऊळ, आंतील सुवर्णाच्या व रुप्याच्या मूर्ती, व मल्हारराव होळकर यांचें देऊळ व आंतील त्यांची व त्यांच्या स्त्रियांच्या संगमरवरी पाषाणाच्या मूर्ती या गोष्टी पहाण्या जोगत्या आहेत. येथें मार्गशीर्ष, माघ व चैत्र या महिन्यांत यात्रा भरते.

९१. शकुन पोतें (याच्या चिठ्ठ्या)— 'शकुन पोतें' ही एकाप्रकारची पट्टी असावी.

९२. कमाविसदार.

व एक नारायण पा। भुजबळ हे त्रिवर्ग आणीक एक दोन असे मिळोन असे रयतेस बिछडून कुभांड गांवांत मोठें मांडलें आहे. रात्रंदिवस कचेरी दरबार साहेब लोकांपर्यंत अर्ज्या रयतीकडून देऊन पुढें बोलण्यास आपण होऊन तकरार कुभांड करीत आहेत. पाटील कुळकर्णी यांजकडे विशेष दोष आहे असें नाहीं. परंतु कुळकर्णी यानें लिहूं नये, गांवांत पाटलानीं कामांत येऊं नये, असे नाना प्रकारचे तकरारी करून मोठा बखेडा मांडला आहे. अशा खटल्यानें कामदार यास रात्रंदिवस मोठी दगदग पडून वसुलाशीही हरकत गु।। ही अखेरसालपर्यंत केली असें दिसोन आलें. यंदाही तसाच प्रकार दिसण्यांत येतो. याविशीं साहेबांकडे यादबिद देऊन बंदोबस्त करण्याचे तजविजींत अक्षयी आहेत. परंतु बारेकर वगैरे तीन असाम्या यांचा बंदोबस्त इंग्रज सरकारांतून अगर आपले सरकारांतून जाल्या वांचून गांवचा बखेडा मोडत नाहीं असें दिसतें ही मोठी जिकीर आहे. कलम.

सदर्हू कलम लिहिल्याप्रमाणें मनन होऊन उत्तरास आज्ञा जाहली पाहिजे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१५४] ॥ श्री ॥

श्रीमंत राजश्री भाऊ स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक लक्ष्मण बल्लाळ साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशळ ता। छ २६ र।। वल मुक्काम वीरगांव पें।। आकोलें यथास्थित असे. विज्ञापना पें।। दिंडोरीकडे बातमीस स्वार पाठविले होते. व र।। पत्तेसिंग काळे याजकडे जासूद पाठविले होते. दोहोंकडून तहकीक वर्तमान आलें कीं, जयराम मोरेश्वर सुटले. खांसा कामास आला. येविशीं फत्तेसिंग काळे यानीं मजला पत्र लिहिलें त्याची नक्कल सेवेशीं पाठविली असे. त्याजवरून सेवेशीं विदित होईल. मातुश्री उमाबाईकडील वर्तमान तरि नाशिकावरि आहेत. परंतु गंगातीरीं मौजे निफाड पें।। चांदवड येथें मीर महमद बाकर नाशिकचा अमीन हजार बाराशें फौज सुद्धां अकस्मात् सेनापतीचें कूच होऊन पुढें जाणार. येका दो दिवशीं जातील. सेवेशीं कळावें म्हणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

[१५५] ॥ श्री ॥

र।। विसाजी देवराव गोा यासीं—

सुरूसन सलास आशर मयातैन व अलफ शेखचांद शिलेदार यास सरकारांतून बक्षीस रूपये ५०० पांचशें पाठविले असत. तरि त्यास देऊन पावती घेऊन हुजूर पाठवून देणें. जाणिजे. छ २१ जा।वल असलपत्र बाळाजीपंत

कारकून नि॥ त्रिंबकजी डेंगळे यांजकडे देऊन डाकेबरोबर लष्करांत रवाना केलें. छ २३ जा॥वल सु॥ सलास अशर मयातैन मु॥ नाशिक.

[१५६] ॥ श्री ॥ पै॥ छ २० जा॥वल सीत.

राजश्री अमृतराव स्वामींचे सेवेशीं–

विनंती उपरि तुम्ही छ ६ जा॥वलचें पत्र पाठविलें तें पावलें. मालीट इंग्रज आज श्रीमंतांचे दर्शनास आला होता. अगोदर त्यांनीं कचेरीस यावें. नंतर श्रीमंतांनीं यावें असा बेत करून भेठ जाली. मालिटास मात्र भेटले.. नजराणा केला. त्याची याद पाठविली आहे. मालीट पर्वतीचे रमण्यांतचं राहिला अहे. बायका वगैरे वाड्यांत राहिले म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास बेत अगोदर त्यांनीं यावें, नंतर श्रीमंतांनीं यावें, असा करून भेट करविली. उत्तम केलें. नजराण्याची यादी पाहिली. पुण्यांतील नेमणुकेचे फौजेस रोजमरा वाटावयाचें लिहिलें त्यास एक दुमाही व दोन आठवडे द्यावे रा॥ छ १४ जा॥वल हे विनंती.

[१५७] ॥ श्री ॥

पै॥ छ १८ मोहरम सन खम्मस अशर

साहेब साहेबांचे सेवेशीं. आज्ञांकित बयाजी नाईक विज्ञापना. मेस्त्र इलफिस्टन वकील दिम्मत इंग्रज कलकत्तेकर यांजकडील दिनचर्येची बातमी–

१. छ १ मोहरमचें वर्तमान–मशारनिले प्रातःकाळीं गणेशखिंडी पावितो नाऊन सहल करून आले. गोपाळ खंडेराव रास्ते यांजकडील कारकून प्रातःकाळीं मशारनिलेशीं बोलून गेले. जिऊबाई भानूकडील कारकून मेस्त्र रसल याशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री यांजकडील नासूद एक लखोटा घेऊन आला. तो मुंबईचे डांकेवर रवाना करावयास मशारनिले जवळ पावता करून गेला. मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें डांकेबरोबर आलीं. जाब रा॥ जाले.

१. छ २ मोहरमचें वर्तमान–मशारनिले व कपतान कलोस वगैरे पांच असामी प्रातःकाळीं गारपीरचे लष्करांत जाऊन तेथून घोरपडी पावेतों सहल करून आले. खुसरवजी मोधी येऊन मशारनिलेशीं दोन घटका बोलणें केलें. कप्तान कलोस व मेस्त्र रसल व बापूजी गोपाळ साने बोलण्यांत होते. नंतर निघोन आदितराम साहुकार यांचे येथें जाऊन घरास गेले. करवीरकारांकडील कारकून मशारनिलेशीं बोलून गेले. गंगाधर शास्त्री यांजकडील आगशीकीरस्ताई मेस्त्र रसल याशीं बोलून गेला. पांडोबा नाईक पिपडी करवीरकरांकडील पत्र घेऊन आले. तीं थैली मशारनिलेस पावती करून दोन घटका

बोलून गेले. बोलून गेले. बरोबर आलीं. जीऊबाई भानू कडील कारकून व प्रभाकरपंत जोशी मोधीशीं मुंबई व हैदराबाद व श्रीरंगपट्टण व बऱ्हाणपूरचीं पत्रें डांके जाब रा॥ जाले. श्रीरूरनजीक लष्करचे छावणीचे गीर्दन-वाईस पेंढारी येऊन उपद्रव केला. म्हणोन छावणींतील टोपकारांकडून डांके बरोबर बारा घटका रात्रीं मशारनिलेस पत्र आलें. एक टोपकर व दहा शिपाई छावणीनजीक जखमी जाले. अशी बातमी आहे. हैदराबादचे डांकेस इंग्रजाकडील जासूद आहेत त्यांस मौजे चिंचोली येथील टप्यावरील जासूद डांकेचीं पत्रें घेऊन येत होता, त्याची पेंढाऱ्यांची गांठ पडून पेंढाऱ्यांनीं भाला मारिला. जासूद जखमी झाला. म्हणोन मशारनिले कडे बातमी आली. कप्तान फोट मुंबईस गेले होते ते बोर घाटावर खंडाळ्याचे मुक्कामीं आले, म्हणोन दापोडीचे छावणींत बातमी आली. त्याजवरून छावणींतील टोपकारांनीं लौकर येण्याविशीं पत्र पाठवून डांक बसावयास घोडे रवाना केले.

२

दोन रोजां वर्तमान निवेदन जालें पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

[१५८] ॥ श्री ॥

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी–

विनंती उपरि सालमजकुरीं स्वारी पुण्यांत असतां कोण कोणते महालांच्या रसदा करार जाहाल्या, व स्वारी निघाल्यावर कोणते महाल विल्हेस लागले, त्या पैकीं तूर्त यावयाचा ऐवज कीती व मुदतीचा ऐवज कीती त्यापैकीं पोतां ऐवज जमा कीती जाहला व बाकी काय तें लिहून पाठवणें व पोत्यास ऐवज येऊन बाकी ऐवज तूर्तचा व मुदतीचा राहिला तो झाडून पोत्यास जमा करणें व ज्या महालांच्या रसदा घेणें असतील तेही महाल विल्हेस लाऊन ऐवज घेणें. लिहिले प्रमाणें आधीं करणें. रा॥ छ ५ रा॥वर. सारांश ऐवज रसदेचा पोत्यास जमा करणें. मुदतीचा ऐवज रसदेपैकीं किती त्यास या ऐवजापैकीं पोत्यास आणिल्यास व्याज किती पडतें हें सविस्तर लिहून पाठविणें. रा॥ छ ४. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[१५९] ॥ श्री ॥

अखंडित लक्षुमी अळंकृत राजमान्य राजश्री जिवाजी रघुनाथ गोसावी यांसि–

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ समान सबैन मया व अलफ. राजश्री बाबूराव केशव मजमदार पेंा॥ सिंदखेड यांणीं हुजूर विदित केलें कीं, रा॥ मल्हारराव रामकृष्ण याजकडे पेंा॥ मा॥ची मामलत सन खमसांत होती. त्या वेळच्या आमच्या वेतनाचे वगैरे व्याज सुद्धां रुपये ४५० साडेचारशें येणें आहेत

ते मागतों. परंतु देत नाहीं. त्यास हल्लीं सरकारांतून मल्हारराव रामकृष्ण यांस रद्द करण्याच्या ऐवजीं वरात बाबती नांदेड येथें दिल्ही आहे. त्यापेक्षां देवावे म्हणून त्याजवरून हें पत्र तुम्हांस सादर केलें असे. तरि मशारनिलेचा वेतना-बाबत वगैरे बाकी असेल तो वाजवीचे रुईनें वजा करून सदर्हू ऐवज पै॥ घेणें. ऐवज मशारनिलेस देणें. जाणिजे. छ १ जिलकाद आज्ञाप्रमाण. लेखनसीमा.

[१६०] ॥ श्री ॥

पै॥ छ १७ माहे रमजान सन १२०० .

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री गोविंदरावजी स्वामींचे सेवेशीं—

पोष्य बळवतराव भवानीशंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ तागायत छ १ माहे रमजान मुक्काम हुमनाबाद जाणोन स्वकीय कुशळ लिहीत जावें विशेष. श्रीमंत महाराज यजमान साहेबीं राजश्री तात्या यांजकडे फौज सुद्धां रवाना केलें तेव्हां आज्ञा हेच कीं, तात्यांची व हजरतीची भेट होणार त्या पूर्वी तात्यांजवळ जाऊन पोंहचावें. त्यांचे विचारें नवाब बंदेगान अल्लीची भेट व्हावी. त्यास लोकांचे स म जो त्या स [समजुतीस ?] चार दिवस अधीक त्राशीमाबर लागले. यांत तात्यांची व हजरतीची भेट होऊन मसलहत प्रकरणीं बोलणें होऊन तात्या यांची स्वारी पुढें कृष्णा उत्तरून गेली. त्यास त्वरेनें तात्यांजवळ जाऊन पोहचण्यास मार्ग हुमनाबादेचा नीट जाणून येथपर्यंत येणें जाहाले. त्यास नीट मार्गें येतां हजरतीची स्वारी मध्यंतरी आहे. पृथक भेटीचें तो प्रयोजन नाहींच. इकडील वाजेकरी [?] व या दौलतीची कळकळ तात्यांस व आपणांस आहेच. तात्या यांचे व हजरतीचे भेटीचे प्रसंगीं इकडील मतलब उगविलेच असतील. प्रत्येक आम्हांस काय बोलावयाचें आहे. त्यांस मार्ग जवळून तेव्हां परस्पर जाणें हें चांगलें. किंवा वीस पंचवीस कोशीं असतांना एक दिवस राहून सरासरी भेट घेऊन जावें. जैशी येविशीं करीन [?] सल्लाह असेल त्याप्रमाणें सूचना व्हावी. हा मार्ग सोडून जावें तरि दिवसगत लागेल. वासना तो तात्यांजवळ सत्वर जावें हेच. तूं यजमानाची आज्ञा याचप्रमाणें. सर्वात्मना यजमानांचा विश्वास आपले ठायीं तेव्हां उचित प्रकार जो असेल तोच आपण लिहीतील. येविशींची विनंती तात्या यांस लिहिली आहे. या उपरि जाण्यास दिवस बहुत थोडके राहिले. पत्राचीं उत्तरें सत्वर यावींत. त्याप्रमाणें येथून घडण्यांत येईल. बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि कीजे हे विनंती[९३].

---

९३. पत्रें अक ५० ते ५२ तीन व ६० पासून तों या पत्रापर्यंत सर्व पत्रें रा० रा० दत्तो विनायक खाडिलकर यांजकडून आ-
(पु० चा०)

[१६१] ॥ श्री ॥

पु॥ राजश्री मल्हारजी होळकर व राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि—

आशीरवाद उपरि. नासरजंगास हिदायतमोहीदीखानाकडे पठाणांनीं भेदून नासरजंगास मारलें. हिदायतमोहीदीखान औरंगाबादेकडे येऊं लागला. तेव्हां आम्हीं जप्ती केली. औरंगाबादेजवळून रुपये घेतले. याजमुळें मोंगलानें विषम मानिलें. तेव्हां तुम्ही जयनगरापाशीं होतेसें. तेव्हां वारंवार पत्रें पाठविलीं कीं, गाजुदीखान इकडे येतील तर उत्तम. तुम्हींही यावें. सा सुभे दक्षिण सोडवावी. अथवा गाजुदीखानास आणावें. त्यास स्थापावें. त्यापासून एखादा तरी निदान सुभा घ्यावा. कर्ज वारून घ्या [वें.] येणेंप्रमाणें करावें. तेव्हां तुम्ही न आलेसें. वजीराचे कामावर[१७] गुनत[१८] चाललेसें. आम्ही खामखा[१९] आणावें तर तुम्ही कामास चाललेस. श्री इच्छेनें हिदायतमोहिदीखान व पठाण भांडून हिदायतमोहिदीखान मेला. आम्ही जवळ गेलों. परंतु मागें बापू * भिंवराव मोडले. याजमुळें शह पडला. व आम्हांजवळ फौज थोडी. सोबत्याचा भरंवसा नाहीं. उन्हाळा दिवस. जानोजी निंबाळकर तेव्हां केवळ रामदासपंताचे लेकें[२०]! त्यांनीं थोडया बहुतावर आम्हांस समजाऊन त्याजवर उपकार करून मजकूर विल्हे लाविला. आम्हांस गाईकवाडास जरब देणें जरूर यास्तव आम्ही दरमजल सातारियाकडे आलों. तुम्हीं वजिराचे कामावर मोठी मेहनत, मोठें जोखींव, केलें. प्रांतही सुटला. परंतु मनसब्याचा जमाव[१००] बसवून कांहीं पठाणास देऊन, कांहीं आपण घेऊन, रंग भरून माळव्यांत यावें, ते गोष्ट तेथील मुरवतीमुळें न जाहाली. एकदेशी मनसबा जहाला. आम्हीं गायकवाडाचें पारपत्य केलें. तुम्हांस नाना

(मागील पृ०.)

म्हांस मिळालीं. हीं बहुतेक अस्सल होतीं. खाडिलकर यानीं पाठविलेल्या पत्रांपैकीं आणखी कांहींच्या नकला आह्मांपाशीं आहेत, पण तीं इतिहासाच्या कामास विशेष उपयोगी पडतील असें वाटत नाहीं. छापिलेल्या पत्रांपैकीं बहुतेक शिक्के मोर्तब झालेलीं अशीं होतीं. कांहींवर तर खुद खाशांचीं हस्ताक्षरें होतीं. एकंदर ह्या पत्रांपासून इतिहासजिज्ञासूंस पुष्कळ माहिती होईल यांत संशय नाहीं. सबब रा० खाडिलकर यांचे आह्मां महाराष्ट्र जनांवर मोठे उपकार झाले हें सांगणें रास्त आहे. अस्सल पत्रें त्यांजकडे परत केली.

१४. हिदायत मोहिद्दिन=मुजफरजंग.

१५. 'होतेस' असाच द्वितीयपुरुषीं अनेक वचनी प्रयोग ह्या पत्रांत जरेच जागीं केलेला आहे.

१६. वर टीप १५ पहा.

१७. वजीराचें काम–अयोध्येचा सफदरजंग याजला रोहिले लोकांचा सूड उगवावयाचा होता तें काम.

१८. खामखा=जरूरीनें, कसेंही करून.

* हे बापूजी भींवराव कोण ?

१९. निंबाळकर फितूर झाल्यावरून त्यांस असें लाहलें आहे.

१००. जवा बसवून=ठाकठीक करून.

प्रकारें लोकांनीं दर्शविलें कीं, यांनीं बेइमानी, दगाबाजी केली. परंतु ईश्वर साक्ष आहे. मोठे मोठे मराठे, मोठे कारभारी, यांनीं त्याचें घर बुडविलें. नाहक चढीं लाविलें. आम्हांशीं कबूल करून मागती चौथे दिवशीं फिरावें यामुळें बंदीखाने, गड सर्वही प्राप्त त्याचे कर्मानुरूप प्राप्त झालें. असो, एतद्विषयीं विस्तार कशास? परंतु आईसाहेबांशीं विरुद्ध वाढलें. आईसाहेबांचे मतें सर्व प्रकारें आम्हांस मोडावें, रामदासपंताचे पुतण्यांस पेशवाई द्यावी, त्यांनीं आम्हांस बुडवावें, दाभाडे यांणीं त्यास मिळावें, प्रतिनिधीनीं त्यांस मिळावें, रघोजीबाबांनीं त्यांस मिळावें, ऐसा पूर्ण भाव. पावसाळां हीं राजकारणें परस्परें शफथपूर्वक घाटलीं. परंतु आईसाहेबांस गडावर एके दिवसाचें खावयास नाहींसें जाहलें, याजमुळें बाह्यात्कारें मात्र आम्हांशीं सलूख करून खालीं उतरलीं. आम्हीं विचार केला कीं, केवळ विरुद्धाचा लौकिक आहे तो वारावा. मनांत कांहीं तरी त्यांचे असो. जशी आमची क्रिया असेल तसें फळ आम्हांस होईल. जशीं तीं चालतील तसे आम्ही चालूं. ऐसा सिद्धांत करून सलूख केला. प्रतिनिधीस प्रतिनिधी करार केली. परंतु आंत सर्वांचे मनसबे घांटून तयार जाले. आम्ही पंचवीस लक्ष कर्ज मात्र नवें करून फौज नवी पंधरा व जुनी चाळीसें येणेंप्रमाणें ठेविली. त्या उपर रामदासपंत आले. प्रथम आमची फौज जमा झाली नव्हती. छापा घातला. दुसरें जुंझ उत्तम झालें. त्याजवर

---

१. ताराबाईच्या कारस्थानांत गायकवाड सामील झाले म्हणून त्यांस पेशव्यांनीं विश्वासघात करून कैद केलें, हा जो आरोप पेशव्यांवर आहे त्यांचें निराकरण येथें त्यांनीं केलें आहे.

२. नाहक चढीं लाविलें=(आमच्या विरुद्ध आचरणाची) फुकट भर दिली

३. कबूल काय केलें होतें व फिरले कसे हें येथें स्पष्ट लिहिलें नाहीं. दुसरे कोठेंही ही गोष्ट लिहिलेली आढळत नाहीं. तथापि गायकवाडानें कांहीं धरसोड केल्यावरून त्यास कैद करणें प्राप्त झालें असा या पत्राचा आशय स्पष्ट दिसतो. यां० ड० याजबद्दल कांहीं लिहीत नाहींत तेव्हां त्यांस ही गोष्ट माहीत नव्हती असें दिसतें.

४. आई साहेब=ताराबाई.

५. या वरून ताराबाई व दुसरी मंडळी मिळून बाळाजी बाजीरावास पदच्युत करण्याचें कारस्थान उभें केलें व त्यांत हैदराबादकरांचा दिवाण जो रामदासपंत यासही सामील केलें होतें असें दिसतें. रामदास पंत (राजा रघुनाथराव) यांनीं ताराबाईकडे बोलणें लाविलें होतें व त्याचें पत्र गोविंदराव चिटणीस यांचे हातीं पडलें यावरून ही गुप्त मसलत पेशव्यांस कळली, इतकेंच यां० ड० लिहितात. पत्रांत आशय काय तें लिहीत नाहींत. पंताच्या पुतण्यास पेशवाई देण्याच्या बेताबद्दलही ते कांहीं बोलत नाहींत.

६. दाभाडे, गायकवाड, भोसले, प्रतिनिधी हे सर्व पेशव्यांच्या घराण्याचें वाईट पहाणारेच होते.

७. येथें ' हजार ' या शब्दाचा अध्याहार समजावयाचा.

८. या वेळीं डुप्ले फराशीस याची पलटणें रामदासपंताबरोबर होतीं.

सलाबत[१] बसली. इत्यादिक[मजकूर] जगाविख्यात व इकडील पत्रावरून तुम्हांस अवगत होत गेले. वारंवार लिहिलें कीं, " लक्षा प्रकारें यावें. वजिराची अब्रू राखिली व आमची गमावली हें कामाचें नाहीं. तुम्ही दौलतेचें स्तंभ[२], राज्यांत खेळ फार झाले आहेत, खामखा यावें. जे मेहनत तुम्ही वजिराचे कामासाठीं केली ते मेहनत येथें येऊन जलदीनें कर्तेसं[३] तर बहुत लाभ होता. परंतु तेथें कामामुळें [४]वं इरेमुळें शह पडला. तुमचें येणें, दोन महिने वाट पाहिली, न जहालें. शेवटीं जानबा[५], सैद लष्करखान केवळ बजीद[६] जहाले कीं, खामखा सलूख करावा. तेव्हां सलूख केला. त्रिंबक एका महिन्यानें द्यावा ऐसें कबूल केलें. कां कीं, तुम्हांस पत्रें गेलीं आहेत, तुम्ही यालच, तुम्ही आलियावर जें तुमचे विचारें होईल तें करावें. व गुजराथचें काम अगदीं बुडतें, खर्चास अगदीं नाहीं, मोंगलांची[७] आग भारी, सरदार कोणी मनापासून अगदीं मेहनत न करीत, एक चिरंजीव उभयतांनीं मात्र खटपट करावी. ऐसे अनेक प्रकार घरावू[९] जाणून सलूख केला. परंतु अंतर शुद्ध नाहीं. आम्हांजवळून रघोजी बाबा मोंगलाकडे गेले. मोंगलांनीं त्यांस जाहागीर करार करून क्रिया घेऊन आपलेसे केलें. बाबूजी[२०] नाईक यांचें कर्नाटक काढून आम्हीं घेतलें. [ते] याजमुळें दुःखी. लटकें फटकें बोलून आशेस लावून दोन वर्षें आम्हीं वोढिलें. परंतु ते या उपर जाणार. आईसाहेबांजवळून कर्नाटक करून घेणार. रामदास पंताजवळून नाल बंदीस रूपये घेऊन तिकडे जाणार. ते हे एकत्र होणार. प्रतिनिधी

---

१. सलाबत=जरब, पगडा.

१०. रोहिल्यांस मोडून सफदरजंग याचे हेतु सिद्धीस नेले व त्याचा आब राखिला त्यास उद्देशून हें लिहिणें आहे.

११. शिंदे होळकर पेशव्यांच्या उपयोगी कसे पडत व पेशवे त्यांस कसें जाणत हें यावरून स्पष्ट होईल. " दौलतेचे स्तंभ " हा गौरव योग्य असून सेवकांचे बाहु स्फुरविणारा होता यांत संशय नाहीं.

१२. 'करतेत' असावें. वरटीप १५ पहा.

१३. इर्र=ईर्ष्या, काम करून देऊं असें वचन.

१४. जानबा निंबाळकर. सरलष्करखान हा औरंगाबादचा सुभा हा बाळाजी रावास व गाजुद्दीखानास प्रथम पासून अनुकूळ होता.

१५. बजिद होणें=आग्रह करणें, गळीं पडणें.

१६. त्रिंबक येथील किल्लापेशव्यांनीं घेतला होता तो परत नबाबास द्यावा.

१७. खुसी मोंगलाकडे होता. त्याचा तोफखाना फार जबर असल्यामुळें थोडया फौजेनें ठिकाव लागेना. हें एक कारण. हीं तह करण्याचीं कारणें लक्षांत ठेवण्या जोगीं आहेत.

१८. उभयतां चिरंजीव म्हणजे दादा व भाऊ हे असावे.

१९. घराऊ=घरगुती, स्वपक्षाकडील, आपल्या राज्यांतील.

२०. बापूजी नाईक बारामतीकर यांजकडे कर्नाटकचा सुभा होता तो त्यांजकडून शाहूनें काढून सदाशिवराव भाऊ यांस दिला होता. यावरून नाईक हे पेशव्यांचे नातेवाईक असूनही त्यांच्या वाइटावरच होते.

ही वाढले. गोविंदरायाचें[21] सरंजाम घेतला. वरकडही किरकोळ कामें केलीं. शेरे[22] जहाले. त्यांचीं हीं राजकारणें कीं, नाईक आम्ही एकत्र होतों. कर्नाटकास येतों. रामदासपंतांनीं आणखी फिरंगी[23] गाडदी ठेवावे. खांमखां[24] आम्हांवर मनसबा[25] मागती करावा. बाह्यात्कारें सलूख कांहीं दिवस दाखवावा व मागें जानबा आमचे मित्रें[26] पुणियांत तीन महिने येऊन बसले. नित्य आम्हांस म्हणत कीं, " मोंगलाजवळ तुम्हीं नवी जागीर मात्र न मागावी, म्हणजे आम्ही त्यांची तुमची पूर्ण निखल [स] ता करून देतों. " लहान सहानें[27] आम्हांस लिहीत कीं, " हें सर्व लटकें. हे एकाएकीं येऊन तुमचीं घरें जाळतात. " आम्हांस वाटे कीं, " लोक-आफवेवर काय आहे ? व जानबा आमचे मित्र आहेत, सहसा आम्हांस फसवणार नाहींत. " शेवटीं जें जहालें तें दृष्टीस पडलें. बहुत लोक म्हणतात कीं रामदास पंतानें जानबा यास कामासाठीं पाठविले कीं, तुम्हीं स्नेह मानून गाफील रहावें. जानबा तो दाखवितात कीं, त्यानें लबाडी केली. असो. याचा अंत ईश्वर जाणें. एकदा मात्र तुम्हांस लिहिलें होतें कीं, याउपर गाजुदीखानाचें येणें कामाचें नाहीं. यांचा आमचा स्नेह होत आहे. परंतु बिघाड जहाल्यापासून निरंतर हेंच लिहितों कीं, " खामखा गाजुदीखानास आणावें. वजीराचा लेक सुभा करून आणिला तर मागें कुचेदे[29] दिल्लींत करितीलं[30]. व येथें मोंगल, मराठे भेटणार[31] नाहींत. गाजुदीखान आलिया सहल[32] पडेल. मोंगल व मराठे मातबर सर्व बराणपुरावर येऊन भेटतील. एक फिरंगी गाडदी नवी फौज मात्र[33] राहील. पठाण[34] कर्नाटकांत बलावले आहेत[35]. महमद अल्लीखानें[36] त्रिचनापल्लीस बलाविला आहे सर्व गाजुदीखानास अनुकूळ पडतील. दुसरें, तुम्ही तिकडून, गाजुदीखान दहा पंधरा [हजार,] आम्ही हिकडून, येणेंप्रमाणें मनसबा उभा राहातांच सर्व कामें होऊन जा

---

२१. गोविंदराव चिटणीस असावे. हे पेशव्यांच्या पक्षांत होते.

२२. शेर=समर्थ, जबरदस्त.

२३. येथें फिरंगी म्हणजे फ्रेंच.

२४. खामखां=कसेंही करून, सर्व यत्न करून.

२५. मनसबा=स्वारी, हल्ला.

२६. 'मित्र' ही व्याजोक्ति आहे. मित्र म्हणविणारे पण खरे शत्रु.

२७. लहानसहान=सरदार, जाहागिरदार

२८. वजीराचा लेक सुजा जहवला.

२९ कुचेदे=खटपटी, कारस्थानें.

३०. गाजुदीखान यांस आणिल्यास पाठीमागें ते दिल्लीस कारस्थान करतील, असा भाव.

३१. वजिराचा पुत्र सुजा यास दक्षिणचा सुभा करून आणिल्यास त्यास इकडील मुसलमान अगर मराठे अनुकूळ होणार नाहींत, असा भाव.

३२. सहल=सोपें, सोईचें.

३३. फ्रेंच व दुसरी नवी फौज.

३४. पठाण—हे कर्नोळ, कडपा व सावनूर येथील नबाब असावे.

३५. महमदअल्ली हा अर्काटचा नबाब.

तीळ. सारांश रामदासपंतानें अब्रू घेतली ही एकदा हरतऱ्हेनें करून त्यास पुर्ती नरबेंद देणें घडल्यावांचून तुह्मांस कैलासवासी यांणीं वाढविलें, व तुह्मी इराण तुराण पावेंतो लौकिक केला, तो सर्व व्यर्थ ! आम्ही ही रा. यांचे वंशीं व्यर्थ जन्म घेतला. या उपरि तुम्हीं खांमखा त्यांसी आणावें अथवा त्यांनीं दसरा करून मागून यावें. तुम्हीं खामखा देशास यावें. शपथपूर्वक हा मनसबा करावा तरच उत्तम आहे. मागें यावें यावें हें लिहित गेलों. न आलां. आतां त्याचा पुढील रंग जाणून सर्व विस्तारें लिहिलें आहे. याउपर यात संशय नाहीं. या पत्राचें उत्तर यथार्थ सत्वर पाठवणें. गुजराथचे कामास फौज गेली. श्रीकृपेनें काम होत चाललें. जेव्हां म्हटलें तेव्हां जवळ आहे. या उपर गाजुद्दीखानास पूर्ण भरंवसा देऊन वजिराशीं लगाम राखून शेवटीं न तोडितां दक्षणचे कामास उपयोगीं पडत तें करून यावें. सर्वस्व वेंचून एकदा रामदासपंत मोडांवा. ते आम्हांवर मनसबा करितात यांत संशय नाहीं. तुम्हीं हल्लीं लिहिल्याप्रमाणें कोलिया सहजच ते हतप्रभ होऊन मोठें यश तुम्हांस येतें. या उपर तुम्ही न आलिया मनसब्यास वाईट, मनास वाईट, यास्तव मनसबा सिद्ध करून यावें. कदाचित् गाजुद्दीखान नामर्द, फौज न ठेवी, बाहेर न निघे, तर दुसरा कोणी पंधरा हजारांचा धनी आणावा. निदानीं तुम्हीं यावें. येथेंही फौन फार आहे. रामदासपंतास तुम्ही आम्ही एकत्र नहाल्यास अंगाष नाहीं. रघोजी बावाही येतील. लाभही उत्तम होईल. हें सर्व मनन करून उत्तर सत्वर पाठवावें. येथेंही तरतू [द] करीत आहों. ऐवजाची मात्र मोठी चोढ आहे. तुम्हीं आलिया सर्व वारेल. सांप्रत नवें वर्तमान कीं, त्रिंबकें आम्ही न दिला यासाठीं रामदासपंत औरंगाबादेस येणार. मग किल्लाही कदाचित् देणें पडेल. नागीरीचा जाबसाल त्याकडूनही अद्याप जहाला नाहीं. मोठा लबाड दगाबाज आहे. सारांश एकदा त्यास जरब द्यावी तरच सर्व सार्थक आहे. छ २१ जमादिलावल. लेखनसीमा. पौ छ ३० जमादिलावलें.

---

३६. जरबदेणें=खोड मोडणें.

३७. कैलासवासी बाजीराव बल्लाळ.

३८ यावरुन आपणास जो तह कराया लागला त्यानें व मराठेशाहींत रामदासपंत जो ढवळाढवळ करीत होता तिनें बाळाजी रावांस फारच संताप आला होता असें दिसतें.

३९. गाजुद्दीखानास.

४०. सफदरजंगाशीं स्नेहभाव ठेवून.

४१. पेशवे फारच हरेस पडले होते. वर

द्वीप १८ पहा.

४२. रामदासपंतास मोडण्यास कठीण नाहीं असा भाव.

४३ कबूल केलें (वर पहा) पण देण्यास उशीर लाविला असा भाव ?

४४. हें पत्र मोठ्या कारस्थानाचें आहे. पेशव्यांवर अनेक संकटें उत्पन्न झालीं असतां त्यांतून साम दाम दंड भेद यांणीं ते त्यांतून कसे पार पडले वगैरे गोष्टी या

(पुढें चालू.)

[१६२] श्री.

राजश्री जयाजी शिंदे गोसावी यांसि

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेही बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित असिलें पाहिजे. विशेष. तुम्हीं जयनगहून निघालियावर एक पत्र आलें त्या आलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तुमची व नवाब बँजीर यांची भेटी जाली, यमुना पार होऊन कादरगंजा जवळ दहा हजार पठाँण सरदार सुद्धां बुडविला, तेंही वर्तमान परभारेंच येऊन पोचलें. तदोत्तर अहमदखा पठाण बंगस प्रयागास म्हसँरा करून होता तो उठऊन फरोखाबादेस येऊन लढाईस नमुँद जाहाला. त्याची तुमची लढाई सुरू जाहली. अहमदखा बंगशानीं फरोकाबाद सोडून गंगातीरास बेहँडा अडचण जागा पाहून आरँबा रचून त्याची तुमची नित्य लढाई होऊं लागली. तथापि वर्तमान लिहिलें नाहीं. याजवरून अपूर्वता, आश्चर्य वाटलें. प्रस्तुत राजश्री दामोदर मँहादेव यांचें पत्र छ ७ जमादिलावरचें छ ५ रजबीं येऊन पावलें कीं, "अहमदखा बंगस बाहादूरखां रोहिल्यास शरण जाऊन त्यास दहा बारा हजार स्वार व प्यादे यांजसीं कुमकेस आणिलें. सँरेदारांची फौज व जाँटाची फौज व नवाब वजीराची फौज गंगापार होऊन छ ३ जमादिलाखरीं लढाई जाली. बाहादुरखां रोहिला बुडविला. हजारों घोडीं घेतलीं. हत्ती पाँडाव केले. हें वर्तमान बंगसानीं ऐकून घाबरा जाला. दुसरे दिवशीं पळून गंगापार गेला. लष्कराच्या लोकांनीं घोडीं पाडाव फार आणलीं. तोफखाना पाडाव केला." म्हणोन लिहिलें तें श्रवण होऊन संतोषा-

---

(मागील पृ०.)

वकम चांगल्या लक्षांत येतील. गाजुद्दीखानाच्या मसलतीचा हेतु हा होता कीं, दक्षणचा सुभा आपले कब्जांत राहवा, किंबहुना पुढें मागें सर्व दक्षण आपले अमलांत यावी

हें व पुढील ४ मिळून पांच पत्रें रा० रा० काशिनाथ कृष्ण लेले इदुरकर यांनीं आम्हांस दिलीं. हीं सर्व असल आहेत. वरील पत्रांतील शेवटचा वराच मजकूर खुद खाशांच्या हातचा आहे. आम्ही नकला घेऊन असल पत्रें लेले यांजकडे परत केली.

४५. नवाब वजीर=अयोध्येचा नवाब सफदरजंग.

४६. प्रथम अफगाणिस्थानांतून जे मुसुलमान आले त्यांस पठाण म्हणण्याचा प्रघात आहे.

४७. म्हासरा म्हणजे? आसरा तर नव्हे?

४८. तमूद=सज्ज, उद्युक्त.

४९. बेहड=नाल्याच्या प्रवाहामुळें झालेली खोल भेग.

५०. आराबा=तोफखाना.

५१. हे कोण?

५२. शिंदे होळकरांची.

५३. सुरजमल जाट.

५४. पाडाव केले=धरिले.

च्या कोटी[५५] जाहल्या. शाबास तुमच्या हिमतीची व दिलेरी-रुस्तुमीची[५६] ! व शाबास लोकांचो ! आमिच्या दक्षिणच्या फौजांनीं यमुना गंगा पार होऊन रोहिले पठाणांसीं युद्ध करून आपण फत्ते पावावें हें कर्म लहान सामान्य न जालें ! तुम्ही एकनिष्ट, कृतकर्मे सेवक. या दौलतीचे स्तंब आहां !! जें चित्तावर धरितां तें घडून येतात. पहिलीं यशावह कर्में संपादिलींत ततोद्यधिक हें यश संपादिलेंत. या यशास जोडाच नाहीं ! परंतु कैल्या मनसुबियाचा अर्थ किमपि लिहीत नाहीं ऐसें नसावें. सर्वदा आपलें कुशल वृत्त लिहित जाणें. तेणें करून संतोष होत जाईल. मोठाँ मनसबा कठीण होता. नानाप्रकारचीं येथें वर्तमानें उठतात. तुमचें पत्र तो येत नाहीं. याजमुळें चित्त चिंतेंत होतें. इरान *तुरान पावेतों लौकीक जाला कीं, वजीर मोडला, पळाँला असतां फिरोन फत्तेच्या मसनदीवर बसविला. याजहून यश कोणतें अधिक आहे ? या उपरि तेथील रंग भरून, स्वकार्य साधून, आपलें मुलुखांत येणें योग्य आहे. छ ७ रजब बहुत काय लिहिणें[५७]. लेखनसीमा.

[१६३] ॥ श्री ॥

राजश्री साँबाजी सिंदे गोसावी यांसि.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद सु॥ इसने खमसेन मया व अल्लफ तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं ऐसें नसावें. सर्वदां आपले कुशल वृत्त लिहीत जावें. यंदां सरदारांनीं मोठा अवघड मनसुबा करून, यमुना भागीरथी पार होऊन, पठाण रोहिल्याशीं गाठ घालून, युद्धप्रसंग करून पन्नास साठ हजार फौज बुडविली. तुम्हीं सर्व लोकांनीं जिवाची तमा न धरितां साहेब-कामावरीच दृष्टि देऊन शत्रु शासनाक्रांत केलात. तुमची निष्ठा दृढोत्तर, तद्योगें यश रामेश्वर इरान *तुरान

---

५५. संतोषाच्या कोटी=अति आनंद.

५६. दिलेरी-रुस्तुमेची=धारिष्टाची व पराक्रमाची.

५७. येथपासून खुद्द खाशांच्या हातचें अक्षर आहे.

५८. सफदरजंगास पठाण लोकांनी पदच्युत केलें होतें, त्यास पुनः वजीरी दिली.

५९. हें पत्र वाचून हल्लींच्या हतवीर्य लोकांसही क्षणभर स्फुरण येईल. तेव्हां ज्यांणीं असे पराक्रम केले त्या लोकांस हा स्वामिगौरव अमृताहूनही गोड लागून त्यांचें शरीर दुणावलें असेल यांत संशय नाहीं !

६०. साबाजी शिंदे हे राणूजीचे कोण हें समजत नाहीं. माऊसाहेबांच्या बखरींत साबाजी शिंदे यांस दादासाहेबानीं लाहोर येथें ठेविलें होतें असें आहे. भा० सा० ब० पृष्ट ५१ व ५७ पहा. तेच साबाजी हे असावे. हे हल्लीं जयाजी शिंद्यांच्या लष्करांत होते असें दिसतें.

६१. शिंदे होळकर.

६२. साहेब काम=स्वामिकार्य 'स्वामी साहेब इंरितः' रा० व्य० को०

* 'दुराण' असेंही होईल.

पर्यंत प्रफुल्लित जालें. शाबास सरदारांची! व शाबास तुम्हां लोकांची आहे!! दुसरियांस हें यश फार दुर्लभ असे. इकडील वृत्त राजेश्री जयाजी शिंदे यांस लिहिलें आहे. त्याजवरून कळेल. अतःपर माघारें यावें. रवाना छ २६ रज्जब बहुत काय लिहिणें. लेखन सीमा.

[१६४] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजीत रामामान्य राजश्री आपाराव स्वामींचे सेवेशीं.

पो। बाळाजी जनार्दन सां। नमस्कार विनंती उपरि येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष. तुम्हीं छ १४ सवाल छ २१।२४ व छ २९ जिलकादचीं पत्रें पाठविलीं ते पावलीं. तह प्रकर्णीं राजश्री पाटील बाबाचें व इंद्रसेनाचें बोलणें जालें त्यांतील मजकूर कलमबंदी लिहून पाठविला तो सविस्तर कळला. पाटील बावांनीं लिहिल्याप्रमाणें तहनामा व डौल शिक्यानशीं लौकर आलें पे।। येविशींचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास येविशींचे मजकुराचीं पत्रें पाटील बावाचीं ही तीन-चार रवानग्यांचीं आलीं. त्यांत लिहिलें कीं, " श्रीमंत दादासाहेबांस इंग्रजांनीं स्वाधिन करावें असें पक्कें करून घेतलें आहे व येथून कलमांची याद पाठविली होती त्यांपैकीं कांहीं कलमें बोलून करारांत आणिलीं आहेत. परंतु पूर्वी पारशी नक्कल तहनाम्याची येथें पाठविली, त्याप्रमाणें शिक्का करून तहनामा पाठवावा; व एक डौल शिक्का करून पे।। शिक्याचा तहनामा इंद्रसेनास *दाखवून. येणें करून त्यास इतबार पुरेल व जावयाची जलदी करणार नाहीं. हा तहनामा आम्ही आपल्या जवळ ठेवूं, त्यास देणार नाहीं. दादासाहेबांचें कलम वगैरे कलमें ठरावांत आलीं, त्याप्रमाणें डौलांत भरून त्याप्रमाणें इंद्रसेनाकडून कलम त्याचा तहनामा आणवून मग हा देऊं." असें लिहिलें. आणि मुदतीचीं पत्रें पाठविलीं. त्यावरून तहनामा शिक्यानशीं व डौल पो। आहे. परंतु दादासाहेब यांस अगोदर स्वाधीन करून घ्यावें. मग किल्ले मुलुख सरकारचा सरकारांत घ्यावा. तरच तह करावा. याप्रमाणें होत नसल्यास करूं नये म्हणून राजश्री पाटील बावाचे पत्रीं लिहिलें आहे व नारो शिवदेव यांस ही विस्तारें करून लिहिलें आहे. त्याजवरून तुम्हांस सविस्तर कळेल. तुम्हीही पाटील बावाशीं

६३. येथें बाजूवर पेशव्यांचा शिक्का आहे.

६४. पाटील बावा=महादजी शिंदे.

६५. इंद्रसेन–हा इंग्रजांचा वकील किंवा दुभाष्या. हा जातीचा कोण तें स्पष्ट कळत नाहीं. तरी बंगाली बाबू असावा असें अनुमान होतें.

६६. डौल=सही, शिक्का करून पाठविलेला कोरा कागद. आधर तहाचीं कलमें लिहून इंग्रजांचे तो स्वाधीन करावयाचा होता.

* म्ह० दाखवूं.

बोलून अमलांत आणावें. इंग्रजांचे तहाचें काम फार नाजूक व मोठें आहे. कोठें कसे पेंच बसतात व पुढें बसतील हें सविस्तर अर्थ मशारनिलेचे पत्रीं लिहिलें आहेत. सारांश दादासाहेब स्वाधिन होत असेल तरच [त] ह करावा व हैदरर्खानाचे कलमावा पर्याय लिहिला आहे. हीं दोन कलमें, वरकड साधेल तेथवर, याप्रमाणें जहालें तरच करावें. नाहीं तर करूं नये. मग श्रीमंतांचें दैव आहे. रवाना छ १५ मोहरम बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती. पौष शुद्ध ९ रविवार. मुक्काम बिलोटी [बलोटी, बेमटी?]

[१६५] ॥ श्री ॥

राजेश्री आपाजीराव स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि तुम्हीं छ ११ जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. धुं. ळपानीं इंग्रजाचे तरांडियांसि लढाई देऊन धरून नेलीं त्याविशीं इंद्रसेनास मुंबईकरानें वर्तमान लिहून पाठविलें. त्यानें राजश्री पाटीलबावास सांगोन पाठविलें. त्यावरून पाटीलबावांनीं स्वामींस पत्र लिहिलें आहे. व पांडुरंग रघुनाथ यांणींही सविस्तर लिहिलें आहे. त्यास कराराप्रमाणें गोष्टी अमलांत याव्या. धुळपास ताकिद होऊन तरांडीं माघारीं देवावीं म्हणून विस्तारें करून लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास धुळपानीं तरांडीं वरील सरदार व लोकसुद्धां दस्त केलीं ते तह जाला त्यापक्षीं सोडून द्यावयाचीं. त्यांत मुंबैकराचें पत्रही आलें. त्यावरून तेव्हांच धुळपास लिहून सोडून दिल्हीं. राजश्री पाटीलबावांस उत्तर लिहिलें आहे. रवाना छ १५ रज्जब हे विनंती.

[१६६] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अंबाजीपंत स्वामी गोसावी यांसि

सेवक बाजीराव साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशळ तागाईत ज्येष्ठ कृष्ण सप्तमी गुरुवार पर्यंत यथास्थित जाणून स्वकीय लिहिणें. विशेष—तुमचीं

---

६७. येथपासून खुद मानांचें अक्षर आहे.

६८. हैदरअल्ली म्हैसूरचा.

६९. सालप्याचा तह महादजीचे मार्फत इंग्रजांशीं झाला (१७८२) त्या संबंधाचें हें पत्र आहे. वरील आपाराव कोण तें समजत नाहीं.

७०. आनंदराव धुळप देवगडकर याजकडे पेशव्यांचे आरमाराचा भाग होता. धुळपांनीं इंग्रजांच्या तारवांशीं रत्नागिरीच्या मुमारास लढाई करून त्यांचा पुष्कळ नाश केला. या धुळपावरील एक पवाडा 'विविधज्ञानविस्तार' या पुस्तकांत छापिला आहे.

७१. तरांडीं=तारवें.

७२. दस्तकेलीं=जिकून घेतलीं.

७३. अंबाजीपंत पुरंदरे सासवडकर. यांस मां० ह० आबाजी असें म्हणतात ती चुकी होय.

दोन तीन पत्रें व बाळाचें पत्र व राजश्री सोमाचीं पत्रें ऐशीं कांहीं काल्हीं परवां ऐशीं पावलीं. त्यांत सारांश कीं, "छावणी केली उत्तम केलें. खर्चास व लोक राजश्री स्वामी पुरवितात. प्रतिनिधीस व सरलष्कर, कृष्णाजी दाभाडे रवाना केले. महाडास येतील. उदाजी चव्हाणाकडील कारकुनास सांगोन दोन हजार प्यादे आणविले आहेत तेही येतील. संभूसिंग चव्हाण यासही बोलाविलें आहे. तेही आलियावर रवाना होतील. सचिवासही निरोप दिल्हा." म्हणून सविस्तर लिहिल्याप्रमाणें कळलें. परंतु येथील मनसबा ऐसा आहे. शेखजीनी आम्हांस भेटले. खो क री ची वाट मात्र त्यांणीं दाखवून दिल्ही. काम करितां इतकेंच केलें. येथें येतांच दुसरे दिवशीं त्यास बोलावून हत्ती, वस्त्रें देत होतों. खर्चाची रदबदल करूं लागले. तेव्हां बोली करून तूर्त दहा हजार रुपये त्याचे पदरीं घातले. बहुमानासाठीं बहुतसा आग्रह केला. परंतु ते करून घेईनात. लोक कोणी त्याजवळ राहिले नाहींत. सारे उठ-उठोन आपापले कबिले काढावयास गेले. तेव्हां गड सुटले नव्हते. आतां गड सुटले. सारे कबिले मुलखांतच मागती राहिले. लोकांस मागती बोलावूं पाठविलें आहे. येतील तेव्हां खरें. पहिले लोक कोणी शें दोनशें भेटले त्यांस अटक करून ठेवावें तरि कौल दिल्हा कार्य होतें[७९] कौलाचेंच होतें यास्तव त्यास अटकही करितां नये. यास्तव निरोप दिल्हा. आंतील राजकारण होतें ते तो पहिलेच दिवशीं वारले. आतां प्रस्तुत कांहीं शेखजीच्यानें कार्य होत नाहीं. बरेंही वाटत नाहीं. चार महिने येथें राहिल्या उपरि 'मग त्यांच्यानें तरतूद होईल ते करतील. खर्चास मागतील तसें देणें लागेल. गड घेतले त्यापैकीं अर्वाचेतगड त्याचे हवाली कबिले ठेवावयास करावा असे झालें. तोही त्याचे हवाली केला. न करावा तरि बेदील होतो. करावा तरि ईतंबारही पुरेना. परंतु करणें प्राप्त झाला. केला. या जातीचे त्याचें वर्तमान आहे. खानजादा थोरला मेला. त्याचा लेक बाहेर होता तो आम्हांजवळ आहे. आणि लहान भाऊ त्याचे सहाजण आहेत. हाही मूल शहाणाच आहे. आंत सिद्दीसमूल व सिद्दीअंबर अ फ ला ही ऐसे आहेत. बाराशें माणूस किलियावर आहे. पहिले थोडके होते. आलीकडे अंजनवेली व *उंदेरीहून मदत त्यास आली. एकूण भरती झाला

---

७४. बाळा=बाळाजी बाजीराव.

७५. स्वामी=शाहू.

७६ हें पत्र हबशी याच्या मसलतीच्या संबंधाचें आहे.

७७. शेखजी--हा जंजिऱ्यांतील एक फितुरी.

७८. कबिले=कुटुंबें.

७९. येथें अक्षर गेलें आहे.

८०. इतबार=विश्वास.

८१. शिद्दीच्या मुलांपैकीं वडील.

* उंदेरी कीं खांदेरी तें स्पष्ट नाहीं. तरी पुढील संदर्भावरून उंदेरीच असावे.

ओह्र. अंजनवेलही मजबूतच आहे. उंदेरीही मजबूतच आहे. चारी जंजिरे[२] त्याचे बरे खबरदार मुसलमानच आहेत. अंजनवेलीस कांहीं मराठे असतील. त्यांकडे विजयगड, गोवळचा कोट दोन अहेतच. तिसरा मंडणगडही त्यानें बळाविला अहे. रायगडावर तीन चारशें माणूस मुसलमान आहेत. चार पांचशें मराठे आहेत. गड म[?] बळाविला आहे. जुंजतात. कांहीं पैगामही वरील लागला म्हणून गेले आहेत. ते लिहितात सत्य मिथ्या त ही कैं क तह किंवा नाहीं कळलें नाहीं. वर्तमान येईल तें लिहून पाठवून. ऐसें वर्तमान आहे. सविस्तर कळावें म्हणून लिहिलें असे. लोभ असो दिजे हे विनंती. छ २२ जिल्हेज शनवारें.

[१६७] ॥ श्री ॥

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५३ प्लवंग संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं* राजश्री अंबाजी त्र्यंबक यांसि आज्ञा केली ऐसीजे. मनसुब्यांचा अर्थ सविस्तर राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांस लिहिला आहे त्यावरून कळेल. तरि तुम्हीं पंडित मशारनिल्हेस चार गोष्टी विचाराच्या सांगोन अमित्राचे पिछावरि * * [८७]* कृ य त फितूर तुटे तो अर्थ करणें. तुम्हीं स्वामींजवळ बोलोन गेलां काय, करितां काय, हा विचार कळत नाहीं. राजश्री प्रधानाचे व राजश्री सेनापतीचे चित्तीं विचार काय आहे हा तरी शोध घेऊन लेहून पाठवणें. त्यावरून स्वामी निश्चिती मानितील. गुज काढावयाचा विचार चित्तांत येत नसेल तरि इलाज काय? वारंवार त्याहावयाची सीमा झाली. परंतु कार्यभागाचा विचार दिसत नाहीं. या उपरि तरि गुज काढावें. फितूर तुटावा ऐसें चित्तांत असेल तरि पत्रदर्शनीं फौजेनिशीं अमित्राचे पिछावर येऊन त्याची वाताहात करणें[८८]. बहुतें काय लिहिन.

---

८२. जंजीरा. जजीरा=पाण्यांतील किल्ला.

८३. तहकीक?= तथ्य, खरें वर्तमान

८४. हें सर्व पत्र बाजीराव बल्लाळ यांच्या हातचें आहे. अक्षर चांगलें वळणदार नाहीं. हें पत्र व पुढील कांहीं आम्हांस श्री० रा० नाना साहेब पुरंदरे सासवडकर यांणीं दिलीं ह्या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

*येथें कोरी जागा आहे.

८५ हा 'मनसुबा' कोणता ?

८६. अमित्र=शत्रु, गनीम.

८७. येथें कोरी जागा आहे.

८८. वरील सेनापतीच्या उल्लेखावरून हा त्यांचा फितूर निजामुल्मुल्क यांजकडे झालेला असावा असें दिसतें. तो फितूर नाहींसा करण्यास निजामावरच हल्ला करावा असा शाहूचे लिहिण्याचा भाव दिसतो.

८९. येथून खुद महाराजांचें अक्षर.

[१६८]

॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री नानें[10] यांसि बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें. विशेष. तुम्हीं पत्र छ २८ रविलाखरचें पाठविलें तें छ १२ जमादिलोवलीं सांडणीस्वाराहातीं येऊन पावलें. "गाईकवाडाचे आपले फौजेचें युद्ध छ २७ रबिलाखरीं झालें. गें ज्या [?] पावेतों मोडून तारान [ज?] केलें. त्याचे बुनगे तिजाई लुटून आणिले. उंटें, घोडीं, पालख्या घेतल्या" म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. लेखनार्थ-श्रवणें संतोष झाला. मोठी गोष्ट झाली. शाबास तुमची लोकांची! बरी केली! गायकवाड वेणेवर[11] राहिला, तुम्ही कृष्णेवर[12] आहां, म्हणोन सांडणीस्वारांनीं सांगितलें. त्यास राजेश्री मानाजी पायगुडे व तात्यांही[13] तुम्हांजवळ येऊन पावलेच असतील. सारे एकदील होऊन गायकवाडास जाऊं न देणें. जोर पोहोंचल्यास लुटून नेस्त नाबूत करणें. जों पर्यंत गायकवाड [याचा] वारापाणी झाला नाहीं तों फौज न फोडणें. आमचा मोंगलाचा सलूखा झाला. इकडील सर्व गुत्ते उरकले. आम्हीं मजल दरमजल येत आसों. आणि छ १२ जमादिलावलीं नि[13] जा कों ड्यावर मुक्काम झाला. जलदीनें येतों. गायकवाड जाऊं न पावे तें करणें. युद्ध-प्रसंगीं राजेश्री सोनजी भास्करें[14] व राजेश्री बापूंजी बावा व सरकारचे हुजूरातचे लोक व राजहुजूरातच्या लोकांनीं शर्त केली, बापूजी बावास तरवारीची जखम लागली, नागोरी[15] यास गोळीची जखम लागली, म्हणोन [लिहिलें] तर ते थोर थोर मातबर लोक प्रसंगीं असतां कां चुकतील? व पुढेंही सर्व प्रकारें त्यांचाच भरंवसा[16] असे. तुम्हीं सर्वांचीं समाधानें करणें. मोडली[17] बाजी तुम्हीं सांवरली! जी गोष्ट तुमचे वडिलांचे वडिलांस योग्य तें

---

१०. नाना पुरंदरे—यांस चिरंजीव लिहिण्याचें कारण असें कीं, अंबाजीपंत पुरंदरे व बाळाजी विश्वनाथ हे आपणास भाऊ भाऊ समजत व हाच घरोबा पेशव्यांनीं शेवटपर्यंत पुरंदऱ्यांशीं ठेविला होता. तेव्हां नानाकडे धाकटे भावाचें नातें येत असावें. याचें नांव त्रिंबक सदाशिव.

११. हें युद्ध बाळाजी बाजीराव हैदराबादेकडे असतां ताराबाईनें जें राजकारण केलें त्या संबंधाचें होय. यावेळीं नाना पुरंदरे व दुसरे सरदार यांणीं पेशव्यांची बाजू राखिली.

१२. तात्या कोण?

१३. 'नि' कीं 'जि'?

१४. 'भास्कर' आहे तेथें 'भापकर' असें असावें.

१५. हे बापूजी खंडेराव चिटणीस असावे. रामराजाचें चरित्र पहा.

१६. नागोरा कीं जागोरा? हा कोण?

१७. यावरून आपले लोकांवर पेशव्यांचा इतबार कसा होता तें समजतें.

१८. येथपासून खुद खाशांचे हातचा लेख आहे.

१९. असा स्वामिगौरव झाल्यावर सेवक सेवेंत तत्पर कां नसेल?

तुम्हीं केलें! या उपर बहुत सावधतेनें जरब देणें. मळमळीत न करणें. आम्ही येऊन पोहोंचतों. छ १४ जमादिलावल. हे आशीर्वाद.

[१६९] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अंबाजीपंत स्वामी गोसावी यांसि.

पोष्य बाजीराऊ बल्लाळ नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत जाणें. विशेष-तुह्मांकडून एक दोन पत्रें आलीं व चिरंजीव राजश्री चिमानी यांनीं लिहिलें त्यावरून सविस्तर अर्थ कळों आला. ऐसियासि मुलकाच्या बंदोबस्तावद्दल फौज या प्रांतें ठेवावी लागते. त्यास कांहीं फौज अंगेजणी[100] केलिया खेरीज राहते असें नाहीं. यास्तव तुमच्या आगमनाचा मार्ग लक्षावा लागला. तरि जेक्षणीं तुह्मांस पत्र पावेल ते क्षणीं अविलंबें स्वार होऊन आलिया उत्तम आहेत. पूर्वी हीं पत्रें पाठविलीं आहेत. परंतु यावयास विलंबावर घातलें. या उपरि दिरंग लावावा ऐसें न करणें. त्वरेनें आलें पाहिजे. तुम्ही येथें आलियावरि येथील बंदोबस्त तुमचे स्वाधीन करून राजदर्शनास जावें लागतें. ज्यांनीं रहावें त्यांनीं अंगेजणी करून बाकी भरावी आणि लोक ठेवणें तें तुमचे विचारें ठेवावे लागतात. आह्मांकडे सरकार इजारा करून घेतलें. दरगांवीची बोली औरंगाबादेस गेलियावरि करून ध्यावेशी केली आहे. तेही होईल. खर्च[3] प्रसंग इकडील अनुकूळ केला. परंतु तुमचे येण्यामुळें तटला आहे. तुम्हो आलियाविना कांहीं होत नाहीं. तरि लौकर लौकर येणें. आलियावरि तुह्मांस ठेऊन आम्ही हुजूर जाऊंन[3]. कळलें पाहिजे. विनीं तुम्ही आल्या खेरीज एक राऊत राहत नाहीं. कौठीजी कडील कारभार तसाच बुडतो. सर्व प्रकारें आमचा घात न करणें. लौकर येणें. कीं पुढें तरी मामलियाची सांवरासांवर होईल. वारंवार लिहावें तर अडलेंसें दिसतें. परंतु न लिहितां उपाय नाहीं. लौकर येणें. तुमचे येणें झाल्या खेरीज आमचें येणें होतच नाहीं. लोभ असों दीजे हे विनंती.[6]

[१७०] ॥ श्री ॥

चिरंजीव राजमान्य राजश्री महीपतराव त्रिंबक यांसि बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करणें.

---

१००. अंगेजणी=स्वतः हिमतीनें केलें कृत्य, साहस.

१. येथपासून लिहिणारानें मजकूर घातला लिहिला आहे.

२. इजारा=मक्ता.

३. जाऊन=जाऊ.

४. येथपासून शेवटपर्यंत खुद बाजीराव यांचें अक्षर आहे.

५. कंटोजी ? कदम ?

६. हें निकडीचें पत्र कोणत्या प्रसंगानें लिहिलें तें स्पष्ट कळत नाहीं. तथापि स्वानदेशांतून लिहिलें असावें.

विशेष. मोगलाशीं छ १५ जमादिलाँखर रविवार लढाई भारी होऊन दहा हत्तीवाले त्यांजकडील मारले. पाडीव हत्ती दहा व चार, पांच तोफा नाल्या. यात्रमार्णे मातबर लढाई झाली. तुम्हांस कळावें म्हणून लिहिलें आहे. चिरंजीव राजश्री नानां सुखरूप आहेत कळावें. जाणिजे छ २० जमादिलाखर सुरुसन सितैन मय्या व अल्लैफ. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. पो। छ २४ जमादीलाखर.

[१७१] ॥ श्री ॥

चिरंजीव राजमान्य राजश्री बज्याबा यांशि प्रति सदाशिव चिमणाजी आशीर्वाद उपरी येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष—तुम्हांकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरि वरचेवर सविस्तर वर्तमान लिहीत जाणें. आम्ही मजल दरमजल नर्मदापार झालों. पुढें ही दरकूच जातें असों. घोडयावर बसणें व लिहिणें, पढणें चांगलें करणें. तीर्थरूप बोलावतील तेव्हां पुण्यास जात जाणें. फार खेळत न जाणें. घरीं अबई मायेनें रागें भरणार नाहीं. लाडके व्हाल. तें कामाचें नाहीं. चांगलें लिहिणें, पढणें, घोडयावर बसणें करणें. छ. २ रमजान. हे आशिर्वाद. पो छ. २२ रमजान.

[१७२] ॥ श्री ॥

चिरंजीव नाना यांसि भाऊ. आशिर्वाद. सविस्तर तीर्थरूपांनीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. साशंश तुम्हीं सारे जमा करून काम उत्तमच जाहालें. सलीम[10] त वाढली. तरी बहुत विचारें हावभरी न होतां सर्व कामें करणें. आम्हींही दरमजल जसें वर्तमान येईल तसे फौज घेऊन पुढें येऊंन. रघोजी बावास विचारें करून राखिलें पाहिजे. हया आणलियां त्याचें काम बुडतें. पेंचही आहेत म्हणून निरोप दिला. फत्तेसिंगाचे फौजेंत त्रिंबक हरी व दारखोजी पाटील

---

७. जमादिलाखर कीं जमादिलावल तें स्पष्ट होत नाहीं.

८. पाडाव=हत्तगत.

९. नाना पुरंदरे बरोबर होते असें दिसतें.

* सितैन मया व अल्लफ=११६०=इसवी सन १७५२.

१०. यावरुन सोनपत पानपताच्या मोहिमेस जातांना हें पत्र लिहिलें असें होतें.

११. यावरुन बजाबा पुरंदरे या वेळीं लहान असून त्यांचे शिक्षणावर पेशव्यांची नजर होती असें दिसतें. शिक्षण कोणत्या प्रकारचें होतें तेंही त्या पत्रावरुन व्यक्त होतें.

१२. सलाबत=पगडा, दाब.

१३. हावभरी=दुर्धर आशेस भरलेला.

१४. येऊन=येऊं. हें पत्र १७५० सालीं गायकवाडाच्या मदतीनें व रामदासपंताच्या साहाय्यानें ताराबाईनें जें कारस्थान मांडलें होतें त्या वेळचें आहे.

१५. हया आणिलिया=त्रास दिल्यास.

१६. फत्तेसिंग भोसले.

१७ त्रिंबक हरी पटवर्धन.

सरदार ते अम्मचे बदल कदाचित राहिले तरि अक्कलकोटीं राहतील. फौज हर्यांच आहे. आठ कोस प्रमाणें दर मजल कडवे देशचा दाणा खात ताजे होत येतों. वरकड तपशील काय लिहावा ? हजार प्रकारें सारें एक होऊन, आपले फौजेचा गोंहा चांगला करून, आपण जरब न खातां जें होईल तें करणें. पायगुडे वगैरे फौजही सामील जाहलीच आहे. रवाना छ. १२ जमादिलावल. हे आशिर्वाद.*

[१७३] ॥ श्री ॥

चिरंजीव नाना यांसि भाऊ, आशिर्वाद सविस्तर मजकूर भेटी नंतर कळेल. वरकड तरतुदेचा मजकूर तीर्थरूपांनीं लिहिला आहे त्याप्रमाणें करणें. विशेष राजकारणांत असतील ते सविस्तर कोण कोणे प्रकारें व तुम्हांसीं ही दुसरे प्रकारें संदेहाचे लिहून पाठविणें त्याचा सुमार येथून केला पाहिजे तर सविस्तर लिहिणें. वरकड सातारां कजिया न पडावा. सर्व उत्तम. परंतु कालें करून प्राप्त जाहालें तें आपले इजेंती साठीं केलें पाहिजे. तुम्हीं बहुत सावधतेनें सर्व करावयाचा काल आहे. परंतु आलीकडे तुमचें सविस्तर पत्र येत नाहीं. उचित नाहीं. सर्व लिहून पाठविणें. आमची रवानगी पुढें तुम्हांकडे करणार याचाही विचार सर्व लिहिणें. सारांश इनाम देऊन रोजचेरोज येथें लवकर वर्तमान येई तें करणें. रवाना छ. २५ जमादिलावर. दादांस पांच सात रोज बरें वाटत नव्हतें. इकडील पाणियानें परसाकडेचें जाहलें होतें. आतां उतार पडून बरे जाहले. येथील फौज दरमजल येते ही खबर तेथें पावलियावर कोणें प्रकारें भाव होतात हें सर्व लिहिणें. वरकड हजार प्रकारें लबाड्या करणार आमचे दरबारीं गृहस्थ आहेत. तें चुकत नाहीं. सर्वही ईश्वर क्षेम करून परस्परें पेंच तुटतील. असो. पत्रीं विशेष काय लिहावें ? हे आशिर्वाद.

[१७४] ॥ श्री ॥

चिरजीव राजमान्य राजश्री नाना यांसि प्रति सदाशिव चिमणाजी आशिर्वाद उपरि येथील कुशळ जाणोन स्वकीय कुशळ लिहिणें. विशेष. तीर्थरूपांकडून पत्रें आलीं त्याचा वगैरे कित्येक अर्थ लिहिणें तो तुम्हांस लिहिलाच आहे. त्याचीं उत्तरें अद्यापी कांहीं येत नाहीं तरि सर्व वर्तमान लिहिणें. कर्नाटकच्या मामलियाची राजेश्रींचीं पत्रें वगैरे कामें यमाजी शिवदेव व पाटणकर यांचीं करून पाठवावीं तीं अद्यापी येत नाहीं. व पैक्याचे गोपाळराव वगैरे

---

१८. हयाच=दुर्दशेंतच.
१९. गाहा=एकीकरण, अथन राहणें.
* वर पत्र १६८ पहा.

२०. तीर्थरूप=नानासाहेब पेशवे.
२१. 'प्रतिष्ठा इजतिः स्मृता' रा० व्य० को०.

यांजकडील कोणाकडून काय येतो तो मजकूर सविस्तर लिहून पाठविणें. येथील विचार तर **मा च णु रा** हून कूच करून **भंडार** कवठें येथें आलों. येथें पांच सात मुक्काम होतील. पुढें होईल तें वर्तमान लिहिलें जाईल. मातोश्री आईसाहेब यांचा विचार काय? राजेश्री स्वामींची मर्जी कशी? वरकड सामादिकें[२२] कोण कसे आहेत याचा अंतर बाह्यता मजकूर लिहिणें. तुम्हीं सविस्तर मजकूर पुण्यास लिहित असल तेथील भाव भक्ति कळत असेल ते लिहिणें. येथें तीर्थरूपांनीं नायकाची समजावीस काढावी, सरंजाम द्यावा, पुढें त्यांनीं दाभाडियाचा कारभार उरकायाजोगी फौज गेलीच आहे तें करून आम्हीं जातों. ताराबाईची गडबड राहिलियास करनाटकांत पाय घालावा, बाबूजी नाईकानें भीकच मागावी हें बाबांचे मनांत व दाभाडे याचाही निकाल [करणें त्याचे] हजार विचारच होतात या मुळें होत नाहीं. तुम्हीं त्या शहावरच दररोज राहणें. इकडे आम्हांसच मातबर गुता पडालियास तुमचे तिकडे जाणें कळतच आहे म्हणून लिहिलें होतें. नाईकास तीन चार लाख यशवंतराव पवाराचा सरंजाम व कांहीं गुजरायेत द्यावें अशी मर्जी आहे. आम्ही या प्रमाणेंच करावें असें लिहिलें आहे. पवार कांहीं कामाचे नाहींसे दिवसें दिवस रूप दाखवितात. बाबा दाभाडिया पासून पैका घ्यावयाचा मनसुबा करतात; आम्हांसही लिहितात. आम्हीं कामाचे नाहीं, न करावें असें लिहिलें आहे. करूं दिलें, आव पुरला, तर जवळील गुत्ता उरकून पुढें जातील. नाईकाचे या प्रमाणें तीर्थरूपांचेच विचारेंच आहे. करतील. आम्हांस मग गुत्ता नाहीं. पैका मात्र पाहिजे. आठ नव लाख त्यांत बाबा तीन देतील वरकड तुम्हांस मी * * * येईल मजकूर लिहून पाठविणें. हे आशिर्वाद.

[१७५] श्री.

चिरंजीव राजश्री नाना यांसि बाळाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरि. तुमचे सविस्तर पत्रांचीं उत्तरें अलाहिदा लिहिलीं आहेत त्याजवरून सर्व कळेल. चिरंजीव भाऊसाहेब आल्याखेरीज तुम्ही हरगीज न व्हावें. त्या फौजेंत अवघा मदार तुमचाच आहे. तुम्ही आल्यानें ठीक पडणार नाहीं. राजश्री बापूजी नाइकास अजमेर पावेतों भाऊसाहेबांचे खबरीसाठीं रवाना करणें ते फलाणे ठिकाणीं आहेत अशी खबर आल्यावर यांस पाठवावयाची काय मजा? यास्तव

---

२२ सामादिक=मसलतींत असणारे?
२३ 'बाबा' कोण? रामचंद्रबाबा?
२४. हरगोज=सर्वथा?
२५ मदार—विश्वास, भरंवसा.

अगोदरच यांस पाठवावें हें उत्तम. छ. २९ रेंजब हे आशिर्वाद. महिपतराव पांड्या यास पत्रदर्शनीं पाठविणें. हे आशिर्वाद[२७].

[१७६] ॥ श्रीगणेशायनमः ॥ श्री श्री श्री श्री श्री ॥

महाराजाधिराज श्रीराजराजेश्वर गुणगुणालंकृत परमपवित्र श्री राजेसाहेब पंडित प्रधान श्रीमंत माधोराव साहेबजी जोग्य लिखितं–मुरली जोर्तेश रायके अनेक आशीर्वाद वाँचणें महाराजके गृह विचार करकै माघमास विषे पत्र भेजाथा सो महाराजने देखौं[२८] होगा. जानोजी घोसँ[३०]ले को ऐसे लिया जैसे सिंव्हके आगें मृग. मैने विचार लिखौं[३१]था महाराजपर मालूम है या नाही हमारा लिया जो कागद है उस्से अमानत् रखिएगा देखौं[३२] लेना. जद् लडाई फते करा करोगे तद् देखौं[३२] लेना. अब् और विचारांश लिया है बाडि बडी मुहीम और लडाईयाँ फते करोगे. जे तुमसे रूजू नही ते हाथ बांधके मिलेंगें. दुशमन भाग जावें, मारें जावें, पकडें जावें. जो मनसुबा बिगड गया होवे सो. श्रीमंतके हातसों सेंरै पातशाह वजीर चवकशी सों दोस्ती होवे. जँश[३३] तमाम शहरोंमे होवे. जो दुष्ट हैं सो दब् जावें. राजतेजकी वृद्धी होवे. जन्म पत्रकी नकल उतारकै भेज देवो. मूझे अपने इष्टकी शपथ है किसी कौं दिषावनेका नही. मैं तुह्मैं आसीर्वाद देता हों. छोटे *नानानें तुमारी कृपा हमपर कराई अब हं उमेदवार हैं हमपर मेहेरबानी करनी. हमारे नामपर जो पिंजमत फरमावो तिसकी सनद कर भेजों. पातशाहका और उमरावोंका जबाब सवाल इस ब्राह्मण कौं फरमाया. मैं निहाल भया मेरी फरदपर दसषत स्व हस्ताक्षरोंसे कर भेजों. जो षातरजमा सौं षबर सार जबाब सवाल भेजा करौं. पै॥ छ १५ सदरसला.

[१७७] ॥ श्री ॥

चिरंजीव राजेश्री नाना यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष. तुम्हांस जाऊन बहुत दिवस जाहले खांसा स्वारी कार्तीक बहुळ पंचमीस डेरे दाखल जाहले आजि कूच होऊन येवतावर मुक्काम होईल. फौज जमा होत चालली परंतु

---

२६. येथपासून खुद खाशाचें अक्षर.

२७. हें पत्र पाणिपतची लढाई झाल्यावर लिहिलेंसें दिसतें.

२८. हे 'मुरली ज्योतशराज' कोण होते तें कळत नाहीं. तरी प्रयाग किंवा काशी येथील असावेसें वाटतें.

२९. देषा=देखा.

३०. 'घोसले' बदल 'भोसले' असावें.

३१. लिषाथा=लिखाथा. पुढेंही 'ष' बदल 'ख' समजावा.

३२. म्ह० देख लेना.

३३. जश=यशकीर्त.

* छोटे नाना=नाना पुरंदरे.

मुक्काम होत नाहीं. दरमजल कृष्णातीरास जातों. तुम्हीं मुक्काम होतील, सावकाश जाऊं, ह्मणोन चित्तांत आणाल. तर न आणितां सत्वरें येऊन स्वारीचे मुहूर्तें करून लष्करांत येऊन पोहचणें. विलंब न लावणें. चौकरीचे दिवसांत नेहमीं यात्रे समष्टीन रहाणें. पत्र पावतांच सत्वर येणें. रवाना चंद्र १९ जमादिलावर बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

[१७८] ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री महिपतराव त्रिंबक यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशीर्वाद उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जाणें. विशेष–राजश्री स्वामींस किल्ल्यावर नेऊन ठेवणें आणि तुम्हीं निघोन पुण्यास येणें. हे आशिरवाद रवाना छ १९ सवाल. हे आशिरवाद.

[१७९] ॥ श्री ॥

चिरंजीव राजमान्य राजश्री महिपतराव त्रिंबक यांसि माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणें. विशेष. तुम्ही विनंती पत्र पाठविलें तें प्रविष्ट झालें. राजश्रींस किल्यावर न्यावें त्यास ते किल्यावर जात नाहीं या अन्वयें राजश्रीचे जाबसाल कित्येक तपशीलवार लिहिले ते सविस्तर कळले. ऐशियास राजश्रींस आरोग्य झालेंच आहे. तरि हर तजवीज करून किल्यावर घेऊन जा[1]. तुम्हीं आपला मजकूर हुजूर येण्याविषयीं लेखन केला त्यास तुम्हीं तूर्त न येणें. रवाना छ ६ जिलकाद बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

[१८०] ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री नाना यांसि प्रती माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहिणें. विशेष. सरकारचा जामदारखाना पुरंधरीं पेशजी होता तो प्रस्तुत कोठें आहे, जिन्नस व दागिने काय काय आहेत, ते सर्व तुह्मांस ठाऊक आहेतच. हल्लीं तो जामदारखाना कोठें आहे तो लिहून पाठविणें. जामदारखानियांत दागिने व जिन्नस जो असेल त्यांची कुल[2] याद लिहून पाठविणें. तुमचे समजाविशीचा प्रकार कसा झाला हें लिहिणें. तुम्ही याल कधीं हें कळलें नाहीं. तरि सत्वर लिहिणें. रवाना छ १४ साबान बहुत काय लिहिणें हे आशिर्वाद.

[१८१] ॥ श्री ॥

चिरंजीव राजश्री बज्याबा यांसि प्रती माधवराव बल्लाळ प्रधान आशिर्वाद

---

१. यायरून माधवरावाची तंबुफ व शिपायगिरी कशी होती तें थोडेंसें समजेल.

२. येथून खुद्द खाशांचें अक्षर.

३. कुल्=सर्व, तपशीलवार.

उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्रीस वर न्याययाचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास आमचें येणें तिकडे होईल असा निश्चय नाहीं. यास्तव पाहिलें लिहिलें आहे त्याप्रमाणें सत्वर करणें. कां कीं प्रस्तुत काळ खालीं राखावयाचा नाहीं. यास्तव लिहिल्याप्रमाणें करणें. वरकड चाकरी करून दाखवावी ह्मणून लिहिलें त्यास तुमच्या स्वरूपास हेंच योग्य आहे कीं आपल्या मातबरी सारखी चाकरी करून दाखवावी. एतांतच सर्व आहे. कोणी ह्मणतात कीं चाकरी करतों हेंच मोठें काम आहे. असेही कित्येक आहेत. आपलें स्वरूप काय आणि सरकारची तैनात काय खातों हें मनांतच येऊं नये आणि जी चाकरी करतों हें फार मानून कित्येक आहेत. तुमची उमेद आहे याचप्रमाणें काम तुह्मांपासून घ्यावें हेंच मनांतून येथून ही आहे. समयानसार व प्रसंगानसार घडेल. तुमची मातबरी अशी आहे कीं सर्वांपेक्षां चाकरी अधिक करावी. यांतच स्वरूप आहे. बाबापासूनही असेंच आहे. पत्र फाडून टाकणें. दीक्षितासी बोलून निरोप दिल्हा आहे. येतील. तुम्हीं त्यांचें स्वरूप राखीत जाणें. बाहेर वांकडे न पडे तें करणें. अधिक उणें आढळेल तें निराळें पत्र पाठवीत जाणें. पत्र दुसऱ्यास नच कळावें. येथून माझ्या आंतचें[37] जाईल तें अथवा तुमचें दोन्ही पत्रें नच कळावीं. महिनाभर राहणें. कन्यागताचें स्नान करून येणें. खाना छ ५ जिल्काद हे आशिर्वाद.

[१८२] श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री त्रिंबक सदाशीव स्वामी गोसावी यांसि पोष्य नारायणराव बल्लाळ नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुम्हांकडून पत्र येऊन शरीरप्रकृतीचें वर्तमान कळत नाहीं तर तुमची शरीरप्रकृति कशी आहे तें सविस्तर लिहून पाठविणें. तीर्थरूपांकडील वर्तमान तर जुंज होऊन दादासाहेबांची फौज लुटली. दादासाहेब किल्यावर गेले. एक दिवस मध्यें जाऊन दुसरे दिवशीं भेटी झाल्या. दादासाहेबांनीं तीर्थरूप रावसाहेबांचे स्वाधीन किल्ले, कोट, मुलूख वगैरे सर्व कारभार केला[38]. हें सविस्तर वर्तमान राजश्री बजाबांनीं लिहिलेंच असेल. खाना छ २० मोहरम गुरुवार संध्याकाळ बाकी दिवस प्रहर. बहुत काय लिहिणें हे विनंती. पौ. छ. १ माहे सफर.

[१८३] श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री बजाबा स्वामी गोसावी यांसि पोष्य

---

३७. 'हातचें' या अर्थी.

३८. हें पत्र घोडपच्या किल्याजवळ दादांच्या फौजेचा मोड झाल्यावर लिहिलें आहे.

नारायणराव बल्लाळ नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष—तुम्हीं पत्र पाठविलें तें पाक्लें. तीर्थरूपांनीं चेदया घोडयानिशीं शिरें वेतल्याचें सविस्तर वर्तमान विस्तारें कडून लिहिलेत तें कळलें. असेंच सदैव तिकडील वर्तमान व तीर्थरूपांची शरीरप्रकृत सदोदित लिहीत जाणें. आम्ही लष्करांतून निघालों ते फाल्गुन शुद्ध दशमीस गंगापुरीं पावलों. रवाना छ ११ माहे सवाल सुरू सन सबा सितैन मया [व] अलफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[१८४] श्री.

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यांसि सदाशिव चिमणाजी आशिरवाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्रीचें लक्ष सर्व प्रकारें आहे. तीर्थरूपांचा विचार कळतच आहे. याचे कितेक प्रकारचे पेंच पडणार. त्याचा अर्थ राजश्री गोविंदराव यांणीं व तुम्हीं लिहिला तो कळला. ऐशियास तुम्हीं लिहिल्या गोष्टी सर्व यथार्थच आहेत. त्यास दाभाडियाकडील कारभार निरगमांत न ये. मनसुबियास तोड पडेना. वगैरे कितेक पेंच उलगडले पाहिजेत. यास्तव मानाजी पायगुडे व हरी राम यांस हजार तीन पावेतों फौजेनशी चारणेचे काठीं पाठवून आम्ही पुणियास गेलों. तिकडील मनसुबा लवकर उलगडून बाकी फौज पुढें कर्नाटक प्रांतीं जावयास येतां त्यास तुम्हीं सर्व प्रकारें राजश्री स्वामींचें लक्ष आपले चरि कायम राही ते गोष्ट करणें. त्यांत अंतर पडूं न देणें. आणि वर्तमान लिहिणें तें पुणियाकडे लिहीत जाणें. आम्ही पंढरपुरापलीकडे कुरुल्याजवळ आलों. पांच सहा दिवशीं तीर्थरूपांजवळ पोहोंचतों. पैकाही पाठविणें तो पुणियाकडे पाठविणें. सातारियाचेंही बंड मोडलें पाहिजे. मूळ दाभाडे. तेथें कांहींच होईना, करीनात, मनासही नये, संशयच वाढतात. यास्तव जाऊन नीट करून होईल तें लेहून पाँठवून. दुसरे रविवारचें पत्र पाठविलें तेंही पावलें. सर्व कळलें. कान्होजी बावाजवळ मातुश्रीचे भाव निघाले व राजश्रीचा निरोप वगैरे सर्व लिहिलें तें कळलें. तुम्हीं बोललां ऐशियास हा डौल कामाचाच नाहीं. मातुश्रीस नीट सांगून राजश्री सोडावे लागतील. याचें पुण्याहून लिहून पाठवूं त्याप्रमाणें करणे. मुख्य राजश्रीचा लगाम पुर्ता राहे तें करणें. हें काम तुमचे हातीं आहे. जरूर याप्रमाणें करणें. मोठी गोष्ट आहे. हजारा भो तें नें खर्च वेच करून, वरतीं आपलीं मायेचीं माणसें पाठवून लगाम राखणें.

---

३१. चढया घोडानिशीं=घोडयावरून न उतरतां, एकदांही दम घेतल्यावांचून.

४०. पाठवून=पाठवूं.

परचेवर सर्वां मुतसद्दियांचे भाव लिहिणें. मजवळ संदेह तुम्हांस वाटतो. ईश्वरी जुलूम आहे! असें न करणें. सविस्तर लिहिणें हें आशिर्वाद.

[१८५] ॥ श्री ॥

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ८१ चित्रभानुनामसंवत्सरे मार्गशीर्ष शुद्ध १० भृगुवासरे क्षत्रिय-कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति स्वामी यांनीं राजमान्य राजश्री त्रिंबक सदाशिव यांसि आज्ञाकेली ऐसीजे, विजयादशमाचे सुमुहुर्तें स्वामी सिंहासनारूढ जहाले, हे संतोष वर्तमान तुम्हास कळावें म्हणून आज्ञापत्र सादर केलें असे व राजश्री माधवराव प्रधान व वरकडांस आज्ञापत्रें सादर झाल्या आहेत. तुम्ही राज्यांतील एकनिष्ठ सेवक आहां तरि आपणाकडून सविस्तर वर्तमान लेंहून विनंती पत्र पाठवून स्वामींस संतोष पाववणें. तीर्थरूप श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब यांचें आज्ञापत्र सादर आहे त्याव-रून कळेल. राजश्री महादजी राव [?] मोरे व मल्हार महादेव पे॥ आंहत, जाणिजे.

[१८६] ॥ श्री ॥

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री कृष्णराव नारायण स्वामी गोसावी यांसि पोष्य बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. शहर सातारा येथील बंदोबस्तास चिरंजीव राजश्री त्र्यंबकराव महिपत पुरंदरे यांजकडील सरंजामी पतकाचे स्वार एकशें पाठविले असत. तर याजकडील एकशें स्वार घोडे राऊत चांगला पाहून गणती घेऊन चाकरी घेत जाणें जाणिजे. चंद्र ७ सवाल सु॥ इसने मयां तैन व अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

[१८७] राज* ॥ श्री ॥

राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरि. राजश्री पाटील बावांची पत्रें येतात कीं, इंद्रसेन निरोपाची

---

४१. हें पत्रही राम राजास आपल्याकडे वळवून ठेविण्याबद्दल आहे. ताराबाईच्या मनांत रामराजास जवळ घेऊन आपलेया मताप्रमाणेंच सर्व कारभार करावा असा जो हेतु तो मोडून काढण्याविषयीं सर्व प्रयत्न करणें अशा भावाचें हेंही पत्र आहे.

४२. पत्र [१६६] पासून या पत्रापर्यंत सर्व पत्रें श्री० रा० नाना साहेब पुरंदरे सासवडकर यांजकडून मिळालीं. या पत्रांच्या नकला करून घेऊन अस्सल पत्रें पुरंदरे यांजकडे परत दिलीं.

* या व पुढील बऱ्याच पत्रांवर या कोपऱ्यांत 'राज' अशीं अक्षरें आहेत. त्यांचा अर्थ 'राजकारणी' असा असावा.

४३. नारोपंत हे नाना फडणिसांच्या मार्फत महादजी शिंदे यांजकडे वकील होते हें पत्र व पुढील दोन पेशव्यांचा व इंग्रजांचा तह १७८२ सालीं झाला त्या प्रसंगीं नानांनीं लिहिलीं.

४४. पाटीलबावा=महादजी शिंदे. यांस पाटील म्हणून घेण्यांत फार प्रतिष्ठा वाटे.

४५. इंद्रसेन=अंदरसन. हा इंग्रजी वकील शिंद्यांचे मार्फत पेशव्यांशी तह करण्यास आला होता. याचें पूर्ण नांव डेविड अन्-

जलदी करितो, पुण्याहून पत्रें येतात त्यांत निश्चय ठरून लिहीत नाहींत, म्हणोन वारंवार लिहितात. त्यास तुम्हांकडे इंग्रजांचा तह करण्याचें कलमबंदीचें पत्र पूर्वी पाठविलें व निदानपक्षही लिहिलाच आहे. त्यास मुख्य सरकारचा मुद्दा श्रीमंत राजश्री दादासाहेब व साष्टी. त्यास साष्टी तर होत नाहीं. त्यास दादासाहेब कुटुंबसुद्धां इंग्रजांनीं हवालीं करावे याप्रमाणें तहनाम्यांत ठरावून वरकड कलमांपैकीं जेथवर होईल तेथवर करारांत आणून आधीं दादा आलियावर मग ठाणीं मुलूख घेणें तो घ्यावा. असें जाहालें तरच तह करावा. दादांचें कलम मळमळीत लिहिलें आहे तसें असल्यास तह करणें ठीक नाहीं. चहूंकडील दोष मसलतीस येऊन, सरकारांत गाडेरा[30]कडून उदिष्टन[48] आला त्याचे बोलण्यांत दादा व साष्टीही द्यावयाचें होतें. परंतु राजश्री पाटील बावांकडे कलकत्त्याहून इंद्रसेन आला आहे तेंही राजकारण सरकारांतचें[49] आहे असें जाणून व नबाब भोंसलेही इंग्रजांचे तहाविशीं बोलत होते तें न ऐकून उदिष्टिनास निरोप दिला. आणि हल्लीं दादा हवालीं करून घेतल्या खेरीज तह केला असतां आपले सरकारचे मसलतीसही कांहीं न जाहालें. आणि नबाब भोंसलेही काय म्हणतील? हैदरखानाचा मुद्दा कांहींच न जाहाला तेव्हां खान तो फारच वाईट मानतील[50]. हे अर्थ पुरते ध्यानांत आणावे. दुसरें, साष्टीचा मुद्दा सरकारचा होत नाहीं व अंतरवेद वगैरेही कलमांत नुकसान्या. व हैदरखान घरीं[51] जाहला त्याचे कांहींच नाहीं. त्यास करार असतां तोडावें. फेरा[52]शीज ही येणार त्यांचें राजकारण तोडावें. इतक्या गोष्टी कबूल करून दादांचेंही कलम मळमळीत. जोंहीराणा[53] मात्र तहाचा होऊन हैदरखान उगाच सोबती आहे तो नाहींसा होईल आणि आपले घरचें खूळ दादा येणार नाहीं. बाहाणे हजार लावतील. बिनसल्यास मसलतही फिरोन उभी राहील. याकरितां दादासाहेबांस इंग्रज कुटुंब सुद्धां निखालस हवालीं करीत असेल तर तह करावा, नाहीं तर करणें ठीक नाहीं, याप्रमाणे सांगावें. तुम्हांकडील पत्रें आलीं त्यांचीं उत्तरें मागाहून सविस्तर लिहून पाठवूं. तुम्हांस हा मजकूर जलदीनें

---

२६. या पुढें पत्र फाटलेलें आहे.

२७. गाडर=जेनरल गोदर्द साहेब.

४८. उदिष्टन हा कोण ? मि० आथर्स्टन तर नव्हे ?

४९. सरकारांत=पेशव्यांकडे.

५०. या वेळीं निजाम अल्ली, हैदर व मराठे असे मिळून इंग्रजांविरुद्ध कट करण्याचें ठरत होतें. तेव्हां हैदरास सोडून तह करणें ठीक नाहीं असा नानांचा भाव. इकडे हैदरानें तर इंग्रजांचा फार नाश केल्यामुळें त्यास ते या तहांतून गाळूं लागले. सन १७८०।८१

५१. परीक=वांटेकरी.

५२. फरासीस=फ्रेंच लोक.

५३. जाहिराणा=प्रसिद्धि.